VOLUME 6 ISSUE 3 MARCH 2021

Progressive Education Society's

Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous)

Shivajinagar, Pune-411005. Maharashtra

MODLIB E-Bulletin of Library and Information Centre

Published by : Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous) , Shivajinagar, Pune-05.

Editor : Dr. Shantashree Sengupta, Librarian.

Coverpage Image designed by : Prof. Sameer Nerlekar, Assistant Professor, Department of Animation.

Editorial Assistant : Mrs. Sarika Sable.

Website : http://www.mcasclib.com/ ; **E-mail:** librarian@moderncollegepune.edu.in

Table of Contents

Sr. No.	Title	Page No.s
1	Article by Honorable Prof. Dr. Gajanan Ekbote Sir	4
2	Work of Appreciation by	
	- Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam	5-7
	- Prof. Dr. Nivedita Ekbote Madam	8
3	Congratulations to Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam and Prof. Dr. Nivedita Ekbote Madam	9
4	State Level Webinar on International Women's Day : 08th March 2021	10-12
5	Article on Career Opportunities in Animation by Prof. Shamkant Deshmukh Sir	13
6	Report of the Institutional Repository : March 2021	14
7	Events conducted by NSS	
	- World Forestry Day and World Water Day	16
	- Shaheed Din	17
8	Events conducted by Library and Information Centre	
	- Yashwantrao Chavan Jayanti	18
	- Shaheed Din	19-20
9	Events and Activities organised by Departments	
	- Department of Marathi	22-24
10	Modern Achievements	
	- Prof. Sameer Nerlekar	26-27
11	Newly added books in the Library	28
12	Newspaper Clippings	
	- Related to MCASC Pune-5	30-34
	- Education	35-108
13	Shraddhanjali	
	- Late Subash Puri, Alumni of MCASC Pune-5	109
	- Late Vishnupant L. Avhad, Ex– Office Superintendent, MCASC Pune-5	110
14	Upcoming Events of April 2021	111

आदरणीय प्रा.डॉ.गजानन एकबोटे सर, कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी यांचा दैनिक महाराष्ट्र टाईम्स मधील लेख

21-3-21 म.टा.

वेगाने लसीकरण गरजेचे

आटोक्यात येत असतानाच करोनाचा प्रादुर्भाव पुन्हा वाढत आहे. ही दुसरी लाट आहे का, त्याची कारणे आहेत आणि या काळात काय काळजी घ्यावी आणि लसीकरण याबाबत सर्वांच्या मनात विविध प्रश्न आहेत. याबाबत नेहमी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची ज्येष्ठ वैद्यक व्यावसायिक आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांनी दिलेली उत्तरे...

■ भारतामध्ये करोनाची दुसरी लाट आलेली आहे काय?

करोनाची दुसरी लाट आली असून वेगाने नवीन रुग्णसंख्या वाढत आहे, त्याची तुलना मागील वर्षीच्या पहिल्या लाटेबरोबर करावी लागेल.

■ सप्टेंबरमध्ये दररोज २५ हजार एवढी नवीन रुग्णाची संख्या होती. दुसऱ्या लाटेत एवढी रुग्णसंख्या होण्याची शक्यता आहे का?

होय. लोकांचा निष्काळजीपणा व बेजबाबदार वागणुकीमुळे लवकरच आपण दैनंदिन २५ हजार हा आकडा गाठलेला दिसेल. १६ मार्च रोजी महाराष्ट्रातील नवीन रुग्णांची संख्या १७ हजार एवढी होती.

■ असे असेल, तर पहिल्या लाटेपेक्षा दुसरी लाट वेगळी कशी?

दुसऱ्या लाटेचा विषाणू पहिल्या लाटेपेक्षा कमी धोकादायक आहे. दुसऱ्या लाटेचा मृत्यूदर एका टक्क्याहून कमी आहे. महाराष्ट्रातील ३-४ जिल्हे सोडता इतरत्र मृत्यूदर कमी आहे.

■ राज्यातील दुसरी लाट कशामुळे? धोरणात्मक निर्णयाच्या चुकीमुळे?

महाराष्ट्रामध्ये अनेक कारणांमुळे दुसरी लाट आलेली आहे. त्यामध्ये वातावरणातील व हवामानातील बदल, महाराष्ट्राचा निरनिराळ्या देशांशी येणारा संपर्क (उदा. मुंबई शहर आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक देशांशी हवाईमार्गे जोडले गेले आहे.) अवकाळी पाऊस, थंडीचे वाढलेले प्रमाण हीसुद्धा कारणे असून मोठमोठ्या शहरातील लोकांची बेजबाबदार वृत्तीसुद्धा या दुसऱ्या लाटेला कारणीभूत आहे.

■ लॉकडाउन उपयोगी ठरेल?

टाळेबंदीमुळे लाट तात्पुरत्या प्रमाणामुळे थांबेल. टाळेबंदीचा मुख्य उपयोग आरोग्यविषयक पायाभूत सुविधा निर्माण करणे किंवा वाढविण्यासाठी मुदत मिळण्यामध्ये होतो. गेल्या वर्षभरात या सुविधांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. टाळेबंदीमुळे देशाच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर प्रचंड परिणाम होतो, हे गेल्या वर्षी सर्वांनी अनुभवले आहे. त्यामुळे दुसरी लाट थोपविण्यासाठी टाळेबंदी हा उपाय निश्चितच नाही. दुसरी लाट थोपवण्यासाठी खालील गोष्टींचा अवलंब करणे योग्य आहे.

१) समाजातील ज्या व्यक्तींमध्ये करोनाची लक्षणे दिसत नाहीत, अशा व्यक्तींना शोधून काढणे, २) करोनामुळे घरात विलगीकरणात राहून उपचार घेत असलेल्या आणि त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची नियमित तपासणी, चाचण्या करून घेणे, ३) देशामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी तापावर उपचार देणारी आरोग्य केंद्रे व सुविधा केंद्रे (फीव्हर क्लिनिक) वाढविणे हे प्रभावी उपाय ठरू शकतात.

■ लसीकरणाचा नेमका परिणाम काय होणार?

दुसरी लाट थोपविण्यासाठी लसीकरण हा एक प्रभावी उपाय आहे. लसीकरणामुळे करोनाविरुद्धची प्रतिकारशक्ती ज्यांच्या शरीरात निर्माण झाली आहे, अशा व्यक्तींची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे लसीकरण वेगाने केले पाहिजे. 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च'च्या (आयसीएमआर) संशोधनानुसार भारतात अनेक ठिकाणी २० टक्के व्यक्ती करोना बाधित झालेल्या आहेत. या सर्व व्यक्तींमध्ये करोना विरुद्धची प्रतिकारशक्ती निर्माण झालेली आहे. परंतु, ही संख्या आणखी वाढवायची असेल तर, त्यासाठी लसीकरण हा प्रभावी उपाय आहे.

■ असे असेल, तर लसीकरण सर्वांसाठी का नाही?

आपला देश हा १३८ कोटी लोकसंख्या असलेला आहे. प्रामुख्याने वृद्ध व्यक्तींमध्ये त्याचप्रमाणे कॅन्सर, मधुमेह, बी.पी., टी.बी. इत्यादी सारखे विकार यांमुळे प्रतिकारशक्ती कमी झालेल्या व्यक्तींमध्ये करोनाचा संसर्ग लवकर होतो. त्याचप्रमाणे करोना योद्ध्यांनाही (डॉक्टर, नर्सेस, वॉर्डबॉय) संसर्ग लवकर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लसीकरणाच्या पहिल्या टप्प्यामध्ये वरील सर्व व्यक्तींचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे लसीकरणानंतर प्रतिकारशक्ती किती प्रमाणात वाढते, लसीचे काही दुष्परिणाम होतात का, लसीकरण कितपत सुरक्षित आहे, याबद्दलही अभ्यास सुरू आहे. या सर्वांचा अहवाल पुढील एक-दोन महिन्यांत येईल. त्याचप्रमाणे दोन महिन्यांत सर्वसामान्य जनतेला उपलब्ध होतील एवढे डोस भारतामध्ये तयार होतील, असा अंदाज आहे. त्यामुळे दोन महिन्यांनंतर करोनाची लस सर्वसामान्य जनतेला उपलब्ध होईल, असे वाटते.

■ करोनाची लस घेतल्यानंतर प्रतिबंधात्मक उपायांचा अवलंब करावा का?

होय. कोणतीही लस ही शंभर टक्के परिणामकारक नसते. लस घेतल्यानंतर करोना होण्याचे प्रमाण कमी असले तरी, ही शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे लसीकरणामुळे प्रतिकारशक्ती किती प्रमाणात वाढलेली आहे, ती किती दिवस टिकणार आहे, याबद्दल संशोधन सुरू आहे. याचा अहवाल अद्याप झालेला नाही. त्यामुळे लस घेतल्यानंतरही सुरक्षित अंतर ठेवणे, मास्क वापरणे, साबणाने हात वारंवार धुणे, वैयक्तिक स्वच्छता राखणे बंधनकारक आहे.

■ ज्यांना रक्त पातळ होण्याच्या गोळ्या सुरू आहेत, अशांसाठी लसीकरण सुरक्षित आहे का?

रक्त पातळ होण्यासाठी ॲस्पिरिन किंवा क्लोपिडिग्रेल ही औषधे वापरली जातात. हृदयविकार असलेल्या व्यक्तींना ही औषधे बंधनकारक आहेत. अशा व्यक्तींसाठी लसीकरण पूर्णपणे सुरक्षित आहे. अशा व्यक्तींचा रक्तदाब सामान्य असेल, तर लसीकरणानंतर कोणताही त्रास होत नाही.

■ राज्यात सर्वाधिक रुग्णसंख्या असण्याचे कारण काय?

देशातील एकूण रुग्णांच्या ६२ टक्के रुग्ण महाराष्ट्रात आहेत. अवकाळी पाऊस, बदलते तापमान, लोकांची बेजबाबदार वृत्ती, उद्योगधंद्यांमुळे नोकरी-व्यवसायानिमित्त मुंबई-पुण्यासारख्या शहरांतील परप्रांतीयांची वाढलेली संख्या, मुंबईत लोकलमधील प्रचंड गर्दी यांमुळे करोनाच्या बाबतीत महाराष्ट्र 'आघाडीवर' आहे.

■ कोणते निर्बंध असावेत?

सभा संमेलने पूर्णपणे रद्द करावीत, लग्न समारंभास परवानगी देताना केवळ २५-३० व्यक्तींच्या उपस्थितीचे निर्बंध घालणे, शाळा-महाविद्यालये पूर्णपणे बंद ठेवणे, वेगवेगळ्या ठिकाणी नोकरीस असलेल्या कर्मचाऱ्यांना दोन पाळ्यांमध्ये नोकरीस बोलवणे, सार्वजनिक स्वच्छतागृहे वारंवार साफ करणे, ज्या व्यक्तींचे विलगीकरण केलेले आहे आणि जे घरीच उपचार घेत आहेत, त्यांच्यावर कडक निर्बंध ठेवणे, करोनाबाबत उपचार देणाऱ्या केंद्रांची संख्या वाढविणे, अंत्यविधीच्या वेळेला केवळ १०-१५ व्यक्ती उपस्थित राहतील, असे निर्बंध घालणे आवश्यक आहे. या सर्व शहरांतील सर्व आरोग्यसेवक, शाळा-महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, बँकांमधील कर्मचारी यांचे प्राधान्याने लसीकरण करून घेणे, ज्या ठिकाणी गर्दी जमते अशा ठिकाणी कडक निर्बंध घातले जाणे आवश्यक आहे.

Maharashtra Times 21.3.2021

Work of Appreciation– Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam

शिवाजीनगर येथील दळवी हॉस्पिटल येथे कोविड 19 लसीकरण कक्ष चालू करण्यात आले. या लसीकरण कक्षाची पाहणी नगरसेविका मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांनी नगरसेविका सौ.नीलिमा खाडे, सोनाली लांडगे यांच्या सोबत केली. यावेळी शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय सहा.आयुक्त मा.सौ.आशा राऊत, वरिष्ठ आरोग्य अधिकारी मा.डॉ.संतोष मुळये, मा.डॉ. मृणालिनी कोलते व इतर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी या लसीकरण कक्षात उपस्थित होते. याठिकाणी नागरिकांची प्रचंड गर्दी झाली होती. ही लसीकरण मोहिम वय 45 ते 59 मधील नागरिकांना काही व्याधीचे आजार असल्यास लस प्रथम प्राधान्याने देण्यात येत आहे. त्याच बरोबर वय 60 पुढील नागरिकांना नियमितपणे देण्याचे महापालिकेने ठरविले आहे. कोविड लस पूर्णपणे सुरक्षित आहे. लस घेतल्या नंतर नागरिकांनी काळजी घ्यावी. प्रशासनाला लसीकरण मोहिमेत सहकार्य करावे ही विनंती.

Date: 4.3.2021

Work of Appreciation– Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam

सकाळ

राजकारण, समाजकारणातील सक्षम नेतृत्व

मानवी जीवनाचा पूर्णांक असणारा छेदक अंश म्हणजे स्त्री ! ती आई असते, पत्नी असते, स्नुषा आणि बहीणही असते. पण, जेव्हा ती समाजातील दुःखितांची, पीडितांची सेवा करते, तेव्हा ती आयुष्याच्या एका वळणावर उभी असते. नगरसेविका **प्रा. ज्योत्स्ना एकबोटे** यांचाही प्रवास असाच आहे.

८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात आज असे कोणतेही क्षेत्र नाही, ज्यात महिलांचा सहभाग नाही. त्याला ज्योत्स्नाताई कशा अपवाद असतील. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा त्यांनी उमटविला. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवणाऱ्या तसेच सामान्य माणसाला दिलासा देणारे हे व्यक्तिमत्त्व आहे.

फर्ग्युसन महाविद्यालयात प्राणीशास्त्राच्या ३६ वर्षे प्राध्यापिका, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्यवाह ते पुणे महापालिकेत नगरसेविका, महिला बालकल्याण समितीच्या अध्यक्षा असा शैक्षणिक क्षेत्रापासून राजकीय क्षेत्रापर्यंतचा ज्योत्स्नाताईंचा प्रवास उल्लेखनीय आहे. त्या एक उत्तम शिक्षिका, उत्तम प्रशासक, उत्तम सामाजिक कार्यकर्त्या व कार्यक्षम नगरसेविका आहेत. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून प्रशासक म्हणूनही सामाजिक भावनेतून त्यांनी चांगले काम उभे केले. त्यांच्या या सर्व क्षेत्रातील कार्यास पती आणि नामवंत सर्जन व प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांची सक्षम साथ आणि मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

“ महात्मा फुले, टिळक, आगरकर यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या पुण्यात मी जनसेवेचे व्रत घेतले आहे. ते पूर्णत्वास नेणार आहे. स्त्री ही अबला नसून सबला आहे, हे माझ्या कार्यातून समाजाला दाखवून देईन. शैक्षणिक जबाबदारी सांभाळत राजकारण व समाजकारण करण्यासाठी कुटुंबातील सदस्य पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले. दूरदृष्टी ठेवून काम करण्यास मी प्राधान्य देते. आपण समाजाचे देणं लागतो ही भावना कायम मनामध्ये असते.

– प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, नगरसेविका

विशेष कार्य...

- देशातील पहिली एव्हिएशन गॅलरी पूर्णावस्थेकडे नेली.
- कलाकार कट्टा निर्माण करून कलागुणांना वाव दिला.
- प्रभागातील तरुण व विद्यार्थी वर्गासाठी अत्याधुनिक व्यायामशाळेचे साहित्य.
- मुद्रणालयाच्या जागी सिटी लायब्ररी उभारण्याचे काम. त्यामध्ये पाच मजल्यात पुणे महापालिकेची पहिलीच स्वतंत्र ई-लायब्ररी व स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू होणार.
- कोरोनाकाळात अध्ययन आणि अध्यापनाची प्रक्रिया प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सर्वच शाखांमध्ये सुरळीतपणे चालू ठेवण्यात सिंहाचा वाटा.

(शब्दांकन : समाधान काटे)

Pune, Pune-Today
08/03/2021 Page No. 5

Work of Appreciation– Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam

सांस्कृतिक शहरात तयार होत आहे कलाकार कट्टा

नगरसेविका प्रा.सौ. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या माध्यमातून "कलाकार कट्ट्याचे" काम अंतिम टप्प्यात आले आहे.

पुणे शहरात प्रथमच अशा पध्दतीचा कलाकारांसाठी तयार केलेला पहिलाच कट्टा असणार आहे. या कामाची पाहणी करण्यासाठी नगरसेविका सौ. ज्योत्स्नाताईं आल्या होत्या, हे कळताच चित्रकार आनंद टेके यांनी केवळ ७ मिनिटात ताईंच्या नावात श्री गणेशाचे चित्र तयार करून दिले. अशा प्रकारचे अनेक कलाकार ताईंनी निर्माण केलेल्या कलाकार कट्टा या संकल्पनेसाठी ताईंचे आभार मानतात.

Dt. 24.3.2021

Work of Appreciation– Prof.Dr.Nivedita Ekbote Madam

सकाळ

युवा पिढीची आयडॉल

साने गुरुजींनी म्हटले आहे, 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो'... देशाचे भावी तरुण ज्यावेळेस ध्येयाने प्रेरित होतात आणि कार्य करतात त्यावेळी आकाराला येते त्यांच्या कार्याचे मंदिर, अशीच ध्येयवेडी तरुणी म्हणजे **प्रा. डॉ. निवेदिता गजानन एकबोटे.** शैक्षणिक क्षेत्रातील तिचे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे.

शैक्षणिक क्षेत्रात विद्यादानाचे कार्य करण्यासाठी तरुण पिढीने पुढे आले पाहिजे, याच ध्येयाने डॉ. निवेदिता कार्य करीत आहेत. वडील नामवंत सर्जन व प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, आई नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, बहिण डॉ. गायत्री, भाऊ डॉ. दिग्विजय यांचे मोलाचे सहकार्य त्यांना नेहमीच मिळत असते. वडिलांचा शैक्षणिक वारसा आणि संस्कार घेऊन त्यांनी शैक्षणिक व्रत स्वीकारले आहे. सर्वसामान्यांना परवडेल पण उच्च दर्जाचे शिक्षण देणे हा वडिलांचा वारसा घेऊन त्या शिक्षण क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवीत आहे. इंजिनिअरिंगनंतर व्यवस्थापन शास्त्राचे धडे घेऊन निवेदिता यांनी प्राध्यापक होण्याचे ठरविले. कार्पोरेट क्षेत्रातील मोठ्या पगाराची नोकरी सोडून त्यांनी महाविद्यालयात विद्यादानाचे कार्य चालू केले. हे सुरू असतानाच आयआयएम अहमदाबाद येथे पुढील प्रशिक्षणासाठी त्यांची निवड केली.

दरम्यानच्या काळात त्यांनी पीएच.डी पूर्ण केली. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपसचिव म्हणून त्या कार्यरत आहेत. बारा वर्षे त्या संस्थेत विविध जबाबदाऱ्या उत्तमरीत्या पार पाडत आहेत. संस्थेच्या 'एमआयबीएम'च्या समन्वयक म्हणून त्या काम करतात. तसेच सहयोगी प्राध्यापिका म्हणूनही कार्यरत आहेत. संस्थेच्या शाळा, महाविद्यालयांत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्या सातत्याने विविध उपक्रम राबवतात. डॉ. निवेदिता यांनी अवनि (अन्न, वस्त्र, निवारा) या संस्थेची स्थापना केली. यामार्फत त्या सामाजिक कार्यही करीत आहेत. डॉ. निवेदिता यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य पाहून भारतीय जनता पक्षाने त्यांना पुणे शहराचे युवती आघाडीचे अध्यक्षपद दिले.

> वर्तमानाचे भान ठेवून भविष्याची जाण ठेवून जनसामान्यांच्या, गोरगरिबांच्या जीवनात शैक्षणिक पहाट फुलविण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील असेन.
>
> **- प्रा. डॉ. निवेदिता गजानन एकबोटे**

विशेष कार्य...

- अवनि संस्थेच्या माध्यमातून कोरोनाच्या संकटात गरजूंना मदत.
- कडाक्याच्या थंडीत अनाथांना दिली मायेची ऊब.
- तरुणांना स्टार्टअपसाठी मार्गदर्शन.
- दिव्यांगांचा सामुहिक विवाह सोहळा तसेच त्यांच्यासाठीच्या विविध उपक्रमात सक्रिय सहभाग.
- युवती आघाडीच्या अध्यक्षा म्हणून युवतींशी निगडित अनेक विषयांना वाचा फोडली.

(शब्दांकन : समाधान काटे)

Pune, Pune-Today
08/03/2021 Page No. 5

Congratulations to Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam and Prof.Dr.Nivedita Ekbote Madam

सकाळ

'ती'च्या कर्तृत्वाला सलाम

'सकाळ'तर्फे 'नारी सन्मान' सोहळा उत्साहात

पुणे, ता. ८ : महिला अष्टपैलू असतात. त्या कोणतीही जबाबदारी सहजपणे पार पाडू शकतात. त्यामुळे बदलत्या काळात आधुनिकतेची कास धरून स्वयंविकासाचे उद्दिष्ट साध्य करायला पाहिजे. अन त्यासाठी आत्मविश्वास मोलाचा ठरतो, असा सूर 'सकाळ' आयोजित 'नारी सन्मान' या कार्यक्रमामधून निघाला.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात जीएसटी विभाग पुणे व कोल्हापूरच्या सहआयुक्त वैशाली पतंगे, परिमंडळ एकच्या पोलिस उपायुक्त डॉ. प्रियांका नारनवरे, शहर अन्नधान्य वितरण अधिकारी अस्मिता मोरे या प्रमुख पाहुण्या म्हणून या प्रसंगी उपस्थित होत्या. 'सकाळ'च्या कार्यकारी संपादक शीतल पवार यांनी स्वागत केले. नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, मानसी देशपांडे, राजश्री शिळीमकर, अश्विनी भागवत, ज्योती कळमकर, मंजुश्री खर्डेकर, ॲड. जयश्री नांगरे, यशस्वी जगताप, डॉ. आशा गावडे, आश्लेषा मुंगरवाडी, डॉ. सारिका भाळे, डॉ. ममता दिघे, सरला चांदेरे, दिशा ससार, अपूर्वा निकाळजे, डॉ. निवेदिता एकबोटे यांचा पुस्तक, सन्मानचिन्ह आणि गौरवपत्र देऊन प्रसंगी सन्मान करण्यात आला. मोरे म्हणाल्या, "महिला दिनाला संघर्षाची किनार आहे. महिला सबलीकरण, सक्षमीकरण खूप महत्त्वाच्या गोष्टी आहेत. महिला आता कुटुंब संस्थेची चौकट ओलांडून समाज संस्थाही सांभाळायला लागल्या आहेत. त्यामुळे महिलांची जबाबदारी दुहेरी आहे. तसेच आपण हे सर्व करताना आपल्याला समाजातील इतर महिलांनाही हात द्यायला हवा." 'सकाळ'चे संपादक सम्राट फडणीस यांनी आभार मानले तर, उपसंपादक सुवर्णा येनपुरे-कामठे यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ कार्यालय : जागतिक महिला दिनानिमित्त 'सकाळ'तर्फे नारी सन्मान सोहळ्याचे आयोजन केले होते. प्रमुख पाहुण्या वैशाली पतंगे, डॉ. प्रियांका नारनवरे, अस्मिता मोरे यांच्यासह सत्कारमूर्ती महिला.

"महिलांनी व्हर्च्युअल रिॲलिटी म्हणजेच समाजमाध्यमांच्या जाळ्यातून बाहेर पडायला हवे, आणि वास्तविक जीवनात स्वतःचे अस्तित्व निर्माण करायला हवे. प्रत्येक छोट्या-छोट्या लढ्यामधून व्यापक बदल होत असतो, त्यामुळे हा लढा छोटा असला तरी संघर्ष करता आला पाहिजे.
- वैशाली पतंगे, सहआयुक्त, जीएसटी विभाग पुणे व कोल्हापूर

"महिलांनी आपल्यामध्ये न्यूनगंड आणता कामा नये, तसेच अतिआत्मविश्वासही घातक ठरू शकतो. महिलांनी दिसण्यापेक्षा कृतीला महत्त्व दिले पाहिजे. विचारातून समाज आणि परिणामी देश घडत असतो. महिला पिढी घडवत असते, त्यामुळे देशाला एक सजग नागरिक देण्याचे काम ती करत असते.
- डॉ. प्रियांका नारनवरे, पोलिस उपायुक्त, परिमंडळ एक

Pune, Pune-Today
09/03/2021 Page No. 1

International Women's Day –8th March 2021

The Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 organised State Level Webinar on the occasion of International Women's Day on 08th March 2021. The theme of the Webinar was -
'Women in Leadership : Achieving an Equal Future in the COVID-19 World'.

Honourable Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam, Joint Secretary, P.E.Society and CDC Chairperson inaugurated the Webinar in an Online manner and presented an impactful Keynote Speech which truly showcases her inspirational and multifaceted persona. Madam highlighted the points that how COVID-19 has completely changed the outlook of people towards work. The concept of Gender Equality has become more evident. She also mentioned that Freedom of Women come with great responsibility and it's time that we all understand that and respect it. Hats off to the entire Respected family members of Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam for extending help to the needy and poor people.
The State Level Webinar had speakers invited from varied professions. One of them was **Ms. Shraddha Kandkure, Assistant Inspector Motor Vehicle RTO Pune**, who shared the experiences and challenges that Police and RTO Professionals faced in the pandemic situation.
The 3rd Speaker for the day was **Dr.Mrs. Mugdha Kuber, General Practitioner** from Pune who very nicely with the help of real life examples explained the challenges that healthcare workers faced and how we are moving towards defeating the situation with the help of vaccinations and by following various preventive measures.
Prof.Shamkant Deshmukh , Secretary, P.E.Society and Vice Principal and Head of the Department, Computer Science, Modern College, Pune-5 shared his views regarding Women's Day and aptly summarised the points covered by all the speakers.
We are grateful to Honorable Prof.Dr.Gajanan Ekbote Sir, Chairman, Progressive Education Society; Prof.Mrs.Jyotsna Ekbote Madam, Prof.Shamkant Deshmukh; Prof.Dr.Nivedita Ekbote, Deputy Secretary, P.E.Society; Principal Dr.Rajendra Zunjarrao Sir for coming up with this idea of organising the State Level Webinar and giving me an opportunity to conduct it. Thank you Dr. Vaijayantimala Jadhav Madam for introducing one of our speakers and Dr.Anjali Sardesai, Vice Principal and IQAC Coordinator for proposing the Vote of Thanks. I am also thankful to Prof. Sameer Nerlekar for the technical support.
We are thankful to all the participants from various parts of Maharashtra and Goa who joined us for the Webinar and for giving us the feedback.

The Webinar was streamed live on Modern Media Station YouTube Channel.

Regards,
Dr.Shantashree Sengupta,
Librarian,
Modern College , Shivajinagar, Pune-5.

International Women's Day –8th March 2021







International Women's Day –8th March 2021

पीइएस की प्रा. ज्योत्स्ना एकबोटे ने कहा

आत्मनिर्भर बनने की ओर कदम बढ़ाएं महिलाएं

नवभारत न्यूज नेटवर्क

पुणे. प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के मॉडर्न कला, विज्ञान और वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर में अंतरराष्ट्रीय महिला दिवस पर 'वुमन इन लीडरशिप : अचीविंग एन इक्वल फ्युचर इन कोविड-19 वर्ल्ड' राज्यस्तरीय वेबिनार आयोजित किया गया. इस वेबिनार के प्रमुख मार्गदर्शक के रूप में प्रा. ज्योत्स्ना एकबोटे उपस्थित थीं.वेबिनार में प्रा. ज्योत्स्ना ने कहा कि, एक समय था जब महिलाएं केवल बच्चे और चूल्हा-चौकी का काम देखती थीं. लेकिन अब महिलाएं विभिन्न क्षेत्रों में आगे आ रही हैं. लेकिन आज भी कई सारी महिलाएं स्वावलंबी नहीं हो पाई हैं. इसलिए महिलाएं ज्यादा से ज्यादा आत्मनिर्भर बनने का प्रयास करें.

तो पूरा परिवार प्रगति कर सकता है

उन्होंने कहा कि महिलाएं काफी मेहनती होती हैं. अपनी इसी प्रवृत्ति को बरकरार रखें तो वह भी किसी भी सफलता के शिखर पर पहुंच सकती हैं. पति-पत्नी का आपस में उचित सहयोग और समझौता रहे तो पूरा परिवार ही प्रगति कर सकता है. कोरोना महामारी के संकट का महिलाओं ने डटकर मुकाबला किया. ऐसी प्रशंसा भी उन्होंने की. डॉ. वैजयंतीमाला जाधव ने वेबिनार में उपस्थित सभी लोगों के लिए आभार प्रकट किए. वेबिनार में सहायक मोटर वाहन निरीक्षक श्रद्धा कंदकुरे ने भी अपने विचार रखे. उन्होंने अपने अनुभवों को साझा किया.

स्त्रीरोग विशेषज्ञ डॉ. मुग्धा कुबेर ने अपने विचार रखे

इसके अलावा स्त्रीरोग विशेषज्ञ डॉ. मुग्धा कुबेर ने महिलाओं का स्वास्थ्य और कोरोना महामारी की समस्याओं पर अपने विचार रखे. वेबिनार में पीईएस के सचिव श्यामकांत देशमुख, आबेदा इनामदार महाविद्यालय की नूरजहां शेख, आरएमडी फार्मास्युटिकल्स महाविद्यालय की ग्रंथपाल सुप्रिया कुबेर, आईएमएससीडीआर की ग्रंथपाल डॉ. स्वाति बर्नाबस भी शामिल हुईं. महाविद्यालय की उपप्राचार्य और आईक्यूएसी समन्वयक डॉ. अंजली सरदेसाई यांनी सभी के आभार जताए. महाविद्यालय के प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव ने प्रस्तावना की. वेबीनार में प्रा. समीर नेर्लेकर ने तकनीकी कामकाज देखा. वेबीनार का आयोजन ग्रंथालय और सूचना केंद्र की ओर से किया गया. कार्यक्रम का नियोजन ग्रंथपाल डॉ. शांतश्री सेनगुप्ता ने किया. वेबीनार में महाराष्ट्र और गोवा से कई लोग शामिल हुए. कार्यक्रमा को प्रोग्रेसिव एजुकेशन सोसाइटी के कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे का मार्गदर्शन मिला.

Pune Edition
09-march-2021 Page No. 2
epaper.enavabharat.com

महाराष्ट्र टाइम्स ९|३|२०२१

'गृहिणी हा समाजाचा कणा'

पुणे : मॉडर्न कला विज्ञान आणि वाणिज्य कॉलेजतर्फे 'वुमन इन लीडरशिप : अचीव्हिंग अँन इक्वल फ्युचर इन कोव्हिड १९ वर्ल्ड' ही राज्यस्तरीय परिषद आयोजित करण्यात आली होती.

या वेळी नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे प्रमुख पाहुण्या होत्या. करोनानंतरचा काळ आणि स्त्रियांची परिस्थिती या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. 'महिलांनी चूल आणि मूल याच्या पलीकडे जाऊन आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करावी. नोकरी न करणाऱ्या स्त्रियांचे कामही महत्त्वाचे आहे. गृहिणी या आपल्या समाजाचा कणा आहेत, असे मत एकबोटे यांनी व्यक्त केले.

Maharashtra Times 9.3.2021

महिला दिनानिमित्त राज्यस्तरीय वेबिनार

पुणे : शिवाजीनगर येथील मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'वूमन इन लीडरशिप : अचिविंग अँन इक्वल फ्युचर इन कोविड १९ वर्ल्ड' या विषयावर राज्यस्तरीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्यवाह नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे होत्या. याप्रसंगी सहायक मोटर वाहन निरीक्षक श्रद्धा कंदकुरे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. मुग्धा कुबेर, सोसायटीचे सचिव श्यामकांत देशमुख उपस्थित होते. आभार महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अंजली सरदेसाई यांनी मानले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन ग्रंथपाल डॉ. शांतश्री सेनगुप्ता यांनी केले.

Sakaal 9.3.2021

Article written by Prof.Shamkant Deshmukh Sir in Lokmat 18.3.2021

लोकमत

ॲनिमेशन : करिअरचा उत्तम अन् हटके पर्याय

ॲनिमेशन हा शब्द मुळात 'ॲनिमा' या लॅटिन शब्दापासून आला. लॅटिन भाषेत अनिमा म्हणजे 'आत्मा - जीव'. inanimate म्हणजे निर्जीव. एखाद्या निर्जीव गोष्टीत प्राण अथवा जीव ओतणे म्हणजे ॲनिमेशन. ॲनिमेशन ही एक प्रभावी कला आहे. खरंतर ६४ कलामध्ये या नवीन कला प्रकाराचा समावेश करावा लागेल. सध्याच्या धकाधकीच्या जगात व बदलत्या जीवनशैलीमुळे ऑनलाईन शॉपिंग, सर्फिंग, आभासी वास्तव्य (व्हर्च्युअल रिॲलिटी), वॉकस्थूजचा (चलत माध्यम) वाढता वापर लक्षात घेता ॲनिमेशन क्षेत्र हा एक उत्तम व हटके करियरचा पर्याय विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध आहे. क्षेत्राशी संबंधित अभ्यासक्रम निवडताना चित्रकलेची आवड, रंगसंगतीचे ज्ञान, निरीक्षणक्षमता, कल्पनाशक्ती, भाषेवरील प्रभुत्व, संवादकौशल्य तसेच तंत्रज्ञान व विविध सॉफ्टवेअर प्रणाली आत्मसात करण्याची आवड हवी. तसेच नवनिर्मितीचा ध्यास आणि आस असणे आवश्यक आहे. मध्ये करियर करताना सांघिक काम करण्याची क्षमता, संघ भावना, खिलाडूवृत्ती या गुणांबरोबरच प्रसंगी अपयश पचवण्याची तयारी ठेवली

पाहिजे. मोबाईलचा प्रसार, स्मार्ट मोबाईल फोनची दिवसेंदिवस वाढत चालली मागणी या बाबी लक्षात घेता गेमिंग ॲप्लिकेशन, एन्टरटेन्मेंट, इन्फॉर्मेशनसारख्या प्रणालीबरोबरच प्रकल्प विकसित करण्याच्या दृष्टीने अनेक संधी उपलब्ध आहेत. दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांवरील व्यंगचित्र, विडंबन चित्र, हास्य चित्रपट (कार्टुन्स) मालिका तयार करता येतात. विविध वाहिन्यांवरील कार्यक्रम, शीर्षक गीते, शीर्षके, दर्जेदार ग्राफिक्स, प्रभावी मांडणी या सर्वांची योग्य जुळवाजुळव हा मोठा आकर्षणाचा व कुतूहलाचा विषय झाला आहे. जाहिरात, सिने-नाट्य, चित्रपटसृष्टीला, प्रिंट मीडियालादेखील कुशल ॲनिमेटर्स, ग्राफिक्स डिझायनर, व्हिडिओ व साऊंड एडिटर/इंजिनिअरची मोठी गरज आहे. ॲनिमेशन अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रामुख्याने फ्लॅश (फ्लॅश), 2 डी - ॲनिमेशन, 3 डी -ॲनिमेशन , माया, व्हर्च्युअल इफेक्ट, गेमिंग, बेसिक्स ऑफ डिझानिंग, ग्राफिक्स डिझानिंग, व्हिडिओ / ऑडिओ रेकॉर्डिंग आणि इडिटिंगसाठी लागणाऱ्या विविध प्रणाली शिकविल्या जातात. विद्यार्थ्यांना नोकरी व स्वयम व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे या क्षेत्राचा करियर म्हणून उत्तम व हटके पर्यायांचा विचार करायला हरकत नाही.

बारावी विज्ञान शाखेचे उत्तीर्ण विद्यार्थी बी. एस्सी. या अभ्यासक्रमाची निवड करू शकतात, तर कला, वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी बी. व्होक या अभ्यासक्रमाचा पर्याय उपलब्ध आहे. तसेच काही विद्यार्थी दहावीनंतर लगेचच या क्षेत्राची निवड करू इच्छित असतील तर त्यांना संबंधीचे प्रमाणपत्र, पदविका अभ्यासक्रम देखील उपलब्ध आहेत.

- प्रा. शामकांत देशमुख,
उपप्राचार्य व संगणकशास्त्र विभागप्रमुख, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर.

Report of Institutional Repository (IR@MCASC)- March 2021

In the COVID-19 pandemic situation, with the help of Institutional Repository@MCASC, Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 is able to reach out to students by providing them e-contents, lecture notes prepared by respective teachers and scanned reading materials selected by the teachers.

We are thankful to the following teachers and departments for their contribution in IR@MCASC during March 2021:

CATEGORY: Annual Report

- Annual Report 2019-20 : Edited by Prof. Dr. Vaijayantimala Jadhav

CATEGORY: E-contents by Faculty Members

- FYBCom (Business Mathematics)- 6 Videos : Prof. Pooja Paratne
- FYBSc Mathematics –6 Videos: Prof. Pooja Paratne

CATEGORY: Lecture Notes

- FYBSc Mathematics : Prof. Dr. Ashok N. Bhavale
- SYBSc Mathematics : Prof. Dr. Ashok N. Bhavale
- FYBSc Mathematics : Prof. Pooja Paratne
- M.Sc Mathematics Part-I : Prof. Krishna Shinde
- M.Sc Mathematics Part-II : Prof. Krishna Shinde

CATEGORY: Research Project Reports

- **M.A.Psychology**

Events Conducted by National Service Scheme (NSS) in March 2021

World Forestry Day and World Water Day

Celebration of World Forestry Day (21st March 2021) and World Water Day (22nd March 2021) by NSS Unit, Modern College, Shivajinagar Pune in Online mode and tree plantation in college by following all the rules of physical distancing in COVID-19 pandemic.







Source: 1) https://english.jagran.com/lifestyle/world-water-day-2021-wishes-quotes-messages-whatsapp-facebook-status-to-share-on-this-day-10024725

2) http://www.fao.org/international-day-of-forests/en/

Shaheed Din- 23rd March 2021

On 23rd March throughout the nation, 'Shaheed Din' (Martyr's Day) was celebrated. On this occasion, NSS Volunteers of Modern College, Shivajinagar, Pune-5 organized an online program . This program was carried out under the guidance of Honorable Principal Dr. Rajendra Zunjarrao Sir and Dr. Prabhakar Varade Sir (NSS Program Officer, MCASC). On this day in 1931, three freedom fighters Bhagat Singh, Sukhdev Thapar, Shivaram Rajguru were hanged by the British.
The beginning of the program was done by the motivational speech on our country delivered by Guest Speaker. The importance of this day was explained by our NSS Volunteer Swati Auti. Then, NSS Volunteer Afsha Mashayak recited a beautiful poem on Martyrs. NSS Volunteer Rushikesh Raut delivered a beautiful speech on Bhagat Singh. Later on, Sketch Video created by NSS Volunteer Sanskruti Shelar was presented.
A short story on Martyrs was delivered by Sneha Chopada. NSS Volunteer Ravindra Shinde delivered an inspirational speech on Hutatma Rajguru. A poem title 'Amar Hutatma' was recited by Sanskruti Shelar. Another poem on Bhagat Singh was recited by NSS Volunteer Ankit Bhardwaj.
Sneha Pokharkar recited a beautiful poem on Martyrs. Then, NSS Volunteer Dhiraj Raut recited a poem on freedom fighters. The name of the poem was "Mei Amar Shahidon ka charan unke yash gaya karta hu". After that, NSS Volunteer Aishwarya Shashtri delivered a speech on Sukhdev. Then, Shruti Katkar recited a wonderful poem on this day. NSS Volunteer Amol Mishrikotkar delivered a speech on Shaheed Din. NSS Volunteer Goraksha Gurav recited poem on Bhagat Singh.
The hosting of the program was done by NSS Volunteers Sukanya Aru and Tanaya Chaudhari.



Events Conducted in the Library during March 2021

1. Yashwantrao Chavan Jayanti : 12th March 2021

On 12th March 2021, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated Yashwantrao Chavan Jayanti as per the Maharashtra Government GR.

Under the guidance of Respected Principal Dr.Rajendra S. Zunjarrao Sir, Librarian Dr. Shantashree Sengupta and Library Staff paid their respect to Late Yashwantrao Chavan ji.

Principal Sir mentioned that Yashwantrao Balwantrao Chavan was a great Indian politician who served as the last Chief Minister of Bombay State and the first of Maharashtra after latter was created by the division of Bombay state. He was a strong leader, co-operative leader, social activist and writer. He was popularly known as Leader of Common People. He advocated social democracy in his speeches and articles and was instrumental in establishing co-operatives in Maharashtra for the betterment of the farmers. Principal Sir also mentioned the various Posts held by Late Yashwantrao Chavan like Minister of Home Affairs, Minister of External Affairs, Minister of Finance and Minister of Defence.

All the rules of physical distancing were followed during the programme. I am thankful to the library staff members who were present during the programme.

Regards,
Dr.Shantashree Sengupta,
Librarian.

Events Conducted in the Library during March 2021

2. Shaheed Din: 23rd March 2021

On 23rd March 2021, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 observed 'Shaheed Din' (Martyr's Day) as per the Maharashtra Government GR. 23rd March is remembered as the day when three brave freedom fighters namely Bhagat Singh, Shivaram Rajguru and Sukhdev Thapar were hanged by the British. Under the guidance of Respected Principal Dr.Rajendra S. Zunjarrao Sir, Librarian Dr. Shantashree Sengupta, NSS Programme Officer Dr. P.S.Varade, Junior College Physical Instructor Shri. Deepak Kute, Shri. Sachin Bhondave and Library Staff paid their respect to Bhagat Singh, Shivaram Rajguru and Sukhdev Thapar.

Principal Sir mentioned that 23rd March is celebrated as Martyr's Day to remember the sacrifice of three extraordinary freedom fighters of India. On 23rd March 1931 three freedomfighters of our Nation were hanged to death namely Bhagat Singh, Shivaram Rajguru andSukhdev Thapar by the British. They are the source of inspiration for the youth of India. At such a young age, they came forward and for the independence they fought with bravery.So, to pay homage to these three revolutionaries Martyr's Day is celebrated on 23rd March. Sir mentioned that Bhagat_Singh who was born on 28 September, 1907 in the Lyallpur,Punjab, together with his companions Rajguru, Sukhdev, Azad, and Gopal fought for the assassination of Lala Lajpat Rai. Bhagat Singh became an inspiration for youngsters due to his daring adventures. He with his companions on 8th April, 1929 threw bombs over the Central Legislative Assembly by reading the slogan *"Inquillab Zindabad".* And for this, a murder case was charged against them. On 23rd March, 1931 in the Lahore Jail they were hanged. Their body was cremated at the banks of the Sutlej River.

All the rules of physical distancing were followed during the programme. I am thankful to thelibrary staff members who were present during the programme.

Regards,

Dr.Shantashree Sengupta,

Librarian.

Events Conducted in the Library during March 2021

Events and Activities organized by the Departments during March 2021

Department of Marathi

प्रोग्रेसिव्हएज्युकेशनसोसायटीचे

मॉडर्न कला ,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय ,(स्वायत्त) शिवाजीनगर , पुणे ५

जागतिक महिलादिन विशेष कार्यक्रम

अहवाल एम ए भाग १ व २ (मराठी) । दि .८ / ३ / २०२१ । वेळ : सकाळी ते१०।

ऑनलाईन पद्धतीने आयोजित कार्यक्रम

मॉडर्न कला ,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय ,(स्वायत्त) शिवाजीनगर , पुणे ५येथील मराठी पदव्युत्तर विभागाच्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने जागतिक महिलादिनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनीही उत्स्फूर्तपणे आपली उपस्थिती दर्शवून स्त्रीविषयक आदरयुक्त भावना विविध माध्यमातून व्यक्त केल्या. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक एम ए भाग १ चे विद्यार्थी समीर गायकवाड यांनी केले. मुंबईस्थित चंद्रकांत तांबे (एम ए १) यांनी महिला दिन साजरा करण्यास कशी सुरुवात झाली याचा थोडक्यात इतिहास सांगितला.

'जिच्या उदरातून जन्म घेते दुनिया सारी'

ही कविता शुभम गायकवाड (एम ए १) याने सादर केली

तिने स्वीकारलेले आजवर रस्ते निखाऱ्यांचे
न जाणे का तिच्या नशिबीच नव्हते क्षण नजाऱ्यांचे ॥

ही सुंदर अशी स्वरचित गज़ल रचना अविनाश काठवटे (एम ए १) याने सादर केली.

लेखक भवान महाजन यांच्या **निष्कलंक**या कलाकृतीचे नाट्य रूपांतर करणारे हैद्राबाद येथील प्रकाश फडणीस (एम ए १) यांनी अभिवाचन केले. ***'तू फार महत्वाची आहेस'*** ही मुक्तछंदातील स्वरचित कवितासमीर गायकवाड (एम ए १) यांनी सादर केली. विद्यार्थ्यांसोबत प्रा.डॉ. गजानन अपिने सर यांनी कवितांचे सादरीकरण केले -

स्त्रीने कोणताच धर्मग्रंथ लिहिला नाही
स्त्रीला कोणत्याच धर्माने पुरोहित केले नाही

प्रा. सुरेश रासकर सरांनी आपल्या आदरयुक्त भावना व्यक्त करताना पुरुषांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि स्त्री - पुरुष समानतेवर आपले मनोगत मांडले. शुभम रोकडे (एम ए २) याने आपल्या भावना खालील ओळीतून गाऊन सादर केल्या

साऊ पेटती मशाल, साऊ आग ती जलाल
साऊ शोषितांची ढाल, साऊ मुक्तीचं पाऊल ॥

तसेच ऋतुजा चिंचपूरे (एम ए २) हिने स्वरचित कविता सादर केली -

अगं, आहेस कुठे तू?
मी, आता तुझ्या गर्भात...

Department of Marathi

प्रा. डॉ.वैजयंतीमाला जाधव मॅडम यांनीही स्त्रीविषयक आपल्या भावना हिंदी कवितेतून सादर केल्या-

महिलाएं सिर्फ शक्ल और जिस्म से खूबसूरत नही होती

बल्की वह इसलिये भी खूबसूरत होती है...

कार्यक्रमाच्या शेवटी मराठी विभाग प्रमुख डॉ. निशा भंडारे मॅडम यांनी स्त्रीविषयक भूमिका मांडली. या कार्यक्रमाचे गुगल मिट वर आयोजन करण्याट आले होते.या कार्यक्रमाला मा.प्राचार्य डॉ.राजेंद्र झुंजारराव यांचे मार्गदर्शन लाभले.

श्री.चंद्रकांत तांबे (एम ए १) यांनी उपस्थित असणाऱ्या सर्वांचे आभार मानले.



डॉ.वैजयंतीमाला जाधव

समन्वयक .पदव्युत्तर मराठी विभाग

(भ्रमणध्वनी -८३०८८३९३३७)

Pre Ph.D Viva organised by Department of Marathi

मराठी संशोधन विभागातील प्रा.वंदना जोशी यांची पी.एचडी मौखिक पूर्व परीक्षा डॉ. बाळकृष्ण लळीत (मराठी विभागप्रमुख, सी.टी. बोरा कॉलेज, शिरुर) यांच्या उपस्थित संपन्न झाली. मार्गदर्शक डॉ. माधवी खरात (मराठी विभागप्रमुख, शाहू कॉलेज, पुणे)

दिनांक: 3.3.2021

Modern Achievements

Pocket Book Published by

Prof. Sameer Nerlekar, Department of Animation

हार्दिक अभिनंदन!



Prof. Sameer Nerlekar, Department of Animation

भावेश प्रोडक्शन्स आणि शार्कफिन स्टुडिओज निर्मित 'छावा' या थ्रीडी ऍनिमेशन चित्रपटासाठी गीतलेखन आणि संहितालेखन करण्याची संधी मिळाली. हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. संपूर्ण टीमचे अभिनंदन व शुभेच्छा!

-Prof.Sameer Nerlekar



NEWLY ADDED BOOKS DURING MARCH 2021

Authors	Title
Patil, Shankar	Shapit Vastu शापित वास्तू House Of The Seven Gabels
Aaher, Abhishek	दहावी बारावी नंतर करायचे काय ?
Shewale, Nanaji / Ahire, Subhash	ICT Library Among Library Professionals
Singhania, Vinod, K. / Singhania, Monica	Students Guide To Income Tax Including GST 2021-22

News Paper Clippings : March 2021

Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf*]

Clipping is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous .***

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

ऑनलाइन अधिसभेला विरोध

पुणे, ता. १६ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दोनशे लोकांच्या उपस्थितीमध्ये चित्रपटाचे शूटिंग सुरू आहे, तेथे कोणत्याही नियमांचे पालन केले जात नाही. मात्र, २० मार्च रोजी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीसाठी नियमांवर बोट ठेऊन ती ऑनलाइन घेण्याचा प्रयत्न आहे. विद्यापीठाने आवश्यक त्या परवानग्या घेऊन थेट बैठक घ्यावी, असे सांगत अधिसभा सदस्यांनी ऑनलाइन बैठकीस विरोध केला आहे.

पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत ७० सदस्य आहेत. अधिकारी, कर्मचारी सुमारे ४० जण उपस्थित असतात, त्यामुळे अधिसभेला १०० पेक्षा जास्त व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. यात नियमांचे उल्लंघन होण्याची शक्यता असल्याने अधिसभेची बैठक प्रत्यक्षात न झाल्यास गेल्यावर्षी प्रमाणे यंदाही ऑनलाइन घ्यावी लागणार आहे.

कुलगुरू डॉ. करमळकर यांना पत्र

अधिसभेच्या बैठकीत पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यातील सदस्यांचा सहभाग असतो. गेल्यावर्षी कोरोनामुळे ऑनलाइन बैठक झाली होती, त्यामध्ये अनेक अडचणी आल्या, सदस्यांना त्यांचे म्हणणे मांडता आलेले नव्हते. पुन्हा याच पद्धतीने ऑनलाइन बैठक घेण्यास सदस्यांनी विरोध केला आहे. डॉ. श्यामकांत देशमुख, दादाभाऊ शिनलकर, अभिषेक बोके, शशिकांत तिकोटे, संतोष ढोरे, डॉ. नंदू पवार, डॉ. तानाजी वाघ, अमित पाटील यांनी याबाबतचे पत्र कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना दिले आहे.

सकाळ १७/३/२०२१

"पुणे विद्यापीठातील सभागृहात चित्रपटाचे शूटिंग सुरू आहे, तेथे कोणत्याही नियमाचे पालन केले जात नाही. पण अधिसभेसाठी नियम दाखवून ती ऑनलाइन घेतली जात आहे. ऑनलाइन बैठकीत नेटवर्क, आवाज न येणे, सदस्यांना संधी न मिळणे अशा अनेक अडचणी येतात.
- संतोष ढोरे,
सदस्य, अधिसभा

"विद्यापीठामध्ये सुरक्षित अंतर ठेऊन अधिसभेची बैठक घेणे शक्य आहे. ऑनलाइन बैठकीत अनेक अडचणी येतात, त्यावर विद्यापीठ हिताची चर्चा करता येत नाही. त्यामुळे बैठक प्रत्यक्षात घ्यावी.
- दादाभाऊ शिनलकर,
सदस्य, अधिसभा

Sakaal 17.3.2021

SPPU bouquet may add data science, animation & fitness

Senate Meet On Saturday To Also Seek More Hostels

Ardhra.Nair@timesgroup.com

NEW AVENUES FOR STUDY

Courses are at the undergraduate, postgraduate and certificate level

- They depend upon the objective of the course
- The university senate meeting is scheduled on Saturday
- There is a proposal for opening the reading room and library 24x7
- Students can use them since they have much backlog to cover due to Covid 19

File photo

"The university website is the window to the outside world on what the university offers. However, there are many mistakes related to the language and content in it. Hence, there is need to revive it and keep updating it
Rajeev Sabde | SENATE MEMBER

Pune: Senate members of Savitribai Phule Pune University (SPPU) have submitted proposals to start new courses in the fields of data sciences, physical fitness, animation in the 2021-22 academic year.

There is also a proposal to increase the number of hostels within the campus in keeping with the increasing number of courses offered by the university that would attract students.

Senate member Shamkant Deshmukh has suggested SPPU should start a bachelor's degree in data science from the new academic year and a master's course in the same faculty in the near future.

Deshmukh said, "SPPU's BSc in Animation course is highly popular among students due to a large number of job opportunities in the fields of animation, graphic design, gaming, advertising, video production, visual effects. However, when it comes to the master's degree in the same field, their options are limited. Considering the scenario, a master's course should be started by the university."

Many other proposals will also be discussed in the senate meeting which involves schemes and scholarships offered by Pune varsity, examination, payment of teachers in unaided colleges, transparency in choosing PhD guides among others.

Rajeev Sabde, another senate member, sought a revision of buildings allotted to departments, depending upon the strength of students and staff working in each of the departments.

Times of India 17.3.2021

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

वेब मालिकेचे चित्रीकरण चालते; प्रत्यक्ष अधिसभाच का नको?

सदस्यांचा विद्यापीठ प्रशासनाला सवाल

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : विद्यार्थिहिताशी संबंधित विषय, वर्षभराच्या आर्थिक कामांची चर्चा होण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा प्रत्यक्ष पद्धतीनेच होणे आवश्यक असल्याचे सांगत अधिसभा सदस्यांनी ऑनलाइन अधिसभेला तीव्र विरोध केला आहे. विद्यापीठात दोनशे लोक असलेले वेब मालिके चे चित्रीकरण चालते, तर शंभर सदस्य असलेली अधिसभाच का नको? असा सवाल करत त्यांनी अर्थसंकल्पीय अधिसभा प्रत्यक्ष घेण्याची मागणी केली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा २० मार्चला आयोजित करण्यात आली आहे. मात्र करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे प्रत्यक्ष अधिसभेला प्रशासनाकडून परवानगी मिळाली नसल्याचे सांगत ऑनलाइन अधिसभा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र अधिसभा सदस्यांचा ऑनलाइन अधिसभेला विरोध आहे.

गेल्यावर्षी अर्थसंकल्पीय अधिसभा ऑनलाइन पद्धतीने झाली. त्यात अनेक तांत्रिक अडचणींमुळे व्यवस्थित चर्चाही होऊ शकली नाही.

मुद्दामच ऑनलाइन सभा

अडचणीचे ठरू शकणारे विषय, प्रश्न टाळण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाचा ऑनलाइन अधिसभेसाठी प्रयत्न आहे. परीक्षेबाबतचा गोंधळ, काही प्रशासकीय आणि आर्थिक व्यवहार असे काही विषय विद्यापीठ प्रशासनासाठी अडचणीचे ठरणार असल्याने ऑनलाइन अधिसभा घेण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे अधिसभा सदस्यांचे म्हणणे आहे.

त्यामुळे विद्यार्थिहिताचे विषय, आर्थिक तरतुदी यांबाबत सविस्तर चर्चा होण्यासाठी प्रत्यक्ष पद्धतीनेच अधिसभा व्हायला हवी. करोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करून शंभर सदस्यांची अधिसभा प्रत्यक्ष पद्धतीने घेण्यात विद्यापीठ प्रशासनाला अडचण काय, असा सवाल सदस्य संतोष ढोरे, शशिकांत तिकोटे, बागेश्री मंठाळकर, प्रा. शामकांत देशमुख, डॉ. संजय खरात, अभिषेक बोके, अमित पाटील, गिरीश भवाळकर, आशिष पेंडसे आदी सदस्यांनी उपस्थित केला आहे.

Loksatta 19.3.2021

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

कुलगुरूंचे कौतुक अन् प्रशासनावर शंका

पुणे, ता. २० : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन अधिसभेत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने राष्ट्रीय, जागतिक पातळीवर दर्जा वाढविला, कोरोना काळात सिरमला केलेल्या मदतीसह इतर उपक्रमांचे कौतुक केले. मात्र, त्याचवेळी कर्मचारी, अधिकारी यांच्या वेतन भत्त्यावर होणारा अतिरिक्त खर्च, विद्यार्थ्यांच्या योजनांना लावली जाणारी कात्री या कारभारावर सदस्यांनी शंका व्यक्त केल्याने अधिसभेतील वातावरण गंभीर झाले होते.

पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत शनिवारी (ता. २०) सकाळी कुलगुरू करमळकर यांचे भाषण झाले. त्यावर सदस्यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला. त्याचवेळी कोरोनाचा प्रभाव कमी झाल्यानंतर प्रत्यक्ष अधिसभेत अर्थसंकल्प मंजूर करावा. तोपर्यंत ही सभा स्थगित करावी, असा ठराव संतोष ढोरे यांनी मांडला.

"मी हे पद स्वीकारण्यापूर्वी १९९४-९५ पासूनचे जुने प्रस्ताव आहेत, त्यावर अधिकार मंडळांनी दिलेल्या आदेशाचे पालन केले जात आहे. अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने त्यांची संख्या कमी होत आहे, जे आहेत त्यांना दुप्पट काम लागत असल्याने त्यांना एक पगार जास्त दिला जात आहे.

– डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू

डॉ. श्यामकांत देशमुख म्हणाले, "विद्यापीठाच्या ठेवी कमी झाल्या, शिष्यवृत्तीची व कमवा शिकवा योजनेला कात्री लावली आहे, यावर थेट अधिसभेत चर्चा झाली पाहिजे. ''

संजय खरात म्हणाले, "विद्यार्थी योजनेला कात्री, अधिकाऱ्यांवर झालेले आरोप यावर देखील स्पष्टता आली पाहिजे.''

अधिकाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या भत्त्याची त्रयस्थ व्यवस्थेमार्फत चौकशी झाली पाहिजे, अशी मागणं अमित पाटील यांनी केली.

Sakaal 21.3.2021

विद्यापीठाच्या ५९३ कोटींच्या अर्थसंकल्पाला तत्त्वतः मान्यता

प्रत्यक्ष अधिसभा न झाल्याची सदस्यांकडून तीव्र नाराजी

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेत शैक्षणिक वर्ष २०२१-२२साठीच्या तरतुदी 'सादर' न करता अर्थसंकल्प मांडण्यात आला. त्यात केवळ जमा बाजू, खर्च बाजू आणि तुटीचे आकडे सांगण्यात आले. अर्थसंकल्पीय अधिसभा प्रत्यक्ष पद्धतीने न झाल्याची तीव्र नाराजी सदस्यांकडून उमटली. विद्यापीठ प्रशासन, व्यवस्थापन परिषदेने कधी तांत्रिक अडचणी सांगत, कधी भावनिक आवाहन करत ५९३ कोटींच्या आणि ५२ कोटींचा तुटीचा अर्थसंकल्प तत्त्वतः मंजूर करून घेतला. त्या बदल्यात पंधरा दिवसांत प्रत्यक्ष अधिसभा घेण्याचे आश्वासन देण्यात आले.

विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा शनिवारी ऑनलाइन झाली. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेला प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, वित्त व लेखा अधिकारी अतुल पाटणकर आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात ५४० कोटी ८२ लाख ८५ हजार जमा बाजूला आणि ५९३ कोटी ५४ लाख १५ हजार खर्च बाजूला दाखवण्यात आले आहेत. तर ५२ कोटी ७१ लाखांची तूट आहे. हा अर्थसंकल्प व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे यांनी मांडला.

कुलगुरूंनी त्यांच्या अधिकारात तीन महिने खर्च करण्याची मान्यता घ्यावी. चर्चा टाळण्यासाठी विद्यापीठ प्रशासन ऑनलाइन अधिसभा होत असून, अर्थसंकल्प मांडणे ही औपचारिकता आहे, अशी भूमिका संतोष ढोरे, बागेश्री मंठाळकर, गिरीश भवाळकर, डॉ. कान्हू गिरमकर, दादाभाऊ शिनलकर, विवेक बुचडे, डॉ. संजय खरात आदी सदस्यांनी मांडली. अखेर कुलगुरूंच्या विनंतीला मान देत अधिसभेने अर्थसंकल्पाला तत्त्वतः मान्यता दिली.

खर्चाचा तपशील

- विद्यार्थी विषयक सेवासुविधा : १९६ कोटी ४५ लाख
- शैक्षणिक गुणवत्ता सुधार कार्यक्रम : ५ कोटी ३५ लाख
- पायाभूत सेवा विभाग : ५१ कोटी ५ लाख
- इमारत बांधकाने, सुविधा, सुधारणा : ४५ कोटी २५ लाख
- स्वतंत्र प्रकल्प-योजना : ८८ कोटी ३१ लाख

भत्ते, वेतन आणि खर्चाबाबत प्रश्न

विद्यापीठातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिले जाणारे भत्ते, वेतन संरक्षण अशा मुद्द्यांवर अधिसभा सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती कमी करून अधिकारी-कर्मचाऱ्यांना भत्ते दिले जात असल्याबाबत अधिसभा सदस्य डॉ. वंदू पवार, डॉ. बाळासाहेब सागडे, प्रा. श्यामकांत देशमुख यांनी नाराजी व्यक्त केली. या संदर्भात समिती नेमून चौकशीची मागणी केली. रखडलेल्या इमारतीवरील खर्चाबाबत अभिषेक बोके यांनी प्रश्न विचारला.

बैठक ऑनलाइन, सदस्य विद्यापीठात

करोनाच्या प्रादुर्भावामुळे अधिसभा ऑनलाइन घेण्यात आली. मात्र व्यवस्थापन परिषदेचे काही सदस्य विद्यापीठातूनच ऑनलाइन अधिसभेत सहभागी झाल्याचे दिसून आले. त्यामुळे ऑनलाइन सभेला अर्थ काय असाही प्रश्न विचारण्यात आला.

लोकसत्ता Sun, 21 March 2021
https://epaper.loksatta.com/c/59241028

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

FYJC admissions end on Mar 26; syllabus completion now a worry

Dheeraj Bengrut
puneletters@htlive.com

PUNE: The admission process for Class 11, or the first year of junior college (FYJC) will now end on March 26, as per the state government.

The FYJC process is the only post-lockdown course still open for admissions.

College principals and administrations are now worried about the completion of the syllabus. At least 30,000 seats are still vacant in the Pune division.

After completing three regular rounds and two special rounds of the FYJC admission process, the deputy director of Education (DYDE), Pune, last week released a timetable for a first-come-first-served (FCFS) round, which began from March 19.

"It is a challenge for all the colleges to complete the syllabus for FYJC students due to the delayed admission process. If admissions were done earlier, colleges would have started online or offline classes. Now we are planning extra classes to cover the syllabus," said Rajendra Zunjarrao, principal, Modern College of Arts Science and Commerce, Shivajinagar.

> It is a challenge for all the colleges to complete the syllabus for FYJC students due to the delayed admission process. Now we are planning extra classes to cover the syllabus.
>
> **RAJENDRA ZUNJARRAO,** principal, Modern College of Arts Science and Commerce

Junior colleges in the city started offline classes from January 4 for students of Class 11 and 12.

After the spike in Covid cases, the district administration closed down all schools and colleges till March 31.

For this year's Class 11 admission process, a total of 72,820 students are eligible for the first round of admissions in 304 colleges of Pune and Pimpri Chinchwad.

Due to an interim stay given by the Supreme Court (SC) on the implementation of the quota for the Maratha community in the jobs and education sectors, the state education department stopped the admission process for FYJC on September 9, and it resumed again on November 26, 2020.

CS Scanned with CamScanner

Hindustan Times 24.3.2021

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

'गुणवत्ता सुधार'ला कात्री

पुणे : पुढारी वृत्तसेवा

कोरोनामुळे ऑनलाइन शिक्षणसाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता निधीची आवश्यकता असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयांच्या गुणवत्ता सुधार योजनेच्या निधीला मोठ्या प्रमाणात कात्री लावली आहे. त्यामुळे संलग्न महाविद्यालयांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

डॉ. नरेंद्र जाधव हे कुलगुरू असताना गुणवत्ता सुधार ही योजना सुरू करण्यात आली. त्यानंतर योजनेचा निधी वाढत जाऊन अर्थसंकल्पात १५ कोटींपर्यंत तरतूद करण्यात येत होती. मात्र, अधिसभेने नुकतीच तत्त्वत: मंजुरी दिलेल्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी

■ पुणे विद्यापीठाने निधी कमी केल्याने महाविद्यालये नाराज

५ कोटी ३५ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. महाविद्यालयांसाठीचा निधी कमी करणे चुकीचे आहे. विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांकडून, महाविद्यालयांकडूनच पैसे येतात. विद्यापीठाने काटेकोर नियम लावून निधी द्यावा. पण, तो कमी करणे चुकीचे आहे. केवळ निकाल चांगले लागणे म्हणजे गुणवत्ता नाही, तर विद्यार्थी-प्राध्यापक-कर्मचाऱ्यांसाठीच्या चांगल्या सुविधा हाही गुणवत्तेचाच भाग आहे. निधी कमी झाल्यास एकूण गुणवत्ता घसरण्यावर परिणाम होणार असल्याचे मत अधिसभा सदस्यांनी व्यक्त केले.

> विद्यापीठाचे उत्पन्न ६५० कोटींवरून ३०० कोटींवर आले आहे. त्यामुळे विद्यापीठाने शक्य त्या ठिकाणी काटकसर करण्याचा निर्णय घेतला आहे. तरीदेखील गुणवत्ता सुधारसाठी कोणतीही तडजोड करण्यात आलेली नाही. त्यामुळेच ई-कंटेटसाठी ५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. फक्त महाविद्यालयांना देण्यात येणारी रक्कमच सध्याचा काळ पाहता कमी करण्यात आली आहे.
>
> \- **राजेश पांडे,** व्यवस्थापन परिषद सदस्य

> यंदा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आयटी इन्फ्रास्ट्रक्चर वाढविणे गरजेचे होते. या योजनेच्या माध्यमातून त्याला हातभार लागला असता. परंतु, निधीला कात्री लावल्यामुळे महाविद्यालयाच्या सोलर पॅनेलसारख्या योजना, ई-कंटेट डेव्हलपमेंट, संशोधक, महाविद्यालयाचा स्टाफ आदींना फटका बसणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष होणाऱ्या अधिसभेत विद्यापीठाला याचा जाब विचारला जाणार आहे.
>
> \- **डॉ. श्यामाकांत देशमुख,** अधिसभा सदस्य

Pudhari 23.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

शाळा, महाविद्यालये १४ मार्चपर्यंत बंद

ऑनलाइन वर्ग भरविण्यास परवानगी; हॉटेल रात्री अकरा वाजेपर्यंत

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २८ : पुणे, पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्यातील संचारबंदीची मुदत १४ दिवसांनी वाढवितानाच येत्या १४ मार्चपर्यंत शाळा, महाविद्यालये, आणि खासगी शिकवण्या बंद ठेवण्यात येणार आहेत. परंतु, ऑनलाइन वर्ग भरविण्यास परवानगी दिली आहे. दुसरीकडे हॉटेल, बार आणि रेस्टॉरंटही रात्री अकरा वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत.

कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी सर्वत्र रात्रीची संचारबंदी लागू करताना शाळा, महाविद्यालये, खासगी शिकवण्या २८ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय पालकमंत्री अजित पवार यांनी गेल्या आठवड्यात घेतला होता. त्यानंतर कोरोनाचे रुग्ण वाढल्याने खबरदारीचे उपाय कायम ठेवण्याची भूमिका स्थानिक प्रशासनाने घेतली आहे. कोरोनामुळे पवार यांच्या सूचनांनुसार विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी घेतलेल्या नव्या निर्णयाबाबतचे आदेश रविवारी पुन्हा काढले. पुणे महापालिकेचे आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी-चिंचवडचे आयुक्त राजेश पाटील आणि जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांनी स्वतंत्रपणे आदेश काढले.

अशी आहे नियमावली

सकाळ

- लग्न समारंभ, खासगी, सरकारी आणि राजकीय कार्यक्रमांसाठी २०० लोकांनाच परवानगी.
- गर्दीवर नियंत्रणासाठी सर्वत्र तपासणी करून दोषींवर कारवाई करणार.
- पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकांच्या हद्दीसह जिल्ह्यात सर्व मंगल कार्यालये, हॉटेल, लॉन्स आणि कार्यक्रम होणाऱ्या सर्व ठिकाणांवर नजर.
- किराणा दुकाने, भाजीपाला, दूध, औषधांची दुकाने सुरू राहणार.
- हॉटेल, बार, रेस्टॉरंट रात्री ११ वाजता बंद करावे लागणार.
- जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्यांना वाहनांना मुभा.
- अत्यावश्यक सेवा वगळता अन्य कोणत्याही कारणांसाठी नागरिकांना रात्री ११ ते सकाळी ६ वाजेपर्यंत घराबाहेर येता येणार नाही.

१/३/२०२१

अभ्यासिका सुरू राहणार

शाळा-महाविद्यालये, खासगी शिकविण्याचे ऑनलाइन वर्ग भरविता येणार असल्याचे नव्या आदेशात स्पष्ट करण्यात आले. याआधी अशा प्रकारे वर्ग सुरू होते. मात्र, २० ते २८ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन वर्गही बंद होते. दरम्यान, स्पर्धा परीक्षेचे क्लास आणि अभ्यासिका ५० टक्के क्षमतेने सुरू ठेवता येणार आहे.

> कोरोनाची साथ कमी करण्यासाठी आखलेल्या उपायांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी, यासाठी मर्यादा आहेत. त्यांचे पालन न केल्यास साथरोग नियंत्रण कायद्यांतर्गत दोषींविरोधात कारवाई होईल. पुढील आदेश येईपर्यंत नियम लागू असतील.
> - विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महापालिका

Sakaal 1.3.2021

अनामत रक्कम परत करा

महाविद्यालयांना विद्यापीठाचे आदेश

१/३/२०२१

म. टा. प्रतिनिधी, पुणे

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची अनामत रक्कम/सुरक्षा ठेव (डिपॉझिट) तातडीने परत करण्याबाबत कार्यवाही करावी, असे आदेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाने प्राचार्यांना दिले आहेत. अनामत रक्कम देण्याबाबत काही महाविद्यालयांकडून टाळाटाळ करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यापीठाने तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

व्यावसायिक; तसेच बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्रवेश घेत असताना, महाविद्यालयांकडून ग्रंथालयातील पुस्तके, प्रयोगशाळेतील साहित्य हाताळणी आदींसाठी काही रक्कम डिपॉझिट म्हणून ठेवण्यात येते. अभ्यासक्रमाचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, महाविद्यालय प्रशासनाने संबंधित रक्कम ही विद्यार्थ्यांना देणे अनिवार्य असते. महाविद्यालये ही रक्कम विद्यार्थ्यांना परत देण्यास टाळाटाळ करतात. त्याच वेळी रक्कम मिळण्यासाठी विद्यापीठाकडूनही पाठपुरावा करण्यात येत नाही. राज्यातील एकूण महाविद्यालयांची संख्या लक्षात घेता, त्यामध्ये असणारी रक्कम ही कोट्यवधी रुपयांच्या घरात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे ही रक्कम विद्यार्थ्यांना परत मिळावी, यासाठी विद्यार्थी संघटनाकडूनही पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी राज्यातील सर्व विभागीय सहसंचालकांना पत्र लिहून महाविद्यालयांकडे असणाऱ्या, अनामत रक्कमेची माहिती देण्याचे आदेश दिले होते. त्याचप्रमाणे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना अनामत रक्कम परत करावी. महाविद्यालये अनामत रक्कम देण्यास, टाळाटाळ करीत असल्यास, उच्च शिक्षण संचालनालयाकडे तक्रार करावी, असे आवाहन डॉ. माने यांनी केले होते. त्यानंतर आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या उपकुलसचिवांनी संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पत्र लिहून, अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडून घेतलेली अनामत रक्कम परत करण्याचे आदेश दिले आहेत.

अनामत रकमेबाबत माहिती देण्याचे आदेश

'महाविद्यालयांवर कारवाई व्हावी'

विद्यार्थ्यांना अनामत रक्कम देण्याबाबत उच्चशिक्षण संचालनालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयांना सूचना दिल्या आहेत. मात्र, काही महाविद्यालये जाणीवपूर्वक अनामत रक्कम देण्यास टाळाटाळ करीत आहे. त्यामुळे अशा महाविद्यालयांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.

Maharashtra Times 1.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

'कमवा व शिका' बंद असल्याने हाल

योजना पुन्हा सुरू करण्याची विद्यार्थ्यांची मागणी

१|३|२०२१

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये कमवा व शिका योजना बंद असल्याने, आर्थिक परिस्थिती कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. करोनाच्या प्रादुर्भावामुळे यंदा विद्यापीठे व महाविद्यालये अधिक काळ बंद असल्याने, योजना राबविण्याचा निर्णय झालेला नाही. मात्र, त्याचा परिणाम गरजू व होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे ही योजना सुरू करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.

आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना आर्थिक आधार मिळावा; तसेच त्यांच्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता व्हावी, या उद्देशाने कमवा व शिका योजना राबविण्यात येते. या योजनेमध्ये गरजू व होतकरू विद्यार्थी प्रामुख्याने सहभागी होऊन, शिक्षण घेताना विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांत किंवा महाविद्यालयांमध्ये काम करतात. योजनेत सहभागी होणाऱ्या, विद्यार्थ्यांना सुट्टीचे दिवस वगळून शैक्षणिक वर्षात ४५ रुपये तासाप्रमाणे दर दिवशी तीन तास काम करता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा महिन्याचा खर्च भागण्यासाठी आर्थिक मदत होते. मात्र, यंदाच्या शैक्षणिक वर्षावर करोनाचे सावट असल्याने, विद्यापीठांचे शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालये पारंपरिक शिक्षणासाठी बंद होती. या काळात ऑनलाइन पद्धतीने शिक्षण सुरू होते. काही दिवसांपूर्वी, शैक्षणिक विभाग व महाविद्यालये सुरू झाली. मात्र, करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे पुन्हा बंद झाली. या एकूणच परिस्थितीमुळे कमवा व शिका योजना राबविण्याबाबत निर्णय झालेला नाही. याचा फटका विद्यापीठातील; तसेच संलग्न महाविद्यालयांमधील गरजू विद्यार्थ्यांना बसला आहे.

> "कमवा व शिका योजनेमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक आधार मिळतो. या योजनेतून मिळणाऱ्या मानधनामुळे, जेवणाचा खर्च भागतो. मात्र, योजनाच बंद असल्याने पुण्यात उच्चशिक्षण घेणाऱ्या साधारण १६ विद्यार्थ्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. योजना सुरू करून, विद्यापीठाने गरजू विद्यार्थ्यांना दिलासा द्यायला हवा.
>
> – विशाल पालवे, एमएस्सी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

'योजना सुरू करावी'

करोनाची स्थिती पुन्हा वाढल्यामुळे महाविद्यालये व विद्यापीठ बंद करण्यात आले. मात्र, ग्रामीण भागातून पुण्याचे आलेल्या, गरजू विद्यार्थ्यांपुढे आर्थिक पेच निर्माण झाला आहे. वसतिगृहे बंद आहेत. त्यामुळे दैनंदिन राहण्याचा व खाण्याचा खर्च भागवायचा कसा, असा प्रश्न पडला आहे. गेल्या वर्षीपर्यंत कमवा व शिका योजनेतून दैनंदिन गरजा भागवल्या जात होत्या. मात्र, सध्या ही योजना करोनाच्या प्रादुर्भावामुळे बंद आहे. ही योजना सुरू झाली, तर निश्चितच विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा मिळेल. त्यामुळे विद्यापीठाने कमवा व शिका योजना सुरू करावी, अशी मागणी '…हेल्पिंग हँड' या संस्थेतर्फे कुलदीप आंबेकर यांनी केली आहे.

Maharashtra Times 1.3.2021

As confusion prevails, SPPU semester exams likely to be delayed

Indecision over which agency will conduct online exams

ALIFIYA KHAN
PUNE, MARCH 1

THE SEMESTER exams of Savitribai Phule Pune University (SPPU) are likely to be delayed due to a host of reasons, including indecision over which agency will conduct the online exams, and whether the exam for a single semester will be conducted or two semesters will be clubbed together.

On February 9, a special meeting of the Board of Examinations had approved online MCQ (multiple choice questions) exams for the first semester of first to final-year students. The exams were supposed to start from March 20 for second and third-year degree students while for first-year students enrolled in various courses, it was to begin by March 30.

However, several representations were made to the university by students as well as senior Senate members, demanding that the first and second semester be combined for the exams, due to the delay in completing the syllabus and examinations.

> Mahesh Kakade, director of the Board of Examinations and Evaluation, said until the company to conduct the exams is finalised, no date can be declared

Currently, the first semester examination which should have taken place by October 2020, but was delayed due to the Covid-19 pandemic and irregularity in online teaching, are scheduled to take place in March 2021. The end semester exams are likely to be held some time in June, according to Exam department officials.

Even as the university is dealing with demands to club the two semesters, it has also received demands to hire a new company to conduct the online exams, even though the previous company's contract is valid for a year.

Meanwhile, anxious students are now demanding that the university declare the final exam dates as they are concerned about further delays due to the prevailing confusion.

But Mahesh Kakade, director of the Board of Examinations and Evaluation, said that until the company to conduct the exams is finalised, no date can be declared.

"Once the contractor is fixed, we will need at least a months' notice to conduct exams. Since students need to be given advance notice, we have to prepare a question bank for 6,500 subjects. We will also be conducting mock tests for students to make them comfortable with the online format, which will take a week's time at least," he said.

Asked if the earlier schedule of March 20 can be adhered to for the exams of second and third-year students, he said it "appeared difficult".

"We have started preparations from our end but the number is in several lakhs of students. Conducting mock tests and then actual exams takes some preparation and planning... usually 30 days are needed," he said.

News Paper Clippings During March 2021

Section: Education

Educators feel MCQ-based tests just not the right fit for postgrad courses

Ardhra.Nair@timesgroup.com

Pune: The conduct of multiple-choice-questions (MCQ) based examinations and allowing only 20 marks for theory examination for the last year students may not be an ideal way to assess college students in English, psychology, philosophy or law where descriptive answers are important to understand the students' understanding of a topic, educators have said.

In many subjects, and especially in a postgraduate courses, the quality of writing is also of prime importance and this examination pattern is detrimental to their evaluation, they added. But another group of educators said the move as an exception this year.

> Examinations have to be subjective, especially in the graduate and postgraduate levels. About 10-20% of the questions can be MCQ-based but one cannot judge a postgraduate student of political science based on them alone. Secondly, if the university has said 20 marks can be subjective questions, then why can't 80 marks be subjective and can be applied to all years instead of just the final year. Technology is available to ensure proctored examinations even if done online
>
> **W N Gade** | FORMER VICE-CHANCELLOR, SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

Radhika Seshan, former head of the history department at SPPU said analysis is a major part of being a postgraduate student. "MCQs do not allow one to understand how much a student has evolved. They can probably gauge how much a student knows but there is a big difference between what a student knows and what a student understands. At the postgraduate level, understanding topics and analysing concepts become important," she added.

Gautami Pawar, head of the English department at Abasaheb Garware College, said all language teachers would like a subjective examination where students are asked to describe, interpret and critically analyse a topic.

"Last week, we tried to conduct our internal examinations online with just 10 marks allotted to descriptive writing. Even this could not be scanned, converted to a pdf file format and uploaded by many students due to poor network issues. Hence, MCQs are the most convenient option to assess students at the moment," she said.

The Times of India 2.3.2021

पडताळणीनंतरच सहयोगी प्राध्यापकांबाबत निर्णय

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत

मुंबई : राज्यातील सहयोगी प्राध्यापक पदोन्नती व वेतन निश्चिती पडताळणी बाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या त्रुटी निवारण समितीकडून मार्गदर्शन मागविण्यात आले असून ते प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली. यासंदर्भात सदस्य अरुण लाड यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. राज्यात सुमारे ५०० प्राचार्यांची पदे भरावयाची होती. त्यापैकी २६० प्राचार्यांची भरती करण्यात आलेली आहे. उर्वरित पदांबाबत वित्त विभागाने परवानगी दिल्यानंतर सकारात्मक निर्णय घेण्यात येणार असल्याची माहितीही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. सामंत यांनी दिली. यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य अरुण लाड व शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला.

Kesari 5.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

» संधी करिअरच्या...

विवेक वेलणकर

स्पर्धा परीक्षा आणि कला शाखा

कला शाखेतून मानवाशी संबंधित शास्त्रांचा अभ्यास केला जातो. मानवी जीवनाच्या विविध पैलूंच्या अभ्यासाबरोबरच या शाखेमध्ये राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र यासारख्या विषयांमध्ये उत्तम करिअर करण्याच्या संधी उपलब्ध आहेत. मानसशास्त्रासारख्या विषयात अनेक प्रकारचे स्पेशलायझेशन करता येतात. त्यात सोशल सायकॉलॉजी, स्कूल सायकॉलॉजी, क्लिनिकल सायकॉलॉजी, इंडस्ट्रिअल सायकॉलॉजी, कंझ्युमर सायकॉलॉजी, काउन्सिलिंग इत्यादी विषयांचा समावेश होतो. याशिवाय या शाखेतून इतिहास, भूगोल, गणित, संख्याशास्त्र आणि इंग्रजी, मराठी, संस्कृतसह जर्मन, फ्रेंच, जॅपनीज सारख्या परकीय भाषांमध्ये सुद्धा अध्ययन व करिअर करण्याची सोय आहे.

कला शाखेतून बारावीनंतर बीबीए, लॉ, हॉटेल मॅनेजमेंट, बीएफ, डिझायनिंग, पत्रकारिता यांसारख्या क्षेत्रात जाता येते तर पदवीनंतर स्पर्धा परीक्षा, एमबीए, बँकिंग, इन्शुरन्स, आर्मी, पत्रकारिता, लॉ, एमएसडब्ल्यू, मीडिया, ट्रॅव्हल/ टुरिझम, रेल्वे, लायब्ररी सायन्स, राजकारण अशा विविध क्षेत्रांत पुढील शिक्षणाच्या / करिअरच्या संधी उपलब्ध होतात. यूपीएससी/ एमपीएससी परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना कला शाखा आदर्श शाखा आहे. यामुळे या स्पर्धा परीक्षांची तयारी पदवीपर्यंत शिक्षण घेताना करणे सहज शक्य होते. सायन्स, कॉमर्सच्या मानाने आर्ट्सला कमी वेळ अभ्यासासाठी व कॉलेजसाठी देणे पुरते.

कला शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी बारावीनंतर आयआयटीमध्ये शिक्षणाची संधी मिळते. आयआयटीमध्ये बारावीनंतर जायचे असल्यास फक्त शास्त्र शाखेचीच मुले जाऊ शकतात या सर्वसाधारण समजाला तडा देणारी एक संधी बारावीनंतर कला शाखेच्या विद्यार्थ्यांना आयआयटी मद्रासमध्ये उपलब्ध आहे. मद्रास आयआयटीमधील ह्युमॅनिटीज व सोशल सायन्स विभागात बारावीनंतर पाच वर्षांचा इंटिग्रेटेड 'एमए'चा कोर्स चालवला जातो. ज्यामध्ये विद्यार्थी इंग्रजी/ डेव्हलपमेंट स्टडीज हा विषय घेऊन मास्टर्स डिग्री मिळवू शकतात. १९५९ साली स्थापन झालेल्या मद्रास आयआयटीमध्ये गेली अनेक वर्षे ह्युमॅनिटीज व सोशल सायन्स विभागामध्ये पीएचडी करण्याचीही सोय आहे. बारावीनंतरच्या या शिक्षणक्रमात पहिली दोन वर्षे समान अभ्यासक्रम असतो ; तर पुढील तीन वर्षे इंग्रजी/डेव्हलपमेंट स्टडी या विषयात प्रावीण्य मिळवता येते. त्यानंतर या विद्यार्थ्यांना अॅकॅडिमिक्सपासून पत्रकारितेपर्यंतच्या विविध क्षेत्रात उत्तम संधी उपलब्ध होऊ शकतात. आयआयटी मद्रासमधील या शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी एक प्रवेश परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेमध्ये दोन पेपर असतात. पहिला पेपर अडीच तासांचा, संपूर्णपणे ऑब्जेक्टीव्ह स्वरूपाचा व कॉम्प्युटरवर सोडवण्याचा असतो. ज्यामध्ये इंग्रजी व कॉम्प्रिहेन्शन कौशल्य, अंकगणित व बुद्धिमत्ता चाचणी, सामान्यज्ञान, पर्यावरण या विषयांवर प्रश्न असतात. दुसरा पेपर अर्ध्या तासाचा लेखी पेपर असतो. त्यामध्ये सामान्यज्ञान व ताज्या घडामोडी यावर निबंध लिहावा लागतो.

बारावी उत्तीर्ण किंवा बारावीला बसलेले विद्यार्थी या परीक्षेला बसू शकतात. यंदा ही परीक्षा १३ जूनला होणार आहे; त्यासाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची अंतिम मुदत १५ मार्च आहे. अधिक माहितीसाठी hsee.iitm.ac.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

दहावी-बारावीची परीक्षा ऑफलाइन

सामना ५।३।२०२१

शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांची माहिती

मुंबई, दि. ४ (प्रतिनिधी) - दहावी-बारावीची परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येतील, असे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले. कोरोनाची परिस्थिती पाहता विद्यार्थी आणि शिक्षकांचे आरोग्य आणि सुरक्षेला आमचे प्राधान्य असून परीक्षेच्या आयोजनासंदर्भात राज्यातील विविध शिक्षणतज्ज्ञांशी चर्चा सुरू असल्याचेही वर्षा गायकवाड यांनी सांगितले.

ऑगस्टमध्ये दहावी-बारावीचा अभ्यासक्रम कमी करण्यात आला तसेच नोव्हेंबरमध्ये राज्य शिक्षण मंडळाने पेपर पॅटर्न निश्चित केला असून गेल्या दोन-तीन महिन्यांपासून परीक्षेचे कामकाज सुरू असल्याचेही त्या म्हणाल्या. बोर्डाच्या परीक्षांचे वेळापत्रक निश्चित करण्याआधी याबाबत शिक्षक, पालकांकडून सूचना आणि हरकती मागविण्यात आल्या होत्या तसेच पेपर पॅटर्न आणि मूल्यमापन पद्धत बदलण्याची आवश्यकता असल्यास तज्ज्ञ व्यक्तींशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असेही वर्षा गायकवाड यांनी स्पष्ट केले. तसेच पहिली ते नववीच्या परीक्षांसंदर्भात शाळांना लवकरच सूचना दिल्या जातील, असेही त्या म्हणाल्या.

■ बारावीची परीक्षा २३ एप्रिल ते २१ मे तर दहावीची परीक्षा २९ एप्रिल ते २० मेदरम्यान होणार आहे

OPPO F9 Pro

Saamana 5.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

Final-year UG exams offline, on schedule: MUHS

Ranjan.Dasgupta @timesgroup.com

Nashik: The Board of Examinations (BoE) of Maharashtra University of Health Sciences (MUHS) has decided that there will be no alterations in the dates for the final-year undergraduate examinations of health science courses.

The BoE, headed by varsity's acting vice-chancellor Nitin Karmalkar, has also made it clear that the exams will be held in offline mode.

The BoE has also approved the SOP framed by the varsity's examination department for the conduct of the exams in adherence to the Covid safety protocols. The examinees have to wear masks during the exams.

These decisions assume significance as some final-year MBBS students had written to state medical education minister Amit Deshmukh and MUHS demanding that the exams be conducted online.

The Times of India 5.3.2021

अकरावीची प्रवेश प्रक्रिया तूर्त ऑनलाइन

''राज्यात इयत्ता अकरावीसाठीची प्रवेश प्रक्रिया तूर्त ऑनलाइन घेतली जाणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला होता. यापुढील काळातही कोरोनाची परिस्थिती पाहून पुढील वर्षासाठी ही प्रवेश प्रक्रिया ऑफलाइन करावी किंवा कसे याबाबत निर्णय घेण्यात येईल,'' अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी विधान परिषदेत दिली. औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया रद्द करण्याबाबत विधान परिषद सदस्य सतीश चव्हाण यांच्या प्रश्नाला उत्तर देताना त्या बोलत होत्या.

शिष्यवृत्तीसाठी 'महाडीबीटी पोर्टल'वर ऑनलाइन अर्ज भरण्याचे आवाहन

पुणे : पुणे विभागातील सर्व जिल्ह्यातील महाविद्यालयांनी आणि विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी ऑनलाइन संकेतस्थळावर अर्ज भरण्याचे आवाहन समाजकल्याण विभागाचे (पुणे) प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी यांनी केले आहे.

पुणे विभागातील सर्व महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकाठी शिष्यवृत्ती शिक्षण फी व परीक्षा फी, राजश्री शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता आदि योजनांचे ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी महाडिबीटी पोर्टल ३ डिसेंबरला सुरू झालेले आहे. त्या अनुषंगाने सर्व महाविद्यालयांनी अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित व नूतनीकरण महाडिबीटी प्रणालीमध्ये ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना आपल्या स्तरांवरून सूचना घ्याव्यात. त्यांसाठी या संकेतस्थळावर अर्ज भरावेत.

महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरांवर प्राप्त अर्जाची पडताळणी करून परिपूर्ण पात्र अर्ज संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त समाजकल्याण लॉगइनला तत्काळ ऑनलाइन पद्धतीने पाठवावेत. विहित कालावधीत शिष्यवृत्तीचे अर्ज सादर न केल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाची राहणार असल्याची माहिती सोळंकी यांनी दिली.

Kesari 5.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

'बुद्धिस्ट संस्कृती'च्या अभ्यासक्रमांची माहिती आता एकाच ठिकाणी उपलब्ध

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून अभ्यासक्रमांचा 'विदासंच'

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : देशभरातील शिक्षण संस्थांमध्ये चालवल्या जाणाऱ्या बुद्धिस्ट संस्कृती आणि पर्यटन संबंधित अभ्यासक्रमांची माहिती आता एकाच ठिकाणी उपलब्ध होऊ शकणार आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून देशभरातील बुद्धिस्ट संस्कृती आणि पर्यटन संबंधित विविध प्रकारचे अभ्यासक्रम, या क्षेत्रातील तज्ज्ञ, विद्यापीठांच्या वार्षिक परिषदा आदी माहितीचा समावेश असलेला सर्वसमावेशक 'डेटाबेस' तयार करण्यात येत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने या बाबतचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. या परिपत्रकानुसार बुद्धिस्ट संस्कृती व पर्यटनाचे भारत हे जागतिक केंद्र होण्यासाठी केंद्र सरकार विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न करत आहे.

> देशभरातील विविध विद्यापीठे, संस्थांद्वारे बुद्धिस्ट संस्कृती, पर्यटन संबंधित अभ्यासक्रम राबवले जातात. देशभरातील नामांकित संस्थांमध्ये १५० हून अधिक अभ्यासक्रम आहेत. प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, संशोधन अशा विविध स्तरांवरील अभ्यासक्रमांची माहिती एका ठिकाणी उपलब्ध करण्याचा निर्णय अतिशय स्तुत्य आहे. त्यामुळे देशभरातील विद्यार्थ्यांसह परदेशातील विद्यार्थ्यांनाही एकाच ठिकाणी विविध अभ्यासक्रमांची माहिती उपलब्ध होऊ शकेल. तसेच संस्थांनाही नवे अभ्यासक्रम सुरू करायचे असल्यास पुनरावृत्ती टाळता येईल.
>
> – डॉ. श्रीकांत गणवीर, डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ

त्यात बौद्ध संस्कृती संबंधित अभ्यासक्रम, पर्यटनासंबंधित अभ्यासक्रम आणि पाली भाषेचा प्रचार, प्रसार यांचा त्यात समावेश आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालय बुद्धिस्ट संस्कृती आणि पर्यटन संबंधित अभ्यासक्रमांच्या माहितीचे संकलन करून सर्वसमावेशक 'डेटाबेस' तयार करत असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यात शिक्षण संस्थांद्वारे राबवले जाणारे अभ्यासक्रम, माजी विद्यार्थी, बुद्धिस्ट संस्कृती आणि पाली भाषा या विषयांतील संशोधक-तज्ज्ञ, संस्थांतर्फे माहिती संकलित केली जाणार आहे. विद्यापीठांना त्यांचे अभ्यासक्रम आणि संबंधित माहिती पाठवण्यासाठी १० मार्चपर्यंतची मुदत असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

शुल्क नियामक प्राधिकरणाचे आदेश

मागासवर्गीयांकडून शुल्क वसुली करू नका

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ७ - मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणशुल्कात सवलत असतानाही महाविद्यालयांकडून पूर्ण शुल्काची मागणी होत आहे. त्यामुळे काही विद्यार्थी प्रवेशाविना राहिले आहे. त्या पार्श्वभूमीवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देत असताना शुल्क वसुली करू नये, असे स्पष्ट आदेश शुल्क नियामक प्राधिकरणाने दिले आहे. त्यामुळे अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांना पायबंद बसणार आहे.

राज्यातील अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या शिक्षण संस्थांवर कारवाईबाबत निवेदन कॉप्स विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अमर एकाड यांनी सचिव शुल्क नियामक प्राधिकरण यांना दिले होते.

अनेक व्यावसायिक महाविद्यालये विविध शीर्षकाखाली शुल्क आकारणी करून विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य शुल्काची वसुली करत असल्याची तक्रार सातत्याने येत होती. तसेच अनेक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्क भरल्याशिवाय प्रवेश देणार नसल्याचे तक्रारी येत होत्या. परंतु, संविधानाचे कलम ४६ नुसार एससी आणि एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क आकारू नये, असे स्पष्ट आदेश आहेत. या विद्यार्थ्यांनी खुल्या प्रवर्गातून प्रवेश घेतला तरी त्यांना शुल्क सवलत कायम राहणार

असल्याचे सांगण्यात आले आहे. यानंतर महाविद्यालयामध्ये देण्यात येणाऱ्या इतर सुविधांचे शुल्क या विद्यार्थ्यांनी द्यावे, असे सांगण्यात आले होते. प्रवेशावेळी विद्यापीठाने स्पष्ट केल्यानुसार प्रवेशप्रक्रिया शुल्क, कागदपत्र छाननी, ओळख पत्र, डिझास्टर रिलीफ फंड, ग्रुप इन्शुरन्स, विद्यार्थी विकास निधी, कुलगुरू निधी, ई-सुविधा या आठ शीर्षकाखालील शुल्कच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून घ्यावे असे सांगितले आहे. याबाबत सुधारित परिपत्रक शुल्क नियामक प्राधिकरणाने काढले. त्यात शुल्क वसुली करता येणार नसल्याचे स्पष्ट केले.

महाविद्यालय विरोधात तक्रारीचे आवाहन

शिक्षण शुल्काव्यतिरिक्त अन्य वसुली करणाऱ्या महाविद्यालयांच्या विरोधात विद्यार्थ्यांनी शुल्क नियामक प्राधिकरणाकडे तक्रार करावी, असे आवाहन केले आहे. त्यामुळे बेकायदा शुल्क वसुली करणाऱ्या महाविद्यालये अडचणीत येण्याची शक्यता आहे.

प्रभात Mon, 08 March 2021 https://epaper.eprabhat.net/c/58926473

News Paper Clippings During March 2021

Section: Education

नेट-सेटधारकांचे ई-मेल आंदोलन

पुणे, ता. ७ : राज्य सरकारकडून सहाय्यक प्राध्यापक भरतीला परवानगी दिली जात नसल्याने याविरोधात नेट-सेट पात्रताधारकांनी वर्षा बंगल्यावर धुणी, भांडी करण्यासाठी, तसेच स्वयंपाकी म्हणून नियुक्त करा, अशा मागणीचे शेकडो इमेल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठवून त्वरित भरतीचा निर्णय घ्या अशी मागणी केली.

नेट-सेट पीएच.डी.धारक संघर्ष समितीतर्फे रविवारी ही मोहीम राबविण्यात आली. राज्यातील नेट, सेट पात्र झालेले तरुण महाविद्यालयांमध्ये तुटपुंजा पगारावर काम करत आहेत. राज्य सरकारकडून प्राध्यापक भरतीचा निर्णय घेतला जावा त्यासाठी संघर्ष समितीतर्फे वारंवार सरकारला निवेदन दिले आहे. 'उच्च तंत्र शिक्षण मंत्रालयाच्या उपक्रमात मंत्री उदय सामंत यांना प्रत्येक विद्यापीठात निवेदन दिले आहे. मात्र, प्राध्यापक भरतीचा निर्णय घेण्याची मानसिकता नाही. यामुळे संघर्ष समितीतर्फे इमेल मोहीम राबविण्यात आली.

" प्राध्यापक भरती होत नसल्याने बेरोजगार तरुणांची काय स्थिती आहे हे मुख्यमंत्र्यांना लक्षात आणून देण्यासाठी ही मोहीम राबविली.
– प्रा. सुरेश देवढे पाटील,
समन्वयक, नेट-सेट पीएच.डी.धारक संघर्ष समिती

Sakaal 8.3.2021

प्रात्यक्षिक परीक्षा घ्यायची कशी?

कोरोनामुळे दहावी-बारावी परीक्षांबाबत संभ्रम

मुंबई, ता. ७ : दहावी-बारावीच्या लेखी परीक्षा ऑफलाइन घेण्याचे राज्य शिक्षण मंडळाकडून निश्चित करण्यात आले; मात्र मुंबईसह राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने लेखी परीक्षेपूर्वी प्रात्यक्षिक परीक्षा कशा घ्यायच्या, याविषयी शाळा संभ्रमात सापडल्या आहेत.

प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यापूर्वी शाळांना आणि विद्यार्थ्यांना सरकारकडून कोणती सुरक्षा पुरवली जाणार, याबद्दल कोणतीही स्पष्टता नसल्याने या परीक्षा कशा घ्यायच्या, असा प्रश्न असल्याचे मुख्याध्यापक संघटनेचे सचिव प्रशांत रेडीज यांनी सांगितले.

प्रात्यक्षिक आणि तोंडी परीक्षांचे वेळापत्रक

बारावी
- तोंडी, श्रेणी, प्रात्यक्षिक परीक्षा : ५ ते २२ एप्रिल
- स्टेनोग्राफी (इंग्रजी) प्रात्यक्षिक : १२ एप्रिल

दहावी
- तोंडी, श्रेणी, प्रात्यक्षिक परीक्षा : १२ ते २८ एप्रिल
- शरीरशास्त्र, गृहशास्त्र, आरोग्यश प्रात्यक्षिक - १२ ते २८ एप्रिल
- दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यानुभव विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा - २१ मे ते १ जून

Sakaal 8.3.2021

विद्यार्थी संघटनांचा तीव्र आंदोलनाचा पुणे विद्यापीठाला इशारा

परीक्षेचा निर्णय आठवडाभरात जाहीर करावा

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ७ - करोनाच्या वाढत्या संख्येने विद्यार्थी व पालकांची चिंता वाढली आहे. अशा मन:स्थितीत विद्यार्थी महाविद्यालयाच्या परीक्षेला सामोरे जाणार आहेत. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षेसाठी देण्यात येणाऱ्या एजन्सीविषयी अद्यापही अनिश्चितता आहे. त्यामुळे परीक्षेचा निर्णय विद्यापीठाने आठवडाभरात जाहीर करावा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा विद्यार्थी संघटनांनी दिला आहे.

पुणे विद्यापीठाने येत्या १५ मार्चपासून पदवी आणि पदव्युत्तरच्या प्रथम सत्राची परीक्षा घेण्याचे जाहीर केले आहे. पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार आठवभरात ही परीक्षा सुरू होणे अपेक्षित आहे. मात्र, सध्याची परिस्थिती पाहता ही परीक्षा एक महिना पुढे ढकलावी लागणार असल्याचे स्पष्ट होत आहे. कारण परीक्षा घेण्यासाठी जी एजन्सी नेमायची आहे, त्याचा निर्णय अजूनही झालेला नाही. पूर्वीची एजन्सी कायम ठेवायची का? नवीन एजन्सीला काम द्यायचा, याविषयी दिरंगाई होत आहे.

विद्यापीठाने परीक्षेचे तातडीने परिपत्रक प्रसिद्ध करावे आणि त्याचे वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणी पुणे शहर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने कुलगुरुंकडे केली आहे. विद्यापीठाने योग्य कंपनीची निवड करून परीक्षांचे योग्य ते नियोजन करावे. आठवडाभरात याबाबत निर्णय न झाल्यास आंदोलन करण्यात येणार असल्याचे 'मनविसे'चे शहराध्यक्ष कल्पेश यादव यांनी सांगितले.

दरम्यान, विद्यापीठ योग्यवेळी योग्य निर्णय घेण्यास सक्षम नाही. परीक्षेच्या निर्णयात कायमच गोंधळ आहे. विद्यार्थ्यांना मागील वर्षी परीक्षेमध्ये आणि निकालात अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे यावेळेस निविदा प्रक्रिया राबवून योग्य त्या कंपनीला देण्यात यावी. यावर्षी परीक्षेत व निकालात गोंधळ झाल्यास आंदोलन करावे लागेल, असे युक्रांदचे उपाध्यक्ष कमलाकर शेटे यांनी सांगितले.

प्रभात Mon, 08 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/60204359

News Paper Clippings During March 2021

Section: Education

आपल्या समस्यांवर आपणच उपाय शोधत आत्मनिर्भर व्हावे

प्रा. डॉ. नितीन करमळकर यांचे मत

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ७ - सद्य:स्थितीत पर्यावरणाच्या समस्यांवर उपाय शोधण्याची गरज आहे. इनोफेस्टच्या माध्यमातून आपण केवळ स्पर्धा घेत नाही, तर या आपल्याच प्रश्नांवर आपणच उत्तरे शोधत आत्मनिर्भर बनण्याचा प्रयत्न करत आहोत, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केले.

सेंटर फॉर इनोव्हेशन, इंक्युबेशन अँड लिंकेजेसच्या वतीने आयोजित इनोफेस्ट समिट २०२१ च्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू एन. एस. उमराणी, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या महापौर माई ढोरे, ऑटो क्लस्टर डेव्हलपमेंट अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे व्यवस्थापकीय संचालक किरण वैद्य, मुख्य माहिती तंत्रज्ञ नीलकंठ पोमण, सेंटर फॉर इनोव्हेशनच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर आणि अधिसभा सदस्य संतोष ढोरे आदी उपस्थित होते.

या इनोफेस्ट २०२१ मध्ये २०४ संघांच्या माध्यमातून एक हजाराहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. यातील निवडक ३४ गटांना बूट कॅम्पद्वारे ३३ तज्ज्ञ व्यक्तींनी मार्गदर्शन केले व त्यातील काही आयडिया पुढील काळात स्टार्टअपमध्ये रूपांतरीत करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. डॉ. करमळकर म्हणाले, हवा, पाणी यामध्ये सध्या होत असलेल्या प्रदूषणाबाबत अनेक विद्यार्थ्यांनी उपाय सुचवले आहेत, हे खरोखरच कौतुकास्पद आहे. विद्यापीठातील अनेक विभागांमध्येही या विषयावर अनेक संशोधन व प्रकल्प सुरू आहेत.

विजेत्यांची नावे : पिंपरी-चिंचवड महापालिका इनोव्हेशन सेंटर : आकांक्षा शिंदे. विषय- सार्वजनिक स्वच्छतागृहांचा चांगल्या प्रकारे वापर व देखभाल. श्रीष सिंग : विषय- इ कचऱ्याचे व्यवस्थापन. प्रतीक्षा थोरात : विषय- डेटा मॉनिटरिंग यूजिंग आयोटी सिस्टीम.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ 'आय टू इ' स्पर्धा : श्रेणीक मुथा, कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, विषय- ॲक्टिव्हिटी बेस लर्निंग प्रोग्राम. अभिषेक चौधरी : पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, विषय- प्लांट रेसिड्यु एक्सट्रक्शन. याबरोबरच अनुराग लंबोर आणि गौरव दुधे या विद्यार्थ्यांना क्लाउड क्यू कंपनीकडून नोकरीची संधी देण्यात आली आहे.

प्रभात Mon, 08 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/60204374

News Paper Clippings During March 2021

Section: Education

पीएचडी गाइडसाठी अट बदलणार?

विद्यापीठाच्या समितीचा अहवाल येणार आठवड्याभरात

पुणे, ता. ८ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पीएचडीसाठी गाइड म्हणून मान्यता मिळविण्यासाठी किमान तीन ते पाच वर्षांची अट आहे. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) नियमाचे उल्लंघन होत आहे. याबाबत तक्रारी गेल्याने ही अटी रद्द करण्यासाठी विद्यापीठाकडून समिती नियुक्त केली आहे. पुढील आठवड्याभरात त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत स्पष्टता येणार आहे.

पुणे विद्यापीठातून मिळवलेल्या पीएचडीला विशेष महत्त्व आहे.

परंतु अनेक विषयांना कमी गाइड असल्याने अनेकांना पीएचडीसाठी प्रवेश मिळत नाही.

'यूजीसी'ने २०१६ मध्ये काढलेल्या परिपत्रकात पीएचडी मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळविण्यासाठी कोणतीही अट टाकलेली नाही. त्यानुसार सर्व विद्यापीठांनी त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक होते. मात्र, पुणे विद्यापीठाने पीएचडी गाइड होण्यासाठी पीएचडी झाल्यापासून तीन वर्षे शैक्षणिक अनुभव किंवा नियुक्तीच्या वेळी पीएचडी असल्यास पाच वर्षांच्या शैक्षणिक अनुभवाची अट घातली आहे. यूजीसीच्या नियमाप्रमाणे त्यात बदल करण्यात आलेला नव्हता. तत्कालीन कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांनी आदेश दिले होते.

पीएचडी प्राप्त सहायक प्राध्यापकांना संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्याचा ठराव विद्यापीठाने मंजूर केला. त्यामध्ये अनुभवाची अट टाकलेली नव्हती. परंतु शैक्षणिक विभागाने नियमावली करताना सहायक प्राध्यापकाने सेवेत रुजू झाल्यानंतर पीएचडी पूर्ण केल्यास तीन वर्षांचा आणि सेवेत रुजू होताना पीएचडी असल्यास पाच वर्षांचा अनुभव पाहिजे, अशी अट घातली आहे.

याविरोधात भारतीय इलिजिबल स्टुडंट अँड टीसर्च असोशिएशनचे (बेस्टा) अध्यक्ष अजय दरेकर व सचिव डॉ. संतोष पाटील यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्याकडे तक्रार केली होती. 'यूजीसी'च्या नियमांचे उल्लंघन होत असल्याने पुणे विद्यापीठाने ही नियमावली बदलण्यासाठी समिती गठित केली आहे. त्याचा अहवाल पुढील आठवड्याभरात येऊन परिपत्रक निघेल असे सूत्रांनी सांगितले.

> पुणे विद्यापीठाने पीएचडी गाइडसाठी अनुभवाची अट टाकल्याने तरुणांना या पदासाठी पात्र होता येत नव्हते. विद्यापीठाने ही अट रद्द करावी म्हणून पाठपुरावा केला. परंतु त्यास नकार दिला होता. याबाबत उदय सामंत यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर विद्यापीठाने तयारी दाखवली आहे.
> - अजय दरेकर, अध्यक्ष, बेस्टा

Sakaal 9.3.2021

राज्यातील अठराशे संस्थांचा 'नॅक'ला ठेंगा

अनेक महाविद्यालये त्यांना नॅक मूल्यांकनात किती गुण मिळाले, हे अभिमानाने सांगतात. मात्र, राज्यात अनेक महाविद्यालये अशी आहेत, की त्यांनी गेल्या कित्येक वर्षात एकदाही नॅक मूल्यांकन करून घेतले नाही. राज्यातील नॅक मूल्यांकनाचा आढावा घेणारी मालिका आजपासून...

'नॅक'चा गुंता
भाग एक

सकाळ EXCLUSIVE

ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ८ : शैक्षणिक दर्जा राखण्यासाठी नॅक मूल्यांकन अनिवार्य आहे; पण राज्यातील १ हजार ८६४ शैक्षणिक संस्थांनी अद्याप एकदाही मूल्यांकन करून घेतलेले नाही. नॅक मूल्यांकनापासून पळवाट शोधणाऱ्या संस्थांना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दणका देत २०२२ पर्यंत मूल्यांकन करून घ्या व किमान २.५ गुण मिळवणे आवश्यक केले आहे. पुढील वर्षभरात मूल्यांकन करून घेताना संस्थांची कसरत होणार आहे.

महाविद्यालयाची इमारत, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा, प्राध्यापकांचा संशोधनात असलेला सहभाग, गुणवत्तावाढीसाठी राबविले जाणारे उपक्रम, क्रीडा, कला यामधील सहभाग यांसह इतर गुणात्मक बाबींचे मूल्यांकन करून घेतले जाते. राज्यातील शासकीय संस्था व अनुदानित संस्थांकडून मूल्यांकन करून घेतले जात असले तरी विनाअनुदानित संस्थांनी नॅक मूल्यांकन करून घेण्याकडे पाठ फिरवली आहे. यातच कोरोनामुळे महाविद्यालये बंद आहेत, त्यामुळे फेब्रुवारी २०२१ पर्यंत नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण ठप्प होती.

देशभरातील केवळ सुमारे ४० हजार संस्थांपैकी आतापर्यंत केवळ ८ हजार १६६ महाविद्यालयांनी तर ९९३ विद्यापीठांपैकी ३६४ विद्यापीठांनी नॅक मूल्यांकन करून घेतले आहे. हे प्रमाण साधारणपणे २० टक्के आहे. यापेक्षा महाराष्ट्रातील हे प्रमाण ४० टक्के आहे. मात्र, गेल्या २७ वर्षात राज्यातील ६० टक्के संस्थांनी एकदाही नॅक मूल्यांकन करून घेतलेले नाही. त्यामुळे 'यूजीसी'ने नुकतेच एक परिपत्रक काढले असून, त्यामध्ये सर्व महाविद्यालये, विद्यापीठांनी २०२२ पर्यंत नॅक मूल्यांकन करून घ्यावे व त्यांना मूल्यांकनात किमान २.५ क्युम्युलेटिव्ह ग्रेड पॉइंट अॅव्हरेज मिळणे अनिवार्य आहे, असे आदेश दिले आहेत. त्यामुळे नॅक मूल्यांकनाबाबत उदासीनता असलेल्या महाविद्यालयांना तयारीला लागावे लागणार आहे.

> महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन करून घेणे आवश्यकच आहे; पण ज्या संस्थांनी अद्याप एकदाही मूल्यांकन करून घेतले नाही त्यांना तयारीला लागावे लागेल. तसेच विद्यापीठ व शासनाने महाविद्यालयांना विश्वासात घेऊन प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. यूजीसीच्या परामर्श योजनेमुळेही त्यास हातभार लागू शकतो.
> -डॉ. आर. एस. माळी, माजी कुलगुरू व नॅकचे अभ्यासक

नॅक मूल्यांकन म्हणजे काय?

नॅशनल असेसमेंट अँण्ड अॅक्रिडिएशन कौन्सिल (नॅक) ही महाविद्यालये, विद्यापीठ यांच्या भौतिक तसेच गुणात्मक क्षमतेचे मूल्यांकन करणारी यंत्रणा आहे. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी १९९४ मध्ये याची स्थापना करण्यात आली आहे. यापूर्वी शैक्षणिक संस्थेमध्ये समिती जाऊन पाहणी करून मूल्यांकन करत होती. मात्र, आता २०१८ पासून नव्या पद्धतीनुसार ६५ टक्के मूल्यांकन हे संगणकीय व गणित पद्धतीने होत असून, ३० टक्के मूल्यांकन हे महाविद्यालयाला भेट देणारी समिती (पीअर टीम) करते, ५ टक्के मूल्यांकन विद्यार्थ्यांकडून माहिती भरून घेतील जात आहे.

राज्यातील मूल्यांकनाची स्थिती

एकूण महाविद्यालये	एकदा मूल्यांकन	दोन वेळा	तीन वेळा	चार वेळा
३१४१	१२७७	८६७	३७९	४

Sakaal 9.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

79% SSC, HSC pupils upset with offline exam move

Times News Network

Mumbai: While the state government has been stern on its decision to conduct SSC and HSC exams offline in April in the current format, 79% students said they were dissatisfied with the decision, found a survey by a city-based teacher.

Dineshkumar Gupta, a teacher from a Hindi medium civic school in Mumbai, used Google forms to reach out to 1.5 lakh students to find out their opinion about the upcoming board exams.

"We have been reaching out to the education department to demand that they bring about changes in the format of the board examinations considering that learning has been largely impacted due to the pandemic. Students haven't been able to study the complete syllabus and with the board exams now just round the corner, they are extremely stressed," said Gupta. Through his peers in all districts of the state, Gupta sent out his survey to SSC and HSC students.

Among the respondents, 84% said that the board should further reduce the syllabus and 70% were not satisfied with online lectures.

The Times of India 9.3.2021

विद्यापीठ परीक्षा मंडळाची आज बैठक

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची प्रथम सत्राची परीक्षा कधी होईल, याबाबत स्पष्टता नसल्याने विद्यार्थी अद्याप संभ्रमात आहेत. या पार्श्वभूमीवर आज (मंगळवारी) विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाची बैठक होणार आहे. त्यामुळे या बैठकीत काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

परीक्षेसंदर्भातील निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत घेण्यात येतात. त्या दृष्टीने मंगळवारी होणाऱ्या बैठकीला महत्त्व प्राप्त झाले आहे. या बैठकीत परीक्षेबाबत ठोस निर्णय होण्याची शक्यता आहे.

ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होणार असून विद्यापीठाच्या पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार येत्या सोमवारपासून प्रथम सत्राची परीक्षा होणे अपेक्षित आहे. मात्र, या परीक्षेसाठी कोणती एजन्सी नेमायची याचा निर्णय अद्याप झालेला नाही. ही परीक्षा सध्याच्या एजन्सीकडून घ्यायची अथवा नव्या एजन्सीद्वारे घ्यायची, याबाबतचा निर्णय झालेला नाही. एजन्सीचा प्रश्न तातडीने मार्गी लावून वेळेवर परीक्षा घ्या, अशी मागणी विद्यार्थी व पालक करीत आहेत. मागील परीक्षेतील तांत्रिक अडचणींचा विचार करून कंपनी निवडण्यात यावी, अशी भूमिका विद्यार्थी संघटनांनी मांडली आहे.

Scanned with CamScanner

Maharashtra Times 9.3.2021

सकाळ

विद्यापीठाच्या परीक्षा आता ११ एप्रिलपासून

२५ मार्चपर्यंत नवीन वेळापत्रक जाहीर होणार

पुणे, ता. ९ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम सत्राच्या परीक्षेवरून निर्माण झालेला गोंधळ निस्तारण्यासाठी आज झालेल्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत परीक्षा एक महिना पुढे ढकलण्याची नामुष्की विद्यापीठावर आली. ही परीक्षा ११ एप्रिलपासून सुरू होणार आहे.

प्रथम ते अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने बहुपर्यायी प्रश्नांद्वारे (मल्टिपल च्वाइस क्वेश्चन- एमसीक्यू) ५० गुणांची घेतली जाणार आहे. विद्यापीठाची स्वतःची एसएसपीयू एज्युटेक फाउंडेशन ही कंपनी परीक्षा घेणार आहे.

पुणे विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची परीक्षा एक महिन्यापूर्वी म्हणजेच ९ फेब्रुवारी रोजी बैठक झाली होती. त्यामध्ये १५ मार्चपासून परीक्षा घेण्याचा निर्णय झाला होता. मात्र, परीक्षेसाठी एजन्सी निवडीवरून मतभेद असल्याने परीक्षेचे वेळापत्रक कोलमडले. त्यामुळे आज पुन्हा परीक्षा मंडळाची बैठक झाली.

पान ७ वर »

> प्रथम सत्र परीक्षा ११ एप्रिलपासून सुरू केली जाईल. त्याचे वेळापत्रक २० ते २५ मार्च दरम्यान जाहीर होईल. ही परीक्षा विद्यापीठाची स्वतःची कंपनी असलेली एसएसपीयू एज्युटेक फाउंडेशन ही कंपनी घेईल. ५०:२० चे सूत्र रद्द केले असून, सर्व अभ्यासक्रमांच्या व सर्व वर्षांच्या परीक्षा ५० गुणांची एमसीक्यू पद्धतीने होईल.
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मे अखेरपर्यंत परीक्षा चालणार

११ एप्रिलपासून परीक्षा सुरू झाल्यानंतर परीक्षा संपण्यास किमान ५० दिवसांचा कालावधी लागणार आहे. त्यामध्ये सार्वजनिक सुट्या आल्याने हा कालावधी वाढणार आहे. परीक्षेबाबत सविस्तर सूचना व मार्गदर्शनासाठी विद्यापीठाने अधिकृत परिपत्रक त्वरित जाहीर करावे, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

सुमारे ५५०० प्रथम सत्रासाठी विषय

६ लाख २५ हजार परिक्षा देणार विद्यार्थी

५ लाख ८४ हजार आत्तापर्यंत अर्ज प्राप्त

Pune, Main
10/03/2021 Page No. 101

News Paper Clippings During March 2021

Section: Education

सकाळ

विद्यार्थ्यांनाही लॉकडाउन नकोच

पुणे, ता. ९ : शाळा महाविद्यालये केव्हा सुरू होणार, परीक्षा ऑनलाइन होणार का, ऑफलाइन हेही अद्याप निश्चित झालेले नाही. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिपच्या समस्या आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन आता लॉकडाउनचा विचार करीत आहे. लॉकडाउन झाला तर, शैक्षणिक अनिश्चितता आणखी वाढेल आणि त्याचा फटका बसेल, असा बहुसंख्य विद्यार्थ्यांचा सूर आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने लॉकडाउन न करता जनजीवन सुरळीत राहील, याकडे लक्ष देण्याची गरज आहे, असेच अनेक विद्यार्थ्यांनी 'सकाळ'शी बोलताना सांगितले.

संचित काळूसकर : लॉकडाउन करण्यापेक्षा जर मंदिरे, थिएटर, मॉल्स यासारख्या जागांवर निर्बंध घातले तर

“ आधी कोरोनामुळे बोर्डाच्या परीक्षा लांबणीवर टाकल्या आहेत. त्यात अजूनही ऑनलाइन का ऑफलाइनचा घोळ चालू आहे. यावर लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा एवढीच अपेक्षा.
-अनिकेत देवूगणे

“ लॉकडाउनमुळे विद्यार्थ्यांना शाळा, कॉलेजमध्ये न जाता घरूनच ऑनलाइन अभ्यास करावा लागत आहे. यामुळे मोबाईल, लॅपटॉपचा वापर अतिशय वाढला आहे. तसेच परत कडक लॉकडाउन झाल्यास किराणा माल, हॉटेल्स, दुकाने बंद झाल्यास सर्व व्यावसायिक वर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होईल.
- प्रिया विंकार

कदाचित कोरोनाची स्थिती आटोक्यात येऊ शकते. तसेच अत्यावश्यक जमावबंदी हा देखील एक यावरील एक उत्तम उपाय आहे. पुढे येणाऱ्या कडक लॉकडाउनपेक्षा या गोष्टींचे पालन करणे तुलनेने सोपे होईल.

सालस वाईकर : कडक लॉकडाउन झाल्यास गरजेच्या वस्तूंचा पुरवठा कमी होईल. लॉकडाउनमुळे विद्यार्थी अगोदरच निष्क्रिय झाले आहेत, पुन्हा असे झाले तर शिक्षणाबद्दलची उरली सुरली ओढ आणि असणारा उत्साह नाहीसा होईल. भविष्यात काहीतरी करून दाखवण्याची जिद्द मागे पडेल. आता कुठे सर्वजण नव्या आशेने कामाला लागले होते पुन्हा मानसिक तणावातून जाण्याची कोणाचीच इच्छा नाही. त्यामुळे लॉकडाउन नकोच.

मानिका कुलकर्णी : लॉकडाउनचा परिणाम जसा उद्योगधंद्यावर होणार तसाच शिक्षणावरही होणार आहे. शाळेत नुकत्याच सुरू झाल्या असताना परत बंद कराव्या लागल्या आहेत. आपण जर नियमांचे पालन केले, स्वतःची काळजी नीट घेतली तर लॉकडाउन करण्याची वेळ येणार नाही.

अनिष पुरोहित : सर्वात आधी कोरोनाची सद्यस्थिती जनतेसमोर यायला हवी. कारण एकीकडे लसीकरण चालू आहे तर दुसरीकडे संपूर्ण लॉकडाउन करण्याची चर्चा चालू आहे. जर जनतेकडून नियम पाळण्याची अपेक्षा असेल तर त्यांच्यापर्यंत योग्य ती परिस्थिती येणे अत्यंत गरजेचे आहे.

...तर शिक्षणाचा खेळखंडोबा होईल

कोरोनात कसे वागायचे हे लोकांना कळले आहे, सुविधा उपलब्ध झाल्या आहेत, तरीही कोरोना रुग्ण वाढत असल्याने लॉकडाउन करून शाळा- महाविद्यालये बंद केले तर शिक्षणाचा खेळखंडोबा होणार आहे. विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान भरून निघणार नाही. त्यामुळे हिवसभरात दोन, तीन बॅचमध्ये शिक्षण देता आले तरी चालेल; पण लॉकडाउन नको, अशी भूमिका शिक्षण क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.

कोरोनाच्या वाढीमुळे २८ फेब्रुवारीपर्यंत शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आता १४ मार्चपर्यंत सर्व संस्था बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. कोरोनाला रोखण्यासाठी शासनाकडून आणखी निर्बंध आणण्याचा प्रयत्न आहे, पण याचे दुष्परिणाम परिणाम विद्यार्थी, प्राध्यापकांना भोगावा लागणार आहे.

“ कोरोनाबद्दल लोकांमध्ये जनजागृती झाली आहे. उपचाराची तयारी आहे, लसीकरण सुरू झाले आहे. त्यामुळे पुन्हा लॉकडाउन करण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांचे एका वर्षाचे नुकसान झाले आहे; पण आणखी नुकसान होऊ नये. सावधगिरी बाळगून महाविद्यालयांमधील थेट शिक्षण सुरू ठेवता येईल. शासनाने फक्त इच्छाशक्ती दाखविणे गरजेचे आहे.
-ॲड. एस. के. जैन, अध्यक्ष, नियामक मंडळ, शि. प्र. मंडळी

Pune, Pune-Today
10/03/2021 Page No. 1

पुणे विद्यापीठाची प्रथम सत्र ११ एप्रिलपासून

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ९ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची प्रथम सत्र परीक्षा ११ एप्रिलपासून सुरू होणार आहे. प्रथम सत्र ते अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन-एमसीक्यू) पद्धतीने ५० गुणांची ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. विद्यापीठाची स्वतःची असलेल्या 'एसएसपीयू एज्युटेक फाउंडेशन' या कंपनीमार्फत परीक्षा होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

नियोजित वेळापत्रकानुसार दि. १५ मार्चपासून परीक्षा सुरू होणार होती. मात्र, एजन्सी नेमण्यावरून परीक्षा कधी होतील, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले होते. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची बैठक आज झाली. यात परीक्षेच्या निर्णयावर

“ विद्यापीठाची प्रथम सत्र परीक्षा ११ एप्रिलपासून सुरू होईल. त्याचे वेळापत्रक २० ते २५ मार्च दरम्यान जाहीर होईल. या परीक्षेत ५०:२० पॅटर्न रद्द करण्यात आला आहे. सर्व अभ्यासक्रमांच्या व सर्व वर्षांच्या परीक्षा ५० गुणांची एमसीक्यू पद्धतीने होणार आहे.
डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू

शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यामुळे अखेर विद्यापीठावर एक महिना ही परीक्षा पुढे ढकलण्याची नामुष्की आली.

साधारणतः दोन तास चाललेल्या बैठकीत दोन्ही सत्राची परीक्षा एकत्र **(पान २ पहा)**

प्रभात Wed, 10 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/58991408

पुणे विद्यापीठाची प्रथम सत्र ११ एप्रिलपासून

घ्यावी का?, परीक्षा कोणती एजन्सी घेणार?, परीक्षेमध्ये गुणवत्ता राखण्यासाठी काय केले जाणार यासह अन्य विषयांवर जोरदार चर्चा झाली. एसएसपीयू एज्युटेक फाउंडेशनने परीक्षा घेण्याची तयारी दर्शविल्याने पत्रही बैठकीस सादर करण्यात आले. या कंपनीची क्षमता आहे का? यावरही चर्चा करण्यात आली. तसेच यापूर्वीच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत अंतिम वर्षाच्या प्रथम सत्राच्या परीक्षा ५०:२० या पॅटर्ननुसार घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. अशा पद्धतीने ही परीक्षा घेण्याची क्षमता या कंपनीची नसल्याने ५०:२० हा पॅटर्न रद्द करण्यात आले आहे. प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष या सर्वांची सरसकट ५० गुणांची एमसीक्यू परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यापीठाच्या प्रथम सत्र परीक्षेसाठी १० मार्चपर्यंत अर्ज करण्याची मुदत आहे. आतापर्यंत ५ लाख ८४ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले आहेत. जवळपास ६ लाख विद्यार्थी परीक्षेसाठी अपेक्षित आहे. ह्या परीक्षेसाठी १० मार्चनंतर कसल्याही परिस्थितीत अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली जाणार नाही, अशी माहिती विद्यापीठातर्फे देण्यात आली.

प्रभात Wed, 10 March 2021
https://epaper.eprabhat.net

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

विद्यापीठाची परीक्षा आता ११ एप्रिलपासून

परीक्षा मंडळ बैठकीत निर्णय : गोंधळावर पडदा पडला

फॉलो अप

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे १५ मार्चपासून घेतल्या जाणाऱ्या परीक्षा १५ दिवस पुढे ढकलल्या आहे. आता येत्या ११ एप्रिलपासून एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन या कंपनीच्या सहकार्याने या परीक्षा घेतल्या जातील. तसेच परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक २३ मार्च रोजी प्रसिद्ध केले जाईल, असा निर्णय मंगळवारी परीक्षा मंडळाच्या (बीओई) बैठकीत घेतला. त्यामुळे परीक्षा केव्हा होणार? याबाबत काही दिवसापासून सुरू असलेल्या गोंधळावर अखेर पडदा पडला आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यातील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या सुमारे साडेसहा लाख विद्यार्थ्यांची परीक्षा १५ मार्चपासून होणार असल्याचे प्रसिद्ध केले होते.

२५ मार्चला परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करणार

विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत १५ एप्रिल रोजी होणाऱ्या परीक्षा सुमारे पंधरा दिवस पुढे ढकलून येत्या ११ एप्रिलपासून घेण्याचा ठराव मंगळवारी झाला. येत्या २५ मार्च रोजी परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच ऑनलाइन पद्धतीने केवळ ५० गुणांची परीक्षा घेण्याचे निश्चित करण्यात आले.

- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मात्र, परीक्षा घेण्यासाठी एजन्सी निश्चित न झाल्याने परीक्षा एप्रिल महिन्यापर्यंत पुढे ढकलाव्या लागणार असल्याचे वृत्त 'लोकमत'ने सर्वप्रथम प्रसिद्ध केले होते. स्वत:च्या कंपनीच्या सहकार्यातून परीक्षेबाबत चाचपणी विद्यापीठ करत करून मंगळवारी परीक्षेच्या गोंधळावर पडदा पडणार असल्याचे वृत्तही 'लोकमत'ने दिले होते. आठ रुपये दराने प्रत्येक विद्यार्थ्याची परीक्षा घेण्याची जबाबदारी दिली. एजन्सी निवडीच्या गोंधळामुळे परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा लागला. बहुपर्यायी प्रश्नांबरोबरच २० गुणांचे लेखी प्रश्न परीक्षेत विचारले जाणार असल्याचे जाहीर केले होते. तसेच या प्रश्नांची उत्तरे एका कागदावर लिहून विद्यापीठाने दिलेल्या क्यूआर कोडवर अपलोड करावे लागणार होते. मात्र, एजन्सी बदलल्यामुळे २० गुणांची लेखी परीक्षा घेण्याचा निर्णय रद्द केला आहे. ५० गुणांची बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित ऑनलाइन परीक्षा घेतली जाईल.

Pune Main
Page No. 2 Mar 10, 2021
Powered by: erelego.com

News Paper Clippings During March 2021

Section: Education

पुणे विद्यापीठ समाजाशी नाळ जोडून : डॉ. नितीन करमळकर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ९ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ म्हणजे केवळ शैक्षणिक उपक्रम चालवणारे केंद्र नसून व्यापक अर्थाने हे विद्यापीठ समाजाशी नाळ जोडून आहे. समाजातील सकारात्मकतेचे स्पंदन टिपणे हे पुणे विद्यापीठाचे आद्य कर्तव्य आहे, असे मत सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळातर्फे देण्यात येणाऱ्या सावित्रीबाई फुले सन्मानाचे वितरण मंगळवारी कुलगुरुंच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शीला बारसे, कडूबाई खरात, सोनिया अगरवाल-कोंजेटी, ॲड. वर्षा देशपांडे, क्षिप्रा रोहित आणि रेलु वसावे यांना त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सावित्रीबाई फुले सन्मान देऊन गौरविण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरु डॉ. एन.एस.उमराणी, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या सुनेत्रा पवार, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. संतोष परचुरे उपस्थित होते.

प्रभात Wed, 10 March 2021 https://epaper.eprabhat.net/c/58991470

समस्यांच्या चक्रव्यूहात नॅक मूल्यांकन

'नॅक'चा गुंता
भाग दुसरा

सकाळ EXCLUSIVE

ब्रिजमोहन पाटील :
सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ९ : महाविद्यालयाची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी, दर्जा वाढविण्यासाठी नॅक मूल्यांकन अनिवार्य असते. मात्र, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे, महाविद्यालयात असुविधांचा वानवा, तयारीसाठी येणारा मोठा खर्च यामुळे राज्यातील बहुतांश विनाअनुदानित महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकनाकडे पाठ फिरवली आहे. महाविद्यालयाचे अस्तित्व टिकविण्यासाठीचा संघर्ष सुरू असल्याने या चक्रव्यूहात नॅक मूल्यांकन अडकले आहे. राज्यातील १ हजार १३६ हजार विनाअनुदानित संस्थांपैकी केवळ १० टक्के म्हणजे १९१ संस्थांनाच नॅक मूल्यांकन करून घेणे शक्य झाले आहे.

कायद्यानुसार नॅक मूल्यांकन अनिवार्य असताना सध्या देशातील केवळ २० टक्के संस्थांनी मूल्यांकन करून घेतलेले आहे. केंद्र सरकारकडून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना महाविद्यालयांची संख्या कमी केली जाणार आहे. गुणवत्ता राखणारे महाविद्यालये टिकतील यादृष्टीने पावले उचलली जात असून त्या दृष्टीनेच २०२२ पर्यंत सर्व संस्थांना नॅक मूल्यांकन करावे तसेच त्यामध्ये २.५ पेक्षा जास्त गुण मिळविणे आवश्यक आहे असे 'यूजीसी'ने स्पष्ट केले आहे. अशा स्थितीत राज्यातील विनाअनुदानित संस्थांची स्थिती गंभीर आहे.

राज्यात १ हजार १३६ विना अनुदानित महाविद्यालये आहेत. यापैकी अनेक महाविद्यालयांमध्ये एकही कायमस्वरूपी प्राध्यापक नाही, तेथील शैक्षणिक कामकाज तात्पुरत्या प्राध्यापकांना तुटपुंजे वेतन देऊन सुरू आहे, महाविद्यालयांची स्वतःची इमारत नसल्याने भाड्याच्या जागेत संस्था सुरू आहे, जागा स्वतःची असली तरी इमारत चांगली नाही, ग्रंथालय, लॅब, मैदान यासह इतर सुविधा नाहीत. नॅक मूल्यांकनाच्या तयारीसाठी येणारा लाखो रुपयांचा खर्च यामुळे संस्थाचालक त्यासाठी तयार होत नसल्याचे प्राचार्यांनी खासगीत मान्य केले.

अशी आहे स्थिती

विभाग	विनाअनुदानित संस्था	नॅक मूल्यांकन झालेल्या संस्था
अमरावती	१४४	४
औरंगाबाद	२८९	६
जळगाव	६४	१३
कोल्हापूर	९२	२०
मुंबई	१४०	३२
नांदेड	१५४	६
नागपूर	३९२	१३
पनवेल	२८९	३९
पुणे	३३२	५१
सोलापूर	४०	७
एकूण	११३६	१९१

"नॅक प्रक्रियेची थेट सुरुवात २००० मध्ये झाली आहे, पण गेल्या २० वर्षांत संस्थांनी मूल्यांकन करून घेतले नसेल तर ते गंभीर आहे. त्यामुळे 'यूजीसी'ने २०२२ पर्यंत मूल्यांकन करावे हा धरलेला आग्रह महत्त्वाचा आहे. त्यामुळे संस्थांची आर्थिक स्थि कशीही असली तरी संस्थांनी मूल्यांकन करून घेताना त्यांची वस्तुस्थिती दाखवली पाहिजे. तसेच प्राध्यापक भरती नसल्याचा परिणाम मूल्यांकनावर होत आहे.
- डॉ. संजय खरात,
प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड

"नॅक मूल्यांकन करून घेणे गरजेचे आहे. २०१२ पासून राज्यात प्राध्यापक भरती नाही, जवळपास ५०० प्राचार्यांची पदे रिक्त आहेत. तसेच ९० टक्के संस्थांपुढे आर्थिक संकट असताना तयारीसाठी येणारा मोठा खर्च विनाअनुदानित संस्थांना परवडणारा नाही, त्यामुळे अनेक संस्थांनी अद्याप मूल्यांकन करून घेतलेले नाही.
- डॉ. सुधाकर जाधवर, सचिव, प्राचार्य महासंघ

Sakaal 10.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

कंपनीसमोर परीक्षा घेण्याचे आव्हान

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आपल्या स्वत:च्या एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन या कंपनीकडे परीक्षेचे काम देण्याचा निर्णय मंगळवारी घेतला. मात्र, विद्यापीठाने गेल्या वर्षी घेतलेल्या ऑनलाइन परीक्षेमध्ये झालेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर कंपनीसमोर परीक्षा घेण्याचे मोठे आव्हान असणार आहे. तसेच परीक्षेत गैरप्रकार होऊ नयेत; यासाठी कोणत्या प्रॉक्टर्ड पद्धतीचा अवलंब करणार? असे प्रश्न अनुत्तरीत आहेत.

परीक्षेसाठी आतापर्यंत ५ लाख ८४ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. प्रथम वर्ष कला अभ्यासक्रमाचे विद्यार्थी वगळता इतर सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यास १० मार्चपर्यंत मुदत दिली आहे. त्यामुळे सुमारे ६ लाख २० हजार विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावी लागणार आहे. विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या एजन्सीला ऑनलाइन परीक्षांचे आयोजन करताना अडचणी आल्या. त्याचा फटका हजारो विद्यार्थ्यांना बसला. परंतु, काही विद्यार्थ्यांनी घरी बसून पुस्तकात पाहून व इंटरनेटवर उत्तरे शोधून परीक्षा दिल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना चुकीची प्रश्नपत्रिका पाठवणे, उशिरा प्रश्नपत्रिका मिळणे, प्रश्नपत्रिकेत चुकीचा फॉंट दिसणे, आकृत्या व नकाशे न दिसणे अशा अनेक अडचणी परीक्षेदरम्यान आल्या.

दुसऱ्या सत्राची परीक्षा लांबणार

प्रथम सत्राची परीक्षा येत्या ११ एप्रिलपासून सुरु होणार असून मे महिना अखेरपर्यंत चालणार आहे. त्यामुळे दुसऱ्या सत्राची परीक्षा काही दिवस पुढे जाणार आहे. परिणामी जून किंवा जुलै महिन्यापर्यंत दुसऱ्या सत्राची परीक्षा घ्यावी लागणार आहे. त्यामुळे विद्यापीठाने आत्तापासूनच दुसऱ्या सत्राच्या परीक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता करावी, असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे. कोरोनामुळे पहिल्या व दुसऱ्या सत्राच्या परीक्षा एकत्रितपणे घेतल्या जाणार आहेत.

Pune Main
Page No. 2 Mar 10, 2021
Powered by: erelego.com

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

अभियांत्रिकी अभ्यासक्रम : भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचा नियम

गणित, भौतिकशास्त्राला वगळण्याचा निर्णय चुकीचा

एक्सपर्ट व्ह्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : गणित आणि भौतिकशास्त्र हा अभियांत्रिकीचा पाया असून या दोन विषयांशिवाय अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेश देणे संयुक्तिक ठरणार नाही. या निर्णयामुळे अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या रिक्त राहिलेल्या जागांमध्ये वाढही होणार नाही. उलट शिक्षण क्षेत्रात गोंधळाची स्थिती निर्माण होईल, असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने (एआयसीटीई) २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी गणित व भौतिकशास्त्र विषय बंधनकारक असल्याचे नुकतेच स्पष्ट केले. परंतु, याबाबत उलट-सूलट प्रतिक्रिया उमटत असल्याने निर्णय मागे घ्याचा लागला.

अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची भीती दूर करण्यासाठी आणि प्रवेश क्षमता वाढविण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. परंतु, अकरावी-बारावीला भौतिकशास्त्र, गणित हे विषय न घेणारे विद्यार्थी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकडे वळत नाहीत, असे शिक्षणतज्ज्ञ सांगत आहेत.

अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी गणित विषय आवश्यकच आहे. त्यामुळे गणित,भौतिकशास्त्राचा अभ्यास न करणारे विद्यार्थी महाविद्यालयात आले तर प्रथमत: त्यांना या विषयांच्या मूलभूत संकल्पना शिकवाव्या लागतील.

- डॉ. बी. बी. आहुजा, संचालक, सीओईपी

अभियांत्रिकी प्रवेशासाठी नियमावलीत बदल केले जाणार असतील तर प्रवेशासाठी सीईटी परीक्षा घेतली जाणार का? अकरावी-बारावीत भौतिकशास्त्र आणि गणित विषयाच्या मुलभूत संकल्पनांचा अभ्यास झाल्याचे गृहित धरुनच विद्यापीठाकडून अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम तयार केला जातो. मात्र, या पुढील काळात विद्यापीठाला अभ्यासक्रमाबाबत वेगळा विचार करावा लागेल. तसेच 'ब्रीज कोर्स'मुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा कालावधी वाढू शकतो.

- डॉ. गजानन खराटे, माजी अधिष्ठाता, अभियांत्रिकी विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

पदवीधर अभियंते आणि बाजाराच्या, उद्योगांच्या गरजा यांची सांगड नाही म्हणून अभियांत्रिकी महाविद्यालयांवरच गदा येते. ही स्थिती असताना, अभियांत्रिकी शिक्षणाचा दर्जा उंचावणे अत्यावश्यक ठरते. विद्यार्थीही तावूनसुलाखून निवडलेले असणे ही अशा वेळी किमान गरज ठरते. 'एआयसीटीई' या विद्यार्थ्यांना निवडस्वातंत्र्याच्या नावाखाली भौतिकशास्त्र व गणितासारख्या विषयांमधून सवलत देऊ पाहाते आहे. यामुळे अभियांत्रिकी शिक्षण धसाला लागणार आहे.

- डॉ. आनंद भालेराव, प्राचार्य, भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय

गणित आणि भौतिकशास्त्राशिवाय अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला प्रवेश देणे चुकीचे होईल. शिक्षण क्षेत्रात आपण आणखी किती तडजोड करणार? अर्थशास्त्र विषयासह इतर विद्या शाखांमधील काही विषयांसाठी गणित अनिवार्यच आहे. या निर्णयामुळे रोजगाराचा प्रश्न उपस्थित होईल.

- डॉ. वासुदेव गाडे, माजी कुलगुरु

हा निर्णय गोंधळ घालणारा आहे. विज्ञानाच्या मुलभूत संकल्पना समजल्याशिवाय अभियांत्रिकी अभ्यासक्रम पूर्ण करणे अशक्य आहे. तसेच ब्रीज कोर्स केल्याने हा प्रश्न सुटणार नाही. गेल्या दहा वर्षात अभियांत्रिकी शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी आयटी किंवा स्पर्धा परीक्षांकडे वळले. असा निर्णय झाला तर अभियांत्रिकीच्या प्रवेशात वाढ होणार नाही.

- डॉ. अरुण अडसूळ, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ.

Hello Pune
Page No. 1 Mar 14, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

वेळेत परीक्षा सुरु करा

विद्यापीठ परीक्षा: एसपीपीयू फाउंडेशनचे सादरीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परीक्षा नियोजत योग्य पध्दतीने केले नाही तर विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ निर्माण होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सर्व तयारी वेगात करून येत्या ११ एप्रिलपासूनच परीक्षा सुरू होतील याची दक्षता घ्यावी,अशा सूचना शनिवारी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विद्यापीठ प्रशासनाला देण्यात आल्या. यावेळी विद्यापीठाच्या एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन या कंपनीने ऑनलाइन परीक्षा घेण्यासंदर्भात सादरीकरण केले. त्यानंतर कंपनीला परीक्षेचे काम देण्याचा अंतिम निर्णय घेण्यात आला.

पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने एजन्सी निवडीच्या प्रक्रियेला विलंब केल्यामुळे 15 मार्च रोजी सुरू होणारी परीक्षा पुढे ढकलावी लागली. त्यामुळे विद्यार्थी व शिक्षण क्षेत्रातून उलट सुलट प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. परंतु, विद्यापीठाने येत्या ११ एप्रिलपासून प्रथम सत्राच्या परीक्षा घेण्याचे जाहीर केले. त्यानंतर व्यवस्थापन परिषदेमध्ये याबाबत चर्चा करण्यात झाली. एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन कंपनी प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर परीक्षा घेण्याची आहे. त्यामुळे त्यांच्यासमोर सादरीकरण झाले. विद्यापीठाच्या कंपनीकडे कोणती यंत्रणा उपलब्ध असून तिचा वापर करून परीक्षा घेणे शक्य आहे? का ? विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळात कोणत्या नव्या काय सुविधा देता येऊ शकतात.

परीक्षा घेणे अवघड जाणार नाही

कंपनीने निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत परीक्षा सुरु करण्यासाठी आवश्यक तयारी करावी.या पूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षेच्या कामात कंपनीच्या पदाधिका-यांनी काम केले आहे. त्यामुळे त्यांना परीक्षा घेणे अवघड जाणार नाही, असा विश्वास व्यवस्थापन परिषद सदस्यांनी यावेळी व्यक्त केला.

Hello Pune
Page No. 8 Mar 14, 2021
Powered by: erelego.com

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

दिल्ली उच्च न्यायालय

प्राध्यापकांना पात्रतेपासून पदोन्नतीचा अधिकार

खुशालचंद बाहेती
लोकमत न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : विद्यापीठातील प्राध्यापकांना या पदासाठी पात्रतेचे निकष पूर्ण केलेल्या तारखेच्या प्रभावाने पदोन्नती मिळण्याचा अधिकार आहे, असे मत दिल्ली उच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे.

दिल्ली विद्यापीठाच्या विधि विभागाच्या सहयोगी प्राध्यापकांनी २०१७ मध्ये प्राध्यापक पदाची पात्रता मिळाल्यानंतर पदोन्नतीसाठी अर्ज केले. २०१९ मध्ये त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. निवड समितीने ९ जणांच्या मुलाखती घेतल्या. यापैकी ८ जणांची शिफारस केली. हे करताना ३ जणांना पात्रतेच्या तारखेपासून, तर ५ जणांना मुलाखतीच्या तारखेपासून पदोन्नती देण्याची शिफारस निवड समितीने केली. विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने यास मान्यता दिली व त्याप्रमाणे आदेश निघाले.

उशिरा पदोन्नती मिळणाऱ्या ४ उमेदवारांनी यास दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीप्रमाणे पदोन्नतीची तारीख ही पात्रता मिळाल्यापासून असणे आवश्यक असल्याचा मुद्दा त्यांनी मांडला. त्याला प्रत्युत्तर देताना विद्यापीठाने, निवड समितीचा निर्णय पदोन्नतीच्या बाबतीत अंतिम असतो, ते प्रत्येक उमेदवाराचा स्वतंत्र विचार करून निर्णय घेतात, असा मुद्दा मांडला. विद्यापीठ अनुदान आयोग मात्र दिल्ली विद्यापीठाशी सहमत झाले नाही. त्यांनी युजीसीच्या नियमाप्रमाणे पात्रतेची तारीख हीच पदोन्नतीची तारीख योग्य असल्याचे मत व्यक्त केले. न्या. व्ही. कमलेश्वर राव यांनी विद्यापीठाचा निर्णय अन्यायकारक असल्याचे ठरवत, सर्वांना पात्रतेच्या तारखेपासून पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती देण्याचे आदेश दिले.

काय आहे नियम...

२०१० मध्ये युजीसीने विद्यापीठातील शिक्षण देणाऱ्या पदांच्या सेवा शर्तीत नियम जारी केले. २०१४ च्या आदेशाप्रमाणे सर्व पदोन्नती या करिअर ॲडव्हान्स स्कीम (CAS) प्रमाणेच होतील, असा नियम बनविला.

CAS 2010 च्या ६.३.१२ ची तरतूद

उमेदवाराने पात्रता प्राप्त झाल्यानंतर पदोन्नतीसाठी अर्ज दिल्यास आणि यात तो यशस्वी ठरल्यास पदोन्नतीचा प्रभाव किमान पात्रता मिळालेल्या तारखेपासून राहील.

Pune Main
Page No. 9 Mar 14, 2021
Powered by: erelego.com

संबंधितांवर कारवाई होणार : सद्य:स्थितीत ६० टक्केच काम पूर्ण

प्रश्नसंच तयार करण्यास प्राध्यापकांची टाळाटाळ

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १५ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची प्रथम सत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. त्यासाठी विविध विषयांची प्रश्नसंच तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. सद्य:स्थितीत ६० टक्के प्रश्नसंचाचे काम पूर्ण झाले असून, उर्वरित ४० टक्के प्रश्नसंच तयार करण्यास संबंधीत प्राध्यापकांकडून टाळाटाळ होत आहे.

विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षांसाठी विविध विषयांचे प्रश्नसंच काढण्याची जबाबदारी २८ हजार प्राध्यापकांकडे दिली आहे. मात्र, त्यातील सुमारे ७ ते ८ हजार प्राध्यापक प्रश्नसंच देण्यास टाळाटाळ करत आहेत. यासंदर्भात टाळाटाळ करणाऱ्या संबंधीत प्राध्यापकांवर कारवाईचे परिपत्रक विद्यापीठाने यापूर्वीच जाहीर केले आहे. त्यामुळे प्राध्यापकांना आता प्रश्नसंच तयार करावे लागणार आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांतील सुमारे साडेसहा लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षा येत्या ११ एप्रिलपासून सुरू होणार आहेत. प्राध्यापकांना प्रश्नसंच तयार करण्यासाठी वेळ मिळावा, यासाठी महाविद्यालयांनी संबंधीत प्राध्यापकांना कामातून सुट द्यावी, अशा सूचनाही परीक्षा विभागाने प्राचार्यांना दिल्या. तरीही काही प्राध्यापक वेळेत प्रश्नसंच देण्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. प्राध्यापकांना एका प्रश्नासाठी प्रत्येकी १२ रुपये देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला असून एका प्राध्यापकाला १ हजार रुपये रक्कमेपेक्षा अधिक प्रश्न काढता येणार नाही, अशीही मर्यादाही विद्यापीठाने घालून दिली आहे. प्राध्यापकांच्या मानधनात विद्यापीठाने वाढ केली. तरीही अद्याप प्रश्नसंच निर्मितीचे केवळ ६० टक्के काम पूर्ण झाले आहे.

प्रभात Tue, 16 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59123853

News Paper Clippings During March 2021

Section: Education

प्राध्यापकांच्या संशोधनाला चालना मिळण्याबाबत प्रश्न

'ॲस्पायर' योजनेत प्रकल्पांच्या निवड संख्येत घट

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्राध्यापकांच्या संशोधनासाठीच्या ॲस्पायर योजनांमध्ये निवडलेल्या प्रकल्पांच्या संख्येत घट झाली आहे. २०१६-१७ पूर्वी सुमारे २५० प्रकल्प निवडले जात होते. मात्र गेल्या चार वर्षांत ११३ प्रकल्पांची निवड झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे प्रकल्पांची संख्या कमी होत असल्याने संशोधनाला चालना मिळणार कशी असा प्रश्न उपस्थित करून संलग्न महाविद्यालयांनी योजनेसंदर्भातील धोरणाबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

विद्यापीठाकडून प्राध्यापक-विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती निर्माण होण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. त्यासाठी विद्यापीठाकडून संशोधन प्रस्ताव महाविद्यालयांतील प्राध्यापक-विद्यार्थ्यांकडून मागवले जातात. आलेल्या प्रकल्पांची तज्ज्ञ समितीकडून छाननी करून, विद्याशाखांनिहाय प्रकल्प निवडून त्यांना संशोधनासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र या योजनेत निवडल्या जाणाऱ्या प्रकल्पांची संख्या अलीकडे कमी होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

> ॲस्पायर योजनेत प्रकल्पांची संख्या कमी झाली आहे. कारण या योजनेच्या निकषांची पुनर्रचना करण्यात आली. छाननी समितीचे सदस्य राष्ट्रीय पातळीवरील असतात. अधिक काटेकोर पद्धतीने संशोधन प्रस्तावांची छाननी केली जाते.
>
> - डॉ. एन. एस. उमराणी, प्र कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गेल्या चार वर्षांमध्ये संलग्न महाविद्यालयातील ११३ संशोधक, विद्यापीठातील ९ संशोधकांना या योजनेचा लाभ मिळाल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य प्राचार्य डॉ. संजय खरात म्हणाले, की ॲस्पायर ही योजना हौशी संशोधकांसाठी केली असेल, तर ती जास्तीत जास्त शिक्षकांपर्यंत पोहोचली पाहिजे. या योजनेतून संशोधन प्रक्रिया शिकण्याची संधी मिळते. पण योजनेचा आढावा घेतल्यास प्रस्थापित संशोधकांनाच निधी जात असल्याचे दिसून येते. २०१७ पूर्वी सुमारे २५० प्रकल्पांची निवड केली जात होती. गेल्या चार वर्षांत प्रकल्पांची संख्या कमी झाली आहे. काही विद्याशाखांना एकही संशोधन प्रकल्प मिळालेला नाही. त्यामुळे योजनेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. संशोधन प्रकल्पात शिक्षकांनी प्रकल्पात चार विद्यार्थ्यांना तयार करावे असे सूचित केले होते. पण विद्यार्थी संशोधनवृत्तीपासून वंचित राहिले. संशोधनवृत्ती वृद्धिंगत होण्याऐवजी लोप पावत आहे. विद्यार्थी, शिक्षकांच्या सर्वांगीण विकासासाठी योजना महत्त्वाची असल्याने संशोधनासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Tue, 16 March 2021
https://epaper.loksatta.com/c/59122993

लोकमत

७ ते ८ हजार प्राध्यापकांवर होणार कारवाई

प्रश्नसंच देण्यास टाळाटाळ : तीन जिल्ह्यांतील सुमारे साडेसहा लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षा येत्या ११ एप्रिलपासून

न्यूज अपडेटस्

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांसाठी विविध विषयांचे प्रश्नसंच काढण्याची जबाबदारी विद्यापीठाने सुमारे २८ हजार प्राध्यापकांकडे दिली आहे. मात्र, त्यातील सुमारे ७ ते ८ हजार प्राध्यापक प्रश्नसंच देण्यास टाळाटाळ करत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे विद्यापीठाने संबंधित प्राध्यापकांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या आहेत.

पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांतील सुमारे साडेसहा लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षा येत्या ११ एप्रिलपासून सुरू होणार आहेत. त्यासाठी विविध विषयांचे प्रश्नसंच तयार करण्याचे काम परीक्षा विभागातर्फे काही प्राध्यापकांना दिले. तसेच प्राध्यापकांना प्रश्नसंच तयार करण्यासाठी वेळ मिळावा, यासाठी महाविद्यालयांनी संबंधित प्राध्यापकांना महाविद्यालयीन कामातून सुट द्यावी, अशा सूचनाही परीक्षा विभागाने संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांना दिल्या. तरीही काही प्राध्यापक वेळेत प्रश्नसंच देण्याकडे दुर्लक्ष करून आपली जबाबदारी टाळत आहेत.



प्रश्नसंच निर्मितीचे केवळ ६० ते ७० टक्के पूर्ण

प्राध्यापकांना एका प्रश्नासाठी प्रत्येकी १२ रुपये देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. एका प्राध्यापकाला १ हजार रुपये रकमेपेक्षा अधिक प्रश्न काढता येणार नाही, अशीही मर्यादा विद्यापीठाने घालून दिली आहे. प्राध्यापकांच्या मानधनात विद्यापीठाने वाढ केली. तरीही अद्याप प्रश्नसंच निर्मितीचे केवळ ६० ते ७० टक्के पूर्ण झाले आहे. त्यामुळे जबाबदारी देऊनही कामात टाळाटाळ करणाऱ्या प्राध्यापकांवर विद्यापीठ कायद्यातील नियमावलीप्रमाणे कारवाई करण्याबाबत हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

प्रॉक्टर्ड पध्दतीनेच होणार परीक्षा

विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांची माहिती

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने येत्या ११ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या ऑनलाईन परीक्षांसाठी कंपनी बदलली असली, तरी सर्व विषयांची परीक्षा प्रॉक्टर्ड पध्दतीनेच होणार आहे. त्याचप्रमाणे परीक्षेपूर्वी सुमारे सात ते आठ दिवस आधी विद्यार्थ्यांना मॉक टेस्टची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे परीक्षेदरम्यान अडचणी येणार नाहीत, असा विश्वास परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वच विद्यापीठांना ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घ्यावी लागत आहे. त्यामुळे ऑनलाईन परीक्षा घेणाऱ्या विविध एजन्सीकडे विद्यापीठाला जावे लागते. ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेतल्या. मात्र, अंतिम वर्षाच्या परीक्षेत झालेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने योग्य पध्दतीने व चांगल्या एजन्सीची निवड करणे अपेक्षित होते. परंतु, एजन्सी निवडीच्या कार्यपध्दतीत चूक झाली. त्यामुळे एसपीपीयू एज्युटेक फाऊंडेशन या कंपनीला परीक्षेचे काम देण्याचा निर्णय घ्यावा लागला.

परीक्षा आता केवळ ऑनलाईन पध्दतीनेच होणार आहेत. त्यामुळे परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांनी गैरप्रकार करू नये, यासाठी प्रॉक्टर्ड पध्दतीचा अवलंब केला जाणार आहे. परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे फोटो ठराविक कालावधीत सॉफ्टवेअरच्या माध्यमातून घेणार आहेत. एका पेक्षा अधिक व्यक्ती फोटोत दिसून आल्यास किंवा काही गैरप्रकार करताना अढळून आल्यास संबंधित विद्यार्थ्यावर कारवाई केली जाणार आहे.

सरावासाठी अवधी देणार; अडचणी येणार नाहीत

विद्यापीठाच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. तसेच यंदा परीक्षेचे काम दुसऱ्या कंपनीकडे दिले आहे. त्यामुळे येत्या ११ एप्रिल रोजी सुरु होणाऱ्या परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना सरावासाठी अवधी देण्यात येणार असल्याने परीक्षेदरम्यान अडचणी येणार नाहीत, असा विश्वास परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे.

Pune Main
Page No. 2 Mar 16, 2021
Powered by: erelego.com

News Paper Clippings During March 2021

Section: Education

सहायक प्राध्यापक भरतीला वित्त विभागाची आडकाठी

लोकसत्ता प्रतिनिधी

शासनाकडून आर्थिक परिस्थितीचे रडगाणे

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) राज्य शासनाला वारंवार सहायक प्राध्यापकांची पदे भरण्याच्या सूचना केल्या आहेत. मात्र, राज्य शासनाकडून आर्थिक परिस्थितीचे कारण पुढे करून पदे भरण्याचे टाळले जात आहे. परंतु, प्राध्यापकांच्या वेतनाचा ५० टक्के हिस्सा हा 'यूजीसी'कडून दिला जात आहे. असे असतानाही प्राध्यापक भरती का होत नाही, असा सवाल आता पात्रताधारकांकडून होत आहे.

नागपूर : राज्यातील वरिष्ठ महाविद्यालय आणि विद्यापीठातील प्राध्यापक पदभरतीला वित्त विभागाकडून मान्यता मिळत नसल्याने पंधरा हजारांपेक्षा अधिक सहायक प्राध्यापक पदांची पदभरती मे २०२० पासून अडकून पडली आहे. वित्त विभागासोबत बैठक घेऊन एका महिन्याच्या आत प्राध्यापक भरतीचा तिढा सोडवण्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांचे आश्वासनही हवेत विरले आहे.

सप्टेंबर २०२० मध्ये विद्यापीठाच्या ऑनलाइन परीक्षांच्या निमित्ताने उदय सामंत यांनी राज्यातील विविध विद्यापीठांचा दौरा केला. त्यावेळी त्यांनी वित्त मंत्र्यांशी चर्चा करून ४ मे २०२०च्या शासन निर्णयामधून सहायक प्राध्यापक भरतीला वगळण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. जानेवारी २०२१ ला 'उच्च शिक्षण विभाग आपल्या दारी' या उपक्रमादरम्यान सामंत यांनी राज्यातील सर्वच विद्यापीठांचा दौरा केला. यावेळीही त्यांनी एका महिन्यात वित्त विभागासोबत बैठक घेऊन प्राध्यापक भरती सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. परंतु, प्राध्यापक पदभरती संदर्भात वित्त विभागासोबत बैठक होत नसल्याने भरती प्रक्रिया रखडलेली आहे.

राज्यातील विविध अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये सुमारे १५ हजारांपेक्षा अधिक सहायक प्राध्यापकांची पदे मागील सहा वर्षांपासून रिक्त आहेत. ही पदे भरण्याकडे राज्य सरकारकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नवप्राध्यापक संघटनेने केला आहे. दुसरीकडे ४० हजारांपेक्षा नेट-सेट, पीएच.डी. पात्रताधारक नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. तर तासिका तत्त्वावरील पात्रताधारकांना मागील वर्षभर एक छदामही मिळालेला नाही. त्यामुळे या नेट, सेट, पीएच.डी. पात्रताधारकांमध्ये राज्य शासनाप्रती संतापाची लाट उसळली आहे.

टीजेएसबी सहकारी

लोकसत्ता Tue, 16 March 2021
https://epaper.loksatta.com/c/591

सीए, सीएस, आयसीडब्ल्यूए आता पदव्युत्तर पदवीला समकक्ष

विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) कंपनी सचिव (सीएस), सनदी लेखापाल (सीए) आणि कॉस्ट अकाउंटंट या अभ्यासक्रमांना पदव्युत्तर पदवी समकक्षता दिली आहे. त्यामुळे हे अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले उमेदवार नेट परीक्षेसाठी पात्र ठरतील, पीएच.डी. करू शकतील, तसेच शिक्षणासाठी परदेशी जायचे असल्यास त्यासाठीही फायदा होऊ शकणार आहे. यूजीसीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत या तीन अभ्यासक्रमांना पदव्युत्तर पदवीची समकक्षता देण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आल्याचे परिपत्रक यूजीसीने प्रसिद्ध केले आहे. जगभरात कंपनी सचिव, सनदी लेखापाल आणि कॉस्ट अकाउंटंट ही पात्रता पदव्युत्तर पदवीच्या समकक्ष मानली जाते. मात्र आतापर्यंत या अभ्यासक्रमांना पदव्युत्तर पदवीची समकक्षता नव्हती. त्यामुळे ही समकक्षता मिळण्यासाठी गेली काही वर्षे मागणी करण्यात येत होती. सनदी लेखापालांची नियामक संस्था आयसीएआय, कंपनी सचिवांची नियामक संस्था आयसीएसआय आणि कॉस्ट अकाउंटंट्सची नियामक संस्था आयसीडब्ल्यूएआय यांनी ही समक्षकता मिळण्यासाठी यूजीसी आणि सरकारकडे पाठपुरावाही केला. या पार्श्वभूमीवर यूजीसीकडून या तीनही अभ्यासक्रमांना पदव्युत्तर पदवीची समक्षकता देण्याचा निर्णय घेण्यात आला. तीनही अभ्यासक्रमाच्या नियामक संस्थांनी त्यांच्या संकेतस्थळावरही समकक्षता मिळाल्याचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

कंपनी सचिव अभ्यासक्रमाला समकक्षता मिळाल्याने स्वतंत्रपणे पदव्युत्तर पदवी न घेता पीएच.डी. करता येईल, प्राध्यापक म्हणून काम करता येईल. तसेच कंपनी सचिव अभ्यासक्रमाला परदेशात पदव्युत्तर पदवी म्हणून ग्राह्य धरले जाईल. त्याशिवाय तरुण उमेदवारांसाठी अनेक नव्या संधी प्राप्त होतील. त्या दृष्टीने हा समकक्षतेचा निर्णय महत्त्वाचा आहे.

— देवेंद्र देशपांडे, उपाध्यक्ष, आयसीएसआय

प्राध्यापक म्हणून काम करण्यासाठी, पीएच.डी. करण्यासाठी या पूर्वी स्वतंत्रपणे पदव्युत्तर पदवी आवश्यक होती. आता पदव्युत्तर पदवी समकक्षता प्राप्त झाल्याने प्राध्यापक होण्यासाठीची नेट-सेट परीक्षा देता येईल, पीएच.डी. करता येईल. तसेच नव्या संधी प्राप्त होतील.

— यशवंत कासार, सनदी लेखापाल, पश्चिम भारत विभागीय समिती सदस्य

सीए, सीएस आणि आयसीडब्ल्यूए या तीनही अभ्यासक्रमांना पदव्युत्तर पदवीची समकक्षता नसल्याची त्रुटी आता दूर झाली आहे. या समक्षकतेमुळे पीएच.डी. करण्याची संधी प्राप्त होईल.

— अमित आपटे, माजी अध्यक्ष, आयसीडब्ल्यूएआय

लोकसत्ता Tue, 16 Ma
https://ep

News Paper Clippings During March 2021

Section: Education

'ऑनलाइन'ला विद्यार्थी वैतागले...

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १५ - करोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा, महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत ऑनलाइन शिक्षण सुरू झाले. शैक्षणिक वर्ष शेवटच्या टप्प्यावर असताना विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाचा कंटाळा आल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी ऑनलाइन शिक्षण दिले जात आहे. पण या शिक्षणातून फलनिष्पत्ती काय? असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

सध्या डिजिटलचा काळ आहे. गेल्या चार-पाच वर्षांत नव्या-नव्या तंत्रज्ञानाचा वापर करीत शिक्षण अधिक सुलभ व सहज उपलब्ध होण्यासाठी सर्वच पातळीवर प्रयत्न होत आहेत. अशा स्थितीत भविष्यात ऑनलाइन शिक्षण ही काळाची गरज आहे, असे मत शिक्षणतज्ज्ञांतून होत होती. त्यातच गेल्या वर्षभरात करोना संकट उभे राहिले. या कठीण परिस्थितीत शिक्षणाची निरंतर प्रक्रिया सुरू राहण्यासाठी ऑनलाइन शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे सिद्ध झाले. त्यादृष्टीने सर्वच शैक्षणिक संस्थांनी ऑनलाइन शिक्षणास सुरुवात केली.

सध्या मुलांना मोबाइल फोन, लॅपटॉप, संगणक या सर्व सोयी उपलब्ध आहेत. काही ठिकाणी दिवसभराची शाळा भरते, तर काही ठिकाणी मुलांना गणवेश घालून स्क्रीनसमोर बसण्याची सक्ती केली आहे. त्यात वयाने थोडी मोठी असलेली मुले सहजपणे स्वतःला म्यूट करून, व्हिडिओ स्टॉप करून शिक्षकांसमोर बसतच नाहीत. त्यांनी स्क्रीनसमोर बसावे, असा पालकांचा आग्रह असतो. यापूर्वी मोबाइल वापरू नका, असे सांगणारे आता शाळेचे तास होईपर्यंत मोबाइलसमोरून उठू नको, अशी पालकांची ओरड असते. या सर्व प्रकारात मात्र विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणास वैतागले आहेत.

> ऑनलाइन शिक्षणास नव्हे, तर मोबाइल फोनला मुले कंटाळली आहेत. त्यासाठी पहिला पर्याय म्हणजे सर्व इयत्तांचे वेळापत्रक निश्चित करून मराठी वाहिन्यांवरून किमान अर्धातास शिक्षण दिले तरी त्यास मुलांचा चांगला प्रतिसाद मिळेल. दुसरे म्हणजे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शिक्षण देणे थोडं बंद करावे लागेल. त्याऐवजी मुलांना संवादातून, अभिनय, क्रीडा, संगीत अशा विविध माध्यमांचा उपयोग करीत मनोरंजनात्मक शिक्षण देणे संयुक्तिक ठरेल. त्यामुळे मुले ऑनलाइन शिक्षणात रमतील.
>
> – अ. ल. देशमुख, शिक्षणतज्ज्ञ

प्रभात Tue, 16 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59123829

ऑनलाइन परीक्षेमुळे निकालाचा टक्का वाढला

अधिसभा सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना पुणे विद्यापीठाने केले स्पष्ट

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १५ - करोनाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या अंतिम सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० मध्ये पहिल्यांदाच ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. ऑनलाइन परीक्षेचा निकाल गतवर्षीच्या तुलनेत वाढला आहे, अशी माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली. जवळपास २० ते २५ टक्क्यांनी ऑनलाइन परीक्षेचा निकाल वाढला आहे.

विद्यापीठाची अधिसभा (सिनेट) शनिवारी (दि. २० मार्च) होत आहे. अधिसभेची कार्यक्रमपत्रिका जाहीर करण्यात आली. त्यात अधिसभा सदस्यांनी ८० ठराव आणि २६ प्रश्न विचारले आहेत. यात अधिसभा सदस्य डॉ. पंकज मिनियार यांनी ऑनलाइन परीक्षेमुळे यंदा निकाल वाढला असा प्रश्न विचारला आहे. त्यास व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य संजय चाकणे यांनी उत्तर देत निकाल वाढल्याचे स्पष्ट केले.

विद्यापीठाने करोनाच्या पार्श्वभूमीवर पदवीच्या अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षा घेतली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या धोरणानुसार ही परीक्षा घेण्यात आली. या परीक्षांसाठी ४० टक्के प्रश्न हे अत्यंत सोपे, ४० टक्के प्रश्न हे मध्यम काठिण्यता असलेले व इतर २० टक्के प्रश्न हे सोडविण्यास काठिण्य असे होते. शासनाच्या आदेशानुसार ४० टक्के प्रश्न विद्यार्थ्यांना तयारीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेले होते. त्यामुळे परीक्षेचे निकाल वाढले असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. हा निकाल २० ते २५ टक्क्यांनी वाढला आहे. हा निकाल कोणत्या कारणामुळे वाढला, त्याचा अभ्यास करण्याचा विद्यापीठ प्रशासन विचाराधीन आहे.

दोन वर्षांत २६ सामंजस्य करार

विद्यापीठाने गेल्या दोन वर्षांत किती सामंजस्य करार केले, असा प्रश्न अधिसभा सदस्य संतोष ढोरे यांनी उपस्थित केला. त्यास डॉ. पराग काळकर यांनी उत्तर देताना म्हटले की दोन वर्षांत २६ सामंजस्य करार केले. विद्यापीठाने विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विद्यापीठे आणि संस्थांबरोबर केलेल्या सामंस्य करारअंतर्गत सेमीनार, कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. या करारातून १२ अभ्यासक्रमांची निर्मिती केली आहे. या कराराद्वारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि इंटर्नशीपची सुविधा प्राप्त होत असल्याचे काळकर यांनी स्पष्ट केले.

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र प्लेसमेंट सेल

अधिसभा सदस्य डॉ. देविदास वायदंडे यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसंदर्भात ठराव मांडला. सामाजिक बांधिलकी म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंध, अपंग व मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र प्लेसमेंट सेल सुरू करावा, अशी मागणी ठरावाद्वारे केली आहे.

प्रभात Tue, 16 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59123821

News Paper Clippings During March 2021

Section: Education

विद्यापीठाच्या अधिसभेवर टांगती तलवार?

परवानगीअभावी ऑनलाइन सभेचे आयोजन करण्याची शक्यता

> २० मार्च रोजी होणाऱ्या अधिसभेच्या प्रत्यक्ष बैठकीची तयारी सुरू आहे. मात्र, कोरोना प्रतिबंधक निर्देशांची अंमलबजावणी करणे सर्वांसाठी बंधनकारक आहे. याबाबत आवश्यक कार्यवाही केली जाईल.
>
> - डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

पुणे, ता. १५ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा २० मार्च रोजी होणार असली तरी कोरोनामुळे ५० पेक्षा जास्त जणांना एकत्र येण्यावर बंधन घालण्यात आले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष अधिसभा होण्याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. अधिसभा घेण्यास परवानगी न मिळाल्यास विद्यापीठाला ऑनलाइन सभेचे आयोजन करावे लागण्याची शक्यता आहे.

पुणे विद्यापीठाच्या २०२१-२२ या वर्षाचा अर्थसंकल्प या अधिसभेमध्ये मांडला जाणार असून, त्याच दिवशी त्यास मान्यता घेतली जाते. गेल्यावर्षी कोरोनामुळे अधिसभेची बैठक ऐनवेळी रद्द केली होती. प्रत्यक्ष बैठक घेणे शक्य नसल्याने ऑनलाइन अधिसभा घेण्यात आली. मात्र, यास अधिसभा सदस्यांनी कडाडून विरोध केला होता.

पुणे विद्यापीठाने जानेवारीत प्रत्यक्षात अधिसभा घेतली होती. त्यानुसार अर्थसंकल्पाची अधिसभा सभागृहात घेण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र, पुण्यात कोरोनाचे रुग्ण वाढत असल्याने १२ मार्चपासून बंधने आणली आहेत. त्यामध्ये बंद सभागृहात ५० पेक्षा जास्त जणांना एकत्र येण्यावर बंदी घातली आहे. विद्यापीठाच्या अधिसभेसाठी ७० सदस्य, अधिकारी, कर्मचारी असे ११० जण एकत्र येणार आहेत. त्यामुळे नियमांचे उल्लंघन होऊ शकते. त्यामुळे अधिसभेच्या आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाकडून विशेष परवानगी मिळू शकते का?, याचाही विचार विद्यापीठाने सुरू केला आहे. जर परवानगी न मिळाल्यास ऑनलाईन अधिसभा घ्यावी लागणार आहे.

Sakaal 16.3.2021

दहावी, बारावीचे नमुना प्रश्नसंच विद्या प्राधिकरणाकडून उपलब्ध

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना एप्रिलपासून सुरू होणाऱ्या परीक्षेचा सराव करता येण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेकडून (विद्या प्राधिकरण) विषयनिहाय नमुना प्रश्नसंच उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आतापपर्यंत १६ विषयांचे नमुना प्रश्नसंच ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आले आहेत, तर उर्वरित विषयांचे प्रश्नसंचही लवकरच उपलब्ध करून दिले जातील.

करोना प्रादुर्भावामुळे यंदा दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्कळीत झाले. त्यामुळे परीक्षेपूर्वी प्रत्येक विषयाची चांगल्या पद्धतीने तयारी करण्यासाठी, स्वयंअध्ययन करण्यासाठी विद्या प्राधिकरणाच्या माध्यमातून नमुना प्रश्नसंच उपलब्ध करून देण्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी केली होती. त्यानुसार विद्या प्राधिकरणाने नमुना प्रश्नसंच उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे.

विद्या प्राधिकरणाचे संचालक दिनकर टेमकर म्हणाले, की बारावीचे जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि संख्याशास्त्र, इंग्रजी, गणित आणि संख्याशास्त्र (वाणिज्य) इतिहास (मराठी, इंग्रजी), भूगोल (मराठी) या विषयांचे प्रश्नसंच, तर दहावीच्या गणित भाग एक आणि दोन, इतिहास आणि राज्यशास्त्र (मराठी) भूगोल (मराठी, इंग्रजी), कुमारभारती आदी विषयांचे प्रश्नसंच संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत. पुढील काही दिवसात उर्वरित विषयांचेही प्रश्नसंच दिले जातील. www.maa.ac.in या संकेतस्थळावरून नमुना प्रश्नसंच डाऊनलोड करता येतील.

९४ लाखांहून अधिक भेटी...

दहावी आणि बारावीच्या प्रश्नसंचाबाबत विद्यार्थी आणि पालकांमध्ये उत्सुकता असल्याचे स्पष्ट झाले. प्रश्नसंच उपलब्ध झाल्याचे जाहीर करण्यात आल्यावर विद्या प्राधिकरणाच्या संकेतस्थळ भेटींमध्ये झपाट्याने वाढ झाली. काहीच वेळात ९४ लाख १३ हजार ७६८ लोकांनी भेटी दिल्याची माहिती उपसंचालक विकास गरड यांनी दिली.

लोकसत्ता Tue, 16 March 2021
https://epaper.loksatta.com/c/59108127

SPPU cuts syllabus for final-year courses

Review of all the graduate and post-graduate courses done on Monday, and process of cutting down syllabus for current academic year has begun

HT Correspondent
puneletters@htlive.com

PUNE: The Savitribai Phule Pune University (SPPU) has now decided to cut its syllabus for third-year students for the next semester.

"UGC has given the right to the university to reduce the syllabus of courses in their respective regions. So we have now asked for a review from all the deans of SPPU and accordingly, to complete the second semester in time, we are planning to cut down the syllabus," said N S Umrani, pro-vice chancellor of SPPU.

A review of all the graduate and post-graduate courses was done by the SPPU on Monday, and now the process of cutting down the syllabus for this academic year has been started.

As first semester examinations have been delayed, the SPPU administration took this decision to ensure the syllabus of future courses was not affected. Due to the Covid-19 pandemic the academic year 2020-21 began late.

From July-August online classes were held for all the years. It is necessary to have a 90-day period of classes per semester. This was difficult to maintain online, due to various issues like connectivity and students not having access.

MPSC students study at a facility centre in Sadashiv peth. The MPSC preliminary exams will be held on March 21.
RAVINDRA JOSHI/HT PHOTO

"Frustrated" MPSC students back in books for exam preparation

HT Correspondent
puneletters@htlive.com

PUNE: After huge protests, and the state chief minister intervening in the matter, the Maharashtra Public Service Commission's (MPSC) preliminary exams will be held on March 21.

This one week delay from the earlier date of March 14, has disturbed the preparations of student hopefuls.

While most aspirants have resumed studies, some have returned to their villages and will operate in study circles to prepare for the exam.

"There still a sense of frustration among the students, as they have been waiting to appear for this exam for the last one year. Students coming from rural areas are struggling financially and with this delay again, their expenses increase to live in Pune," said Ruksana Patil Shaikh, a student appearing for the exam.

As per a new circular issued on Monday by the state relief and rehabilitation department that conducts the MPSC exam, "The preliminary exam which was earlier scheduled on March 14, is now going to be held on March 21 across the state at the same centres. The students who have received hall ticket to appear for the exam (earlier scheduled on March 14), will be considered valid for the March 21 exam as well."

Two other examinations conducted by the MPSC, scheduled for March 27 and April 11, remain on schedule.

Another student, Shailesh Mahankal, said, "We just wanted that the exams happen immediately.

"All the students were angry so they protested, and the next day exam dates were declared.

"Now we are studying and utilising this additional time to prepare well for the prelim exam."

Hindustan Times 16.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

'यूजीसी'च्या अटीचा बेकायदा वापर

प्राध्यापकांकडून सरकारची दिशाभूल

म. टा. प्रतिनिधी, पुणे

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) सहायक प्राध्यापक पदासाठी नेट किंवा सेट अर्हतेला २००४ मध्ये केवळ दोन वर्षांसाठी सूट दिली होती. मात्र, एमफिल झालेल्या सहायक प्राध्यापकांनी दोन वर्षांत कोणतीही परीक्षा उत्तीर्ण न करता बेकायदा नियुक्त्या मिळवल्या आणि पदोन्नतीचे (कॅस) लाभही मिळवले. याशिवाय न्यायालय आणि सरकारची दिशाभूल केली आहे, अशी माहिती शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांनी दिली.

'यूजीसी'ने नऊ डिसेंबर २००४ रोजी सहायक प्राध्यापक पदासाठी नेट आणि सेटची अर्हता शिथिल करण्यासाठी निकष तयार केले. या निकषांनुसार एखाद्या विषयात नेट किंवा सेट परीक्षा होत नसेल; तसेच उमेदवाराच्या नियुक्तीच्या वेळी निवड समितीमार्फत निवड झाल्यावरही नेट किंवा सेट अर्हता प्राप्त उमेदवार मुलाखतीला आला नाही, अशा दोनच परिस्थितीत सूट देण्यात आली. मात्र, या दोन निकषांसाठी देण्यात आलेली सूट केवळ दोन वर्षांसाठीच लागू असेल, असे 'यूजीसी'च्या परिपत्रकात स्पष्टपणे नमूद केले आहे. मात्र, या दोन निकषांना 'एमफिल'च्या लाभार्थी प्राध्यापकांनी ढाल बनवून नेट आणि सेट अर्हतेतून सूट मिळवली आणि दोन वर्षांत कोणतीही परीक्षा उत्तीर्ण केली नाही. त्याचप्रमाणे चुकीच्या पद्धतीने पदोन्नती मिळवून राज्य सरकारच्या तिजोरीतील कोट्यवधी रुपये लाटले. उमेदवाराकडे नेट किंवा सेटची अर्हता नसल्यास विद्यापीठ, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांनी संबंधित उमेदवाराची नियुक्ती सहायक प्राध्यापकपदी करू नये, अशा स्पष्ट सूचना विद्यापीठे आणि राज्य सरकारच्या सचिवांना दिल्या होत्या. त्यावर राज्य सरकारने १३ जून २००० रोजी त्याप्रमाणे निर्णयदेखील प्रसिद्ध केला आहे. मात्र, याकडे दुर्लक्ष करीत सहायक प्राध्यापकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आणि त्यांना कॅसचे लाभ देण्यात आले.

न्यायालय व सरकारची दिशाभूल

या प्रकरणाशी संबंधित न्यायालयांमध्ये याचिका दाखल करण्यात आल्या. मात्र, या याचिकांच्या सुनावणीदरम्यान 'यूजीसी'चे २००४ चे परिपत्रक न्यायालयासमोर जाणून बुजून मांडले नसल्याचे अनेक प्रकरणांत दिसून येत आहे. नागपूर उच्च न्यायालयाने सहा मार्च २००७ रोजी; तसेच राज्य सरकारने जुलै २००७ मध्ये 'यूजीसी'च्या एमफील अधिसूचनेस स्थगिती दिली होती. या स्थगितीचे आदेश अकृषी विद्यापीठांचे कुलसचिव आणि उच्चशिक्षण संचालक यांना देण्यात आले होते. असे असतानाही त्या काळात 'एमफिल' या एक अर्हतेवर सहायक प्राध्यापकांच्या नियुक्त्या व पदोन्नत्या बेकायदा असल्याचे स्पष्ट होते.

सरकारच्या निर्णयाला लाभार्थ्यांचा चुना?

राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सहायक प्राध्यापकांच्या नियुक्त्या व वेतनश्रेणीबाबत १३ जून २००० रोजी निर्णय घेतला. या निर्णयानुसार प्राध्यापकांनी तरतुदींचा भंग केल्यास राज्य सरकारकडून वेतन अनुदान मिळणार नाही. प्राध्यापकांच्या नियुक्त्या करताना 'यूजीसी'च्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी महाविद्यालयांची आहे. या नियुक्त्यांबाबत केंद्र सरकार आणि 'यूजीसी'कडून वेळोवेळी ज्या सूचना येतील, त्यानुसार राज्य सरकार आदेश देईल. या आदेशाची अंमलबजावणी करायची आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयांनी याची नोंद घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले होते. मात्र, आदेशाला नियुक्ती व कॅसशी निगडित सर्वांनी केराची टोपली दाखवली असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

मटा मालिका

Maharashtra Times 16.3.2021

'पूर्वीचे पुणे विद्यापीठ' लिहिण्याची 'प्रथा'

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) असा सर्रास उल्लेख

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १६ - पूर्वेचे ऑक्सफर्ड म्हणून ओळख असलेल्या पुणे विद्यापीठाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा नामविस्तार होऊन पाच वर्षे झाली. त्यानंतर आजमितीस विद्यापीठमार्फत प्रशासकीय कागदपत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) असा सर्रास उल्लेख केला जातो. नामविस्ताराच्या पाच वर्षांनंतरही कंसात 'पूर्वीचे पुणे विद्यापीठ' हे लिहिण्याची प्रथा बंद करावी, असा प्रस्ताव विद्यापीठाच्या अधिसभेत मांडण्यात आला आहे.

विद्यापीठाची येत्या शनिवारी अधिसभा होत आहे. यात सदस्य डॉ. कान्हू गिरमकर यांनी हा प्रस्ताव मांडला आहे. नामविस्तारानंतर पहिले दोन-तीन वर्षे पूर्वीचे अथवा जुने पुणे विद्यापीठ असा उल्लेख समजण्यासारखे आहे. मात्र, अजूनही तसाच लिहिण्याचा प्रयत्न होत असल्यास ते योग्य नाही. सर्वांच्या संमतीने नामविस्ताराचा ठराव करण्यात आला. राज्य शासनानेही नामविस्तारास मान्यता दिली आहे. एवढेच नव्हे, जागतिक आणि देशातील सर्व गुणवत्तेच्या क्रमवारीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे संबोधिले जात असून, ते आता रूढ झाले आहे. अशा परिस्थितीत पूर्वीचे पुणे विद्यापीठ लिहिणे बंद व्हावी, याकडे लक्ष वेधण्यासाठी हा प्रस्ताव मांडणार असल्याचे गिरमकर यांनी सांगितले.

अधिसभा ऑफलाइनच घ्या...

सध्या करोनाचे रुग्ण वाढत आहेत. तसे निर्बंधही लागू आहेत. तसेच ५० लोकांना एकत्र येण्यास जिल्हा प्रशासनने बंदी घातली आहे. अशा परिस्थितीत अधिसभा सदस्य व विद्यापीठ अधिकारी असे एकूण ११० जणांच्या उपस्थितीत अधिसभा ऑफलाइन होईल, याविषयी सांशकता व्यक्त केली जात आहे. याउलट येत्या शनिवारी होणारी अधिसभेची बैठक करोनाचे नियम पाळून पुरेशा व्यवस्था घेत विद्यापीठात होऊ शकते. ऑनलाइन अधिसभेत अनेक तांत्रिक अडचणी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे अधिसभेची बैठक ऑफलाइन घ्यावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी कुलगुरूंकडे केली आहे.

प्रभात १७/३/२०२१

Prabhat 17.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

pune.mtonline.in

एमसीक्यू परीक्षा १० एप्रिलपासून

येत्या २५ मार्च रोजी वेळापत्रक होणार जाहीर

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने बहुपर्यायी (एमसीक्यू) स्वरूपात १० एप्रिलपासून सुरू होणार आहेत. एमसीक्यू पद्धतीने परीक्षा होणार असल्याने विद्यार्थ्यांना घरबसल्या परीक्षा देता येणार आहे. बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १०० टक्के सिलॅबस असेल. व्यावसायिक कोर्ससोबतच 'सीईटी'द्वारे उशिरा प्रवेश झालेल्या कोर्ससाठी (प्रथम सत्र) ७० टक्के अभ्यासक्रम असेल, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून देण्यात आली आहे.

या परीक्षांमध्ये एकूण ६० एमसीक्यू प्रश्न विचारण्यात येणार असून, त्यापैकी कोणतेही ५० प्रश्न विद्यार्थ्यांना सोडवावे लागणार आहेत. या प्रश्नांसाठी एक तासाचा अवधी देण्यात आला आहे. या परीक्षा केवळ ऑनलाइन पद्धतीने होणार आहेत. विद्यार्थ्यांना मोबाइल, टॅब, लॅपटॉप, कम्प्युटर आदी कोणत्याही माध्यमाद्वारे ही परीक्षा देता येणार आहे. इंजिनीअरिंग, फार्मसी, मॅनेजमेंट अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतर्गत आवश्यकतेनुसार महाविद्यालयस्तरावर प्रात्याक्षिक परीक्षा घेण्यात येणार आहेत. या परीक्षांचे वेळापत्रक येत्या २५ मार्च रोजी विद्यापीठाच्या वेबसाइटवर जाहीर करण्यात येईल. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना परीक्षेचा सराव व्हावा, यासाठी सात एप्रिलपासून सराव परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी परीक्षा समन्वय कक्ष महाविद्यालयांना स्थापन करावा लागणार असल्याचे सांगण्यात आले आहे. प्रथम व द्वितीय सत्रातील प्रॅक्टिकल, मौखिक परीक्षा, सेमिनार, मिनी प्रोजेक्ट, प्रोजेक्ट आदींचे आयोजन संबंधित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा प्रथम सत्राचा शेवटचा पेपर झाल्यानंतर महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करावे, यासाठी स्वतंत्र परिपत्रक काढले जाणार नाही, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्पष्ट केले.

'तांत्रिक बिघाड झाल्यास वेळ वाढवणार'

'परीक्षा फक्त ऑनलाइन पद्धतीनेच होणार असून, तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा अर्ध्यातच बंद पडल्यास विद्यार्थ्यांना वेळ वाढवून दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांनी जेवढे प्रश्न सोडविले आहेत ते सिस्टीममधून सेव्ह झालेले असतील. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळे परीक्षा मध्येच बंद पडल्यास कोणीही घाबरून जाऊ नये,' असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

परीक्षेबाबत प्रमुख माहिती

- थोड्या प्रमाणात प्रॉक्टर्ड 'मेथड'चा वापर
- परीक्षा ५० गुणांची असली, तरी अंतिम निकाल मान्य आराखड्यानुसार जाहीर होतील.
- योग्य ई-मेल आयडी व मोबाइल क्रमांक द्या.
- दिव्यांग विद्यार्थ्यांना २० मिनिटांचा जास्त कालावधी असेल.
- परीक्षा ऑनलाइन असल्याने छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा नाही.
- महाविद्यालयांना विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण १० एप्रिलपर्यंत विद्यापीठाला पाठवायचे असून, त्यांचाच निकाल जाहीर होईल.

Scanned with CamScanner

Maharashtra Times 18.3.2021

शैक्षणिक संशोधनाला 'कपिला'मुळे चालना

प्रत्येक महाविद्यालयात उभारणार व्यवस्था; पेटंटसाठी निधीही देणार

संतोष शाळिग्राम :
सकाळ न्यूज नेटवर्क

> "आतापर्यंत महाविद्यालयांमध्ये पेटंट कसे मिळवावे, याची माहिती देणारी तसेच त्यासंबंधी प्रक्रिया पूर्ण करणारी व्यवस्था नव्हती. 'कपिला'मुळे ती उभी राहणार आहे. त्यामुळे पेटंट मिळविणे सुलभ होऊन त्यांची संख्याही लक्षणीयरित्या वाढेल.
> - डॉ. अभय जेरे, मुख्य नवसंशोधन अधिकारी, शिक्षण मंत्रालय

नवी दिल्ली, ता. १७ : देशातील संशोधनाला चालना देण्याबरोबरच विद्यार्थी वा अध्यापकांच्या संशोधनाचे पेटंट मिळविण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात आता 'कपिला' योजनेच्या माध्यमातून व्यवस्था निर्माण होणार आहे. तसेच, पेटंट मिळविण्यासाठी महाविद्यालयांना निधी दिला जाणार आहे. दहा हजार पेटंटसाठी अर्ज करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा नवसंशोधन विभाग (इनोव्हेशन सेल) आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने 'कपिला' (कलाम प्रोग्राम फॉर आयपी लिटरसी अँड अवेअरनेस) या योजनेचा आराखडा तयार केला आहे. याअंतर्गत देशातील महाविद्यालये वा शिक्षण संस्थांमध्ये 'आयपी फायलिंग'साठी अनुकूल व्यवस्था उभी केली जाणार आहे. यातून देशातील विद्यार्थी, अध्यापकांचे नवसंशोधन, संशोधन यांचे बौद्धिक स्वामित्व हक्क (आयपीआर) अबाधित राखले जाणार आहेत. तसेच शिक्षण संस्थांमधून अधिकाधिक संशोधन व्हावे, यासाठी आर्थिक पाठबळही मिळेल. त्यासाठी २८ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

देशातील संशोधनाचे प्रमाण वाढून पेटंटची संख्या वाढावी म्हणून केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून शिक्षण संस्थांना आर्थिक मदत दिली जाणार आहे. त्यासाठी 'कपिला' संकेतस्थळावरून संस्थांना तपशीलवार अर्ज करावे लागतील. पेटंटसाठी शुल्क भरले असेल, तर पावती जोडावी लागेल. छाननी केल्यानंतर पात्र प्रस्तावांना प्रत्येकी २८ हजार रुपये दिले जाणार आहेत. एका संस्थेला दोन लाख ८० हजार रुपयांपर्यंत मदत मिळेल. कमाल दहा पेटंट अर्जांसाठी मदत असेल.

या योजनेचा लाभ घ्यायचा असल्यास प्रत्येक शिक्षण संस्थेला बौद्धिक स्वामित्व हक्क आणि तंत्रज्ञान रुपांतरण विषयक तज्ज्ञ प्राध्यापकांची समिती स्थापन करावी लागेल. यात दोन प्राध्यापकांसह उद्योगांतील दोन तज्ज्ञ वा माजी विद्यार्थी तसेच एक बौद्धिक स्वामित्व हक्क विषयक कायदेशीर सल्लागार नियुक्त करावा लागेल. ते पेटंटसंबंधीच्या अर्जांची तपासणी करतील. संस्थेतील आयपीआर वा इनक्युबेशन सेल हा केवळ समन्वयकाची भूमिका बजावेल.

भारतातील पेटंटची स्थिती

शिक्षण मंत्रालयाच्या नवसंशोधन विभागाचे मुख्याधिकारी डॉ. अभय जेरे म्हणाले, "चीनमध्ये दरवर्षी पेटंटसाठी १५ लाख, अमेरिकेत सहा लाख अर्ज केले जातात. भारतात मात्र दरवर्षी पेटंटसाठी केवळ ५० हजारांपर्यंत अर्ज केले जातात. यातील निम्मे अर्ज अनिवासी संशोधकांचे असतात. देशातील ४० हजार उच्च शिक्षण संस्थांपैकी बहुतांश संस्था संशोधनाचे पेटंट मिळविण्यासाठी अर्जही करीत नाही, हे चित्र बदलण्याची गरज आहे." भारताला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था व्हायचे असेल, तर ज्ञानावर आधारित समाज आणि ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था बनावे लागेल. त्यासाठी प्रचंड प्रमाणात नवसंशोधन करावे लागेल. त्यादृष्टीने 'कपिला' योजना महत्त्वाची ठरणार आहे, असे डॉ. जेरे यांनी स्पष्ट केले.

Sakaal 18.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

SPPU finally releases details of online MCQ-based tests, mock exams on Apr 7

ALIFIYA KHAN
PUNE, MARCH 17

AFTER A LONG wait by students, the examination department of the Savitribai Phule Pune University (SPPU) has released a circular specifying the details of exams of the first semester (October-November 2020) for first to final-year degree students, to be conducted online in multiple-choice question (MCQ) format from April 10. The exam duration will be one hour and the 50-marks question paper will have 60 MCQ questions, of which 50 correct answers will be accepted for calculating results.

The circular states that mock exams would be held on April 7 and the final exam time table would be released by March 25 on the website, www.unipune.ac.in. Students will be sent all details of the examination through SMS and email, but candidates will have to ensure to send the correct number/email for communication.

According to the circular, syllabus of most programmes including BA and B Com for external students has been completed and 100 per cent of the syllabus will be considered while setting exam papers. Since the academic session for professional courses such as pharmacy, engineering, law, M.Ed began on February 6, as per the advice of the Board of Studies of these faculties, exams will be based on 70 per cent syllabus of that particular unit.

The marks of theory papers for first semester will be made available to students through the Student Profile System and the results of various faculties would be released in phases. As and when the results are announced, forms for March/April 2021 examinations would be made available. The printed results would be given after both semester exams are conducted. The exams of a few first year (regular) will be conducted in online MCQ format at college level such as BA (2013 pattern), in Commerce – BBA (Computer Application) and BBA (International Business) in 2016 pattern and more such subjects, in the same manner as prescribed by the university. The internal or sectional exams should be conducted online/remote, using the means available at the college/institute, and marks be uploaded in the university system by April 10.

The circular specifies that if for any reason, the exam session is logged out, then commensurate time will be given to the candidates. Previous answers will automatically be stored in the system and only remaining questions and specified time will be provided.

Photocopies of answersheets will not be available for the online MCQ-based tests. The theory results of only those students whose internal/in semester exams have been sent by concerned colleges will be declared, and only such students will get final marksheets after both semester exams are conducted.

For any queries or complaints regarding the pattern of examinations or even later about difficulties faced in giving examinations, students can register complaints at sps.unipune.ac.in

The Indian Express 18.3.2021

SPPU exams from April 10, practicals later

The Savitribai Phule Pune University (SPPU) will start the first-semester examination for all courses from April 10. The practical exams will be conducted by colleges soon after the last exam of the respective course, **reports Ardhra Nair.**

Students of conventional courses such as BA, BSc and BCom will have question papers on the full syllabus, but question papers for students of professional colleges will be based on 70% of the syllabus.

The university circular on Wednesday said the date sheet of the examinations would be uploaded online on the official website on March 25. **P5**

The Times of India 18.3.2021

SPPU exams from April 10, date sheet out on March 25

Professional Courses Will Have 70% Of The Syllabus

Ardhra.Nair@timesgroup.com

Pune: The Savitribai Phule Pune University (SPPU) will start the first-semester examination for all courses from April 10. The practical examinations will be conducted by the colleges immediately after the last examination of the respective course.

Students of conventional courses such as BA, BSc and BCom will have question papers on the full syllabus, but question papers for students of professional colleges will be based on 70% of the syllabus.

The university circular on Wednesday said the date sheet of the examinations would be uploaded online on the official website on March 25 while the mock tests would be available for students from April 7.

The first semester examinations for all years of courses should have been conducted in October/November 2020.

These exams will be conducted online in a multiple-choice question (MCQ) format for a one-hour duration for a total of 50 marks. For this, 60 MCQs will be given out of which correct answers to 50 questions will be considered.

"Most of the courses have completed 100% of their syllabus so their examinations will be held on the whole syllabus. The same goes for the courses that follow the annual pattern and external students. Meanwhile, the professional courses started their first semester on February 6 and hence for them, the respective board of studies have decided to go ahead with exams for 70% of the syllabus," Mahesh Kakade, director of examination and evaluation at SPPU, said.

Once the results of the courses are announced by the university, the students will be able to fill up the examination forms for the second-semester examinations in a phased manner.

The schedule for in-semester, online, session examination (for theory subjects in certain courses and Fundamentals of Programming Languages) should be conducted at the college level and the students should be informed accordingly, the university circular said.

Marks obtained by the students in this examination will be sent to the university by April 10, 2021. Only those, whose internal marks are received by the university by April 10, will get to know their first semester results online. The mark sheets will be distributed after the results of the second-semester examinations are declared.

Backlog examinations and regular exams for certain students of the old syllabus as well as ME electives, will be conducted at the college level.

SCHEDULED ON SUNDAYS

- All the necessary information regarding the online exams of the students from the first year to the final year will be communicated to the students through SMS and e-mail
- For any technical glitch in the online exam, the same amount of time will be given to the concerned student through the computer system
- Students should register their grievances by logging in to sps.unipune.ac.in and resolve their grievances before and during the examinations
- The Principal / Director / College Examination Officer is requested to review the above guidelines and instructions and inform all the teachers, non-teaching staff and students in their college about this from their level and cooperate with the university by resolving their doubts

News Paper Clippings During March 2021

Section: Education

येत्या सप्टेंबरपासून 'कतार कॅम्पस' सुरू

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला परवानग्या मिळाल्या

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कतार शैक्षणिक केंद्राचा (कॅम्पस) प्रारंभ येत्या सप्टेंबर महिन्यापासून होण्याची शक्यता आहे. कतार कॅम्पससाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक परवानग्या पुणे विद्यापीठाला मिळाल्या असून, आता प्रत्यक्ष पारंपरिक अभ्यासक्रमांनी शैक्षणिक वर्षाला सुरुवात होणार आहे.

विद्यापीठाने कतारमधील स्थानिक शैक्षणिक संस्थेच्या मदतीने तेथे शैक्षणिक केंद्र सुरू करण्यासाठी दीड वर्षांपासून प्रयत्न सुरू केले. याबाबत सर्वांत पहिले वृत्त 'महाराष्ट्र टाइम्स'ने दिले होते. विद्यापीठाने कतार कॅम्पससाठी कतारच्या प्रशासनाकडे प्रस्ताव दाखल केल्यानंतर, प्रशासनाने काही दिवसांतच परवानगी दिली. त्यानंतर कॅम्पस सुरू करण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला. मात्र, राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तांत्रिक अडचणींमुळे परवानगी दिली नव्हती. गेल्या वर्षी करोनाचा प्रादुर्भाव असल्याने, भारतासह अनेक देशात लॉकडाउन होते. त्यामुळे या कॅम्पसचे काम थंडबस्त्यात गेले. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर, या कॅम्पसच्या स्थापनेला गती मिळाली. कतार कॅम्पसच्या स्थापनेला चालना मिळण्यासाठी 'मटा'ने वृत्ताद्वारे पाठपुरावा केला होता. त्यानंतर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी कतारमधील कॅम्पसला सरकारकडून मान्यता मिळाल्याचे विद्यापीठात जाहीर केले होते. त्यानंतर विद्यापीठाच्या प्रशासनानेही कतारमधील दोहा शहरात कॅम्पसच्या उभारणीला गती दिली. या कॅम्पसबाबत विद्यापीठ अनुदान आयोगालाही माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार विद्यापीठाचे प्रशासन आणि स्थानिक शैक्षणिक संस्थेने तीन इमारतींची निवड केली आहे. या इमारतींच्या माध्यमातून शैक्षणिक वर्गांना आणि कामकाजाला सुरुवात होणार आहे.

या कॅम्पससाठी विद्यापीठाला कोणताही खर्च येणार असून, सर्व खर्च हा कतारमधील शैक्षणिक संस्था आणि तेथील सरकारकडून करण्यात येणार आहे. कॅम्पससाठी नवे अभ्यासक्रम तयार करणे; तसेच प्राध्यापकांची निवड ही महत्त्वाची कामे विद्यापीठाकडून केली जातील. प्राध्यापकांचे वेतनदेखील संबंधित शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली. कतारमध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय असून, त्यांना शिक्षणासाठी नावलौकिक असणाऱ्या शैक्षणिक संस्थेची आवश्यकता होती. अशा परिस्थितीत सर्वानुमते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची निवड करण्यात आली.

> "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कतारमधील कॅम्पसमधून शैक्षणिक कामकाज आणि अभ्यासक्रमांची सुरुवात सप्टेंबर महिन्यापासून होऊ शकते. त्या दृष्टीने कॅम्पसच्या कामकाजाला गती देण्यात आली आहे. या कॅम्पससाठी तीन इमारतींची निवडदेखील करण्यात आली आहे.
>
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सुरुवातीला पारंपरिक अभ्यासक्रम

कतार कॅम्पसमध्ये सुरुवातीला विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात येतील. त्यानंतर स्थानिक आवश्यकतेप्रमाणे नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात येतील. कतार प्रशासन आणि शैक्षणिक संस्थेच्या सहकार्याने सांस्कृतिक कार्यक्रम, भाषा कार्यक्रम, शिक्षक-विद्यार्थी आदान-प्रदान, संयुक्त संशोधन प्रकल्प, शैक्षणिक कार्यक्रम, विविध कार्यशाळा आयोजित करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

Maharashtra Times 18.3.2021

विद्यापीठाची सिनेट होणार ऑनलाइन

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची २० मार्च रोजी होणारी अर्थसंकल्पीय सिनेट ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. पुणे विद्यापीठाने सिनेट २० मार्च रोजी होणार असून, यामध्ये विद्यापीठाचा २०२१-२२ चा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे.

पुणे शहरात करोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने, प्रशासनाने एकत्र जमण्यावर बंधने आणली होती. त्यामुळे बंद सभागृहात ५० पेक्षा जास्त व्यक्ती उपस्थित राहू शकत नाहीत. पुणे विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य ७० आहेत. या सदस्यांसह अधिकारी, कर्मचारी असे ४० जण उपस्थित असतात. त्यामुळे ११० पेक्षा जास्त व्यक्ती दिवसभर सभागृहात असतात. त्यामुळे थेट बैठक घेण्याऐवजी सिनेटची बैठक ऑनलाइन घेण्याबाबत प्रशासनाने विचार सुरू केला होता. विद्यापीठाकडे वेळ कमी असल्याने ही बैठक ऑनलाइन घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार २० मार्च रोजी सकाळी ११ वाजता ही ऑनलाइन बैठक सुरू होईल, असे पत्र कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी प्रसिद्ध केले आहे.

News Paper Clippings During March 2021

Section: Education

१० एप्रिलपासून विद्यापीठाच्या ऑनलाइन सत्र परीक्षा

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १७ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम ते अंतिम वर्ष सत्र परीक्षा १० एप्रिलपासून सुरू होणार आहेत. त्या ऑनलाइन पद्धतीने बहुपर्यायी प्रश्नांद्वारे १०० टक्के अभ्यासक्रमावर होणार असून त्याबाबतचे परिपत्रक प्रशासनाने बुधवारी जारी केले आहे.

करोना पार्श्वभूमीवर विद्यापीठ, महाविद्यालयीन परीक्षा कशा घ्यायच्या याबाबतचा संभ्रम होता. तो आता मिटला आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाने परीक्षेबाबत निर्णय जाहीर केला आहे. बहुपर्यायी प्रश्नाच्या स्वरूपात ५० गुणांच्या परीक्षेसाठी एक तासाचा कालावधी असणार आहे. बी.ए., बी.कॉम., हे वार्षिक अभ्यासक्रम व बहि:स्थ यांच्याची परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमावर होणार आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रथम सत्र ६ फेब्रुवारीपासून सुरू झाल्याने वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी, विधी, एम.एड., एम.पी.एड. बीएस्सी बी.एड., बी.ए.बी.एड. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा संबंधीत अभ्यास मंडळाकडून प्राप्त सूचनेनुसार प्रथम घटकांपासून सुरू होणाऱ्या ७० टक्के अभ्यासक्रमावर होणार

आहेत. परीक्षांचे वेळापत्रक २५ मार्चपर्यंत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर होणार आहे. परीक्षा निर्धारित वेळेत पूर्ण होण्यासाठी रविवारच्या दिवशीही असणार आहेत, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी परिपत्रकात नमूद केले आहे. प्रथम सत्राच्या परीक्षांसाठी फक्त लेखी परीक्षांचे गुण 'स्टुडंड प्रोफाइल' सिस्टिममध्ये विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. संबंधीत विद्यार्थ्यांचे टप्प्याटप्प्याने निकाल जाहीर होणार आहेत. प्रथम व द्वितीय सत्राच्या परीक्षांची गुणपत्रके श्रेयांक पद्धतीने एकत्रितरित्या नंतर वितरीत होणार आहेत. प्रथम व द्वितीय सत्रासाठी एकत्रितरित्या प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी, सेमिनार, मिनी प्रोजेक्ट, व डेझरटेशन परीक्षांचे आयोजन त्या त्या अभ्यासक्रमातील प्रथम सत्राच्या परीक्षा संपल्यानंतर लगेचच ऑनलाइन किंवा ऑफलाइन करण्यात येणार आहे.

प्रभात Thu, 18 March 2021 https://epaper.eprabhat.net/c/592

News Paper Clippings During March 2021

Section: Education

पुणे । गुरुवार, १८ मार्च २०२१

पुणे

'सीईटी'सह बारावीचे गुण ग्राह्य?

'व्यावसायिक' प्रवेशासाठी स्वतंत्र समितीच्या स्थापनेचा निर्णय

म. टा. प्रतिनिधी, पुणे

इंजिनीअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर, हॉटेल मॅनेटमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी आता सीईटी परीक्षांच्या गुणांसोबतच बारावीचेही गुण ग्राह्य धरण्याची शक्यता आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश 'सीईटी'च्या गुणांवर होत असल्याने विद्यार्थी अकरावी आणि बारावीच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित अशा ठराविक विषयांचा अभ्यास करतात. त्यामुळे इतर विषयांकडे दुर्लक्ष होते. याच कारणामुळे या नव्या पॅटर्नसाठी समिती स्थापन करण्यात आली आहे.

राज्यातील प्रवेशप्रक्रिया व आगामी कृषी शिक्षण धोरणासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कृषिमंत्री दादाजी भुसे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, आमदार शेखर निकम, आमदार डॉ. राहुल पाटील, नियोजन विभागाचे अप्पर मुख्य सचिव देबाशिष चक्रवर्ती, उच्च व तंत्रशिक्षणचे प्रधान सचिव ओ. पी. गुप्ता, कृषी सचिव एकनाथ डवले, 'सीईटी'चे आयुक्त चिंतामणी जोशी उपस्थित होते.

नवीन कृषी शिक्षण धोरणाच्या आखणीसाठी; तसेच यापुढे उच्च शिक्षण प्रवेशाच्या पात्रतेसाठी सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) यासोबतच बारावीच्या परीक्षेचे गुणप्रमाण निश्चित करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करावी. या समितीने एक महिन्याच्या कालमर्यादेत ३० एप्रिलपर्यंत सरकारला अहवाल सादर करण्याचे आदेश पवार यांनी बुधवारी दिले. बारावीनंतरच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी सेलकडून सीईटी परीक्षा घेण्यात येतात. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी 'सीईटी'च्या गुणांसह बारावी परीक्षेचे गुण ग्राह्य धरणे; तसेच त्याच्या प्रमाणाची निश्चिती करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात यावी. या समितीमध्ये शिक्षणतज्ज्ञांसह संबंधित क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश असावा. या समितीने अभ्यास करून ३० एप्रिलपर्यंत एक महिन्याच्या कालमर्यादेत अहवाल सरकारला सादर करावा. राज्यातील इतर अभ्यासक्रमांचे नवीन शैक्षणिक धोरण ठरविण्याबाबत डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या धर्तीवर नवीन कृषी शैक्षणिक धोरण ठरविण्यासाठी लोकप्रतिनिधींसह, कृषितज्ज्ञ, कृषी विद्यापीठाचे आजी-माजी कुलगुरू, सनदी अधिकारी, यांचा समावेश असलेली स्वतंत्र समिती स्थापन करण्याचे आदेश पवार यांनी दिले. या निर्णयाची अंमलबजावणी यंदाच्या 'सीईटी'पासून होणार की, पुढील वर्षापासून ही गोष्ट अद्याप स्पष्ट झालेली नाही.

कृषी अभ्यासक्रम एक एप्रिलपासून सुरू

यंदाची कृषी अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रवेशप्रक्रियेची चौथी फेरी महाविद्यालस्तरावर करण्यात येणार आहे. कृषी अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया पूर्ण केल्यावर येत्या एक एप्रिलपासून शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे. यंदाचे कृषी अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यासाठी झालेला विलंब लक्षात घेऊन शैक्षणिक सत्रातील सुट्ट्या कमी करून आणि शैक्षणिक तासिका वाढवून वीस-वीस आठवड्यांच्या दोन सत्रांत हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यात येणार आहे. यंदाचे शैक्षणिक वर्ष डिसेंबरअखेर पूर्ण करण्यात येणार आहे, असे बैठकीत सांगण्यात आले.

Scanned with CamScanner

Maharashtra Times 18.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

'दहावी-बारावीसाठी लवकरच सूचना'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्य मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षांसाठी मार्गदर्शक सूचना येत्या दोन दिवसांत जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर परीक्षा, उत्तीर्ण होण्यासाठीचे निकष, परीक्षेतील गुण, वेळापत्रक अशा विषयांवर 'व्हायरल' होणाऱ्या चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी केले आहे.

राज्य मंडळाकडून इयत्ता दहावीच्या लेखी परीक्षा २९ एप्रिल ते २० मे या कालावधीत घेण्यात येणार आहेत; तर इयत्ता बारावीच्या लेखी परीक्षा २३ एप्रिल ते २१ मे या कालावधीत प्रचलित पद्धतीने आणि मंजूर आराखड्यानुसार घेण्यात येणार असल्याचे डॉ. भोसले यांनी स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे इयत्ता दहावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा १२ ते २८ एप्रिल या कालावधीत होतील. त्याचप्रमाणे इयत्ता बारावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा ५ ते २२ एप्रिल या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. या दोन्ही परीक्षा राज्य मंडळाच्या मंजूर आराखड्यानुसार होणार असून, त्यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही, असे या वेळी सांगण्यात आले आहे. राज्यात करोनाचा प्रादुर्भाव असून, त्या अनुषंगाने दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरक्षित व सुरळीत; तसेच निर्धारित कालावधीत पार पडण्याच्या दृष्टीने राज्य मंडळाकडून विविध उपाययोजना आखण्यात येत आहेत. मात्र, सोशल मीडियावर आणि प्रसारमाध्यमांमध्ये चुकीच्या बातम्या प्रसारित होत आहे. त्यामुळे या परीक्षेशी संबंधित असणाऱ्या विद्यार्थी, पालक, शिक्षक अशा घटकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थी आणि पालकांनी संभ्रम निर्माण करणाऱ्या कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवू नये, असे भोसले यांनी म्हटले आहे.

'अधिकृत माहिती मंडळाच्या वेबसाइटवर'

'राज्य मंडळाने परीक्षेबाबत प्रसिद्ध केलेली निवेदने आणि सूचना मंडळाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. परीक्षेच्या अनुषंगाने राज्यातील विभागीय मंडळामार्फत लेखी सूचना शाळा आणि जुनिअर कॉलेज यांना देण्यात येतात. त्याच सूचना अधिकृत मानाव्यात,' असे डॉ. भोसले यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे सांगितले आहे.

Maharashtra Times 19.3.2021

सरकारी निधीची अद्याप प्रतीक्षा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी राज्य सरकारकडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला १४४ कोटी ६२ लाख ८८ हजार २५० रुपये मिळणे बाकी आहे. ही थकीत रक्कम राज्य सरकारकडून विद्यापीठाला मिळाल्यास करोनाच्या प्रादुर्भावामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या विद्यापीठाला काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय सिनेट २० मार्चला होणार आहे. त्या अनुषंगाने डॉ. कान्हू गिरमकर यांनी विद्यापीठाला सरकारकडून विद्यापीठाला मिळणाऱ्या रकमेचा तपशिलाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्याबाबत व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनोहर चासकर यांनी माहिती दिली आहे. राज्य सरकारकडून पुणे विद्यापीठाला १४४ कोटी ६२ लाख ८८ हजार २५० रुपये मिळणे बाकी असल्याचे डॉ. चासकर यांनी सांगितले. काही दिवसांपूर्वी उच्च ... उदय सामंत यांनी ही रक्कम विद्यापीठाला देण्यात येईल, असे जाहीर केले होते. मात्र, अद्याप मिळालेली नाही. त्याचवेळी

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी भरती प्रक्रिया सरकारकडून नियोजनबद्ध कालावधीत राबवली जात नसल्याने विद्यापीठातील पदे रिक्त आहेत. त्यामुळे विद्यापीठाने संचित निधीतून काही पदे भरली आहेत. विद्यापीठाच्या संचित निधीतून शैक्षणिक वर्ष २०१९-२० आणि २०२०-२१मध्ये झालेल्या खर्चाचा तपशीलही डॉ. गिरमकर यांनी विद्यापीठाकडे मागितला. त्यानुसार दोन वर्षांत विद्यापीठाच्या संचित निधीतून ७८ कोटी ६७ लाख ९४ हजार ७२६ रुपये प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनमच्या वेतनावर खर्च झाल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून सांगण्यात आले.

'सिनेटला प्रत्यक्ष उपस्थिती का नको?'

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय सिनेट २१ मार्चला ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित विषय, वर्षभराच्या आर्थिक कामांची चर्चा होण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सिनेट ऑफलाइन पद्धतीनेच होणे आवश्यक असल्याचे सिनेट सदस्यांनी सांगितले. पुणे विद्यापीठात दोनशे लोक असलेलय वेबसीरीजचे चित्रिकरण चालते, तर शंभर सदस्य असलेली सिनेट का नको, असा सवाल सिनेट सदस्यांनी उपस्थित केला आहे. सिनेट ऑफलाइन पद्धतीनेच घेण्याची मागणी सदस्यांनी केली आहे.

Maharashtra Times 19.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

ऑफलाइन पद्धतीनेच बैठक घेण्याची अधिसभा सदस्यांनी केली होती मागणी

विद्यापीठाची अधिसभा होणार ऑनलाइन

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोना रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभेची बैठक ऑनलाइन पद्धतीने घेतली जाणार आहे. त्यामुळे यावर्षीसुद्धा अर्थसंकल्प विद्यापीठ प्रशासनाकडून ऑनलाइनच सादर केला जाईल, विद्यापीठ प्रशासनाने असे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

सुधारित आदेशानुसार ऑनलाइन बैठक

विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक ऑफलाईन पद्धतीने घेण्याबाबत पूर्वी नियोजन करण्यात आले होते. मात्र, कोरोना प्रसारास प्रतिबंध आणण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या सुधारित आदेशानुसार, विद्यापीठाची अधिसभा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. ऑनलाइन सभेचा तपशील सर्व सदस्यांना स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहे. - डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विद्यापीठाची अधिसभा ऑनलाइन की ऑफलाइन होणार याबाबत शंका उपस्थित केली जात होती. तसेच काही सदस्यांनी अधिसभा ऑफलाइन पद्धतीनेच घ्यावी, अशी मागणी केली होती. तसेच विद्यापीठाने पर्यायी सभागृहांचा विचार करून ऑफलाइन पध्दतीनेच अधिसभेची बैठक घ्यावी, असे निवेदन कुलगुरूंना दिले होते.

पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक येत्या २० मार्च रोजी आयोजित करण्यास राज्यपाल कार्यालयाने मान्यता दिली आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून रुग्ण संख्येत वाढ होत असल्याने शासनाने व स्थानिक प्रशासनाने काही कठोर पाऊले उचलली आहेत. त्यात ५० पेक्षा जास्त व्यक्तिंना एकत्र येता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे. मात्र, विद्यापीठाच्या अधिसभेस पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील सुमारे ७८ सदस्य, विद्यापीठाचे सुमारे २० अधिकारी व कर्मचारी आणि माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित असतात. त्यामुळे अधिसभेसाठी १०० पेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येतात. नियमानुसार, शंभरपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र बोलवणे चुकीचे असल्याने विद्यापीठाने अधिसभा ऑनलाइन घेण्याचे निश्चित केले आहे. विद्यापीठाचे अधिसभा सदस्य संतोष ढोरे यांनी अधिसभा ऑफलाईन पध्दतीनेच घ्यावी. या मागणीचे निवेदन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना दिले होते. मागील वर्षी घेण्यात आलेल्या ऑनलाईन अधिसभेदरम्यान कनेक्टिव्हिटीची अडचण आली होती. सदस्यांना एकमेकांचा आवज ऐकू येत नव्हता. त्यामुळे अधिसभा ऑफलाईनच घ्यावी, असे ढोरे यांनी निवेदनात नमूद केले होते. परंतु, कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी विद्यापीठाने ऑफलाइन अधिसभा न घेता ऑनलाइन घेण्याचा निर्णय घेतला.

Lokmat 19.3.2021

सावित्रीबाई फुले पुणे विवि आर्थिक संकट में

संवाददाता@नवभारत

पुणे. सावित्रीबाई फुले पुणे विश्वविद्यालय के सीनेट सदस्य डॉ. कान्हू गिरमकर ने आरोप लगाया है कि राज्य सरकार की वजह से विश्वविद्यालय आर्थिक संकट से घिर गया है. राज्य सरकार ने पुणे विश्वविद्यालय का 144 करोड़ रुपये बकाया रखा है. डॉ गिरमकर के लिखित सवाल के जवाब में यह जानकारी सामने आई है. उनके अनुसार करीब 150 करोड़ रुपये राज्य सरकार हर साल प्रोफेसरों और शिक्षकों के वेतन के लिए धन प्रदान करती है.

150 करोड़ पहुंचा बकाया

हालांकि इस फंड के समय पर न मिलने के कारण बकाया लगभग 150 करोड़ रुपये तक पहुंच गया है. पिछले साल विश्वविद्यालय ने शिक्षकों और शैक्षिक स्टाफ पर केवल 16 करोड़ रुपये खर्च किए. विश्वविद्यालय विभिन्न विभागों में अस्थायी प्रोफेसरों और गैर-शिक्षण कर्मचारियों की नियुक्ति करता है. उनका वेतन विश्वविद्यालय के फंड से दिया जाता है.

सरकार की मंशा पर उठने लगे सवाल

विश्वविद्यालय का आरोप है कि उसे राज्य सरकार से समय पर धन नहीं मिल रहा है. दूसरी तरफ राज्य सरकार ने विश्वविद्यालय के पैसे क्यों बकाया रखा. इस पर सवाल उठने लगे हैं. कर्मचारियों के वेतन के लिए निधि से 2019-2020 वित्त वर्ष में 17 करोड़ 79 लाख 50 हजार और 20 करोड़ 74 लाख 48 हजार रुपये और 2020-2021 में 16 करोड़ 78 लाख, 60 हजार और 23 करोड़ 35 लाख 35 हजार रुपए खर्च किये गए हैं.

Navbharat 19.3.2021

पुणे विद्यापीठाच्या प्रथम सत्राच्या परीक्षा १० एप्रिलपासून

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रथम सत्र परीक्षा घेण्यासाठी परिपत्रक जाहीर केले. ही परीक्षा फक्त ऑनलाइन पद्धतीनेच होणार आहे. तांत्रिक अडचणीमुळे परीक्षेत व्यत्यय आल्यास विद्यार्थ्यांना वेळ वाढवून दिला जाईल. तसेच, जेवढे प्रश्न सोडविले गेले आहेत ते सेव्ह झालेले असतील, असे विद्यापीठाने स्पष्ट केले. पुणे विद्यापीठाने १० एप्रिलपासून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या प्रथम सत्राची परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला असून, त्याबाबत परिपत्रक काढले आहे. ही परीक्षा फक्त ऑनलाइन पद्धतीने बहुपर्यायी प्रश्न विचारले जातील. २५ मार्च रोजी सर्व अभ्यासक्रमांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केले जाईल. रविवारीदेखील परीक्षा घेतली जाणार आहे.

एका तासाच्या परीक्षेत ऑनलाइन ६० प्रश्नांपैकी ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राह्य धरले जातील. प्रथम व द्वितीय सत्रातील प्रॅक्टिकल, मौखिक परीक्षा, सेमिनार, मीनी प्रोजेक्ट, प्रोजेक्ट, डेझरटेशन परीक्षांचे आयोजन संबंधित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा प्रथम सत्राचा शेवटचा पेपर झाल्यानंतर महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करावे यासाठी स्वतंत्र परिपत्रक काढले जाणार नाही.

यापूर्वीच्या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी दोन ई-मेल आयडी दिल्याने मोठा गोंधळ झाला होता, त्याचा परिणाम निकालावर झाला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एकच अधिकृत ई-मेल आयडी व एकच मोबाईल नंबर द्यावा. त्यावर परीक्षेची माहिती दिली जाईल, असे परिपत्रकात नमूद केले आहे.

Kesari 19.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

विद्यापीठाचा अर्थसंकल्प शनिवारी होणार सादर

उत्सुकता शिगेला : विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालयांना काय मिळणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या येत्या २० मार्च रोजी होणाऱ्या ऑनलाइन अधिसभेच्या बैठकीत विद्यापीठाचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून विद्यापीठाच्या ठेवींमध्ये घट झाल्याने विद्यापीठाची आर्थिक परिस्थिती खालवली आहे. त्यामुळे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मांडल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पातून विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालयांना काय मिळणार? याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

पुणे विद्यापीठाच्या २०१६-१७ पासून २०१९-२० पर्यंतच्या अर्थसंकल्पात सातत्याने घट होत असल्याचे दिसून आले. मात्र, मागील वर्षी २०२०-२१ चा अर्थसंकल्प ६६२.४६ कोटी आणि ५१.५० कोटी तुटीचा सादर करण्यात आला. परंतु, कोरोनामुळे विद्यापीठाच्या आर्थिक उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर घट झाली. विद्यापीठाला परीक्षा विभागाकडून सर्वाधिक उत्पन्न मिळते. मात्र, कोरोनामुळे विद्यापीठाला परीक्षा शुल्कात सवलत देण्याचा निर्णय घ्यावा लागला. त्यामुळे विद्यापीठाच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला. त्याचप्रमाणे बँकांच्या व्याजदरात घट झाल्याने विद्यापीठाला ठेवी मधून मिळणारे उत्पन्न सुद्धा घटले. त्यामुळे विद्यापीठाच्या अर्थसंकल्पातून कोणाला काय मिळणार याबाबतची उत्सुकता ताणली गेली आहे.

गेल्या पाच वर्षांच्या अर्थसंकल्पाची आकडेवारी (रक्कम कोटीमध्ये)

शैक्षणिक वर्ष	अर्थसंकल्प	तूट
२०१६-१७	६१४.७४	१२०.७२
२०१७-१८	६८८.३८	१००.३२
२०१८-१९	६५१.११	६२.२६
२०१९-२०	६४५.६६	४२.७१
२०२०-२१	६६२.४६	५१.५०

विद्यापीठ अधिसभेची बैठक ऑनलाइन होणार आहे. या बैठकीदरम्यान काही तांत्रिक अडचणी येऊ नयेत, यासाठी शुक्रवारी दुपारी बैठकीची रंगित तालीम घेतली जाणार आहे.

विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना राबविल्या जातात. त्यामुळे शिष्यवृत्तीमध्ये कपात केली जाणार का? शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या योजना बंद होणार का? विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांसाठी गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. परंतु, गेल्या वर्षी या योजनेचा निधी कमी केला होता. त्यात यंदा आणखी घट केली जाणार आहे का? आदी प्रश्नांची चर्चा सध्या शिक्षण वर्तुळात चर्चा केली जात आहे.

Lokmat 19.3.2021

पुन्हा अकरावीची प्रवेशप्रक्रिया

वंचित विद्यार्थ्यांना २६ मार्चपर्यंत मुदत

पुणे : पुढारी वृत्तसेवा

अकरावी प्रवेशप्रक्रियेत यंदा शाखानिहाय किती प्रवेश झाले, हे शिक्षण विभागाकडूनच जाहीर करण्यात आल्यानंतर आता पुन्हा एकदा अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांना २६ मार्चची मुदत देण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव राजेंद्र पवार यांनी प्रवेशप्रक्रियेबाबत परिपत्रकाद्वारे निर्देश दिले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये अकरावीच्या प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांसाठी पुन्हा एकदा प्रवेशप्रक्रिया राबवली जाणार आहे. प्रवेशप्रक्रिया झाल्यानंतरदेखील काही विद्यार्थी अकरावीच्या प्रवेशापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे. या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याबाबत शासनाकडे विनंती करण्यात आली आहे. ▶ पान ४ वर

अकरावी प्रवेश प्रक्रियेला २६ पर्यंत अंतिम मुदतवाढ

पुणे, ता. १८ : इयत्ता अकरावीच्या प्रवेशापासून काही विद्यार्थी वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांच्या प्रवेशासाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी काही दिवसांपूर्वी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने राज्य सरकारकडे केली होती. या मागणीला मान्यता देण्यात आली असून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिताच्या प्रवेश प्रक्रियेला अंतिम मुदतवाढ दिली आहे. त्याअंतर्गत अकरावी प्रवेशापासून वंचित असलेल्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, म्हणून 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' (एफसीएफएस) या तत्त्वावर प्रवेश घेण्यास २६ मार्चपर्यंत मान्यता दिल्याचे शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव राजेंद्र पवार यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

- वाढीव कालावधी १९ मार्च रोजी सकाळी १० पासून सुरू
- प्रथम येणाऱ्यास प्राधान्याची ही शेवटची संधी
- २६ मार्चला प्रवेश प्रक्रिया बंद

मात्र, २६ मार्चनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशासाठी मुदतवाढ देणार नाही. तसेच, जे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत, त्यांच्यासाठीच ही प्रवेश प्रक्रिया राबविणार आहे. अन्य विद्यार्थ्यांना पसंतीक्रम बदलणे किंवा अन्य कारणांसाठी पुन्हा प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची संधी देणार नाही, असेही पवार यांनी स्पष्ट केले.

Pudhari 19.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

परीक्षा वेळापत्रकानुसार

अफवांवर विश्वास नको; दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना आवाहन

पुणे, ता. १८ : विविध समाज माध्यमाद्वारे प्रसारित होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षांबाबतच्या अफवांवर विद्यार्थी-पालकांनी विश्वास ठेवू नयेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत एप्रिल-मे २०२१ मध्ये आयोजित केलेल्या दहावी-बारावीच्या परीक्षा या नियोजित कालावधीतच होणार आहेत, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली आहे.

दहावीची लेखी परीक्षा २९ एप्रिल ते २० मे दरम्यान, तर बारावीची परीक्षा २३ एप्रिल ते २१ मे दरम्यान होणार आहेत. तसेच दहावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा १२ ते २८ एप्रिल, तर बारावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा परीक्षा ५ ते २२ एप्रिल दरम्यान होणार आहेत. राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव अद्यापही सुरू आहे. त्या अनुषंगाने परीक्षा सुरक्षित व सुरळीतपणे तसेच निर्धारित कालावधीत पार पडण्याच्या दृष्टीने मंडळ स्तरावर विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. मात्र, विविध समाज माध्यमाद्वारे दहावी आणि बारावी परीक्षेसंदर्भात विविध अफवा प्रसारित होत आहेत. त्यामुळे या परीक्षेशी संबंधित घटकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. त्यामुळे मंडळामार्फत सर्व संबंधित घटकांना अशा कोणत्याही संभ्रम निर्माण करणाऱ्या गोष्टींवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

> **कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित एप्रिल-मे २०२१ मधील लेखी, प्रात्यक्षिक परीक्षांसाठी मंडळामार्फत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना येत्या दोन दिवसांत देण्यात येणार आहेत. त्याचे काटेकोर पालन करून सर्व विद्यार्थ्यांनी तणावमुक्त होऊन परीक्षा द्यावी.**
> **- डॉ. अशोक भोसले,**
> सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

Sakaal 19.3.2021

दहावी, बारावीची परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावीची परीक्षा २९ एप्रिल ते २० मे, तर बारावीची परीक्षा २३ एप्रिल ते २१ मे या काळात ऑफलाइन म्हणजेच दरवर्षी होतात तशाच होणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन राज्य मंडळाने गुरुवारी केले.

राज्यातील कोरोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येमुळे दहावी, बारावीच्या परीक्षांबाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. विद्यार्थी व पालकांमधील संभ्रम लक्षात घेता दहावी, बारावीच्या लेखी व तोंडी परीक्षा या नियोजित आराखड्यानुसार व प्रचलित पद्धतीनेच होणार असून, दहावीच्या तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा १२ ते २८ एप्रिल, तर बारावीच्या तोंडी परीक्षा ५ ते २२ एप्रिलदरम्यान मंडळाकडून जाहीर करण्यात आल्या आहेत. त्या नियोजनाप्रमाणेच होणार असल्याचे राज्य मंडळाने म्हटले आहे

अफवांवर विश्वास नको

विविध समाजमाध्यमांद्वारे दहावी व बारावी परीक्षांसंदर्भात अफवा प्रसारित होत आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. यासंदर्भात मंडळामार्फत वेळोवेळी अधिकृत निवेदने मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील, असे राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी सांगितले.

Pudhari 19.3.2021

रविवारीसुद्धा विद्यापीठाच्या परीक्षा

नियमावली प्रसिद्ध : काही परीक्षांचे आयोजन महाविद्यालयांकडे

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम सत्राच्या परीक्षा येत्या ११ एप्रिलपासून सुरू होणार आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने याबाबतची सविस्तर नियमावली प्रसिद्ध केली असून त्यात रविवारीसुद्धा परीक्षा घेतल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांमधील सुमारे साडेसहा लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षा १५ मार्चपासून घेतल्या जाणार होत्या. मात्र, एजन्सी निवडण्याची प्रक्रिया चुकल्याने विद्यापीठावर परीक्षा पुढे ढकलण्याची वेळ आली. आता विद्यापीठाच्या कंपनीतर्फे ऑनलाइन पद्धतीने परीक्षांचे आयोजन केले जाणार आहे. मात्र, काही अभ्यासक्रमाच्या परीक्षा या महाविद्यालय स्तरावर आयोजित कराव्यात, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. तसेच प्रथम सत्र वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी, विधी, एम.एड., एम.पी.एड, बीएस्सी-बी.एड., बी.ए-बी.एड अभ्यासक्रमाच्या परीक्षा संबंधित अभ्यास मंडळाकडून प्राप्त झालेल्या सूचनांनुसार ७० टक्के अभ्यासक्रमावर होणार आहेत.

प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन परीक्षांच्या बाबतीत आवश्यक ती सर्व माहिती विद्यार्थ्यांना एसएमएस व ई-मेलद्वारे अवगत करून दिली जाणार आहे. मात्र, त्यासाठी विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक कार्यान्वित असणे आवश्यक आहे. ऑनलाइन परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी विद्यार्थ्याला संगणकीय प्रणालीतून वाढवून दिला जाईल. तसेच यापूर्वी सोडवलेली उत्तरे ही सेव्ह होऊन खंड पडल्यास तिथून परीक्षा पुन्हा सुरू होईल. परीक्षा सुरू होण्यापूर्वी सराव परीक्षेची संधी उपलब्ध करून दिली जाईल. साधारणपणे ७ एप्रिलपासून विद्यार्थ्यांना मॉक टेस्टच्या माध्यमातून परीक्षेचा सराव करता येईल.

विद्यापीठाची परीक्षा केवळ ऑनलाईन पद्धतीनेच होणार आहे. त्यात ५० गुणांच्या बहुपर्यायी प्रश्नांसाठी ६० मिनिटांचा कालावधी दिला जाणार आहे. ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या बहुपर्यायी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना छायांकित प्रत किंवा पुनर्मूल्यांकन करण्याची सुविधा उपलब्ध असणार नाही.

ज्या महाविद्यालयाकडून ज्या विद्यार्थ्यांचे इन सेमिस्टर, ऑनलाइन व सेशनल परीक्षांचे अंतर्गत गुण दिनांक २० एप्रिलपर्यंत विद्यापीठास प्राप्त होतील, त्याच विद्यार्थ्यांचे निकाल फक्त ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात येतील. तसेच गुणपत्रके मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षांचे निकालाबरोबरच एकत्रित वितरित करण्यात येतील, याची सर्वांनी नोंद घ्यावी, असे विद्यापीठातर्फे स्पष्ट केले आहे.

Lokmat 19.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

अकरावी प्रवेशासाठी पुन्हा मुदतवाढ

प्रभात वृत्तसेवा

२६ मार्चपर्यंत प्रवेशासाठी मुदत

पुणे, दि. १८ - यावर्षीच्या अकरावीच्या प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांसाठी पुन्हा प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांना 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' तत्वावर प्रवेश दिले जाणार असून, प्रवेशासाठी २६ मार्चची मुदत देण्यात आली आहे. अकरावी प्रवेशासाठी ही अखेरची संधी आहे.

शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव राजेंद्र पवार यांनी या प्रवेश प्रक्रियेबाबत परिपत्रकाद्वारे निर्देश दिले आहेत. अद्यापही काही विद्यार्थी अकरावीच्या प्रवेशापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे. या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याबाबत शासनाकडे विनंती करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये यासाठी २६ मार्चपर्यंत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर प्रवेश घेण्यात मान्यता देण्यात येत आहे. २६ मार्चनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यात येऊ नये. प्रवेशापासून वंचित विद्यार्थ्यांसाठीच ही प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येईल. पसंतीक्रम बदलणे अशा कारणांसाठी पुन्हा प्रक्रियेमध्ये समाविष्ट होण्याची संधी देता येणार नाही.

Prabhat 19.3.2021



Special round for FYJC on March 26 after demand

TIMES NEWS NETWORK

Pune: A special round on first-cum-first-serve basis for students of first year junior college (FYJC, std XI) will be conducted on March 26.

The special round was organised based on many complaints by students who had not received admissions and all the rounds were over. The admissions will be conducted across the state by the office of deputy director through online mode.

A notification on Thursday by the state school education department said, "It was noticed that due to the pandemic, there were still some students who had not received admissions to FYJC. A request has been made to the state government for admitting these

FILL FORMS TODAY

students on vacant seats. In order to save the academic year of these students this special FCFS basis round has been organised."

The notification said there will be no admission round or any consideration for admission after March 26. Students who have not got admissions at all would only be considered for this special round.

Those who were existing in the previous rounds, or those who change preferences would not be considered in this special round, added the notification.

Students eligible for the special round will be able to fill forms from Friday and last day to fill the form will be March 26.

As soon as the students create their login, they will get an allotment and students can confirm their allotted college online latest by March 26.

The Times of India 19.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

विद्यापीठाला संकेतस्थळ अपडेटचा विसर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १८ - ऑनलाइन शिक्षणात अग्रेसर असणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे संकेतस्थळ 'अपडेट' नसल्याची माहिती समोर आली आहे. संकेतस्थळावरील मजकुरातील भाषा आणि आशय यात अनेक चुका असून, ही बाब विद्यापीठाच्या प्रतिमेला बाधक आहे. जगात नावलौकिक असलेल्या पुणे विद्यापीठाचे संकेतस्थळ अपडेट कधी होणार, असा प्रश्न अधिसभा सदस्यांनी उपस्थित केला आहे.

विद्यापीठाची अधिसभा येत्या शनिवारी होत आहे. त्यात अधिसभा सदस्यांनी प्रस्तावाद्वारे विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील त्रुटी निदर्शनास आणून दिली. विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील माहितीही अनेकदा अपूर्ण किंवा जुनी असते. विभागांनी द्यावयाच्या माहितीतही एकसूत्रता नसते.

संकेतस्थळाचा वापर जगभरातून होत असताना, त्यातील त्रुटी विद्यापीठाच्या दृष्टीने भूषणावह नाही. हा प्रकार टाळण्यासाठी तज्ज्ञांच्या माध्यमातून त्याची पुनर्रचना करण्यात यावी आणि त्याचे सातत्याने पुनरावलोकन करणारी यंत्रा उभी करण्यात यावी, असा प्रस्ताव राजीव साबडे यांनी मांडला आहे.

विद्यापीठ सोशल मीडियापासून दूरच

देश-विदेशातील सर्व नामांकित विद्यापीठाचे संकेतस्थळ दररोज अपडेट असते. तसेच ट्वीटर, फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर संबंधीत विद्यापीठाची माहिती अपडेट असते. त्यामुळे तेथील विद्यापीठाची माहिती काही क्षणात उपलब्ध होणे शक्य असते. तसेच विद्यार्थी व शिक्षण क्षेत्रातील घटकांना एकाचवेळी संवाद साधण्यासाठी सध्या सोशल मीडियाचा वापर होत आहे. त्यापासून पुणे विद्यापीठ दूरच असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

Prabhat 19.3.2021

विद्यापीठाची अधिसभा ऑनलाइनच होणार

पुणे, ता. १८ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची वार्षिक सभा ऑफलाइन ऐवजी ऑनलाइनच घेण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्याबाबत बुधवारी (ता. १७) सूचना काढून स्पष्ट केले आहे.

पुणे विद्यापीठाने अधिसभेची बैठक २० मार्च रोजी होणार असून, यामध्ये विद्यापीठाचा २०२१-२२ चा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरातील कोरोनाबाधितांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने प्रशासनाने गर्दी जमण्यावर बंधने आणली होती. त्यामध्ये बंद सभागृहात कोणत्याही कार्यक्रमास ५० पेक्षा जास्त व्यक्ती उपस्थित राहणार नाहीत असे आदेशात नमूद केले आहे.

पुणे विद्यापीठाच्या अधिसभेचे ७० सदस्य आहेत, अधिकारी, कर्मचारी असे ४० जण उपस्थित असतात. त्याचप्रमाणे सुरक्षा रक्षक व इतर असे ११० पेक्षा जास्त व्यक्ती दिवसभर एकत्र असतात. त्यामुळे थेट बैठक घेण्याऐवजी ती ऑनलाइन बैठक घेण्याबाबत प्रशासनाने विचार सुरू केला होता. ऑनलाइन बैठकीत नेटवर्क नसणे, आपापले मुद्दे मांडताना सदस्यांना अडथळे येणे, चर्चा अर्धवट होणे यासह इतर कारणांनी सदस्यांनी ऑनलाइन बैठकीस सदस्यांनी विरोध केला होता. या बैठकीत २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या खर्चास मान्यता दिली जाते, त्यामुळे त्यास ३१ मार्च पूर्वीच मान्यता घेणे गरजेचे आहे.

विद्यापीठाकडे वेळ कमी असल्याने ही बैठक पुढे ढकलता येणार नसल्याने थेट बैठक घेण्याऐवजी ऑनलाइन बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, २० मार्च रोजी सकाळी ११ वाजता ही ऑनलाइन बैठक सुरू होईल, असे पत्र कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी काढले आहे.

Sakaal 19.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

सकाळ TODAY २०/३/२०२१ पुणे शहर

व्यवसाय अभ्यासक्रमासाठी समिति

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने होणार रचना; तीन महिन्यांत अहवाल

सकाळ EXCLUSIVE

पुणे, ता. १९ : राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण २०१५ मधील तरतुदी विचारात घेऊन नवीन शैक्षणिक धोरण २०२० मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी आणि त्यांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने पुढील रूपरेषा ठरविण्यासाठी राज्य सरकारच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाने राज्य स्तरीय समिती स्थापन केली आहे. या समितीमार्फत आगामी काळासाठी राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाची आराखडा ठरविण्यात येणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात व्यावसायिक शिक्षणाला नवीन स्वरूप देण्यात यावे, असा उल्लेख आहे. त्याप्रमाणे व्यावसायिक शिक्षण हे पुढील दशकात टप्प्या-टप्प्याने सर्व प्रशालांमध्ये व उच्च शिक्षण संस्थांमध्ये समाविष्ट करायचे आहे. त्यासाठी कौशल्यविषयक उणिवांचे विश्लेषण, स्थानिक संधीचे मापन, त्याआधारे व्यावसायिक शिक्षणाची प्राधान्याची क्षेत्रे निवडण्याची गरज आहे. तसेच एकविसाव्या शतकातील नवीन शैक्षणिक धोरण, शैक्षणिक ढाच्यामध्ये, नियमांमध्ये, प्रशासकीय व्यवस्थांमध्ये अनेक सुधारणा व आमूलाग्र बदल देखील शैक्षणिक धोरणात नमूद केले आहेत. शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक व्यवस्था आणि संस्था यांच्याकरिता मूलभूत तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत.

राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण २०१५ मधील तरतुदी विचारात घेऊन तसेच, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील 'रि-इमॅजिंग व्होकेशनल एज्युकेशन'च्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी व पुढील रूपरेषा ठरविण्यासाठी ही समिती काम करणार आहे. या समितीला अभ्यास अहवाल सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आल्याचे, विभागाच्या सहसचिव डॉ. सुवर्णा खरात यांनी अध्यादेशात म्हटले आहे.

२०/३/२०२१

पुणे, शनिवार, २० मार्च २०२१ ३

समितीत कोण आहेत?

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करणार आहे. यात व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे संचालक, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्त, वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टिट्यूटचे उपसंचालक डॉ. एस. जी. भिरूड, ग्लोबल टिचर अॅवॉर्ड विजेते रणजितसिंह डिसले, पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर व्होकेशनल एज्युकेशनचे (भोपाळ) दोन प्रतिनिधी, उच्च शिक्षण संचालक, तंत्र शिक्षण संचालक, शालेय शिक्षण संचालक, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अध्यक्ष, राज्य कौशल्य विकास मंडळाचे अध्यक्ष, कौशल्य क्षेत्रातील दोन तज्ञ हे सदस्य म्हणून काम पाहणार आहेत. तर कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सह सचिव हे सदस्य सचिव असणार आहेत.

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०नुसार इयत्ता सहावीनंतर नियमित शिक्षणात व्यावसायिक अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात यावा, असे सुचविले आहे. त्यानुसार राज्यात शालेय शिक्षणापासून ते उच्च शिक्षणात व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दृष्टीने काय पावले उचलली जावीत, हे ठरविण्यासाठी ही समिती आहे. मात्र, राज्यात मुळातच व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्याचा अनुभव असणारे तज्ज्ञ, प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध आहेत. त्यामुळे उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचे रूपांतर थांबवून या अनुभवी शिक्षकांच्या मदतीने आगामी काळात व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्याचे नियोजन करणे शक्य होणार आहे.

- जयंत भाभे,

अध्यक्ष, व्होकेशनल टीचर्स असोसिएशन

सकाळ

Sakaal 20.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

SPPU seeks external vendor for upcoming online exams, says it's 'borrowing software'

ALIFIYA KHAN
PUNE, MARCH 19

TWO WEEKS after announcing that the SPPU Edutech Foundation (SEF), an internal company of Savitribai Phule Pune University, will conduct the upcoming online MCQ examinations, a circular issued by SEF on Friday seeking external vendors who can provide the software, among a host of other services, has students worried.

Among the scope of works for the vendor as specified by SEF are providing online exam service, proctoring, question paper authoring and results. However, the university administration denied that the buck was being passed to an outsider, calling it a simple case of "borrowing software". The SEF said it will handle 'front-end UI-based' function only.

Vice-chancellor Dr Nitin Karmalkar said, "Actually, we have an in-house software called Moodle, same as used in the IITs to conduct online examinations, but unfortunately some work needs to be done on it. It could be fully ready by the next semester exams but just to ensure there is no further delay, we are looking for technical support in the form of online software. We will have the entire control, the external agency will just provide the cloud-based software," he said.

There has been considerable delay and discussion over the conduct of online MCQ-based October-November 2020 semester examinations, which are now starting from April 11. While six months ago, a vendor was appointed by SPPU who conducted last year's online examinations for final year examinations, the process was riddled with glitches and complaints. Under severe criticism for the same, senior academicians and Senate members questioned why the university wasn't directing its own Section 8 company, SEF, to conduct the exams.

The examination department has released the dates for the mock exams starting from April 7 followed by actual exams by April 11, but students are worried whether exams will take place as per schedule.

The SEF's request for the proposal of providing proctored online exam service in SaaS model defines the scope of the work of the external vendor for providing an online exam service/platform, AI-enabled image-based proctored mode of examinations, question paper authoring, results including one click download of results, showing absentee records and more.

Senate member Santosh Dhore questioned the need to appoint yet another external vendor. "We were assured that SEF is capable of doing the job by themselves and if technical support is needed, why look for one more person? There was the old vendor, why are they wasting time in all these processes?" he said.

Vaibhav Edke, representative of Maharashtra Student Welfare Association, said, "What is the point of giving the work to SEF when it is outsourcing the job? The university administration should ensure that at the end of the day, students should not suffer anymore delays in examinations."

The Indian Express 20.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

परीक्षार्थींना आता वाढीव वेळ

शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांची माहिती; परीक्षा ऑफलाइनच होणार

सकाळ न्यूज नेटवर्क

वर्षा गायकवाड

मुंबई, ता. २० : राज्यात कोरोनामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शिक्षण मंडळाच्यावतीने घेतल्या जाणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांची केंद्रे ही संबंधित शाळा - महाविद्यालयांमध्येच ठेवली जाणार आहेत. यासाठीची घोषणा आज शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केली. सर्व परीक्षा या ऑफलाइन पद्धतीने घेतल्या जाणार असून त्यासाठी अधिकचा वेळ वाढवून देण्यात येणार आहे.

दहावी-बारावीच्या ८० गुणांच्या लेखी परीक्षेसाठी ३ तास वेळ दिला जात होता, परंतु कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव कमी झाल्यामुळे लेखी परीक्षेसाठी ३० मिनिटे वेळ वाढवून देण्यात येणार आहेत, तर ४० व ५० गुणांच्या परीक्षेसाठी १५

मिनिटे वेळ वाढवून देण्यात येणार असल्याची माहितीही गायकवाड यांनी दिली. दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य विद्यार्थ्यांपेक्षा परीक्षेसाठी प्रत्येक घड्याळी तासासाठी २० मिनिटांची वेळ वाढवून देण्यात येणार आहे. तर प्रात्यक्षिक परीक्षा या लेखी परीक्षेनंतर घेतल्या जाणार असून त्यासाठी लेखनकार्य गृहपाठाचा पर्याय देण्यात आला आहे. त्यासाठीचे

पान ४ वर »

solitairesbh.com
SOLITAIRE BUSINESS HUB
शेवटचा दिवस
मध्यरात्रीनंतर या सवलतीचा फायदा होणार नाही.

परीक्षार्थींना आता वाढीव वेळ

» पान 1 वरून

वेळापत्रक राज्य शिक्षण मंडळाकडून जाहीर करण्यात आले आहे.

विशेष परीक्षेचे आयोजन...

एखाद्या विद्यार्थ्यास परीक्षा कालावधीमध्ये कोरोनाची काही लक्षणे जाणवत असल्यास अथवा कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे अथवा लॉकडाउन, कन्टेन्मेंट झोन, संचारबंदीमुळे परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षेचे आयोजन जून महिन्यामध्ये करण्यात येईल. ही परीक्षा केंद्रे शहरी भागांत ठराविक ठिकाणी व ग्रामीण भागांत तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी निश्चित करण्यात येतील.परीक्षा मंडळामार्फत आयोजित केली जाणारी पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्टमध्ये घेण्यात येईल.

लेखी परीक्षांच्या तारखा...

दहावीची लेखी परीक्षा २९ एप्रिल ते २० मे २०२१ या कालावधीमध्ये, तर बारावीची परीक्षा २३ एप्रिल ते २१ मे २०२१ या कालावधीमध्ये ऑफलाइन पद्धतीने होणार आहेत. दहावीच्या दरवर्षी प्रात्यक्षिक परीक्षा घेतल्या जात असत, परंतु या वर्षी कोरोनामुळे विशिष्ट लेखन कार्य (Assignment) गृहपाठ पद्धतीने घेण्यात येतील.

Sakaal 21.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

विद्यापीठाच्या कंपनीकडून परीक्षेच्या कामाची निविदा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : रखडलेल्या सत्र परीक्षांची जबाबदारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन या आपल्याच कंपनीकडे सोपवण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी घेतला. मात्र या कंपनीने आता परीक्षेचे काम माहिती तंत्रज्ञान कंपनीकडून करून घेण्यासाठी निविदा काढल्याचे समोर आले आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षा ठरल्याप्रमाणे सुरू होणार का, या बाबत साशंकता निर्माण झाली आहे.

विद्यापीठाने १० एप्रिलपासून सत्र परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे जाहीर केले आहे. या परीक्षा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने सत्र परीक्षा घेण्याचे काम एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशनकडे दिले. मात्र, एज्युटेक फाउंडेशनने या परीक्षेच्या कामांसाठी माहिती तंत्रज्ञान कंपनीची निवड करण्यासाठी निविदा काढली आहे. या खासगी कंपनीला सोमवारपर्यंत अर्ज दाखल करता येईल. त्यानंतर आलेल्या प्रस्तावांची छाननी करून कंपनी निवडली जाईल. अशा परिस्थितीत परीक्षा ठरलेल्या वेळापत्रकानुसार होणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशनने विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेला सादरीकरण करून माहिती दिली होती. मात्र आता एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशनने निविदा काढल्याने परीक्षेच्या प्रक्रियेत एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन नेमके काय करणार असा प्रश्न निर्माण होत आहे.

परीक्षांना आणखी उशीर नको

आधीच सत्र परीक्षेला उशीर झाला आहे. विद्यापीठाने परीक्षा घेण्यासाठी निवडलेल्या विद्यापीठाच्या कंपनीनेही निविदा काढल्या आहेत. मात्र आता परीक्षा घेण्याच्या तांत्रिक प्रक्रियेत आणखी वेळ जाणार नाही याची दक्षता विद्यापीठ प्रशासनाने घ्यावी, असे युवक क्रांती दलाचे शहर उपाध्यक्ष कमलाकर शेटे आणि महाराष्ट्र स्टुडन्ट वेल्फेअर असोसिएशनचे वैभव एडके यांनी सांगितले.

लोकसत्ता Sun, 21 March 2021 https://epaper.loksatta.com/c/

News Paper Clippings During March 2021

Section: Education

१०वी १२ वीच्या लेखी परीक्षा त्याच शाळा-कनिष्ठ महाविद्यालयात

पेपरसाठी वाढीव वेळ, लेखीपरीक्षेनंतर प्रात्यक्षिक; शिक्षण विभागाचा दिलासा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई: राज्यमंडळाच्या दहावी बारावीच्या लेखी परीक्षेसाठी यंदा विद्यार्थ्यांना अर्धातास वेळ वाढवून देण्यात येणार आहे. दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षाही रद्द करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे करोनामुळे परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे.

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाची दहावी आणि बारावीची परीक्षा पुढील महिन्यापासून सुरू होणार आहे. राज्यात करोना रुग्णांची संख्या वाढत असल्याने या परिक्षांबाबत संभ्रम निर्माण झाला. त्या पार्श्वभूमीवर परीक्षा नियोजित

वेळापत्रकानुसार, लेखीच होईल असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले. मात्र त्याचवेळी सद्यस्थिती लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी वेळ वाढवून देण्याबरोबरच विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक निर्णय विभागाने घेतले आहेत. शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली.

करोनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून प्रत्येक शाळेत एक वर्गखोली राखीव ठेवण्यात येणार असून परीक्षेपूर्वी शिक्षक, शिक्षणमंडळाचे कर्मचारी यांचे लसीकरण करण्यात येणार असल्याचेही गायकवाड यांनी सांगितले.

उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी वाढीव वेळ

सर्वसाधारणपणे ८० गुणांच्या परीक्षेसाठी तीन तासांचा वेळ दिला जातो. मात्र गेले वर्षभर ऑनलाइन वर्गांमध्ये विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव पुरेसा झाला नाही. त्यामुळे यंदा लेखी परीक्षेसाठी ३० मिनिटे वेळ वाढवून देण्यात आला असून ४० व ५० गुणांच्या प्रश्नपत्रिकेसाठी १५ मिनिटे तर अपंग विद्यार्थ्यांसाठी एक तास वाढवून देण्यात येणार आहे.

परीक्षा लेखीच

करोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा ऑनलाइन घेण्याची मागणी पालकांकडून करण्यात येत होती. मात्र, परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार आणि लेखीच होणार असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे. मात्र दहावीचे १६ लाख तर बारावीचे १३ लाख विद्यार्थी परीक्षा देणार असून ग्रामीण भागात ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने दोन्ही परीक्षा ऑफलाइन पद्धतीनेच घेतल्या जातील, अशी माहिती गायकवाड यांनी दिली. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा २३ एप्रिल ते २१ मे या कालावधीत तर इयत्ता दहावीची लेखी परीक्षा २९ एप्रिल ते २० मे दरम्यान होणार आहे.

शाळा-महाविद्यालयांत केंद्र

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी लेखी परीक्षा त्यांच्याच शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये घेण्यात येणार आहेत. अपवादात्मक परिस्थितीत वर्ग खोल्या कमी पडल्यास जवळच्या शाळेत परीक्षा घेण्याची मुभा शाळांना देण्यात आली आहे. लोकल किंवा बसने प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र हेच ओळखपत्र समजून सोबत पालकांनाही प्रवास करण्याची मुभा देण्यात येणार असल्याचेही गायकवाड यांनी सांगितले.

दहावीची प्रात्यक्षिक परीक्षा रद्द

दहावीची प्रात्यक्षिक परीक्षा यंदा रद्द करण्यात आली असून त्याऐवजी प्रकल्प, लेखनकार्य, गृहपाठ अशा स्वरूपात २१ मे ते १० जून या कालावधीत ही परीक्षा घेतली जाईल. बारावीची प्रात्यक्षिक परीक्षा २२ मे ते १० जून दरम्यान घेतली जाणार आहे. विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिके कमी करून पाच ते सहा प्रात्यक्षिकांवरच ही परीक्षा देण्याचे आदेश कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आले आहेत. कला आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेनंतर १५ दिवसात लेखन कार्य, गृहपाठ द्यावे लागणार आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा कालावधीत विद्यार्थी किंवा घरातील कोणाला करोनाची लागण झाल्यास किंवा टाळेबंदी, प्रतिबंधात्मक क्षेत्र, संचारबंदी आदी परिस्थिती असल्यास प्रात्यक्षिक परीक्षा किंवा गृहपाठ सादर करण्यासाठी १५ दिवस वाढवून देण्यात येतील.

विशेष परीक्षेचे नियोजन

परीक्षा कालावधीत करोनाची लागण झाल्यामुळे संसर्गामुळे, टाळेबंदी, प्रतिबंधात्मक क्षेत्र, संचारबंदी आदी कारणांमुळे परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी जूनमध्ये विशेष परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये यासाठी घेतली जाणारी पुरवणी परीक्षा दरवर्षीप्रमाणेच जुलै-ऑगस्ट दरम्यान होईल. या दोन्हींसाठी परीक्षा केंद्रे शहरी भागात ठराविक ठिकाणी व ग्रामीण भागात तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी असतील.

लोकसत्ता Sun, 21 March 2021 https://epaper.loksatta.com/c/59240987

१०वी आणि १२ वीच्या परीक्षा त्याच शाळा-कनिष्ठ महाविद्यालयात

मुंबई: राज्यमंडळाच्या दहावी बारावीच्या लेखी परीक्षेसाठी यंदा विद्यार्थ्यांना अर्धातास वेळ वाढवून देण्यात येणार असून दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षाही रद्द करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे करोनामुळे परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाची दहावी आणि बारावीची परीक्षा पुढील महिन्यापासून सुरू होणार आहे. राज्यात करोना रुग्णांची संख्या वाढत असल्याने या परिक्षांबाबत संभ्रम निर्माण झाला. त्याचप्रमाणे वर्षभर शाळा ऑनलाइन भरत असल्याने परीक्षा, मूल्यांकन पद्धत यांबाबत पालकांनी प्रश्न उपस्थित केले होते. त्या पार्श्वभूमीवर परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार, लेखीच होईल असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले. – पान ६

लोकसत्ता Sun, 21 March 2021 https://epaper.loksatta.com/c/

News Paper Clippings During March 2021

Section: Education

सामना

दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी बोर्डाच्या मार्गदर्शक सूचना जारी

परीक्षेच्या एक ते दीड तास आधी परीक्षा केंद्रावर हजर राहा!

विद्यार्थ्यांसह पर्यवेक्षक, केंद्रप्रमुखांचे थर्मल स्क्रिनिंग होणार

मास्क, पाण्याची बाटली, स्वत: लेखन साहित्य वापरणे बंधनकारक

मुंबई, दि. २२ (प्रतिनिधी) - कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दहावी, बारावीच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा सकाळ सत्रात साडेदहा वाजता तर दुपार सत्रात तीन वाजता सुरू होणार आहे. परीक्षेच्या या निर्धारित वेळेच्या एक ते दीड तास आधी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर हजर राहावे, असे आवाहन राज्य शिक्षण मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच परीक्षा केंद्रात प्रवेश करण्यापूर्वी विद्यार्थी, पर्यवेक्षक आणि केंद्रप्रमुखांचे थर्मल स्क्रिनिंग करण्यात येणार असून तापमान तपासल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान ३० मिनिटे आधी बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी स्थानापन्न व्हावे, अशा सूचना शिक्षण मंडळाच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी यंदा लेखी परीक्षेची वेळ अर्धा तासाने वाढविण्यात आली आहे. परीक्षेच्या वेळेत बदल करून सुधारित वेळापत्रक राज्य शिक्षण मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच कोरोनाबाबत परीक्षार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शक सूचनादेखील जारी करण्यात आल्या असून परीक्षा काळात समुपदेशकांना विद्यार्थ्यांकडून वारंवार विचारण्यात येणारे प्रश्न व त्या प्रश्नांची उत्तरेदेखील शिक्षण मंडळाच्या वेबसाईटवर माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

■ परीक्षा सुरू होण्याच्या दहा मिनिटे आधी विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचनासाठी देण्यात येणार आहे. ■ विशेष परीक्षा ही मूळ परीक्षेचाच भाग असणार, त्यासाठी वेगळे परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही. ■ विशेष परीक्षेतील दोन विषयांमध्ये सार्वजनिक सुट्टी वगळता खंड ठेवला जाणार नाही. ■ परीक्षेला येताना विद्यार्थ्यांनी सॅनिटायझर, पाण्याची बाटली सोबत ठेवावी. ■ परीक्षा पूर्ण होईपर्यंत मास्क वापरणे सक्तीचे असेल. ■ विद्यार्थ्यांनी शक्यतो स्वत:चे लेखन साहित्य वापरावे.

Pune Edition
Mar 23, 2021 Page No. 2
Powered by : eReleGo.com

News Paper Clippings During March 2021

Section: Education

दहावी-बारावीचे सुधारित वेळापत्रक

मार्गदर्शक सूचना, महत्त्वाचे बदल स्पष्ट

म. टा. प्रतिनिधी, पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत एप्रिल-मे महिन्यात घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांचे सुधारित अंतिम वेळापत्रक; तसेच मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यानुसार लेखी परीक्षेसाठी वाढीव वेळ, लेखी परीक्षेनंतर प्रात्यक्षिक कार्य, परीक्षेला मुकलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षा, परीक्षा देताना घ्यावयाची दक्षता आदी महत्त्वाचे बदल करण्यात आले असल्याचे राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी स्पष्ट केले आहे.

इयत्ता दहावीची लेखी परीक्षा २९ एप्रिल ते २० मे; तर बारावीची परीक्षा २३ एप्रिल ते २१ मे दरम्यान ऑफलाइन पद्धतीने शाळेच्या परीक्षा केंद्रावर होणार आहे. इयत्ता बारावीची प्रात्यक्षिक परीक्षा २२ मे ते १० जून या कालावधीत होणार आहे. या दहावी-बारावीच्या परीक्षेची सविस्तर अंतिम वेळापत्रके मंडळाच्या वेबसाइटवर २१ मार्चपासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये करोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर लेखी परीक्षेतील पेपरची वेळ ७० ते १०० गुणांच्या पेपरसाठी ३० मिनिटे; तर ४० ते ६० गुणांच्या पेपरसाठी १५ मिनिटे वाढविण्यात आली आहे. यंदा दहावीची विज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा मंडळाच्या प्रचलित पद्धतीने घेतली जाणार नाही. त्याऐवजी प्रात्यक्षिकांवर आधारित विशिष्ट लेखनकार्य प्रकल्प, प्रात्यक्षिक वही व गृहपाठ यांचा समावेश असेल. प्रात्यक्षिकांवर आधारित कार्य लेखी परीक्षेनंतर दिनांक २१ मे ते १० जून या कालावधीत द्यावे लागणार आहे. अधिक आणि सविस्तर माहिती https://mahahsscboard.in/ या वेबसाइटवर पाहता येतील.

प्रात्यक्षिक वहीसाठी वाढीव कालावधी

प्रात्यक्षिक वही जमा करण्याच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यास करोनाची लागण झाली असल्यास अथवा त्रास होत असल्यास प्रात्यक्षिक वही जमा करण्यास १५ दिवसापर्यंत मुदतवाढ मिळेल. श्रेणी, तोंडी व इतर अंतर्गत मूल्यमापन इत्यादी परीक्षा घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित माध्यमिक शाळांना देण्यात येत आहे. यासाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षक संबंधित माध्यमिक शाळांतूनच देण्यात येतील. दहावीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यशिक्षण/शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयाच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २१ मे ते ०१ जून या कालावधीत होतील. करोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी दिनांक १० जूनपर्यंत वाढविण्यात येईल.

Maharashtra Times 23.3.2021

विद्यापीठांनी ऑनलाइन परीक्षेवर भर द्यावा

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची कुलगुरूंना सूचना

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या परीक्षांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सर्व कुलगुरूंची मंगळवारी (दि. २३) बैठक घेतली. यामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता विद्यापीठांनी ऑनलाइन परीक्षा घेण्यावर भर द्यावा, अशी सूचना सामंत यांनी केली.

राज्यातील अकृषी विद्यापीठांकडून पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची परीक्षा ऑनलाइन घेण्याबाबत नियोजन सुरू आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सत्र परीक्षा येत्या १० एप्रिलपासून सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने सामंत यांनी आढावा घेतला.

विद्यापीठातून एकूण किती विद्यार्थी परीक्षा देणार आहेत, कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठीच्या उपाययोजना, वेळापत्रक कसे आहे, ऑनलाइन परीक्षा कोण घेणार अशा विविध मुद्द्यांवर सामंत यांनी चर्चा केली. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सूचना सामंत यांनी दिल्या; तसेचविद्यार्थ्यांनात्रासहोणार नाही, अशा पद्धतीने परीक्षांचे नियोजन करण्यावर भर दिला. दरम्यान, पुणे विद्यापीठाने सत्र परीक्षांची जबाबदारी एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशनला दिली आहे. या फाउंडेशनकडून निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून नव्या आयटी कंपनीची निवड प्रक्रिया सुरू आहे. फाउंडेशनकडून पडताळणी होऊन तांत्रिक छाननीसाठी पाच कंपन्यांची निवड करण्यात आली. या पाचही कंपन्यांनी मंगळवारी ऑनलाइन परीक्षा घेण्याबाबत सादरीकरण केले. आता यापैकी एका कंपनीची निवड अंतिम करण्यात येईल, अशी माहिती संचालक मंडळाकडून देण्यात आली.

पदभरती परीक्षा लक्षात घेऊन नियोजन

विद्यापीठाची सत्र परीक्षा रविवारीदेखील घेण्याचे प्रस्तावित आहे. मात्र, ११ एप्रिल रोजी राज्यात पदभरतीची परीक्षा होणार आहे; त्याचप्रमाणे उर्वरित रविवारीदेखील विविध पदभरतीच्या परीक्षा होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यादृष्टीने पुणे विद्यापीठाकडून नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दोन्ही प्रकारच्या परीक्षा देता येतील.

Pudhari 24.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

गुणवत्ता सुधारचा निधी अखर्चित

दोन वर्षांमध्ये २६ कोटींपैकी केवळ पाच कोटी रुपयांचा वापर

पुणे, ता. २३ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयांच्या गुणवत्ता सुधार योजनेला २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात तब्बल आठ कोटींची कात्री लावून पाच कोटींची तरतूद केली आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांतील आकडेवारी पाहता २६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलेला असताना केवळ पाच कोटी रुपयेच महाविद्यालये व विद्यापीठ विभागांना वापरता आले आहेत. तब्बल २१ कोटी म्हणजे ८० टक्के निधी शिल्लक ठेवल्याचे समोर आले आहे.

डॉ. नरेंद्र जाधव हे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असताना त्यांनी ही योजना सुरू केली. त्यामध्ये महाविद्यालये व विद्यापीठाच्या विभागांना परिषदा, चर्चासत्र यांसह आवश्यक वस्तू घेण्यासाठी मदत केली जात होती. पुणे विद्यापीठाअंतर्गत पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यातील सुमारे ९०० महाविद्यालये आहेत. त्यातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त महाविद्यालये ग्रामीण व विनाअनुदानित असल्याने अशा संस्थांना या योजनेचा फायदा होतो.

पुणे विद्यापीठाने २०२१-२२ या वर्षाचा अर्थसंकल्प ऑनलाइन अधिसभेत मंजूर करून घेतला, विद्यापीठाची आर्थिक स्थिती खालावल्याने खर्चावर मर्यादा आणल्या आहेत. मात्र, गुणवत्ता सुधार योजनेसाठी १३ कोटींऐवजी पाच कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे.

पान ६ वर »

गुणवत्ता सुधार योजनेविषयी

	२०१९-२०	२०२०-२१
तरतूद	महाविद्यालये १२ कोटी	महाविद्यालये १२ कोटी
	विद्यापीठ विभाग १ कोटी	विद्यापीठ विभाग १ कोटी
खर्च	महाविद्यालये ३ कोटी ८८ लाख	महाविद्यालये २ कोटी ९६ लाख
	विद्यापीठ विभाग ५५ लाख ४८ हजार	विद्यापीठ विभाग २० लाख ११ हजार

“ महाविद्यालयांना निकष पूर्ण करता आले नसल्याने गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेता आला नाही. विद्यापीठाचे उत्पन्न घटल्याने या योजनेसाठी पाच कोटींची तरतूद केली आहे. ही केलेली कपात इतर योजनांसाठी वळविली आहे. महाविद्यालयांना निधी कमी पडू दिला जाणार नाही.

- डॉ. एन. एस. उमराणी, प्र-कुलगुरू

“ ग्रामीण भागातील महाविद्यालयांना गुणवत्तावाढीसाठी मदत मिळत असल्याने ही योजना महत्त्वाची आहे. कोरोनामुळे महाविद्यालयांना ऑनलाइन शिक्षणात अडथळे येत आहेत, त्यासाठी निधी आवश्यक आहे. या योजनेचा निधी कपात करणे योग्य नाही.

- प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील, सदस्य, अधिसभा

गुणवत्ता सुधारचा निधी अखर्चित

» पान १ वरून

विद्यापीठाने महाविद्यालयांसाठी २०१९-२० व २०२०-२१ या वर्षात प्रत्येकी १२ कोटी व विद्यापीठ विभागांसाठी दोन कोटींची तरतूद केली होती. त्यापैकी महाविद्यालयांनी दोन वर्षात चार कोटी १८ लाख २६ हजार तर विद्यापीठ विभागांनी ७५ लाख ५९ हजाराचा निधी वापरला आहे.

विद्यार्थ्यांकडून जमा होणाऱ्या परीक्षा शुल्क व शैक्षणिक शुल्कावर केवळ विद्यापीठाचा अधिकार नाही तर महाविद्यालयांचाही तो हक्क आहे. त्यामुळे गुणवत्तासुधारसाठी जास्त निधी दिला पाहिजे, अशी मागणी अधिसभा सदस्य डॉ. श्यामकांत देशमुख यांनी केली.

Sakaal 24.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

गुणांच्या त्रुटीवरील चौकशीला स्थगिती

विविध अभ्यासक्रम : अंतर्गत गुण भरण्यात त्रुटी राहिल्या

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : विविध अभ्यासक्रमांचे अंतर्गत गुण भरण्यात त्रुटी राहून गेल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापकांवर कारवाईचा बडगा उगारला.मात्र, प्राध्यापकांना कोरोनाच्या काळात चौकशीसाठी विद्यापीठात बोलवू नये. तसेच त्यांच्यावर कारवाई करू नये, अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ महाविद्यालयीन अध्यापक संघटनेतर्फे (स्पुक्टो) देण्यात आला. त्यामुळे विद्यापीठाने या प्रक्रियेस स्थगिती दिली.

कोरोनाच्या पार्श्वभूमिवर विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाच्या निर्देशानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या.या कालावधीत वारंवार परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली. त्यामुळे परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची नावे दर आठ-पंधरा दिवसांनी महाविद्यालयाकडे अंतर्गत गुण भरण्यासाठी पाठविली जात होती.

कोरोना काळात प्राध्यापकांनी महाविद्यालयात येऊन अधिकाधिक विद्यार्थ्यांचे गुण भरण्याचे काम पूर्ण केले. मात्र, अनावधानाने एक ते दोन विद्यार्थ्यांचे गुण भरण्याचे राहून गेले. त्यामुळे विद्यापीठाने संबंधित प्राध्यापकांना विद्यापीठात प्रमाद समितीसमोर चौकशीसाठी बोलवले.त्यामुळे प्राध्यापक संघटनेने आक्रमक भूमिका घेतली.

अनवधानाने गुण भरताना त्रुटी राहिल्या

कोरोनासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या काळात प्राध्यापकांनी विद्यापीठाला सर्वोतोपरी सहकार्य केले. काही तांत्रिक कारणास्तव किंवा अनावधानाने प्राध्यापकांकडून गुण भरताना त्रुटी राहून गेल्याने थेट त्यांना परीक्षा विभागात बोलावून घेणे योग्य नाही. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठात गर्दी करणे उचित नाही. यामुळे विद्यापीठाने या प्रक्रियेस तात्काळ स्थिगिती द्यावी, अशी मागणी प्रध्यापक संघटनेने केली. व्यवस्थापन परिषदेमध्ये एकाही प्राध्यापकावर कारवाई केली जाणार नसल्याचा ठराव झाला होता. तरीही कारवाई केली जात असल्याने आश्चर्य व्यक्त केले. केवळ प्राध्यापकांकडूनच नाही तर परीक्षा विभागाकडूनही चूका होतात. त्यावेळी कारवाई केली जात का? असा सवालही पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला.

Hello Pune
Page No. 3 Mar 24, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

कंपनी परीक्षेच्या तांत्रिक सपोर्टसाठी घेणार सहकार्य

एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन : पाच कंपन्यांनी सादर केल्या निविदा; दोन दिवसांत होणार निवड

न्यूज अपडेटस्

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एसपीपीयु एज्युटेक फाऊंडेशन या कंपनीकडे विद्यापीठाच्या परीक्षा घेण्याची जबादारी दिली आहे. या कंपनीने तांत्रिक सपोर्टसाठी निविदा मागविल्या. त्यानुसार पाच कंपन्यांनी निविदा सादर केल्या आहेत. येत्या दोन दिवसात त्यातील एक कंपनी निश्चित केली जाण्याची शक्यता आहे. मात्र, त्यातील कोणत्या कंपनीला एसपीपीयु एज्युटेक मदतीला घेणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यातील सुमारे साडे सहा लाख विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्राच्या परीक्षा येत्या ११ एप्रिल पासून सुरू होणार आहेत. त्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने प्राध्यापकांकडून प्रश्न संच जमा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. आत्तापर्यंत ६० टक्के प्रश्न संच जमा झाले असून उर्वरित प्रश्न संच येत्या २७ मार्चपर्यंत जमा होती, असा अंदाज परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. विद्यापीठाने परीक्षेच्या कामासाठी एजन्सी निवडीच्या प्रकियेत विलंब केला. त्यामुळे १५ मार्च पासून सुरू होणाऱ्या परीक्षा ११ एप्रिलपर्यंत पुढे ढकलण्याची वेळ विद्यापीठ प्रशासनावर आली. परिणामी विद्यापीठाने स्वत:च्याच कंपनीला परीक्षा घेण्याची जबाबदारी सोपवली. यापूर्वी विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षेच्या कामात विद्यापीठाच्या कंपनीतील कर्मचाऱ्यांनी सहयोग दिला होता. त्यामुळे विद्यापीठाची कंपनी परीक्षा घेऊ शकते का? याबाबत चाचपणी करण्यात आली. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेसमोर कंपनीने परीक्षेबाबत सादरीकरण केले. त्यानंतर कंपनी परीक्षा घेऊ शकते, असा विश्वास सर्व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी व्यक्त केला. त्यामुळे परीक्षेची जबाबदारी कपनीकडे देण्याचे निश्चित करण्यात आले. विद्यापीठाच्या कंपनीने परीक्षेची जबाबदारी स्वीकारली असली तरी काही तांत्रिक सपोर्टसाठी दुसऱ्या कंपनीचे सहकार्य घेण्यासाठी या कंपनीने निविदा मागविल्या. त्यामुळे दुसऱ्या कंपनीचा 'प्लॅटफॉर्म' वापरून परीक्षा घेण्याचे निश्चित केले. कंपनीकडे ५ कंपन्यांनी निविदा सादर केल्या. या सर्व कंपन्यांनी मंगळवारी सादरीकरण केले. त्यातील तीन कंपन्यांची निवड करून एका कंपनीकडून तांत्रिक सपोर्ट घेतला जाणार आहे.

... तर गोंधळाची पुनरावृत्ती होऊ शकते

विद्यापीठाच्या कंपनीला कामाचा फारसा अनुभव नाही. त्यामुळे मदतीसाठी घेतल्या जाणाऱ्या कंपनी तरी परीक्षेच्या कामाचा चांगला अनुभव असला पाहिजे. अन्यथा अंतिम वर्षाच्या परीक्षा घेताना झालेल्या गोंधळाची पुनरावृत्ती होऊ शकते. त्यामुळे विद्यापीठाची कंपनी तांत्रिक सपोर्टसाठी कोणाला बरोबर घेते. हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

ऑनलाइन परीक्षांवर भर द्या

उदय सामंत यांच्या सर्व कुलगुरूंना सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : करोनाचा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता राज्यातील सर्व विद्यापीठांनी ऑनलाइन परीक्षा घेण्यावर भर द्यावा, अशा स्पष्ट सूचना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंना दिल्या.

राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या परीक्षांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने मंगळवारी घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत सामंत बोलत होते. राज्यातील सर्व विद्यापीठांकडून पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ऑनलाइन परीक्षा घेण्याबाबत नियोजन केले जात आहे.त्यानिमित्ताने सामंत यांनी सर्व कुलगुरूशी संवाद साधला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम सत्राच्या परीक्षा येत्या ११ एप्रिलपासून सुरू होणार असून या परीक्षांचा सामंत यांनी आढावा घेतला. करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठीच्या कोणत्या उपाययोजना केल्या आहेत. किती विद्यार्थी परीक्षा देणार आहेत, वेळापत्रक केव्हा प्रसिध्द केले जाईल,ऑनलाइन परीक्षा कोण घेणार अशा विविध मुद्द्यांवर सामंत यांनी चर्चा केली.

तसेच परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या, असे सूत्रांनी सांगितले.

विद्यापीठाकडून नियोजन

- पुणे विद्यापीठातर्फे रविवारी सुध्दा परीक्षा घेतल्या जाणार आहेत. मात्र, विविध पदभरती संदर्भातील परीक्षा या रविवारी होत असतात.
- त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, याहष्टीने विद्यापीठाकडून परीक्षांचे नियोजन केले जात आहे. त्यामुळे विद्यार्थी कोणत्याही परीक्षेपासून वंचित राहणार नाही.

Hello Pune
Page No. 2 Mar 24, 2021
Powered by: erelego.com

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

नेट म्हणजे पैसे उकळण्याचे साधन !

यूजीसीने दहा वर्षांत कमविले १०० कोटींहून अधिक रुपये, नोकरी मात्र दिली नाहीच

शिक्षणाचा बोजवारा भाग - २

डॉ. प्रकाश मुंज
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : उच्चशिक्षणावर नियंत्रण ठेवण्याचे काम विद्यापीठ अनुदान आयोग करते. मात्र, याच आयोगाने 'नेट' परीक्षेच्या माध्यमातून तब्बल सव्वा कोटी बेरोजगारांकडून परीक्षा फीच्या नावावर गत दहा वर्षांत सुमारे १०० कोटी रुपये उकळले आहेत. या बेरोजगारांना नोकरी देण्याकडे मात्र सोयीस्कर दुर्लक्ष केले आहे.

प्राध्यापक पदासाठी सुरुवातीला पदव्युत्तर पदवी परीक्षेत ५५ टक्के गुणांची अट घालण्यात आली होती. १९८६-८७ मध्ये त्यात एम.फिल. होण्याची अट वाढविली. १९९०च्या दशकात सेट आणि नेट उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले. २००९ मध्ये नवा जीआर काढून पीएच.डी. पदवी सेट/नेटसाठी समतुल्य ठरविण्यात आली. त्यानंतर सातत्याने अनेकवेळा त्यामध्ये बदल करण्यात आले. मात्र, हे सारं काही करताना शिक्षणाचा गुणात्मक दर्जा वाढावा, प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेली कौशल्ये त्यांच्यामध्ये अंगिकारावीत, यांचा संबंधितांपैकी कुणीच गांभीर्याने विचार केलेला दिसत नाही.

उद्याच्या अंकात : **सी.एच.बी. प्राध्यापकांची क्रूर चेष्टाच?**

पगार भारी; भरती टाळी

प्राध्यापकांचे पगार खूप आहेत. म्हणून सरकार ही पदभरती टाळत असल्याचा आरोप आहे.

'नेट' निकालाची टक्केवारी का वाढविली?

सहायक प्राध्यापक होण्यासाठी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) लागू करण्यात आली. १९८८ ते २००४ या काळात या परीक्षांचा निकाल ०.२ ते २ टक्के होता. नंतर हा निकाल ३-४ टक्क्यांपर्यंत ठेवला जात होता. २००७ नंतर परीक्षांमध्ये एकूण विद्यार्थ्यांच्या सहा टक्के पात्र ठरविले. यूजीसीचा हा निर्णय हुशारीचा असला तरी तो शहाणपणाचा नक्कीच नाही. या निर्णयामुळे १० लाखांहून अधिक नेट/सेट आणि पीएच.डी.धारक बेरोजगार झाले आहेत. भरती बंद असल्यामुळे वाढत्या बेरोजगारांपुढे जगण्याचा प्रश्न आ वासून उभा आहे. या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण पाहता ही गुणवत्ता ढासळल्याचेच लक्षण आहे. बेरोजगारी वाढल्याने आतापेक्षाही कमी वेतनावर काम करण्यास हे तरुण सहज तयार होत आहेत. त्यामुळे विनाअनुदानितसह अनुदानित महाविद्यालयामध्येही आर्थिक शोषणाला हातभारच लागत आहे.

बेरोजगारांकडून पैशाची वसुली

- नेट परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांकडून १००० रुपये, इडब्ल्यूएस वर्गासाठी ५०० आणि एस.सी., एस.टी., ओबीसी वर्गासाठी २५० रुपये परीक्षा फी आकारली जाते. चौकटीतील आकडेवारी पाहिली असता गेल्या दहा वर्षांत सव्वा कोटी परीक्षार्थींनी अर्ज भरले होते.
- सरासरी ७०० रुपयांप्रमाणे आत्तापर्यंत १० वर्षांत सव्वा कोटी विद्यार्थ्यांकडून सुमारे १०० कोटींहून अधिक रुपये विद्यापीठ अनुदान आयोगाने उकळले आहेत.
- नेट परीक्षा म्हणजे यूजीसीसाठी पैसा वसुलीचे उत्तम साधन बनले आहे. दहा वर्षांत सहायक प्राध्यापक पदाच्या सुमारे दीड लाख जागा रिक्त आहेत. महाराष्ट्रात १२ हजार पदे रिक्त असूनही भरती ऐनकेन प्रकारे प्रलंबित ठेवली जात आहे. तासिका तत्वावर भरती करून अध्यापनाचे काम निभावले जात आहे.

Pune Main
Page No. 8 Mar 24, 2021
Powered by: erelego.com

दहावी, बारावी विद्यार्थ्यांसाठी प्रश्नासोबतच उत्तरपेढीही

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २३ - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (विद्या प्राधिकरण) वतीने इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना पुढील वर्षी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी प्रश्नपेढीबरोबरच उत्तरपेढीही उपलब्ध होणार आहे.

करोनामुळे शाळा, महाविद्यालये बंद आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन शिक्षण उपलब्ध करून दिले आहे. एप्रिल-मेमध्ये दहावी, बारावीच्या परीक्षा होणार असून त्याबाबतचे अंतिम वेळापत्रकही जाहीर झाले आहे. सल्ल्यागार समितीच्या सूचनांनुसार विद्यार्थ्यांना दिलासा देणारे निर्णय घेण्यात आले आहेत.

पुढील वर्षांपासून होणार उपलब्ध : परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी होणार मदत

परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयांचा सराव करता यावा व स्वयंअध्ययनासाठी मदत व्हावी यासाठी यंदा महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे प्रश्नसंच उपलब्ध झाले आहेत. त्याला विद्यार्थ्यांकडून प्रतिसादही मिळत आहे. आता प्रश्नसंचसोबतच उत्तरपत्रिकाही उपलब्ध करून देण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे. मात्र, परीक्षेसाठी महिन्याभराचा कालावधी राहिला असून एवढ्या कमी वेळात उत्तरपेढी तयार करणे शक्य होणार नाही. पुढच्या वर्षी मात्र त्या विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील, अशी माहिती विद्या प्राधिकरणातील अधिकाऱ्यांनी दिली.

प्रभात Wed, 24 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59311544

News Paper Clippings During March 2021

Section: Education

'जीवनसाधना'साठी निकष, समिती नाही!

पुणे विद्यापीठाची माहिती; पुरस्कारासाठीच्या निवडप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे वर्धापनदिनी नामांकित व्यक्तींना देण्यात येणाऱ्या जीवनसाधना गौरव पुरस्कारासाठी कोणतीही नियमावली तयार करण्यात आलेली नाही. केवळ प्रतिष्ठितांकडून नामांकन व अर्ज मागवून पुरस्कार निश्चित करण्यात येतो. पुरस्कारांचे वितरण करण्यासाठी कोणत्याही समितीची स्थापना करण्यात आली नसल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे पुरस्कारासाठीच्या निवडप्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पुढारी वॉच

विद्यापीठातर्फे वर्धापन दिनानिमित्त विविध पुरस्कारांचे वितरण केले जाते. यामध्ये अत्यंत महत्त्वाचा पुरस्कार म्हणून जीवनसाधना गौरव पुरस्काराचा उल्लेख केला जातो. गेल्या चार वर्षांत २२ व्यक्तींना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यामध्ये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १६ व्यक्तींचा समावेश आहे. जीवन साधना पुरस्काराचे वितरण करीत असताना कोणती नियमावली तयार करण्यात आली आहे का? तसेच यासाठी समिती स्थापन केली जाते का? समिती सदस्य निवडण्याचे निकष काय? आदी प्रश्न अधिसभा सदस्य डॉ. संजय खरात यांनी विद्यापीठ प्रशासनाला विचारले होते. त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना विद्यापीठाने पुरस्कारांसाठी केवळ प्रतिष्ठितांकडून नामांकन व अर्ज मागवून जीवन साधना गौरव पुरस्कारार्थी निश्चित केले जातात. सदरहू निवड करण्यासाठी कोणतीही समिती निवडण्यात आली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

यासंदर्भात डॉ. खरात म्हणाले, "समिती किंवा निकष नसल्यामुळे कुलगुरू किंवा व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी सुचविल्यानुसार हा पुरस्कार दिला जात असावा असे दिसून येत आहे. परंतु या पुरस्काराला व्यापक स्वरूप देण्यासाठी काही निकष असणे गरजेचे आहे. त्यासाठी एक समिती तयार करावी. या समितीमध्ये समाजामध्ये ज्यांची वेगळी ओळख आहे, ज्यांनी वेगळा ठसा उमटवलेला आहे अशा उच्चपदस्थ व्यक्तींचा समावेश करावा. विद्यापीठाकडून पारदर्शी कारभार व्हावा आणि असे पुरस्कार देताना कोणतीही शंका घेण्यास वाव नसावा, यासाठी पुरस्काराचे वितरण करताना निकष आणि समिती गरजेची आहे." दरम्यान, यासंदर्भात विद्यापीठातील अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता, पुरस्कारासंदर्भात लेखी निकष नसले तरी अनेक बाबी तपासूनच पुरस्कार दिले जात असल्याचे सांगण्यात आले. यामध्ये सामाजिक कामगिरी, एकंदरीत आयुर्मान, महिला सदस्य, पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यात केलेले उल्लेखनीय कार्य, कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसणे आदी निकष पाळले जात असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

Pudhari 24.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

परीक्षांच्या नियोजनाचा आढावा

तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या कुलगुरूंना सूचना

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या सत्र परीक्षांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सर्व कुलगुरूंची मंगळवारी बैठक घेतली. राज्यातील करोनाचा प्रादुर्भाव पाहता विद्यापीठांनी ऑनलाइन परीक्षा घेण्यावर भर द्यावा, अशा सूचना सामंत यांनी बैठकीत दिल्या.

राज्यातील अकृषी विद्यापीठांकडून पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची ऑनलाइन परीक्षा घेण्याबाबत नियोजन सुरू आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सत्र परीक्षा येत्या १० एप्रिलपासून सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने सामंत यांनी आढावा घेतला. विद्यापीठातून एकूण किती विद्यार्थी परीक्षा देणार आहेत, करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठीच्या उपाययोजना, वेळापत्रक कसे आहे, ऑनलाइन परीक्षा कोण घेणार अशा विविध मुद्द्यांवर सामंत यांनी चर्चा केली. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सूचना सामंत यांनी दिल्या; तसेच विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही, अशा पद्धतीने परीक्षांचे नियोजन करण्यावर भर दिला. दरम्यान, पुणे विद्यापीठाने सत्र परीक्षांची जबाबदारी 'एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन'ला दिली आहे. या फाउंडेशनकडून निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून नव्या आयटी कंपनीची निवड प्रक्रिया सुरू आहे. फाउंडेशनकडून पडताळणी होऊन तांत्रिक पडताळणीसाठी पाच कंपन्यांची निवड करण्यात आली. या पाचही कंपन्यांनी मंगळवारी ऑनलाइन परीक्षा घेण्याबाबत सादरीकरण केले. आता यापैकी एका कंपनीची निवड अंतिम करण्यात येईल, अशी माहिती संचालक मंडळाकडून देण्यात आली.

विद्यार्थ्यांना पदभरती परीक्षेसाठी मुभा

पुणे विद्यापीठाची सत्र परीक्षा रविवारी देखील घेण्याचे प्रस्तावित आहे. मात्र, ११ एप्रिल रोजी राज्यात पदभरतीची परीक्षा होणार आहे; त्याचप्रमाणे उर्वरित रविवारीदेखील विविध पदभरतीच्या परीक्षा होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यादृष्टीने पुणे विद्यापीठाकडून नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दोन्ही प्रकारच्या परीक्षा देता येईल.

CS Scanned with CamScanner

Maharashtra Times 24.3.2021

प्राचार्य भरतीचा मार्ग मोकळा

रिक्त पदे भरण्यास राज्य सरकारची मान्यता

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २३ - राज्य सरकारने वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली आहे. मंगळवारी नव्याने परिपत्रक प्रसिद्ध करीत ३ मे २०२० पर्यंत रिक्त असलेली प्राचार्यांची पदे भरण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे प्राचार्यांची नियुक्तीची प्रक्रिया सुरू होणार आहे.

राज्य सरकारने यापूर्वीच एकूण २६० प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली होती. मात्र, कोणत्या विभागात किती पदे रिक्त आहेत, किती पदांना मान्यता द्यायची, यात कोणतीच स्पष्टता नव्हती. त्यामुळे भरतीचा निर्णय घेण्यात आला असला तरी त्याची पुढील कार्यवाही होत नव्हती. त्यामुळे प्राचार्य पदभरतीत स्पष्टता असावी, अशी मागणी होत होती.

विभागीय सहसंचालकांनी उच्च शिक्षण संचालकांच्या शिफारशीसह 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याबाबतचा प्रस्ताव ऑनलाइन शासनास सादर करावा. तसेच, प्राचार्य या संवर्गाच्या पदभरतीचा प्रस्ताव सादर करताना रिक्त पदे दि. ३ मे २०२० रोजी पर्यंतची असल्याची खातरजमा करून तसे प्रमाणपत्र संबंधीत विभागीय सहसंचालकांनी उच्च शिक्षण संचालकांमार्फत शासनास सादर करणे बंधनकारक आहे. यासंदर्भात कोणत्याही प्रकारची अनियमितता झाल्यास संबंधीत विभागीय सहसंचालकांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई होणार आहे.

दरम्यान, करोनामुळे प्रतीक्षेत असलेल्या प्राचार्य पदांना नियुक्तीचे आदेश देण्यासाठीचा प्रस्ताव संचालकांमार्फत शासनास सादर करावा. त्याचबरोबर 'ना हरकत प्रमाणपत्र' निर्गमित झाल्याच्या तारखेपासून ६ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आला असेल, अशा महाविद्यालयांकडून मुदतीवाढीचा प्रस्ताव स्वीकारून शासनास सादर करावा, असे राज्य शासनाने स्पष्ट केले आहे.

> राज्य सरकारने ३ मे २०२० पर्यंत रिक्त प्राचार्यांची पदे भरण्यास मान्यता देण्याच्या निर्णयाचे स्वागत आहे. मात्र, या कालावधीनंतर प्राचार्य सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे प्राचार्यांची पदे रिक्तच राहणार आहेत. अशा स्थितीत आतापर्यंत जशी पदे रिक्त आहेत, तसे प्राचार्य पदांना परवानगी द्यावी, अशी प्रमुख मागणी आहे. कालावधीची मर्यादा न घालता सरसकट प्राचार्य पद भरतीस मान्यता मिळणे आवश्यक आहे.
>
> – **प्राचार्य नंदकुमार निकम**, अध्यक्ष, प्राचार्य महासंघ

प्रभात Wed, 24 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59311384

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

प्राचार्य भरतीला हिरवा कंदील

पुणे : राज्य सरकारने सर्व महाविद्यालयातील ३ मे २०२० पर्यंत रिक्त असलेली प्राचार्यांची पदे भरण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून रिक्त पदांवरील प्राचार्यांची नियुक्ती प्रक्रिया सुरु करणे शक्य होणार आहे.

राज्य सरकारने २६० प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली होती. मात्र, कोणत्या विभागात किती प्राचार्यांची पदे रिक्त आहेत. तसेच कोणत्या विभागातील किती पदांना मान्यता द्यावी, याबाबत कोणतीच स्पष्टता नव्हती. परिणामी पदभरतीस मान्यता मिळूनही पुढील कार्यवाही होत नव्हती. त्यामुळे पद भरतीत स्पष्टता यावी, अशी मागणी केली जात होती. त्यावर राज्य शासनाने मंगळवारी परिपत्रक प्रसिद्ध केले. त्यात ३ मे २०२० पर्यंत रिक्त असलेली प्राचार्यांची सर्व पदे भरण्याचे आदेश उच्च शिक्षण विभागाला दिले आहेत.

दरम्यान, विभागीय सहसंचालकांनी ही बाब तपासून उच्च शिक्षण संचलाकांच्या शिफारशीसह 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याबाबतचा प्रस्ताव ऑनलाइन पद्धतीने शासनास सादर करावयाचा आहे. तसेच पदभरतीचा प्रस्ताव सादर करताना ३ मे २०२० रोजी प्राचार्यांचे रिक्त पद झाले असल्याची खातरजमा करून तसे प्रमाणपत्र शासनास सादर करणे बंधनकारक आहे. या संदर्भात कोणत्याही प्रकारची अनियमितता झाल्यास संबंधित विभागीय सहसंचालकांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली जाणार असल्याचे परिपत्रकात नमूद केले आहे.

Hello Pune
Page No. 2 Mar 24, 2021
Powered by: erelego.com

प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी

उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून परिपत्रक प्रसिद्ध

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्य सरकारने वरिष्ठ महाविद्यालयांतील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यास मान्यता दिल्यानंतर, आता सर्व महाविद्यालयांतील ३ मे २०२० पर्यंतची रिक्त पदे असलेली प्राचार्यांची पदे भरण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे महाविद्यालयांमधील रिक्त पदांवर प्राचार्यांची नियुक्तीची प्रक्रिया सुरू होणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून याबाबतचे परिपत्रक मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आले. राज्य सरकारने २६० प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली होती. मात्र कोणत्या विभागात किती प्राचार्यांची पदे रिक्त आहेत, कोणत्या विभागात किती पदांना मान्यता द्यायची, अशी कोणत्याही प्रकारची स्पष्टता नव्हती. त्यामुळे प्राचार्यांची पदे भरण्याचा निर्णय झाला. मात्र, त्याची प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात अडचण होती. त्यामुळे प्राचार्य पदभरतीत स्पष्टता असावी, अशी मागणी करण्यात आली. त्यानंतर सरकारने मंगळवारी परिपत्रक प्रसिद्ध केले. त्यात ३ मे २०२० पर्यंत रिक्त असणारी प्राचार्यांची पदे भरण्याचे आदेश उच्चशिक्षण विभागाला देण्यात आले आहेत. यासंदर्भात विभागीय सहसंचालकांनी ही बाब तपासुन उच्च शिक्षण संचालकांच्या शिफारशीसह 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याबाबतचा प्रस्ताव ऑनलाइन पद्धतीने सरकारला सादर करावा. त्याचप्रमाणे प्राचार्य या संवर्गाच्या पदभरतीचा प्रस्ताव सादर करताना रिक्त पदे ३ मे २०२० पर्यंतची असल्याची खातरजमा करावी आणि त्यानंतर तसे प्रमाणपत्र संबंधित विभागीय सहसंचालकांनी उच्च शिक्षण संचालकांमार्फत सरकारला सादर करणे बंधनकारक आहे. या संदर्भात कोणत्याही प्रकारची अनियमितता झाल्यास संबंधित विभागीय सहसंचालकांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

'...तर मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करावा'

करोनाच्या प्रादुर्भावामुळे प्रतीक्षेत असलेल्या प्राचार्य पदांना नियुक्ती आदेश देण्यासाठीचा प्रस्ताव संचालकांमार्फत राज्य सरकारला सादर करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित झाल्याच्या तारखेपासून ६ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आला असेल, अशा महाविद्यालयांकडून मुदतवाढीचा प्रस्ताव स्वीकारून सरकारला सादर करावा, असे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

Maharashtra Times
24.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

परीक्षांचे वेळापत्रक गुरुवारी प्रसिद्ध होणार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : तब्बल ५ हजार ३०० विषयांच्या परीक्षा होणार

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम सत्राच्या परीक्षा येत्या ११ एप्रिलपासून सुरू होणार आहे. या परीक्षांचे वेळापत्रक येत्या २५ मार्च रोजी जाहीर केले जाईल, असे विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत निश्चित केले होते. त्यानुसार गुरुवारी (दि.२५) सुमारे २० ते ३० टक्के विषयांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाणार आहे, असे परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेतल्या जाणार आहेत. त्यादृष्टीने विद्यापीठाने तयारी केली. २८४ अभ्यासक्रमाच्या तब्बल ५ हजार ३०० विषयांच्या विद्यापीठातर्फे घेतल्या जाणार आहे. विद्यापीठाने काही विषयांच्या अभ्यासक्रमाचे परीक्षा अर्ज स्वीकारण्यासाठी मुदतवाढ दिलेले अभ्यासक्रम वगळता उर्वरित अभ्यसक्रमांचे सविस्तर वेळापत्रक गुरुवारी प्रसिध्द केले जाणार आहे.

विद्यापीठाकडे परीक्षा अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचा डेटा जमा झाल्याशिवाय त्यांचे प्रवेशपत्र (हॉल तिकिट) तयार होत नाही. तसेच हॉल तिकिट तयार झाल्यानंतरच परीक्षांचे वेळापत्रक तयार केले जाते. त्यामुळे गुरुवारी काही परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध केल्यानंतर आठवड्याभरात उर्वरित विषयांचे वेळापत्रक प्रसिद्ध केले जाणार आहे, असेही परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 2 Mar 25, 2021
Powered by: erelego.com

सकाळ

प्रथम सत्र परीक्षा आली तरी वर्ग सुरू होईना!

विधीची प्रवेश प्रक्रिया एक महिना लांबणीवर गेल्याने विद्यार्थ्यांसमोर अडचण

पुणे, ता. २४ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची प्रथम सत्र परीक्षा एप्रिल महिन्यात होणार असताना सीईटी सेलने नियुक्त केलेल्या महाआयटी कंपनीकडून घेतल्या जाणाऱ्या एलएलबी विधीच्या (लॉ) पदवी अभ्यासक्रमाची प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया एक महिना लांबली आहे. वर्ग सुरू झाले नसल्याने विद्यार्थ्यांसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

> एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात लॉची प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईल. महाआयटी कंपनीच्या सॉफ्टवेअरमध्ये एरर येत असल्याने ही प्रक्रिया एक महिना उशिरा झाली आहे.
> - चिंतामणी जोशी, आयुक्त, सीईटी सेल

> संस्थास्तरावरील प्रवेश आता सुरू झाले आहेत. विद्यापीठाने एप्रिल महिन्यात परीक्षा घेतली जाईल असे जाहीर केले आहे. आता आमचे कॉलेज कधी सुरू होणार, शिकवणार कधी आणि आम्ही परीक्षा कधी देणार हेच कळत नाही.
> - अमेय कुलकर्णी, विद्यार्थी

गेल्या दोन महिन्यांपासून लॉच्या तीन वर्ष आणि पाच वर्ष अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. तीन वर्षांच्या अभ्यासक्रमाची संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया २२ मार्चपासून सुरू झाली असून ती ९ एप्रिलपर्यंत चालणार आहे. तर पाच वर्षांच्या अभ्यासक्रमाची प्रक्रिया १९ मार्चपासून सुरू झाली आहे. ती १ एप्रिलपर्यंत चालणार आहे.

पुणे विद्यापीठाने १० एप्रिलपासून प्रथम सत्र परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला असून, २७ मे पर्यंत परीक्षा सुरू राहण्याची शक्यता आहे. ज्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लांबली आहे त्यांची ७० टक्के अभ्यासक्रमावर परीक्षा घेतली जाईल असे परीक्षा मंडळाने स्पष्ट केले असून, यामध्ये लॉचा समावेश आहे.

लॉची प्रवेश परीक्षा सीईटी सेलकडून केली जात आहे. ही ऑनलाइन प्रक्रिया महाआयटी कंपनीकडून केली जात आहे. यामध्ये त्रुटी व लॉच्या प्रवेशामध्ये मोठ्याप्रमाणात अडचणी निर्माण झाल्या होत्या. यासंदर्भात सीईटी सेलचे आयुक्त चिंतामणी जोशी यांनी बैठकही घेतल्या होत्या.

सीईटी सेलकडून ही प्रक्रिया लांबणीवर पडत असताना अजूनही लॉ तीन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी १७ हजार विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत. विद्यार्थी प्रवेशासाठी वंचित राहू नये अशी मागणी उच्च व तंत्र शिक्षण मंत्र उदय सामंत यांच्याकडे केली असल्याचे महाराष्ट्र स्टुडंट वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष वैभव एडके यांनी केली आहे.

Pune Main
25/03/2021 Page No. 3

News Paper Clippings During March 2021

Section: Education

ऑनलाइन गृहशिक्षणात विद्यार्थी गणिती कौशल्यात मागे

'स्वाध्याय' उपक्रमाद्वारे केलेल्या पाहणीतील निष्कर्ष

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : गेले वर्षभर सुरू असलेल्या ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थ्यांच्या गणिती कौशल्यांचा अपेक्षेनुसार विकास झाला नसल्याचे समोर आले आहे. बहुतेक जिल्ह्यांत पाचवीच्या पुढील विद्यार्थ्यांच्या गणिती कौशल्याचा विकास हा पन्नास टक्क्यांपेक्षाही कमी असून तुलनेने भाषिक कौशल्यांचा विकास अधिक म्हणजे पन्नास ते पंचाहत्तर टक्के झाल्याचे दिसत आहे.

करोना प्रादुर्भावामुळे गेल्यावर्षी (२०२०) मार्चमध्ये प्रत्यक्ष वर्गातील शिक्षण बंद झाले. ऑनलाइन वर्ग, व्हॉट्सअॅप, रेडिओ, दूरचित्रवाणी अशा विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न शिक्षण विभाग, शिक्षक, स्वयंसेवी संस्थांनी केला. वर्षभर झालेल्या गृहशिक्षणात विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये काहीशी विकसित झाली असली तरी गणितात मात्र विद्यार्थी मागे पडत असल्याचे दिसत आहे. शिक्षण विभागाने प्रत्येक इयत्तेनुसार निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्ती निकषांच्या तुलनेत सद्यस्थितीत विद्यार्थ्यांनी किती कौशल्ये आत्मसात केली आहेत, याची पडताळणी 'स्वाध्याय' उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने केली.

मुंबई उपनगरातील विद्यार्थी सर्वांत मागे...

मुंबई उपनगरातील शाळांतील ६५ हजार विद्यार्थी स्वाध्याय उपक्रमांत सहभागी झाले होते. यातील दहावीच्या विद्यार्थ्यांच्या गणिती कौशल्य विकासाची सरासरी ३३.७४ आहे. आठवीतील विद्यार्थ्यांनीही ३९.६५ टक्के कौशल्ये आत्मसात केली आहेत, तर पाचवीच्या विद्यार्थ्यांची सरासरी संपादणूक ४७.६९ टक्के आहे.

मुंबई उपनगरातील शाळांतील विद्यार्थी भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यातही मागे पडले आहेत. आठवीतील विद्यार्थ्यांची मूल्यमापन सरासरी ३९.०९ टक्के तर दहावीतील विद्यार्थ्यांची मूल्यमापन सरासरी ३५.५६ टक्के आहे. याशिवाय गोंदिया आणि रत्नागिरी जिल्ह्यातील आठवी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांचा भाषिक कौशल्यांचा विकास पन्नास टक्क्यांपेक्षा कमी आहे.

शालेय शिक्षण विभागाकडून राज्यभरात राबवण्यात येत असलेल्या 'स्वाध्याय' उपक्रमात २८ लाखांहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या उपक्रमांतर्गत दर शनिवारी विद्यार्थ्यांना गणितातील दहा आणि भाषेतील दहा प्रश्न सरावासाठी पाठवले जातात. विद्यार्थ्यांनी पाठवलेल्या उत्तरांच्या अनुषंगाने त्यांचे मूल्यमापन करण्यात आले. गेले अठरा आठवडे हा उपक्रम सुरू आहे. बुलढाणा, वाशिम, हिंगोली, उस्मानाबाद, जळगाव, चंद्रपूर, जालना, सांगली, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, नांदेड, अकोला, बीड, गोंदिया, वर्धा, धुळे, नगर, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नंदुरबार, लातूर, परभणी, अमरावती, भंडारा या जिल्ह्यातील विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

झाले काय?

तिसरी, पाचवी, आठवी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांची पडताळणी करण्यात आली. त्यानुसार २६ जिल्ह्यांतील आठवी आणि दहावीतील विद्यार्थ्यांचा गणिती कौशल्यांचा विकास सरासरी पन्नास टक्क्यांपेक्षाही कमी असल्याचे दिसत आहे. तिसरीच्या विद्यार्थ्यांची भाषिक आणि गणिती कौशल्ये सरासरी पंचाहत्तर टक्क्यांपेक्षा विकसित झाल्याचे दिसत आहे.

लोकसत्ता Thu, 25 March 2021
https://epaper.loksatta.com/c/59327564

शैक्षणिक संस्थांना बाह्य दडपण नवीन नाही

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचे मत

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे: 'शैक्षणिक संस्थांना धमक्या येणे, बाह्य दडपण नवीन नाही. मात्र आतापर्यंत मी असा बाह्य हस्तक्षेप रोखण्यात यशस्वी झालो आहे,' असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी बुधवारी मांडले.

'द इंडियन एक्स्प्रेस'तर्फे दूरचित्र संवाद प्रणालीद्वारे आयोजित 'आयडिया एक्स्चेंज' कार्यक्रमात डॉ. करमळकर बोलत होते. 'द इंडियन एक्स्प्रेस'च्या पुणे आवृत्तीचे निवासी संपादक अमिताभ सिन्हा या वेळी उपस्थित होते. सहायक संपादक अलिफिया खान यांनी सूत्रसंचालन केले. अशोका विद्यापीठातील प्रा. प्रताप भानू मेहता आणि प्रा. अरविंद सुब्रमणियन यांनी राजीनामा दिल्यानंतर गेल्या काही दिवसांपासून शैक्षणिक संस्थांचे स्वातंत्र्य आणि वाढत्या राजकीय हस्तक्षेपाची चर्चा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर डॉ. करमळकर यांना प्रश्न विचारण्यात आला होता.

डॉ. करमळकर म्हणाले, की शिक्षण संस्थांना धमक्या नेहमीच दिल्या गेल्या आहेत. मात्र, त्यातील बऱ्याचशा गोष्टी संस्थेच्या नेतृत्वावरही अवलंबून असतात. मी विद्यार्थी असतानाच्या काळात कुलगुरू व्ही. जी. भिडे यांनी कुणाचेही ऐकून घेतले नसल्याचे मला चांगले आठवते. शिक्षण संस्थांवर बाहेरून नेहमीच देखरेख केली जात असली, तरी त्यांना किती महत्त्व द्यायचे, विद्यापीठाच्या प्रांगणात कितपत प्रवेश द्यायचा हे तुमच्यावरच अवलंबून असते. एका ठराविक मर्यादेपर्यंत आम्ही ऐकून घेतो. मात्र त्यांना किती मुभा द्यायची याचीही मर्यादा असायला हवी. त्यानंतर थांबवायला हवे.

विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय डॉ. करमळकर यांनी घेतल्यानंतर राज्य शासनाच्या उच्च शिक्षण विभागाकडून पत्राद्वारे खुलासा मागण्यात आला होता. तसेच विद्यापीठ कायदा सुधारणा समितीमध्ये डॉ. करमळकर यांना



समाविष्ट करण्यात आले नव्हते. त्यामुळे विद्यापीठाच्या अधिसभेत या बाबत चर्चा होऊन शासनाच्या निषेधाची भूमिका मांडण्यात आली होती.

'विद्यापीठात 'त्यांना' प्रवेश देण्यापासून रोखण्याच्या प्रयत्नांमध्ये ८०-९० टक्के यशस्वी झाल्याचे मला वाटते. संस्थेचा प्रमुख म्हणून आपण आपल्या संस्थेतील लोकांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. सुदैवाने आतापर्यंत तितकी टोकाची वेळ आलेली नाही. पण पदभरती, निवड प्रक्रियेच्या वेळी आम्हाला दूरध्वनी येतात. एकदा का त्यांना प्रवेश दिला आणि गुणवत्तेशी तडजोड केली की संपले. मात्र आतापर्यंत आम्ही तसे काहीही केलेले नाही, असेही डॉ. करमळकर यांनी सांगितले.

लोकसत्ता Thu, 25 March 2021
https://epaper.loksatta.com/c/59334103

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

महाविद्यालयांकडे शिष्यवृत्तीचे ८ हजार अर्ज प्रलंबित

बँक खात्याला आधार लिंक करा : अन्यथा जमा होणार नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : समाज कल्याण विभागाअंतर्गत दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे अर्ज जमा करण्याची मुदत काही दिवसांवर आलेली असताना जिल्ह्यातील सुमारे ८ हजार एससी संवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज संस्थात्मक पातळीवर प्रलंबित असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे संबंधित महाविद्यालयांनी पुढील येत्या २ दिवसांत अर्जांची तपासणी करून समाज कल्याण कार्यालयाकडे अर्ज सादर करावेत. तसेच सर्व विद्यार्थ्यांनीसुध्दा आपले बँक खात्याशी आधारकार्ड लिंक करून घ्यावे, असे आवाहन पुणे विभागीय समाज कल्याण सहसंचालक कार्यालयातर्फे केले आहे.

पुणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या एस. सी. संवर्गातील विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत डीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अर्ज केले आहेत. तसेच महाविद्यालयाकडे आवश्यक कागदपत्र सादर केले. मात्र, मार्च महिना संपत आला तरीही काही महाविद्यालयांनी स्वत:कडे प्रलंबित असलेल्या अर्जांची तपासण्याची प्रकिया पूर्ण केली नाही. त्यामुळे समाज कल्याण विभागाने दिलेल्या मुदतीत अर्ज प्राप्त झाले नाहीत तर या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती केव्हा मिळणार? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

महाविद्यालय स्तरावरुन २० हजार ४२७ अर्ज मंजूर केले असून, ९० विद्यार्थ्यांचे अर्ज रद्द केले आहेत, तर ८ हजार ६७३ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांकडे प्रलंबित आहेत.

पुणे जिल्ह्यातील एस. सी. संवर्गातील ३९ हजार ३२२ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी नोंदणी केली. त्यातील ६ हजार ३० विद्यार्थ्यांचे अर्ज रद्द करण्यात आले आहेत, तर ४ हजार २ विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करुन शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यासाठी बँकेकडे पाठविले आहेत.

डीबीटी पोर्टलच्या माध्यमातून शिष्यवृत्तीसाठी हजारो विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. मात्र, समाज कल्याण विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी आपले आधारकार्ड बँक खात्याशी लिंक करणे बंधनकारक आहे. आधारकार्ड बँकेशी लिंक नसेल तर शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणार नाही, असे समाज कल्याण विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

Hello Pune
Page No. 8 Mar 25, 2021
Powered by: erelego.com

News Paper Clippings During March 2021

Section: Education

शिक्षणाला 'अर्थ' किती?

केंद्र व महाराष्ट्र सरकार शिक्षण क्षेत्राच्या- विशेषतः उच्च शिक्षणाच्या भल्याचेच धोरण आखू इच्छिते; परंतु पैसा मात्र पुरेसा देत नाही, हेच यंदाच्याही केंद्र व राज्य अर्थसंकल्पांतून स्पष्ट झाले. शिक्षणावरील खर्चाचे आपले लक्ष्य सालाबादप्रमाणे दूरच राहिले..

डॉ. डी. एन. मोरे

खासगीकरणाचे वारे वाहत असले आणि त्याच्या समर्थनार्थ 'सरकारने व्यापारात राहूच नये' असे युक्तिवादही होत असले, तरी शिक्षण हा काही व्यापार नव्हे. खासगी शिक्षणसंस्थांची संख्या वाढताना दिसते, परंतु शिक्षणावरील - शिक्षण क्षेत्र आणि शिक्षणसंस्था यांवरील- सरकारी खर्चाचे महत्त्व आजही अनन्यसाधारण असेच आहे. या खर्चासंदर्भात केंद्र व राज्य सरकारांची भूमिका काय, याचा आरसा म्हणजे आकड्यांसह धोरणाचीही दिशा दाखवणारे वार्षिक अर्थसंकल्प. यंदा आर्थिक वर्ष २०२१-२२ चा केंद्र आणि राज्य शासनाचे अर्थसंकल्प अलीकडेच मंजूर झाले आहेत. प्रस्तुत लेखात या अर्थसंकल्पांतील शिक्षणावर प्रस्तावित केलेल्या निधीचे विवेचन करणे, हा हेतू आहे.

केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पात शिक्षण घटकासाठी ९३,२२४.३१ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यात शालेय शिक्षण आणि साक्षरतेसाठी ५४,८७३.३१ आणि उच्च शिक्षणासाठी ३८,३५०.६६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. वर्षे २०२०-२१ मध्ये शिक्षणासाठी ९९,३११ कोटी रुपयांची तरतूद केली होती. चालू आर्थिक वर्षात करोनाकालीन टाळेबंदीमुळे अनेकांचे रोजगार बुडाले. अनेक मजुरांना आपल्या गावी स्थलांतरित व्हावे लागले. त्याचा परिणाम त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणावरही झाला. त्यामुळे अर्थसंकल्पात शिक्षणावरील निधी वाढविणे गरजेचे असताना गतवर्षीच्या तुलनेत ६,०८६ कोटी रुपयांनी कमी झाला आहे.

तब्बल ३४ वर्षांनंतर शिक्षणात आमूलाग्र बदल करण्यासाठी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०' लागू करण्यात आले. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या बदलत्या काळात शिक्षणात कालसुसंगत बदल करणे अत्यावश्यक होते. त्या दिशेने केंद्र शासनाने उचललेले हे पाऊल निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु प्रत्यक्षात धोरणाची अंमलबजावणी सुरू केलेल्या वर्षातच निधीत कपात केली आहे. धोरणात जीडीपीच्या सहा टक्के खर्च शिक्षणावर करण्याची तरतूद केली असताना हा खर्च सरासरी ३.५ टक्क्यांच्या आसपास केला जात आहे.

उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रमाण (ग्रॉस एन्रोलमेंट रेश्यो - 'जीईआर') २०३५ पर्यंत ५० टक्क्यांवर नेण्याचे धोरणाने निश्चित केले आहे; ही जमेची बाब. मात्र प्रवेश प्रमाण वाढविण्याचे मूळही पैशात आहे हे नाकारून चालणार नाही. अर्थसंकल्पातील शिक्षणावरील तरतूद हे उद्दिष्ट गाठण्यासाठी पुरेशी नाही. संशोधन आणि नवनिर्मितीसाठी २३७.४० कोटी रुपयांची तरतूद केली असून उच्च शिक्षणसंस्थांत स्टार्ट-अप सुरू करणे, ज्ञान आणि संशोधनाच्या समन्वयावर भर देणे आदींसाठी निधी निश्चित केला आहे.



उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात १०७ कोटी रुपयांची तरतूद आहे. दर्जेदार शिक्षणासाठी देशांतर्गत केंद्रीय विद्यापीठांना अधिक अर्थसाह्य करणे आवश्यक असताना २०१९-२० मध्ये खर्च केलेल्या निधीपेक्षा (७९८८.८४ कोटी रु.) २०२१-२२ मध्ये (७६४३.२६ कोटी रु.) कपात केली आहे.

आयआयटी, आयआयएम, सायन्स इन्स्टिट्यूट आदी इंग्रजी लघुनामांनी ओळखल्या जाणाऱ्या गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणसंस्थांना देशात आजही मान आहे. यांपैकी भारतीय प्रौद्योगिकी संस्था (७,९८८ कोटी), भारतीय व्यवस्थापन संस्था (४७६ कोटी), भारतीय विज्ञान, शिक्षण व संशोधन संस्था (९४६ कोटी) आणि भारतीय विज्ञान संस्था (६२१ कोटी) यांच्या निधीत २०२०-२१ च्या तुलनेत २०२१-२२ मध्ये केंद्राने वाढ केली आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (हिंदी नावाच्या रोमन आद्याक्षरांनुसार 'रूसा' अंतर्गत) राज्यांना दिल्या जाणाऱ्या निधीसाठी ३,००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. शिक्षण धोरणाने विशेष भर दिलेल्या डिजिटल शिक्षणासाठी ६४५.६१ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. यामध्ये माहिती-तंत्रज्ञानावर (आयसीटी) आधारित शिक्षण, आभासी वर्ग किंवा 'व्हर्च्युअल क्लासरूम्स' उभारणे आणि इंटरनेटद्वारे मुक्त अभ्यासक्रम (ओपन ऑनलाइन कोर्सेस) सुरू करण्यासाठी अनुक्रमे १५० व २०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या आर्थिक तरतुदी स्वागतार्ह असल्या तरी त्या कागदावर न राहता त्याचा प्रत्यक्ष विनियोग त्याच वर्षात निश्चित केलेल्या बाबींवर होणे महत्त्वाचे ठरते. बऱ्याचदा अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला निधी प्रत्यक्षात खर्च केला जात नाही. (२०२०-२१ मध्ये शिक्षणावरील एकूण संकल्पित खर्चापैकी (९९,३११ कोटी) केवळ ८५,०८९ कोटी रुपये खर्च केले आहेत.)

राज्य केंद्राच्या निधीविना...

महाराष्ट्र शासनाने २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात उच्च शिक्षणावर १,३९१ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. करोनाकाळातील टाळेबंदीमुळे राज्याच्या उत्पन्नात झालेली घट लक्षात घेता शासनाने शिक्षणावर २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत (१,३०० कोटी रु.) २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात (१,३९१ कोटी) ९१ कोटी रुपयांची केलेली वाढ एवढ्या वर्षापुरती समाधानकारक म्हणावी लागते हे खरेच; पण पुढील वर्षात ती वाढविणे आवश्यक आहे. राज्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता, सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के खर्च शिक्षणावर केला जाण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे केंद्राने शिक्षण धोरणाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी सुधारित अंदाजपत्रकात निधीत वाढ करणे अत्यावश्यक आहे.

राज्यांना धोरणाची अंमलबजावणी करणे बंधनकारक करताना त्यासाठी लागणारा निधी देण्याची जबाबदारीही केंद्राने स्वीकारली पाहिजे परंतु गेल्या काही वर्षांतील आकडेवारी पाहता, केंद्र निधी देण्यास हात आखडता घेत असल्याचे दिसते उदा. बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (२०१२-१७) एकूण मंजूर रु. २२,८५५ कोटी रकमेपैकी केंद्राचा वाटा १६,२२७ कोटी रु. एवढा होता केंद्राने प्रत्यक्षात ५,२०३ कोटी मंजूर करून केवळ २,२२३ कोटी रुपये वितरित केले.

राज्य अर्थसंकल्पात नवीन सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांची सुरुवात करणे, वैद्यकीय महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तरच्या जाग वाढविणे, १७ भौतिकोपचार महाविद्यालयांची स्थापना, चार कृषी विद्यापीठांना संशोधनासाठी पुढल्या तीन वर्षांत दरवर्षी २०० कोटी रुपये 'स्टार्ट-अप योजना' राबविण्याचे धोरण, पुणे येथे आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाची स्थापना, तरुणांना रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यास मान्यता, रोजगाराभिमुख शिक्षण व प्रशिक्षणावर भ देण्याची योजना व रोजगारनिर्मितीस प्राधान्य, गरीब विद्यार्थ्यांना 'सारथी' आणि 'बार्टी' या कल्याण-महामंडळांच्या माध्यमातून आर्थिक मदत करण्यासाठी १५० कोटी रुपयांची तजवीज, इत्यादि महत्त्वपूर्ण तरतुदी आहेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी 'अर्थ' हा घटक महत्त्वाचा ठरतो. येत्या काळात भारताला आर्थिक महासत्तेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती आणि ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था बनविणे आवश्यक आहे. त्या दिशेने सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेला बळकट करण्यासाठी 'अर्थाकडे' विशेष लक्ष देणे आवश्यक ठरते. म्हणून शिक्षणावरील निधीत प्रत्येक वर्षास २० ते २५ टक्के वाढ करून शिक्षण धोरणाने निश्चित केलेले, 'सकल राष्ट्रीय उत्पन्नापैकी सहा टक्के खर्च शिक्षणावर' करण्याचे उद्दिष्ट गाठणे आवश्यक आहे. तसे पाहता ही शिफारस कोठारी आयोगाने १९६६ मध्ये केली होती. ती आजतागायत कधीही अमलात आली नाही.

निदान स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याच्या वर्षात तरी शिक्षणावर जीडीपीच्या सहा टक्के खर्च करण्याची शिफारस प्रत्यक्षात उतरण्याची अपेक्षा करू या.

लेखक नांदेडस्थित 'पीपल्स कॉलेज'मध्ये प्राध्यापक तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य आहेत
dnmore2015@gmail.com

लोकसत्ता Thu, 25 March 2021
https://epaper.loksatta.com/c/59319759

News Paper Clippings During March 2021

Section: Education

फक्त २० ते ३० टक्के विषयांचे वेळापत्रक आज जाहीर होणार

पुणे, ता. २४ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम' सत्राच्या परीक्षांचे वेळापत्रक गुरुवारी (ता. २५) जाहीर केले जाईल, असा निर्णय परीक्षा मंडळाने घेतला होता. मात्र, आज केवळ २० ते ३० टक्के विषयांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाणार आहे, पुढील आठवडाभरात उर्वरित अभ्यासक्रमांचे वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे.

पुणे विद्यापीठाच्या प्रथम सत्राच्या परीक्षा ११ एप्रिलपासून सुरू होणार आहेत. ही परीक्षा ऑनलाईन व बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल च्वाइस क्वेश्चन-एमसीक्यू) पद्धतीने होणार आहे. या परीक्षेत २८४ अभ्यासक्रमाचे ५ हजार ३०० विषय असणार असून, सुमारे सव्वा सहा लाख विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. अजूनही परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे.

परीक्षा मंडळाने सर्व अभ्यासक्रमांचे वेळापत्रक २५ मार्च रोजी जाहीर केले जाईल, असा निर्णय घेतला आहे पण विद्यापीठाकडे परीक्षा अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची सर्व माहिती संकलित झाल्याशिवाय त्यांचे प्रवेशपत्र तयार होत नाही. प्रवेश पत्र तयार झाल्यानंतरच परीक्षांचे वेळापत्रक तयार केले जाते. त्यामुळे गुरुवारी केवळ २० ते ३० टक्के अभ्यासक्रमाचे वेळापत्रक प्रसिद्ध केले जाणार आहे. उर्वरित विषयांचे वेळापत्रक आठवडाभरात प्रसिद्ध केले जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

नियमावलीत अडकली गुणवत्ता सुधार योजना

दर्जा वाढवायचा असल्यास नियमांची कात्री कशाला : प्राचार्यांचा सवाल

पुणे, ता. २४ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयांचा दर्जा वाढविण्यासाठी म्हणून 'गुणवत्ता सुधार योजना' सुरू केली. मात्र, ही योजना निकषांच्या नियमावलीत अडकल्याने अनेक महाविद्यालयांना लाभ घेता येत नसल्याने उपलब्ध तरतूद खर्ची पडत असल्याचा आरोप प्राध्यापकांनी केला आहे.

पुणे विद्यापीठाच्या २०२१-२२च्या अर्थसंकल्पात गुणवत्ता सुधार योजनेची तरतूद १३ कोटी वरून ५ कोटी इतकी कमी करण्यात आलेली आहे. यापूर्वी २०१९-२० व २०२०-२१ या वर्षात प्रत्येकी १३ कोटी रुपये तरतूद होती. दोन्ही वर्षात मिळून महाविद्यालयांनी केवळ ४ कोटी १३ लाख रुपयांच्याच तरतुदीचा लाभ घेतला आहे. त्यामुळे यंदा केलेली ५ कोटीची तरतूद पुरेशी आहे असे विद्यापीठातील अधिकारी सांगत आहेत. मात्र, निधी कपातीवर प्राचार्यांनी आक्षेप घेतला आहे.

अधिसभा सदस्य, प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील म्हणाले, "ही योजना गुणवत्ता वाढविण्यासाठी आहे. परंतु त्याचे निकष करणे महाविद्यालयांना पूर्तता करणे शक्य नाही. तसेच महाविद्यालयास प्राचार्य असणे, नॅक मूल्यांकन झालेले असणे, महाविद्यालयावर कडक कारवाई झालेली असू नये यासह इतर नियम घालण्यात आलेले आहेत. त्यामुळे अनेक महाविद्यालयांना अर्ज करता येत नाहीत. विद्यापीठाकडून मदत मिळाली तर महाविद्यालयांना त्यांचा विकास करता येईल, त्यामुळे या नियमावलीत बदल केला पाहिजे."

अधिसभा सदस्य, प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर म्हणाले, "जी महाविद्यालये विविध कारणांनी दुर्बल आहेत, अशांची गुणवत्ता वाढविण्यासाठी या योजनेचा वापर झाला पाहिजे. परंतु नॅक झाले नाही, प्राचार्य नाही अशा अटींमुळे ठराविकच महाविद्यालये या योजनांचा लाभ घेतात. हे योग्य नाही."

६० टक्के महाविद्यालये अपात्र

पुणे विद्यापीठातील एकूण महाविद्यालयांपैकी ४० टक्के महाविद्यालयांनी एक व त्यापेक्षा जास्त वेळा मूल्यांकन केले आहे. मात्र, ६० टक्के महाविद्यालयांनी मूल्यांकन केलेले नसल्याने ही महाविद्यालये अपात्रच आहेत. तसेच अनेकांना प्राचार्य नसल्याने तेही अर्ज करू शकत नाहीत. गुणवत्ता सुधार योजनेतील काही नियम जाचक आहेत, तर महाविद्यालये अर्ज करताना त्यात त्रुटी राहतात, त्यामुळे महाविद्यालये अपात्र ठरत आहेत.

२५|३|२०२१ सकाळ

Sakaal 25.3.2021

प्रथम सत्र परीक्षा आली तरी वर्ग सुरू होईना!

विधीची प्रवेश प्रक्रिया एक महिना लांबणीवर गेल्याने विद्यार्थ्यांसमोर अडचण

पुणे, ता. २४ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची प्रथम सत्र परीक्षा एप्रिल महिन्यात होणार असताना सीईटी सेलने नियुक्त केलेल्या महाआयटी कंपनीकडून येणाऱ्या एररमुळे विधीच्या (लॉ) पदवी अभ्यासक्रमाची प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया एक महिना लांबली आहे. वर्गच सुरू झाले नसल्याने विद्यार्थ्यांसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून लॉच्या तीन वर्ष आणि पाच वर्ष अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. तीन वर्षाच्या अभ्यासक्रमाची संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया २२ मार्चपासून सुरू झाली असून ती ९ एप्रिलपर्यंत चालणार आहे. तर पाच वर्षाच्या अभ्यासक्रमाची प्रक्रिया १९ मार्चपासून सुरू झाली आहे. ती १ एप्रिलपर्यंत चालणार आहे.

पुणे विद्यापीठाने १० एप्रिलपासून प्रथम सत्र परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला असून, २७ मे पर्यंत परीक्षा सुरू राहण्याची शक्यता आहे. ज्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लांबली आहे त्यांची ७० टक्के अभ्यासक्रमावर परीक्षा घेतली जाईल असे परीक्षा मंडळाने स्पष्ट केले असून, यामध्ये लॉचा समावेश आहे.

लॉची प्रवेश परीक्षा सीईटी सेलकडून केली जात आहे. ही ऑनलाइन प्रक्रिया महाआयटी कंपनीकडून केली जात आहे. यामध्ये कृषी व लॉच्या प्रवेशामध्ये मोठ्याप्रमाणात अडचणी निर्माण झाल्या होत्या. यासंदर्भात सीईटी सेलचे आयुक्त चिंतामणी जोशी यांनी बैठकाही घेतल्या होत्या.

सीईटी सेलकडून ही प्रक्रिया लांबणीवर पडत असताना अजूनही लॉ तीन वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी १७ हजार विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत. विद्यार्थी प्रवेशासाठी वंचित राहू नये अशी मागणी उच्च व तंत्र शिक्षण मंत्र उदय सामंत यांच्याकडे केली असल्याचे महाराष्ट्र स्टुंडट वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष वैभव एडके यांनी केली आहे.

> **"एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात लॉची प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईल. महाआयटी कंपनीच्या सॉफ्टवेअरमध्ये एरर येत असल्याने ही प्रक्रिया एक महिना उशिरा झाली आहे.**
> **- चिंतामणी जोशी,** आयुक्त, सीईटी सेल

> **"संस्थास्तरावरील प्रवेश आता सुरू झाले आहेत. विद्यापीठाने एप्रिल महिन्यात परीक्षा घेतली जाईल असे जाहीर केले आहे. आता आमचे कॉलेज कधी सुरू होणार, शिकवणार कधी आणि आम्ही परीक्षा कधी देणार हेच कळत नाही.**
> **- अमेय कुलकर्णी,** विद्यार्थी

२५|३|२०२१ सकाळ

Sakaal 25.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

पुणे महाराष्ट्र टाइम्स । पुणे । गुरुवार, २५ मार्च २०२१ ३

विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी परीक्षाप्रक्रियेत बदल

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या लेखी परीक्षांना एप्रिल महिन्यात ऑफलाइन पद्धतीने सुरुवात होणार आहे. मात्र, यंदा परीक्षेवर करोनाचे सावट असल्याने, राज्य मंडळाने विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी परीक्षाप्रक्रियेत काही बदल केले आहेत. याबाबतच्या बदलांचा आढावा.

मटा ग्राफिक

इयत्ता बारावी परीक्षा
लेखी परीक्षेचा कालावधी :
२३ एप्रिल २०२१ ते २१ मे २०२१
प्रात्यक्षिक परीक्षेचा कालावधी :
२२ मे २०२१ ते १० जून २०२१
विद्यार्थी संख्या : सुमारे १५ लाख

इयत्ता दहावी परीक्षा
लेखी परीक्षेचा कालावधी :
२९ एप्रिल २०२१ ते २० मे २०२१
प्रात्यक्षिक परीक्षेचा कालावधी :
२१ मे २०२१ ते १० जून २०२१
विद्यार्थी संख्या : सुमारे १७ लाख

दोन्ही परीक्षांतील महत्त्वाचे बदल

- दहावी व बारावीच्या लेखी परीक्षा २५ टक्के कमी केलेल्या अभ्यासक्रमानुसार होतील.
- पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधारसाठी प्रविष्ट होणाऱ्यांची परीक्षा संपूर्ण अभ्यासक्रमावर होईल.
- करोनाचा प्रादुर्भाव असल्याने, विद्यार्थी शिकत असलेली शाळा किंवा ज्युनिअर कॉलेज परीक्षा केंद्र म्हणून देण्यात येईल.
- वर्गखोल्या कमी पडणार असतील, तर लगतच्या शाळेत व्यवस्था करण्यात येईल.
- यंदा प्रात्यक्षिक परीक्षा ही लेखी परीक्षेनंतर घेण्यात येईल.
- पुरवणी परीक्षेसह विशेष परीक्षेचे आयोजन करण्यात येईल.

परीक्षेसाठी वाढीव वेळ

- दर वर्षी ८० गुणांच्या लेखी परीक्षेसाठी तीन तास वेळ दिला जातो. मात्र, यंदा ऑनलाइन शिक्षणावर अधिक भर दिल्याने, विद्यार्थ्यांचा लिखाणाचा सराव कमी झाला आहे. त्यामुळे त्यांना लेखी परीक्षेसाठी ३० मिनिटे वाढवून देण्यात आली आहेत.
- ४० ते ५० गुणांच्या परीक्षेसाठी १५ मिनिटे वाढवून देण्यात आली आहेत.
- दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य विद्यार्थ्यांपेक्षा परीक्षेसाठी प्रत्येक तासासाठी २० मिनिटांचा कालावधी वाढवून देण्यात आला आहे.

विशेष परीक्षेचे आयोजन

- एखाद्या विद्यार्थ्यास परीक्षा कालावधीत करोनाची लक्षणे जाणवत असल्यास किंवा करोनाची लागण झाल्यामुळे परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षेचे आयोजन जून महिन्यात करण्यात येईल.
- लॉकडाउन, कंटेन्मेंट झोन, संचारबंदी आदींमुळे परीक्षा देऊ न शकणाऱ्यांसाठी ही सुविधा लागू असेल.

पुरवणी परीक्षा

- या परीक्षांत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्ट महिन्यात पुरवणी परीक्षा घेण्यात येईल.
- परीक्षेसाठीची केंद्रे शहरी भागात सोयीच्या ठिकाणी; तसेच ग्रामीण भागात तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी निश्चित करण्यात येतील.

प्रात्यक्षिक परीक्षा

- दर वर्षी इयत्ता दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा व्हायच्या. मात्र, यंदा विशिष्ट लेखन कार्य गृहपाठ पद्धतीने घेण्यात येईल.
- इयत्ता बारावीच्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्षिकांचा सराव करता आला नाही. त्यामुळे पाच ते सहा प्रात्यक्षिकांवरच परीक्षा घेण्यात येईल. याची माहिती ज्युनिअर कॉलेजांकडून मिळेल.
- कला, वाणिज्य, व्यावसायिक अभ्यासक्रमाला शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी, लेखी परीक्षेनंतर १५ दिवसांत असाइन्मेंट सादर करावी.
- करोनाची लागण झाल्यास, लॉकडाउन, संचारबंदी किंवा करोनामुळे ऐन वेळी निर्माण झालेल्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना असाइन्मेंट सादर करायला १५ दिवसांची मुदतवाढ मिळेल.

सूचनांचे पालन बंधनकारक

- परीक्षा सकाळ सत्रात १०.३० वाजता व दुपार सत्रात तीन वाजता आयोजिण्यात आली आहे. त्यामुळे परीक्षार्थ्यांनी थर्मल स्क्रीनिंगसाठी परीक्षेच्या वेळेपूर्वी किमान एक ते दीड तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.
- विद्यार्थ्यांचे तापमान तपासल्यानंतर प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर आपल्या निर्धारित परीक्षा कक्षात बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी स्थानापन्न व्हावे.
- प्रत्यक्ष लेखी परीक्षा सुरू होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात येईल.

अधिकृत वेबसाइटवरील माहितीच विश्वासार्ह

- परीक्षेबाबत सोशल मीडियावरील अफवा किंवा इंटरनेटवरील चुकीच्या माहितीवर विश्वास न ठेवता राज्य मंडळाच्या वेबसाइटवरील माहितीवर विश्वास ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
- विद्यार्थ्यांनी https://mahahsscboard.in/ या वेबसाइटला भेट द्यावी.
- विद्यार्थी-पालकांना ०२०-२५७०५००० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल.
- विद्यार्थ्यांनी प्रश्नपेढी, परीक्षेविषयी मनातील शंका दूर करण्यासाठी; तसेच अभ्यासक्रमाच्या माहितीसाठी 'एससीईआरटी'च्या www.maa.ac.in या वेबसाइटला भेट द्यावी; तसेच ०२०-२४४७६९३८, २४४७५५७१, २४४७९५१३ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

Maharashtra Times 25.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

Registrations for Class XII state board exams drop, Class X enrolments go up

ALIFIYA KHAN
PUNE, MARCH 24

WITH REGISTRATIONS for the Class X and XII state board examinations coming to a close, a clear trend has emerged across the state — the number of students enrolling for Class XII examinations has seen a considerable drop, while Class X registrations have gone up by almost the same proportion.

Figures from the Pune divisional board, which includes Pune, Ahmednagar and Solapur, show that compared to last year, when 2,49,895 students had registered for Higher Secondary Certificate (HSC) Class XII exams, this year the number has dropped to 2,30, 983 registrations. A similar trend is being seen across the state. Compared to 14.2 lakh students who had enrolled for HSC, the number stands at 13.1 lakh only this year.

Comparatively, the number of students appearing for Class X has gone up proportionately. In 2021, 2,79,503 students have been enrolled to write the exams as compared to 2,58,204 students in 2020.

As far as the drop in HSC enrolments are concerned, experts attribute it to the junior colleges, coaching classes and hostels remaining shut for most of the year. Since students in Class XII have to choose a career stream for further graduate studies and many prepare for competitive entrance exams, they were forced to take a gap year owing to inadequate preparations.

Academicians said this is especially true for students from rural areas, as they come to cities to enrol in junior colleges and coaching classes. As hostels were shut and classes were not happening, many such students have been forced to take a gap. It is believed that a considerable reduction in syllabus, access to online classes and concessions in exams might be the reason for the positive trend in registrations for the Class X exams.

Indian Express 25.3.2021

Hindustan Times
25|3|2021

Colleges ordered to submit report on refunds

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

PUNE: The Pune division of state technical education has ordered all the technical education colleges and institutes to submit a report on the refundable amount taken by students from the year 2010 to 2020. Student groups have alleged that thousands of students have not received their refundable amount worth crores. The student groups believe, every college collects this amount, but after completion of the course, it is not returned back. After an official complaint was lodged by the student association, the Pune division of state technical education has ordered all the technical education colleges and institutes to submit their report on 'refundable amount' taken and given back to students from the year 2010 to 2020. Student groups have alleged that thousands of students have not received their refundable amount back and it should be returned back immediately.

"For diploma, graduate and postgraduate courses under technical education while taking admission in the first year, the college administration takes this refundable amount under caution money, library fees and laboratory fees. After completing the course, students are supposed to take back this amount, but in most colleges, students do not take it or forget the amount. In some of the cases even colleges avoid giving it back citing various reasons, we got several complaints about the same from students," said Amar Ekad, president of the association.

"So we decided to take an overall data of this refundable amount pending with the technical education colleges and institutes in the Pune division and gave an application for the same. Taking cognizance of our application letter, state technical education joint director Pramod Naik has given orders to all the divisions to submit a report of the refundable amount of all colleges from the year 2010 to 2020," he added.

The circular issued by Dattatray Jadhav on March 19, 2021 states, "All the technical education institutes in Pune division are instructed to submit a report of the refundable amount pending with them from the year 2010 to 2020. Under this total amount collected for library and laboratory, amount refunded to students, total pending refundable amount with the college, expenses done by the college from this refundable amount and whether permission was taken from the higher office about spending the amount,"

According to the state government rule, the remaining amount needs to be spent on the Economically Backward Class (EBC) students under which their hostel and mess fees, educational material, medical services and other expenses need to be done.

Hindustan Times 25.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

THE TIMES OF INDIA, PUNE
THURSDAY, MARCH 25, 2021

TIMES CITY | PUNE

Colleges drag their feet, post-matric scholarship numbers at 11-year low

Recipients Down From 2.6L In 2020 To 15k Now

SwatiShindeGole
@timesgroup.com

Pune: Red tape and a lack of will among colleges have led to a massive drop in the application for post-matric scholarships offered by the state and Union governments.

Since students do not end up getting the benefit of the scholarship, the number of applications has dropped from 2.6 lakh in 2019-20 academic year to just over 15,000 in 2020-21 academic year in Maharashtra, a right to information plea filed by Student Helping Hand, a students' union, has revealed.

The scheme awards scholarships to meritorious students belonging to economically weaker sections of the minority community so as to provide them better opportunities for higher education, increase their rate of attainment in higher education and enhance their employability.

Ten years ago, in the 2011-12 academic year, over four lakh students benefitted from it, but gradually the number of beneficiaries have dropped.

In 2020-21, scholarship takers were at a new low. The allocation for the post-matric scholarship which includes diploma and professional courses after HSC, was Rs 375 crore in the 2020-21 academic year, but only about Rs 38.7 crore was utilised.

Many students have used the scholarship for higher education and foreign education. The scholarship also covers technical and vocational courses in Industrial Training Institutes/ Industrial Training Centres affiliated with the National Council for Vocational Training of standards XI and XII level, including polytechnics and other courses.

OVER 5 LAKH GAINED IN 2015

Year	Allocation (in Rs crores)	Spending (in Rs crores)	Beneficiaries
2010-11	603.91	467.37	4,32,073
2011-12	616.76	614.17	4,16,485
2012-13	762.80	762.48	4,83,387
2013-14	844.41	843.71	3,96,296
2014-15	790	787.94	3,42,108
2015-16	**811**	**810.98**	**5,79,274**
2016-17	1,017.53	1017.50	4,35,292
2017-18	887.90	883.47	2,27,480
2018-19	1,525	1,332.62	3,09,282
2019-20	1,797.20	1,053.38	2,66,013
2020-2021	375	38.75	15,629

(Source: Social welfare department in reply to an RTI query)

WHO CAN APPLY?

- Scholarships will be awarded to students who have secured not less than 50% marks or equivalent grade in the previous final examination and the annual income of whose parents/guardians from all sources does not exceed Rs 2 lakh
- 30% scholarship is earmarked for girls students of each minority community in a State/UT which is transferable to male students of that community in case of non-availability of female students in that community in the concerned State/UT. 30% is the floor and not the ceiling for eligible girl students
- The scholarships shall be provided for the entire course of the academic year
- Actual financial assistance will be provided for admission & course /tuition fee and maintenance allowance
- Students should be regular in attendance

No information given on rejection of applications

President of students' union Kuldeep Ambekar said the academic year has ended long ago.

Yet, this year only about 15,600 students have received their scholarship.

"I was not even given information about how many applications were received by the state social welfare department and how many of them were rejected," he said.

Ambekar said if the past five year figures are to be considered, the applications are declining and it is only because of the numerous problems students face during the process, colleges not cooperating by not forwarding the applications, and also the application portal that is always having problems.

"The beneficiaries never get the scholarship amount in the current academic year. They always get it two to three years later. These scholarships are a great support to minority students and it helps in completing their higher studies," he added.

Some disbursal soon, say social welfare officials

When contacted, commissioner of the state social welfare department Prashant Narnaware, said it was true that this year only 15,000 scholarships have been disbursed.

"There were some technical issues with the scholarship portal and hence the disbursement had stopped. In the coming two to three days, we will be disbursing another 40,000 scholarships to the students who applied which will be the second phase, and in the next few days, the verification of other applications would also be done and accordingly disbursed," he said.

Narnaware said many colleges were at a fault for the decline in the number of scholarship applications as they did not take enough interest.

"We have issued show-cause notices to many colleges in the state asking them why had they not checked on eligible students to fill the form or followed up on the beneficiaries. It is noticed that they do not do the follow up on their own with their students. They could even subscribe to a bulk messaging system and send messages to students regarding the scholarship applications and improve the numbers."

Narnaware added that the department has held talks with many vice-chancellors in the state and had told them to create awareness about the scholarship among colleges and encourage them to ensure that eligible students take advantage of the scheme.

The Times of India 25.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

१२ विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक बदलण्याचे संकेत

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४ - राज्यातील १२ विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकांची दोन वर्षांची मुदत संपण्यापूर्वीच नवीन सहसंचालक नियुक्तीची प्रक्रिया राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षणाने सुरू केली आहे. राज्यात महाविकास आघाडी सरकार आल्यामुळे या नियुक्त्या राबविण्यात येत असल्याची चर्चा रंगत आहे.

उच्च शिक्षण विभागात महत्त्वाच्या प्रशासकीय पदांवरील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या राज्य लोकसेवा आयोगामार्फत करण्याची प्रक्रिया गेल्या अनेक वर्षांपासून रखडली आहे. पर्यायाने शासकीय महाविद्यालयातील व संस्थांमधील

नव्या नियुक्त्यांसाठी जलद प्रक्रिया

प्राध्यापकांना सहसंचालक पदांवर प्रतिनियुक्ती देण्याचा पायंडा शासनाने पाडला आहे. डिसेंबर २०१९ मध्ये नियुक्त सहसंचालकांची दोन वर्षांची मुदत येत्या डिसेंबरमध्ये संपणार आहे. कोणत्याही सरकारला महत्त्वाच्या पदांवर आपल्या मर्जीतील अधिकारी नियुक्तीची घाई लागलेली असते. सहसंचालकांच्या निवड प्रक्रियेत काही नवीन तर काही जून्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

उच्च शिक्षण संचालकांच्या नियंत्रणाखाली विभागीय सहसंचालकांच्या नियुक्त्यांसाठी विशेष समिती गठीत केली आहे. उमेदवार निवडीसाठी निवड प्रक्रिया राबविण्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे उपसचिव द.रा. कहार यांनी आदेश दिले आहेत. निवड प्रक्रियेबाबत अटी-शर्तीही निश्चित केल्या आहेत. इच्छुक उमेदवारांकडून सेवा तपशीलासह २६ मार्चपर्यंत अर्ज मागवून त्यांची तपासणी करून ते १५ एप्रिलपर्यंत शासनास सादर करण्याचे बंधन घातले आहे.

अर्जदारांना परिपूर्ण माहिती व त्यांच्याविरुद्ध चौकशी सुरू अथवा प्रस्तावित आहे की नाही

याचीही माहिती द्यावी लागणार आहे. अर्जदारांची मागील पाच वर्षांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी, सध्या कार्यरत असलेल्या सहसंचालकांनी अर्ज केला असल्यास त्यांच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांची अनुदान निर्धारणाबाबत व निलंबित प्रकरणांची माहितीही सादर करणे आवश्यक आहे.

१२ सहसंचालकांच्या पदांमध्ये २ पदे ही खास प्रशासकीय सहसंचालकांसाठी राखीव आहेत.

विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक पदांसाठी पीएच.डी. पदवीबरोबरच प्राध्यापक किंवा सहयोगी प्राध्यापक म्हणून १२ वर्षे शिकविण्याच्या अनुभवाची अट घातली आहे. प्रशासकीय कामकाजाचा तीन वर्षांचा अनुभव, कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे, पीएच.डी.धारण केल्यानंतर किमान तीन प्रकाशने अशा अटी आहेत. सहसंचालकपदी उमेदवारांना देण्यात येणारी नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात आहे. उमेदवारांना कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचेही शासनाने स्पष्ट केले आहे.

प्रभात Thu, 25 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59318076

सत्र परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाकडून जाहीर

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत १० एप्रिलपासून सुरू होणाऱ्या सत्र परीक्षांसाठी काही अभ्यासक्रमांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने गुरुवारी जाहीर केले.

पदवी, पदव्युत्तर पदवी आदी अभ्यासक्रमांच्या ऑनलाइन आणि बहुपर्यायी पद्धतीने सत्र परीक्षा घेतल्या जाणार आहेत. २८४ अभ्यासक्रमांच्या ५ हजार ३०० विषयांची परीक्षा घेतली जाणार आहे. जवळपास सव्वा लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळापत्रकाची प्रतीक्षा आहे. विद्यापीठाने २५ मार्चपासून



वेळापत्रक जाहीर करण्यात येईल असे परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले होते. त्यानुसार शिक्षणशास्त्र, विधी, वास्तुकला, शारीरिक शिक्षणशास्त्र अशा काही अभ्यासक्रमांचे वेळापत्रक विद्यापीठाने जाहीर केले आहे. बाकी अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रकही पुढील काही दिवसांत जाहीर होईल, असे सांगण्यात आले.

Pudhari 26.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

विद्यापीठावर निधीसाठी शैक्षणिक संस्थांचा दबाव?

आर्थिक सक्षम महाविद्यालयांकडूनच 'गुणवत्ता सुधार' निधीचा वारंवार लाभ

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २५ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने गुणवत्ता सुधार योजनेसाठी महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या निधीत या अर्थसंकल्पात कपात केली आहे. त्यावरून महाविद्यालयांतून नाराजीचा सूर उमटत आहे. **तथापि, या योजनेंतर्गत ठराविक महाविद्यालयेच निधीचा वारंवार वापर** करीत असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे ठराविक संस्थांसाठी आणि तीही आर्थिक सक्षम असणाऱ्या महाविद्यालयांना गुणवत्ता सुधार योजनेसाठी विद्यापीठाचा निधी का द्यायचा, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

राज्यातील बहुतांश विद्यापीठाकडून महाविद्यालयांना अनुदानच्या स्वरुपात कोणताच **निधी दिला जात** नाही. मात्र, सावित्रीबाई फुले **पुणे विद्यापीठाचे** तत्कालीन कुलगुरू डॉ. नरेंद्र **जाधव यांनी** महाविद्यालयांसाठी गुणवत्ता **सुधार योजनेसाठी** निधी देण्याचा नवा पायंडा **सुरू केला.** विद्यापीठाकडून महाविद्यालयांना **निधी** देण्याची परंपरा आजतागायत सुरू आहे. दरम्यान, त्यावेळी शैक्षणिक संस्थांच्या दबावात विद्यापीठाने हा निर्णय घेतल्याची चर्चा शैक्षणिक वर्तुळातून रंगली होती.

योजनेसाठी ठराविक महाविद्यालये पात्र

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार गुणवत्ता सुधार योजनेसाठी निधी देताना काही निकष निश्चित केले आहेत. त्यात पूर्णवेळ प्राध्यापक व प्राचार्य आणि नॅक मूल्यांकन करून घेणे महाविद्यालयांना अनिवार्य आहे. त्यामुळे जवळपास ६० टक्के महाविद्यालये या निधीसाठी अपात्र ठरत आहेत. त्यामुळे या योजनेतून सर्वच संलग्नित महाविद्यालये सक्षम ठरणार आहेत का? असा प्रश्न आहे.

या योजनेसाठी ८ कोटींची कपात

गतवर्षीच्या अर्थसंकल्पात गुणवत्ता सुधार योजनेसाठी १३ कोटींची तरतूद होती. यावर्षीच्या अर्थसंकल्पात केवळ ५ कोटींची तरतूद आहे. त्यामुळे गतवर्षीचा विचार करता ८ कोटींची तरतूद यावर्षी कमी केली आहे. त्यावरून महाविद्यालयांतून नाराजी उमटत आहे.

गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत निधी

- चर्चासत्र, कार्यशाळा आयोजिण्यासाठी निधी
- विद्यार्थ्यांच्या स्वच्छतागृहसाठी निधी
- महाविद्यालयात सोयी-सुविधेसाठी निधी
- परदेशात रिसर्च पेपर सादर करण्यासाठी सहकार्य
- सोलर पॅनल, अत्याधुनिक उपकरणे खरेदीसाठी मदत

"विद्यापीठ संलग्नित सर्वच महाविद्यालयांना सर्वसमावेशक ठरणारी गुणवत्ता सुधार योजना असणे अभिप्रेत आहे. मात्र, काही प्रतिष्ठित महाविद्यालयेच त्याचा लाभ घेत असून, उर्वरित महाविद्यालये नियमात बसत नाहीत. अशा परिस्थितीत विद्यापीठाचा निधी त्याच त्याच महाविद्यालयांसाठी देणे संयुक्तिक ठरणार नाही. त्यामुळे या योजनेचा फेरविचार व्हायला हवा.

– **कल्पेश यादव,**
शहराध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना

प्रभात Fri, 26 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59360115

वरिष्ठ महाविद्यालयांतील प्राचार्यांची वेतननिश्चिती

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घेतला निर्णय

मुंबई, दि. २५ - राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांतील सरळ सेवेने किंवा थेट नियुक्त झालेल्या प्राचार्यांची वेतननिश्चिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

१ जानेवारी २००६ रोजी अथवा त्यानंतर प्राचार्य पदावर सरळसेवेने, थेट नियुक्त झालेल्या वरिष्ठ महाविद्यालयांतील प्राचार्यांची ६ व्या वेतन आयोगातील वेतन बॅण्ड रु. ३७४००-६७००० व अकॅडमिक ग्रेड वेतन रु. १० हजार या वेतन संरचनेची रु. ४३ हजार इतक्या वेतनावर वेतननिश्चिती करण्यात आली. यासाठी ४२ कोटी ८९ लाख ९६ हजार ८७६ रुपयांच्या खर्चासही आज मंजुरी देण्यात आली.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या तरतुदीनुसार प्राचार्य पदाची वेतननिश्चिती रु.४३ हजार इतक्या वेतनावर करण्याबाबत उच्च न्यायालयाचे आदेश होते. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रभात Fri, 26 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/5

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

विद्यापीठातर्फे काही परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

११ एप्रिलपासून परीक्षा सुरू होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे येत्या ११ एप्रिलपासून प्रथम सत्राच्या परीक्षा घेतली जाणार असून विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने गुरुवारी रात्री उशिरा शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम, विधी पदविका व पदवी अभ्यासक्रम तसेच शारीरिक शिक्षण आणि एमए जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. तसेच २५ एप्रिल रोजी विद्यापीठातर्फे परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल, असे स्पष्ट करण्यात आले. त्यानुसार विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ११ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

शारीरिक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा ११ एप्रिल ते २२ एप्रिल या कालावधीत, विधी पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षा १० ते १७ एप्रिल दरम्यान, शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाच्या परीक्षा १० ते २० एप्रिल आणि जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन या विषयांच्या परीक्षा १० ते २५ एप्रिल या कालावधीत घेतल्या जाणार आहेत. उर्वरित विषयांच्या परीक्षांचे वेळापत्रक टप्प्या-टप्प्याने जाहीर केले जाणार असल्याचे परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

Hello Pune
Page No. 8 Mar 26, 2021
Powered by: erelego.com

अकरावीचे वर्ष यंदा गोंधळाचेच

पुणे : पुढारी वृत्तसेवा

अकरावी प्रवेशप्रक्रियेला जुलै-ऑगस्ट महिन्यात सुरुवात झाली खरी, परंतु शैक्षणिक वर्ष संपायला केवळ तीन महिन्यांचा कालावधी शिल्लक राहिलेला असतानाही प्रवेशप्रक्रियेचे गुऱ्हाळ चालूच असल्याचे दिसून येत आहे. शुक्रवारी (दि. २६) प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना शेवटची संधी देण्यात आली आहे. कोरोनामुळे यंदा केवळ महिनाभर विद्यार्थ्यांची वर्गात हजेरी होती. त्यानंतर मात्र केवळ नावालाच ऑनलाइन शिक्षण सुरू आहे. त्यामुळे यंदा अकरावीचे वर्ष हे केवळ गोंधळाचेच असल्याचे स्पष्ट झाले आहे.

- मार्च महिन्यातही प्रवेशप्रक्रियेचेच गुऱ्हाळ
- ऑनलाइन शिक्षणही केवळ नावालाच
- बारावीचा पाया कच्चा राहण्याचीच दाट शक्यता

राज्यात अकरावी प्रवेशप्रक्रिया जुलै-ऑगस्ट महिन्यात सुरू झाली. पहिली फेरी झाल्यानंतर १० सप्टेंबरपासून ठप्प झाली. ती नोव्हेंबर महिन्यापर्यंत ठप्पच होती. त्यानंतर पुन्हा प्रवेशप्रक्रिया सुरू झाल्यानंतर ती लवकरात लवकर पूर्ण करणे अपेक्षित होते. परंतु शिक्षण विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे अगदी मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत प्रवेशप्रक्रिया सुरूच असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे शेवटच्या टप्प्यात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे उर्वरित तीन महिन्यांत अभ्यासक्रमाचे नियोजन कसे करणार, बारावीचा अभ्यासक्रम व वर्ष केव्हा सुरू होणार, तीन महिन्यांत बारावीचा पाया असणाऱ्या अकरावी अभ्यासक्रमाचे मूल्यमापन कसे करणार, याविषयी कनिष्ठ महाविद्यालयांचे शिक्षक, पालक तसेच विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

महाविद्यालये अकरावीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण सुरू असल्याचा दावा करीत असले तरी, ग्रामीण भागातील सध्याचे विजेचे भारनियमन, इंटरनेट रेंज व्यवस्थित नसणे आदी कारणांमुळे ऑनलाइन शिक्षण केवळ नावालाच सुरू असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. विज्ञान शाखेचा पाया समजून घेण्यासाठी आवश्यक प्रात्यक्षिककार्यापासून यंदा विद्यार्थी वंचितच असल्याचे दिसून येत आहे.

अकरावीच्या प्रवेशप्रक्रियेसंदर्भात पूना नाईट हायस्कूलचे प्राचार्य अविनाश ताकवले म्हणाले की, दहावीचा निकाल लागून बरेच महिने उलटल्यानंतर अद्यापही इयत्ता अकरावीमध्ये सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश होऊ शकलेले नाहीत. बरेच विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत. विद्यार्थ्यांचे प्रवेश होऊनही विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबद्दलचे पुरेसे ज्ञान मिळू शकलेले नाही. विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणापासूनही वंचित आहे.

बारावी या महत्त्वाच्या वर्षाचा पाया असलेल्या अकरावीची व्यथा शासनाकडून दुर्लक्षित होत आहे. कोरोनामुळे विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहापासून दुरावत जाण्याची दाट शक्यता आहे. त्याचा परिणाम हा पुढील पिढीसाठी घातक ठरणारा असेल. विद्यार्थ्यांना नवीन विषयाची गोडी निर्माण होण्यासाठी महत्त्वाचे असलेले हे अकरावीचे वर्ष जर असे वाया गेले, तर बारावीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक वाटचाल गुणवत्तेच्या दृष्टीने घातक ठरणारी आहे. त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षणाचा पाया असलेल्या या महत्त्वपूर्ण वर्षाकडे शासनाने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे.

अकरावी प्रवेशप्रक्रियेची यंदाची स्थिती

महाविद्यालये	304
उपलब्ध जागा	107215
विद्यार्थ्यांची नोंदणी	103200
प्रवेशित विद्यार्थी	71700
रिक्त जागा	35515

Pudhari 26.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

ऑनलाइन व्हायवामुळे ५११ विद्यार्थ्यांना पीएचडी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : विज्ञान, तंत्रज्ञानचे सर्वाधिक विद्यार्थी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोनामुळे पीएचडी करणा-या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे ऑनलाइन पद्धतीने मौखिक परीक्षा (व्हायवा) घेण्यात आल्या. त्यामुळे भारतातील व परदेशातील एकूण ५११ विद्यार्थ्यांची व्हायवा घेऊन त्यांना पी.एचडी.पदवी देण्यात आली. त्यात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या सर्वाधिक २४३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध संशोधन केंद्राच्या माध्यमातून पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची सर्व प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविली जाते.त्यात विद्यार्थ्यांच्या संशोधनाची माहिती अद्ययावत ठेवणे, विद्यार्थ्यांचा प्रोग्रेस रिपोर्ट, पुनर्नावनोंदणी अर्ज, गोषवारा, प्रबंध यांचा समावेश आहे. तसेच विद्यार्थ्यांनी शोधप्रबंध जमा केल्यानंतर त्या प्रबंधाची सद्यस्थिती काय आहे , याबाबतची माहिती सुद्धा विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने पाहता येते. विद्यापीठाने यासंदर्भातील ट्रॅकिंग सिस्टिम तयार केली आहे.

कोरोना काळात पीएचडी प्रबंध सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी विद्यापीठाने ऑनलाइन पद्धतीने व्हायवा घेण्याच्या सूचना सर्व विद्याशाखांच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागातर्फे यासंदर्भातील सविस्तर कार्यपद्धती प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार ऑनलाइन पद्धतीने व्हायवा घेतल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती पीएचडी ट्रेकिंग सिस्टीममध्ये अद्ययावत करण्याचे बंधन घालण्यात आले. परिणामी केवळ भारतातीलच नाही तर परदेशातील विद्यार्थ्यांना सुद्धा ऑनलाइन पद्धतीने मौखिक परीक्षा देणे शक्य झाले. त्यामुळे शोधप्रबंध सादर केलेल्या ५२९ विद्यार्थ्यांपैकी ५११ ऑनलाइन पद्धतीने व्हायवा देऊन पीएचडी पदवी प्राप्त केली.

ऑनलाइन व्हायवा देणाऱ्या विद्यार्थ्यांची विद्या शाखा निहाय

विज्ञान आणि तंत्रज्ञान	वाणिज्य आणि व्यवस्थापन	मानवविज्ञान	अंतर विद्या शाखीय अभ्यास
२४३	११०	२५	१३३

विद्यापीठाची सक्षम ऑनलाइन यंत्रणा

- कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा फटका विद्यार्थ्यांना बसू नये ,या उद्देशाने विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाने ऑनलाइन पद्धतीने व्हायवा घेण्यासाठी सक्षम यंत्रणा तयार केली.
- ऑनलाइन पद्धतीने व्हायवा देण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया कशी पूर्ण करावी, यासंदर्भातील सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिली. त्यामुळे शोधप्रबंध सादर केलेल्या विद्यार्थ्यांपैकी ९० टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांना ऑनलाइन व्हायवा देऊन पीएचडी मिळवली.

Hello Pune
Page No. 8 Mar 26, 2021
Powered by: erelego.com

News Paper Clippings During March 2021

Section: Education

दहावीच्या विद्यार्थ्यांना यंदा सवलतीचे कला गुण नाहीत

शासकीय रेखाकला परीक्षा रद्द करण्याचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर शासकीय रेखाकला परीक्षा परीक्षा (एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट) रद्द करण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे. त्यामुळे यंदा दहावीच्या विद्यार्थ्यांच्या सवलतीचे कला गुण दिले जाणार नाहीत.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता लक्षात घेऊन शासकीय रेखाकला परीक्षा रद्द करण्याचा प्रस्ताव कला संचालनालयाने दिला होता. त्यामुळे शासकीय रेखाकला परीक्षा रद्द करण्यात आल्याचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. या शासन निर्णयानुसार दहावी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय रेखाकला परीक्षेचे सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येऊ नयेत. तसेच दृश्यकला पदवी-पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या सीईटी परीक्षेमध्ये शासकीय रेखाकला परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे गुण देण्यात येऊ नयेत असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

कला शिक्षण प्रशिक्षण पदविका (एटीडी) आणि मूलभूत अभ्यासक्रम (फाउंडेशन) या दोन अभ्यासक्रमांना सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीमधून सूट देण्यात येत आहे. ही सूट या शैक्षणिक वर्षामध्ये कला शिक्षण प्रशिक्षण पदविका (एटीडी) आणि मूलभूत अभ्यासक्रम (फाउंडेशन) या दोन अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपुरतीच आणि २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापुरतीच मर्यादित राहील. तसेच तंत्रशिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शासकीय रेखाकला परीक्षा उत्तीर्ण केल्याची बाब प्रवेश प्रक्रियेच्या वेळी विचारात घेण्यात येऊ नये, असेही या निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

क्रीडा गुणांबाबतही प्रश्न

सवलतीचा कला गुण मिळणार नसल्याने क्रीडा गुणांबाबतही प्रश्न निर्माण झाला आहे. राज्य मंडळाचे अध्यक्ष दिनकर पाटील म्हणाले, की क्रीडा गुणांबाबत राज्य शासनाकडून निर्देश प्राप्त झाल्यावर त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

लोकसत्ता Sun, 28 March 2021 https://epaper.loksatta.com/c/59402736

शुल्कवाढ...? यंदा नाहीच

राज्यातील १,०२४ महाविद्यालयांचा विद्यार्थ्यांना दिलासा

शुल्क नियामक प्राधिकरणाचा करोनामुळे निर्णय

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २७ - राज्यातील १ हजार २४ व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी येत्या शैक्षणिक वर्षात शुल्कवाढ न करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे करोनामुळे आर्थिक संकटात असलेल्या विद्यार्थ्यांना पुढच्या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणे शक्य होणार आहे.

शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे (एफआरए) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग आणि कृषी विभागातील अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क निश्चित केले जाते. त्या अंतर्गत आगामी २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुकला, वैद्यकीय, कृषी, विधि अशा विविध पदवी, पदविका, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शुल्क ठरवण्यात आले आहे. त्याची माहिती शुल्क नियामक प्राधिकरणाने संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्क ५० हजार ते दोन लाखांपर्यंत असते. वैद्यकीय अभ्यासक्रमांचे शुल्क एक लाख ते १० लाख रुपयांदरम्यान आहे. मात्र शुल्क नियामक प्राधिकरणाच्या नियमानुसार या महाविद्यालयांना दरवर्षी आठ टक्क्यांपर्यंत शुल्कवाढ करण्यास परवानगी असते. यंदा मात्र शुल्कवाढ न करण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

शुल्कवाढ न करणाऱ्या महाविद्यालयांची संख्या

- **पॉलिटेक्निक : १९९**
- **पदविका फार्मसी : १५३**
- **एमबीए : ९९**
- **अभियांत्रिकी : ८७**
- **आर्किटेक्चर : २६**

प्रभात Sun, 28 March 2021 https://epaper.eprabhat.net/c/59403242

News Paper Clippings During March 2021

Section: Education

सुरक्षा ठेवीच्या नावाखाली शुल्काबाबत महाविद्यालयांना तंबी

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सुरक्षा ठेवींच्या (डिपॉझिट) नावाखाली विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या शुल्क आकारणीबाबत शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) महाविद्यालयांना तंबी दिली आहे. विद्यार्थी संघटना, विद्यार्थी कल्याण, महाविद्यालय साहित्य, वसतिगृह आणि खाणावळ आदींसाठी विद्यार्थ्यांसाठी अवास्तव सुरक्षा ठेव घेताना महाविद्यालयांना विचार करावा लागणार आहे.

शुल्क नियामक प्राधिकरणकडून अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वैद्यकीय, वास्तुकला, कृषि, औषधनिर्माण अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क ठरवले जाते. महाविद्यालयाचा एकूण वार्षिक खर्च, विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधा विचारात घेऊन शुल्क ठरवले जाते. महाविद्यालयांकडून ग्रंथालय, प्रयोगशाळा, खाणावळ, वसतिगृह यांचेही वार्षिक शुल्क घेतले जाते. तसेच सुरक्षा ठेव म्हणूनही काही रक्कम घेतली जाते. अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत ही रक्कम महाविद्यालयाकडून ठेवून घेतली जाते. अभ्यासक्रम आणि सोयीसुविधांचे शुल्क भरतानाच सुरक्षा ठेवींच्या मोठ्या रकमेचा भार विद्यार्थ्यांना सहन करावा लागतो. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेवीची रक्कम परत करणे अपेक्षित असते. मात्र विद्यार्थ्यांकडून मागणी न झाल्यास या रकमेचा महाविद्यालयाकडून वापर केला जातो. सुरक्षा ठेवीबाबत विद्यार्थ्यांनी शुल्क नियामक प्राधिकरणाकडे तक्रारी केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शुल्क नियामक प्राधिकरणाचे परिपत्रक प्रसिद्ध करून महाविद्यालयांना तंबी दिली आहे.

महाविद्यालयांच्या संकेतस्थळाला भेट दिल्यावर अनेक महाविद्यालयांच्या बाबतीत अनियमितता आढळून आल्याचे स्पष्ट करत संबंधितांना नोटीस बजावून त्यांच्याकडून माहिती मागवण्यात आल्याचे शुल्क नियामक प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या माध्यमांतून अवास्तव शुल्क आकारणाऱ्या, सुरक्षा ठेव घेण्याबाबत महाविद्यालयांना विचार करावा लागणार आहे.

लोकसत्ता Sun, 28 March 2021
https://epaper.loksatta.com/c/59402462

महाविद्यालयांच्या मनमानीला 'एफआरए'चा लगाम

विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क वसूल कराल, तर खबरदार!

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २७ - विद्यार्थ्यांना प्रवेश देतेवळी डिपॉझिटच्या नावाखाली शुल्क वसूल करणाऱ्या महाविद्यालयांना आता पायबंद बसणार आहे. प्रवेशाच्या वेळी स्टुडन्ट असोसिएशन, स्टुडन्ट वेल्फेअर, वसतिगृह व मेस आदींसाठी विद्यार्थ्यांकडून अवास्तव डिपॉझिट शुल्क आकारू नका, अशी तंबी शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना दिली आहे.

शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वैद्यकीय, कृषी, फार्मसीसह अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमाचे निश्चित केले जाते. हे शुल्क ठरविताना महाविद्यालयाचा एकूण वार्षिक खर्चाचा आढावा; तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध सुविधांचा आढावा घेतला जातो. त्यानंतर नियमाप्रमाणे शैक्षणिक शुल्क ठरवण्यात येते. त्याचप्रमाणे महाविद्यालयाकडून ग्रंथालय, प्रयोगशाळा, मेस, वसतिगृह यांचे वार्षिक शुल्कही घेतले जाते. त्याचप्रमाणे या सर्वांसाठी अवास्तव डिपॉझिट शुल्क घेतले जाते. त्याचप्रमाणे हे डिपॉझिट शुल्क अभ्यासक्रम संपेपर्यंत संस्थेकडून वापरले जाते. या शुल्काची संपूर्ण रक्कम बँकेत ठेवून त्याचे व्याज घेतले जाते. मात्र, या व्याजाची रक्कम विद्यार्थ्यांना न देता, त्याचा वापर पैसे कमविण्यासाठी महाविद्यालयाकडून केला जातो.

डिपॉझिटच्या रकमेबाबत तंबी

अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर डिपॉझिटची रक्कम महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना देणे अपेक्षित असताना ती दिलीच जात नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून मागणी होईपर्यंत ही रक्कम महाविद्यालय प्रशासनाकडून वापरण्यात येते. या सर्वांबाबत विद्यार्थ्यांनी 'एफआरए'कडे तक्रारी नोंदवल्या. त्याचप्रमाणे शुल्क निश्चित करताना, या वाढलेल्या डिपॉझिट शुल्काची माहिती समोर आली. त्यामुळे शुल्क नियामक प्राधिकरणाचे अध्यक्ष माजी न्यायाधीश एम.एन. गिलानी यांनी परिपत्रक प्रसिद्ध करुन, महाविद्यालयांना तंबी दिली आहे.

प्रभात Sun, 28 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59403277

News Paper Clippings During March 2021

Section: Education

बारावीच्या मूल्यमापन आराखड्याबाबत शिक्षकांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील अकरावी आणि बारावीच्या शिक्षकांना बारावीच्या काही विषयांच्या मूल्यमापन आराखड्याबाबत ऑनलाइन प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यासाठी शिक्षकांनी २८ मार्चपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन राज्य मंडळाचे सचिव डॉ.अशोक भोसले यांनी परिपत्रकाद्वारे केले.

राज्य मंडळांतर्गत येणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातील उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी (अकरावी आणि बारावी) आरोग्य आणि शारीरिक शिक्षण, चित्रकला, संकल्पचित्र आणि रंगकाम, चित्रात्मक संकल्प, कलेचा इतिहास आणि रसग्रहण, भारतीय संगीताचा इतिहास आणि विकास, कंठ सुगम संगीत, कंठ शास्त्रीय संगीत, वाद्यसंगीत तालवाद्य आदी विषयांच्या विषय शिक्षकांचे शैक्षणिक वर्ष २०२०-२१च्या परीक्षेसाठी ऑनलाइन प्रशिक्षण होणार आहे. हे प्रशिक्षण अनिवार्य आहे. संबंधित विषयांच्या सर्व विषय शिक्षकांनी मंडळाच्या evaluation.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावर २८ मार्चपर्यंत माहिती भरायची आहे, असे डॉ.भोसले यांनी नमूद केले आहे.

epaper.loksatta.com
लोकसत्ता Sun, 28 March 202
https://epaper.lol

लोकमत

'ऑनलाइन एज्युकेशन'ने बिघडवले हस्ताक्षर अन् लिहिण्याची गती

कोरोना काळात शाळा बंद; दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना कृतिपत्रिकेसाठी अधिक वेळ

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोना काळात शाळा बंद असल्या तरी ऑनलाईन शिक्षण सुरू आहे, मात्र, विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरावर आणि लिहिण्याच्या गतीवर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच इयत्ता दहावी - बारावीच्या विद्यार्थ्यांना कृतीपत्रिका सोडविण्यासाठी अर्धा तास अधिकचा वेळ वाढवून द्यावा लागला आहे.

शालेय वयातच विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात सुधारणा होते. विद्यार्थी वर्गात शिक्षकांनी दिलेला अभ्यास शाळेतच किंवा घरी पूर्ण करतात. त्यामुळे त्यांचा लेखनाचा सराव होतो. परंतु, कोरोनामुळे गेल्या वर्षभरापासून विद्यार्थी घरी आहेत. ऑनलाईन शिक्षणाला मर्यादा असल्याने विद्यार्थ्यांकडून गृहपाठ पूर्ण करून घेण्याचे मोठे आव्हान शिक्षकांसमोर आहे. एकूणच विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव कमी झाला आहे. काही पालक विद्यार्थ्यांकडून नियमितपणे अभ्यास करून घेतात. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरात सुधारणा होत आहे. परंतु, काही ग्रामीण भागातील व गरीब कुटुंबातील मुलांच्या पालकांना आपल्या पाल्याचा अभ्यास करून घेण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या लेखनाच्या गतीवर परिणाम झाला आहे.

कोरोनामुळे विद्यार्थी वर्षभरापासून घरी आहेत. त्यामुळे त्यांच्या लेखनावर परिणाम झाला. त्यामुळेच मुख्याध्यापक व प्राध्यापक संघटनेने राज्य मंडळाकडे दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी अर्धा तास वाढवून द्यावा, अशी मागणी केली. विद्यार्थ्यांच्या लेखनाला गती नसल्यामुळे मंडळाने अर्धा तास वाढवून देण्याचा निर्णय घेतला आहे.

- हनुमंत कुवडे,
अध्यक्ष, मराठी अध्यापक संघ

सरावाने स्वच्छ व सुंदर हस्ताक्षर काढता येते. एकदा हस्ताक्षर स्थिरावले की त्यात बदल होत नाही. त्यामुळे कोरोना काळात जरी लेखनाचा सराव कमी झाला असला तरी सर्वच विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरावर त्याचा परिणाम होणार नाही. विद्यार्थ्यांनी सतत लेखनाचा सराव करावा.

- अनिल गोरे, मराठी भाषा अभ्यासक

विद्यार्थी घरात बसून ऑनलाइन शिक्षणाला कंटाळले आहेत. शिक्षकांकडून त्यांना मर्यादित लेखन दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या लेखनाच्या गतीवर परिणाम झाला आहे. शिक्षकांनी ही बाब गंभीरपणे घ्यायला हवी.

- सुवर्णा सूर्यवंशी, पालक

विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव कमी झाला आहे. घरात बसून अभ्यास करा, असे सांगूनही मुलं ऐकत नाहीत. ऑनलाइन शिक्षणाने कानावर काही चांगल्या गोष्टी पडत असल्या तरी विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य विकसित होण्यास मर्यादा येत आहेत.

- मनोज केदारे, पालक

Hello Pune
Page No. 8 Mar 28, 2021
Powered by: erelego.com

News Paper Clippings During March 2021

Section: Education

पुणे विद्यापीठाची उपकेंद्रे सक्षम होणार

मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी तरतूद

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २९ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अहमदनगर आणि नाशिक येथे उपकेंद्र स्थापन करण्यास राज्य शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. ही दोनही उपकेंद्र सक्षमीकरण करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनने पाऊल उचलले आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाने याठिकाणी मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी तरतूद केली आहे.

यासंबंधिचे परिपत्रक विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी काढले आहे. विद्यापीठाचे नाशिक व नगर या उपकेंद्रास राज्य शासनाने २२ जानेवारी २०२१ रोजी मान्यता दिली आहे. त्यामुळे ही उपकेंद्रे सक्षम होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने आता कामास सुरुवात केली आहे. गेली अनेक वर्ष ही उपकेंद्रे शासनाच्या उदासिनतेमुळे दुर्लक्षित होती. मात्र, आता तेथे अनेक कामे हाती घेण्यास विद्यापीठाला एकप्रकारची मान्यता मिळाली आहे.

दरम्यान, या ठिकाणी विद्यापीठास मंजूर असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधातून कार्यरत कर्मचाऱ्यांमधून उपकेंद्राची ठिकाणी मनुष्यबळ उपलब्ध करता येणार आहे. तसेच चतुर्थश्रेणीतील पदे बाह्य यंत्रणेद्वारे भरण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. त्याचा विचार करून विद्यापीठाने मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी तात्पुरती तरतूद केली आहे.

पहिल्या टप्प्यात या दोन्ही उपकेंद्राच्या ठिकाणी लेखा व सर्वसाधारण विभागासाठी प्रत्येक कक्षाधिकारी, सहायक कक्षाधिकारी, वरिष्ठ सहायक ४ आणि कनिष्ठ सहायक २ असे एकूण १० पदनामाची तरतूद केली आहे. प्रत्येक केंद्रास ५ या प्रमाणे ही पदनामाची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे आता उपकेंद्राच्या ठिकाणी मनुष्यबळ उपलब्ध होणार असल्याचे प्रशासकीय कामास गती मिळण्याची चिन्हे आहेत.

उपकेंद्राच्या ठिकाणी बदलीही होऊ शकते

विद्यापीठात आवश्यकतेनुसार उपलब्ध असलेल्या शासनमान्य पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी नाशिक व नगर उपकेंद्रासाठी बदलीद्वारे अधिकारी व सेवक दिले जाणार आहे. मात्र, चतुर्थश्रेणीतील पदे आऊटसोर्सिंगद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील, अशी माहिती डॉ. प्रफुल्ल पवार यांनी दिली. त्यामुळे शासनमान्य पदावर कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपकेंद्राची ठिकाणी बदली करण्यास रितसर विद्यापीठाला अधिकार प्राप्त झाले आहेत.

विद्यापीठात येणाऱ्यांची संख्या रोडावेल

उपकेंद्राच्या परिसरातील महाविद्यालय व विद्यार्थ्यांची अडचणी, शंका त्याच ठिकाणी सोडविणे आवश्यक आहे. मात्र, उपकेंद्रासाठी विद्यापीठाचा मनुष्यबळ नसल्याने छोटी छोटी कामे अथवा प्रश्नांसाठी विद्यार्थी, प्राध्यापक व प्राचार्यांना पुणे विद्यापीठात यावे लागत होते. आता उपकेंद्राच्या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी नियुक्त होणार असल्याने नगर व नाशिकमधील अभ्यागतांची प्रश्नांची उत्तरे त्याचठिकाणी प्राप्त होतील. त्यामुळे विद्यापीठात येणाऱ्यांची संख्या कमी होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

प्रभात Tue, 30 March 2021 https://epaper.eprabhat.net/c/59441043

लोकमत

प्राध्यापक कॅसच्या लाभापासून वंचित

प्राध्यापकाचा आंदोलनाचा इशारा : प्रस्ताव सादर करण्यास टाळाटाळ

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या समितीने कॅसचे लाभ देण्यासाठी पात्र ठरवलेल्या काही प्राध्यापकांचे प्रस्ताव शैक्षणिक संस्थांकडून विद्यापीठाकडे सादर करण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केली जात आहे. परिणामी हे प्राध्यापक पदोन्नतीच्या लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे नौरोजी वाडिया महाविद्यालयातील प्राध्यापकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

> विद्यापीठाने पत्र पाठवूनही नौरोजी वाडिया महाविद्यालयाने अकरा प्राध्यापकांपैकी केवळ पाच प्राध्यापकांचे प्रस्ताव सादर केले. उर्वरित सहा प्राध्यापकांचे प्रस्ताव अद्याप सादर केलेले नाहीत. त्यातील काही प्राध्यापक सेवानिवृत्त होणार आहेत. मात्र, नौरोजी वाडिया महाविद्यालयाकडून प्रस्ताव पाठविण्यास टाळाटाळ केले जात आहे. त्यामुळे महाविद्यालयातील प्राध्यापकांनी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. प्राध्यापक संघटनेच्या या आंदोलनास पाठिंबा आहे.
>
> **- एस. एम. राठोड, अध्यक्ष, पुटा**

पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापकांना कॅस अंतर्गत दिले जाणारे लाभ मिळावेत. या उद्देशाने उच्च शिक्षण विभागाने दिलेल्या सूचनेनुसार विद्यापीठाने प्राध्यापकांच्या कॅसच्या मुलाखती घेतल्या. तसेच तज्ज्ञ समितीने दिलेल्या अहवालानुसार संबंधित प्राध्यापकांना पदोन्नतीसाठी पात्र ठरविले. त्याचप्रमाणे संलग्न महाविद्यालयांना पात्र ठरलेल्या प्राध्यापकांचे अहवाल विद्यापीठात सादर करण्याच्या सूचना दिल्या.

मात्र, काही महाविद्यालयांनी या प्रक्रियेस विरोध केला. त्यामुळे विद्यापीठाने पात्र ठरवलेले असतानाही प्राध्यापक कॅसच्या लाभापासून वंचित आहेत. काही प्राध्यापक सेवानिवृत्त होणार आहेत. मात्र, त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी कॅसचे लाभ मिळू नयेत म्हणून काही संस्था जाणूनबुजून प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे.

पुणे विद्यापीठातर्फे राबविण्यात आलेली कॅस प्रक्रिया चुकीची असल्याचे काही संस्थाचालकांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले. मात्र, विद्यापीठाने तत्पूर्वी सर्व प्रक्रिया पूर्ण केली. तसेच प्राध्यापक संघटनेने राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली होती. परंतु, तरीही न्याय मिळत नसल्याने प्राध्यापकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

Hello Pune
Page No. 3 Mar 30, 2021
Powered by: erelego.com

News Paper Clippings During March 2021

Section: Education

दहावीच्या विद्यार्थ्यांना कलागुण देण्याची मागणी

पुणे, ता. २९ : चित्रकलेची आवड म्हणून विद्यार्थ्यांनी चित्रकलेचा अभ्यास केलेला असतो. चित्रकलेचा सराव करून एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट या परीक्षा देऊन लाखो विद्यार्थी ग्रेडही मिळवितात. विद्यार्थ्यांनी मिळविलेले ग्रेड दहावीमध्ये सवलतीचे अतिरिक्त गुण म्हणून ग्राह्य धरले जातात. विद्यार्थ्यांनी मेहनत घेऊन दिलेल्या या परीक्षांचे गुण यंदा दहावीच्या परीक्षेसाठी ग्राह्य धरण्यात यावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाच्या पुणे जिल्हा शाखेने केली आहे.

शाळेतील शिक्षकांनी जादा तासिका घेऊन विद्यार्थ्यांचा एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट परीक्षेचा अभ्यास घेतलेला आहे. दहावीत असताना विद्यार्थ्यांवर परीक्षेचा ताण येऊ नये, म्हणून विद्यार्थी इयत्ता आठवी, नववीमध्ये असतानाच एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट परीक्षा घेतल्या जातात आणि त्याच ग्रेडचे दहावीत सवलतीचे अतिरिक्त गुण संबंधित विद्यार्थ्यांना दिले जातात. परंतु यंदा (शैक्षणिक वर्ष २०२०-२१) दहावीच्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त कला गुण देण्यात येऊ नये, असा आदेश नुकताच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने काढला आहे. त्यावर आता कलाध्यापक संघाने आपली म्हणणे मांडले आहे. शिक्षण विभागाच्या या आदेशाचा विरोध राज्यभरातील कलाध्यापक संघ करत आहेत. दहावीच्या विद्यार्थ्यांचे सवलतीचे अतिरिक्त कलागुण ग्राह्य न धरण्याचा आदेश मागे घ्यावा, अशी मागणी महामंडळाच्या पुणे जिल्हा शाखेचे अध्यक्ष श्रावण जाधव यांनी निवेदनाद्वारे केली आहे. ते म्हणाले, "पुणे जिल्ह्यात जवळपास दीड हजार कला शिक्षक जवळपास एक ते दीड लाख विद्यार्थ्यांना चित्रकला विषयाचे शिक्षण देतात. विद्यार्थी खूप मेहनतीने या विषयाचा अभ्यास करतात आणि एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट परीक्षा देतात. विद्यार्थी २०१८-१९मध्ये (एलिमेंटरी) आणि २०१९-२०मध्ये (इंटरमिजिएट) शासकीय रेखाकला परीक्षा दिली आहे. हे विद्यार्थी सध्या दहावीत असून त्यांना सवलतीचे अतिरिक्त कला गुण देण्यात यावे."

Sakaal 30.3.2021

अकरावी प्रवेशाच्या ३५ हजार ४९३ जागा रिक्त

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २९ - पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावी प्रवेशाच्या ३५ हजार ४९३ जागा रिक्त आहेत.

अकरावी ऑनलाइन प्रवेशाच्या तीन नियमित व दोन विशेष फेऱ्या राबविण्यात आल्या. 'प्रथम येणाऱ्यास, प्रथम प्राधान्य' या तत्वावरही काही प्रवेश फेऱ्या घेण्यात आल्या. यातल्या शेवटच्या प्रवेश फेरीसाठी २६ मार्चपर्यंतची मुदत देण्यात आली. ती आता संपली आहे. प्रवेशापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अनेकदा संधी देण्यात आली. मात्र, तरीही प्रवेशाच्या जागा रिक्त राहिल्या आहेत. पुणे विभागात अकरावी प्रवेशासाठी ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी केली होती. त्यात १ लाख ७ हजार २१५ एवढ्या प्रवेशाच्या जागा दर्शविल्या होत्या. प्रवेशासाठी १ लाख ३ हजार २०४ विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी झाली होती. ८७ हजार ५३२ अर्ज भरल्यानंतर लॉक केले होते. ८७ हजार ४१४ अर्जांची पडताळणी पूर्ण झाली. ७१ हजार ७२२ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. उर्वरित प्रवेश रिक्त राहिले आहेत.

करोनामुळे महाविद्यालये वर्षभर बंद आहेत. ऑनलाइन शिक्षण सुरू होते. बहुसंख्य विद्यार्थ्यांचे उशिरा प्रवेश झाले. त्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना कसरतच करावी लागली. आता परीक्षांची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने सर्वच विद्यार्थ्यांना अभ्यासाची तयारी ही करावीच लागणार आहेत.

प्रभात Tue, 30 March 2021 https://epaper.eprabhat.net/c/594

News Paper Clippings During March 2021

Section: Education

अकरावीसाठी ८२ टक्के प्रवेश

आठ महिने चालली प्रक्रिया; प्रवेश न घेतलेले विद्यार्थी १७.९५ टक्के

पुणे, ता. २९ : इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेंतर्गत ८७ हजार ४१४ विद्यार्थ्यांपैकी ८२.०५ टक्के म्हणजेच जवळपास ७१ हजार ७२२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे, तर १७.९५ टक्के विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी निवड होऊनही प्रवेश घेतलेला नसल्याची माहिती समोर आली आहे. प्रवेशप्रक्रिया तब्बल आठ महिने चालली.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी जवळपास एक लाख सात हजार २१५ जागा उपलब्ध होत्या. या जागांवरील प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविण्यात आली. यंदा कोरोनाच्या पार्श्वभूमीमुळे मार्च २०२०मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जुलै २०२० मध्ये जाहीर झाला. त्यानंतर ऑगस्टमध्ये इयत्ता अकरावीची प्रवेशप्रक्रिया सुरू झाली. या प्रक्रियेंतर्गत प्रवेशासाठी एकूण एक लाख तीन हजार २०४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यातील ८७ हजार ४१४ विद्यार्थ्यांचे अर्ज व्हेरीफाय झाले. त्यापैकी ७१ हजार ७२२ विद्यार्थ्यांनी आतापर्यंत प्रवेश घेतला आहे. तर तब्बल १५ हजार ६९२ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी नोंद होऊन ही प्रवेश घेतला नसल्याचे दिसून आले आहे. प्रवेश प्रक्रियेंतर्गत अतिरिक्त तिसऱ्या 'प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य' (एफसीएफएस) फेरीद्वारे प्रवेश घेऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना १९ मार्चपासून ते २६ मार्चपर्यंत प्रवेशासाठी शेवटची संधी देण्यात आली होती. या अंतर्गत १५६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

प्रवेशाचा तपशील

कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या	३०४
प्रवेश क्षमता	१,०७,२१५
एकूण पात्र विद्यार्थी	८७,४१४
प्रवेश घेतलेले विद्यार्थी	७१,७२२
रिक्त जागा	३५,४९३
प्रवेश न घेतलेले विद्यार्थी	१५,६९२

कोट्यांतर्गत झालेले प्रवेश

४,४३२ इनहाउस

३,११५ अल्पसंख्याक

२,४९६ व्यवस्थापन

फेऱ्यांनिहाय आकडेवारी

प्रवेश फेऱ्या	प्रवेश घेतलेले विद्यार्थी
पहिली नियमित फेरी	२२,३६८
दुसरी नियमित फेरी	९,४९५
तिसरी नियमित फेरी	३,८२१
विशेष पहिली फेरी	१४,२८५
विशेष दुसरी फेरी	३,४५२
एफसीएफएस पहिली फेरी	२६
एफसीएफएस दुसरी फेरी	३९६
एफसीएफएस तिसरी फेरी	९३१
एफसीएफएस चौथी फेरी	१,४३५
एफसीएफएस पाचवी फेरी	१,३२४
एफसीएफएस सहावी फेरी	१,३४८
एफसीएफएस सातवी फेरी	१,००५
एफसीएफएस २.० फेरी	१,५५७
एफसीएफएस ३.० फेरी	१५६

Sakaal 30.3.2021

दहावी-बारावी परीक्षा टांगणीला

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षा तोंडावर आलेल्या असतानाच कोरोनाचा प्रादुर्भाव वेगाने वाढतआहे. त्यातच स्थानिक प्रशासनाने ३० एप्रिलपर्यंत शाळा-महाविद्यालये बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे दहावी-बारावीच्या यंदा होणाऱ्या परीक्षांवर कोरोनाचे सावट निर्माण झाले आहे. एकीकडे विद्यार्थी आणि पालक चिंताग्रस्त झाले आहेत, तर दुसरीकडे परीक्षा पुढे ढकलाव्या लागणार असल्याची माहिती शिक्षण विभागातील सूत्रांनी दिली आहे.

राज्य मंडळामार्फत दहावीची लेखी परीक्षा दि. २९ एप्रिल ते दि. २० मे आणि बारावीची लेखी परीक्षा दि. २३ एप्रिल ते दि. २१ मे या कालावधीत प्रचलित पद्धतीने व मंजूर आराखड्यानुसार आयोजित केलेल्या आहेत. त्याचबरोबर दहावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षा दि.१२ एप्रिल ते दि. २८ एप्रिल आणि बारावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी तत्सम परीक्षा दि. ५ ते दि. २२ एप्रिल या कालावधीत घेण्यात येणार आहेत. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षांसाठी राज्य मंडळाने काही सवलती दिल्या असल्या तरी लेखी परीक्षा या नियोजित वेळेनुसारच होणार आहेत. त्यातच पुणे, मुंबई आणि नागपूर या शहरांमध्ये दिवसाला पाच हजारांहून अधिक कोरोना रुग्ण सापडायला लागले आहेत. दरम्यान, यासंदर्भात राज्य मंडळाकडून परीक्षा पुढे ढकलण्याबाबत सध्या कोणतीही हालचाल नसून वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा घेण्याची तयारी सुरू असल्याची माहिती राज्य मंडळातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.

पुढारी वॉच

- कोरोनाचे गडद सावट
- विद्यार्थी-पालक चिंताग्रस्त
- परीक्षा पुढे ढकलण्याची शक्यता
- ३० एप्रिलपर्यंत शाळा-महाविद्यालये बंद

काय आहेत अडचणी...

- परीक्षा केवळ ऑफलाइन असल्याने केंद्रावर हजेरी लावण्याशिवाय विद्यार्थ्यांना पर्याय नाही
- परीक्षा लांबली तर पुढील वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेवर परिणाम होणार
- कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे परीक्षेशी संबंधित घटक भयभीत
- परीक्षा काळात लॉकडाऊन झाल्यास विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहचण्यास अडचणी येणार

Pudhari 30.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

केवळ एम.फिल.च्या आधारे प्राध्यापकांच्या नियुक्त्या

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २९ - 'नेट' किंवा 'सेट'ची पात्रता नसताना केवळ एम.फिल.च्या आधारे १९९४ ते २००९ या कालावधीत सहायक प्राध्यापकपदी नियुक्त्या मिळवलेल्या आणि पदोन्नतीचे (कॅस) लाभ घेणाऱ्या प्राध्यापकांची माहिती उच्च शिक्षण विभागाने मागविली आहे. तसेच, या प्राध्यापकांच्या नियुक्त्या करणाऱ्या आणि त्यांना कॅसचे लाभ देणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांची माहिती



पाठविण्याचे आदेश उच्च शिक्षण विभागाने विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकांना दिले आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यापीठे आणि महाविद्यालयात सहायक प्राध्यापक

पदोन्नतीचा लाभही : उच्च शिक्षण विभागाने मागविली माहिती

पदासाठी १९९१ नंतर नेटची पात्रता बंधनकारक केली आहे. त्यानंतर राज्यानेही सेटची पात्रता लागू केली. दरम्यानच्या कालावधीत नेट किंवा सेटची पात्रता मिळवण्याच्या अटीवर यूजीसीने काही काळासाठी नियम शिथिल केले होते. मात्र, यूजीसीच्या या अटीचा चुकीचा अर्थ काढून नेट किंवा सेटची पात्रता नसतानाही एम.फिल.च्या पात्रतेवर कार्यरत सहायक प्राध्यापकांकडून कॅसचे लाभ घेण्यात येत आहे. अशाप्रकारे लाभ घेणारे राज्यात साधारण अडीच हजार प्राध्यापक आहेत. ही नियमबाह्य असून, त्याचा आर्थिक भार सरकारच्या तिजोरीवर पडत आहे. याबाबत प्रशासन अधिकारी सुयश दुसाने यांनी नुकतेच पत्र काढून सर्व सहसंचालकांना माहिती पाठविण्याचे आदेश दिले आहेत.

प्रभात Tue, 30 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59441075

ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

पुणे, दि. २९ - राज्य शासनाने वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची पदे भरण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक असणाऱ्या 'ना हरकत प्रमाणपत्र' घेण्यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकांनी सर्व महाविद्यालयांना केले आहेत.

राज्य सरकारने नुकतेच अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यास मुभा दिली आहे. त्यानुसार सर्व महाविद्यालयांतील ३ मे २०२० पर्यंत रिक्त पदे असलेली प्राचार्यांची पदे भरता येणार आहेत. ज्या महाविद्यालयात ही पदे रिक्त आहेत, त्यांनी पुणे विभागीय सहसंचालकांच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावेत. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची यादीही विभागाने प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार योग्य पद्धतीने तातडीने अर्ज करणे आवश्यक आहे, असे सहसंचालक डॉ. संजय जगताप यांनी केले आहे.

प्रभात Tue, 30 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59441107

News Paper Clippings During March 2021

Section: Education

उपकेंद्र विस्तारासाठी विद्यापीठाचे पाऊल

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अहमदनगर आणि नाशिक येथील उपकेंद्रांचा विस्तार करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनने पाऊल उचलले आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाने याठिकाणी मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी तरतूद केली आहे. यासंबंधीचे परिपत्रक विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी काढले आहे.

मनुष्यबळ वाढविण्यासाठी होणार तरतूद

विद्यापीठाच्या नाशिक व नगर या उपकेंद्रास राज्य शासनाने २२ जानेवारी २०१२ रोजी मान्यता दिली आहे. गेली अनेक वर्षे ही उपकेंद्रे शासनाच्या उदासीनतेमुळे दुर्लक्षित होती.

दरम्यान, या ठिकाणी विद्यापीठास मंजूर असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधातून कार्यरत कर्मचाऱ्यांमधूनच हे मनुष्यबळ उपलब्ध करता येणार आहे. तसेच, चतुर्थ श्रेणीतील पदे बाह्य यंत्रणेद्वारे भरण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. पहिल्या टप्प्यात या दोन्ही उपकेंद्रांच्या ठिकाणी लेखा व सर्वसाधारण विभागासाठी प्रत्येक कक्षाधिकारी, सहायक कक्षाधिकारी, वरिष्ठ सहायक ४ आणि कनिष्ठ सहायक २ अशा एकूण १० पदांची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक केंद्रास ५ याप्रमाणे ही पदांची तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठात येणाऱ्यांची संख्या कमी होईल...

उपकेंद्राच्या परिसरातील महाविद्यालय व विद्यार्थ्यांच्या अडचणी, शंका त्याच ठिकाणी सोडविणे आवश्यक आहे. मात्र, मनुष्यबळ नसल्याने छोटे काम, अथवा प्रश्नांसाठी विद्यार्थी, प्राध्यापक व प्राचार्यांना पुणे विद्यापीठात यावे लागत होते. आता उपकेंद्राच्या ठिकाणीच नगर व नाशिकमधील अभ्यागतांच्या प्रश्नांची उत्तरे प्राप्त होतील. त्यामुळे विद्यापीठात येणाऱ्यांची संख्या कमी होईल.

उपकेंद्राच्या ठिकाणी बदलीही होऊ शकते...

विद्यापीठात आवश्यकतेनुसार उपलब्ध असलेल्या शासनमान्य पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी नाशिक व नगर उपकेंद्रासाठी बदलीद्वारे पाठवले जाऊ शकते, अशी माहिती डॉ. प्रफुल्ल पवार यांनी दिली. त्यामुळे शासनमान्य पदावर कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपकेंद्राच्या ठिकाणी बदली करण्यास विद्यापीठाला रीतसर अधिकार प्राप्त झाले आहेत.

Pudhari 30.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

विद्यापीठाच्या नगर, नाशिक उपकेंद्रांचे होणार सक्षमीकरण

आकृतिबंध केला तयार : उपकेंद्राच्या दुरवस्थेबाबत अधिसभा सदस्यांचा पाठपुरावा

फॉलो अप

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील उपकेंद्राच्या दुरवस्थेबाबत विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांकडून नेहमीच प्रश्न उपस्थित करण्यात आले. मात्र, राज्य शासनाने या केंद्रांना अधिकृत मान्यता दिली. विद्यापीठ प्रशासनानेही येथे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी आकृतिबंध तयार केला आहे. त्यामुळे या केंद्राच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला उशिरा का होईना, सुरुवात झाली आहे.

गेली अनेक वर्षे विद्यपीठाची उपकेंद्र शासनाच्या उदासीनतेमुळे दुर्लक्षित होती. मात्र, शासनाची मान्यता मिळाल्यामुळे येथे विविध कामे हाती घेण्यास विद्यापीठ प्रशासनाने सुरुवात केली आहे. विद्यापीठास मंजूर असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधातून उपकेंद्राला मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाणार आहे, तसेच चतुर्थश्रेणीतील पदे बाह्य यंत्रणेद्वारे भरण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. त्याचा विचार करून मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी तात्पुरती तरतूद केली आहे. सध्या या दोन्ही उपकेंद्राच्या ठिकाणी लेखा व सर्वसाधारण विभागसाठी प्रत्येक कक्षाधिकारी, सहायक कक्षाधिकारी, वरिष्ठ सहायक ४ आणि कनिष्ठ सहायक २ अशा एकूण १० पदनामांची तरतूद केली आहे. प्रत्येक केंद्रास प्रत्येकी ५ याप्रमाणे हे मनुष्य बळ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या प्रशासकीय कामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उपलब्ध असलेल्या शासनमान्य पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी आवश्यकतेनुसार, नाशिक व नगर उपकेंद्रासाठी अधिकारी व सेवक नियुक्तीची प्रक्रिया विद्यापीठाने सुरू केली असल्याचे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.प्रफुल्ल पवार यांनी सांगितले. शासनानेच या केंद्रांना मान्यता दिल्याने, उपकेंद्राच्या ठिकाणी कर्मचारी व अधिकाऱ्यांची बदली करण्याचे अधिकार विद्यापीठाला प्राप्त झाले आहेत.

विद्यापीठात येणाऱ्यांची संख्या कमी होणार

अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयातील व विद्यार्थ्यांच्या अडचणी, शंका उपकेंद्रावर सोडविणे अपेक्षित आहे. मात्र, उपकेंद्रावर मनुष्यबळ नसल्याने सर्वच कामांसाठी विद्यार्थी, प्राध्यापक व प्राचार्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात यावे लागत होते, परंतु आता उपकेंद्राच्या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी नियुक्त होणार असल्याने विद्यापीठात येणाऱ्यांची संख्या कमी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

Pune Main
Page No. 2 Mar 30, 2021
Powered by: erelego.com

News Paper Clippings During March 2021

Section: Education

प्राचार्य भरत शिंदे सिनेट सदस्यपदी

बारामती, ता. २० : येथील विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. प्राचार्य गटातून नामनिर्देशन होऊन त्यांची नियुक्ती झाली आहे. विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या सुनेत्रा पवार, कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्यामुळे संधी मिळाल्याचे डॉ. शिंदे यांनी नमूद केले.

Sakaal 21.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

» रि-स्किलिंग

विनोद बिडवाईक

नोकरीच्या दिमाखदार कारकीर्दीसाठी...

आपली कारकीर्द एखाद्या संस्थेत दिमाखदार करायची असल्यास आपली कार्यपद्धती त्या संस्थेच्या कार्यसंस्कृतीसोबत जुळायला हवी. काम करण्याची पद्धत आणि संस्थेची कार्यसंस्कृती ह्या एकमेकाला पूरक असायला हव्यात.

काही संशोधकांनी माकडांवर एक प्रयोग केला. पाच-सहा माकडांचा एक समूह एका खोलीत ठेवला आणि खोलीच्या बाहेर जाण्यासाठी एक झरोका ठेवला. एका हुशार माकडाला तो झरोका दिसला आणि तो तिथपर्यंत जायला तयार झाला. तो वर चढायला लागणार, तोच इतर माकडांवर थंड पाणी टाकण्यात येई. ते बघून ती इतर माकडे वर जाणाऱ्या माकडाला खाली ओढत. संशोधकांनी नंतर एका माकडाला बाहेर काढले आणि मग नवीन माकडाला आत सोडण्यात आले. नव्या दमाच्या त्या माकडाने परत प्रयत्न केला, परत इतर माकडांनी त्याला खाली ओढले. असे करत करत सर्व माकडे एका मागून एक बाहेर काढली गेली आणि एक-एक नवीन माकडाने त्याची जागा घेतली. खोलीतल्या इतर माकडांनी नव्या माकडाला काही वर चढू दिले नाही. शेवटी त्या खोलीमध्ये सर्व नवीन माकडे होती, पण त्यांनाही त्यांच्या वागण्याचा मथितार्थ कळला नाही.

कोणत्याही संस्थेमध्ये असेच असते. जुन्या मंडळींना नवीन मंडळींनी आपल्यासारखेच वागावे असे वाटते आणि नवीन मंडळी तशीच वागायला लागतात. कार्यसंस्कृती अशी तयार होत असते. या जगात मुखवटेच खूप असतात. माणूस मुखवटे लावूनच जगत असतो. व्यक्तिमत्त्व तयार होते, ते अशा अनेक मुखवट्यांचे. आणि असे अनेक मुखवटे एकत्र येऊन स्वतःची एक वेगळी कार्यसंस्कृती तयार करत असतात.

त्यामुळे एखाद्या संस्थेत काम करत असताना अथवा नोकरी बदलत असताना ह्या कार्यसंस्कृतीचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. संस्थेमधील व्यक्ती ज्या गोष्टी करतो, वागतो त्या करण्याच्या आणि वागण्याच्या पद्धती म्हणजे संस्थेची कार्यसंस्कृती. समूहातील व्यक्तींच्या एकमेकांच्या वागण्याच्या, कामे करून घेण्याच्या, कामाच्या पद्धती आणि एकत्रितपणे जोपासलेली मूल्ये म्हणजे 'कार्यसंस्कृती'. खूपदा या सर्व पद्धती अलिखित असतात. त्या कोणत्याही 'सिस्टिम्स' आणि 'स्टँडर्ड ऑपरेटिंग' प्रोसिजरमध्ये बांधता येत नाहीत.

त्यामुळे त्या समजायला थोड्या अवघड वाटतात, परंतु लोकांच्या वागण्याबोलण्याच्या तऱ्हेवरून, तेथील अदृश्य वातावरणातून तुम्ही ह्या कार्यसंस्कृतीचा मागोवा घेऊ शकता. एखाद्या संस्थेत प्रवेश केल्यानंतर एकप्रकारचा तणाव जाणवतो, तर एखाद्या संस्थेत उत्साह, एखाद्या संस्थेत तरतरीत वातावरण असते, तर एखाद्या संस्थेत मरगळ आलेली जाणवते. एखादी स्वागतिका सतत त्रासलेल्या चेहऱ्याने उत्तर देते, तर एखादी सतत हसतमुख असते. तिची वर्तणूक त्या संस्थेचा आरसा असतो.

मुलाखतीला गेलात तर ह्या अदृश्य वातावरणाचा अभ्यास नक्की करा.

News Paper Clippings During March 2021

Section: Education

महाविद्यालये बंद असताना नशामुक्तीचे अभियान?

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालयात नशामुक्त अभियान राबवण्याचे परिपत्रकाद्वारे संलग्न महाविद्यालयांना निर्देश दिले आहेत. मात्र करोनाच्या प्रादुर्भावामुळे महाविद्यालये बंद असताना नशामुक्त अभियान राबवणार कसे असा प्रश्न उपस्थित होत आहे.

केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय मंत्रालयातर्फे देशभरात नशामुक्त अभियान राबवले जाणार आहे. या पार्श्वभूमीवर नशामुक्त अभियान समितीतर्फे जिल्हाधिकाऱ्यांनी नशामुक्त अभियान राबवण्याचे निर्देश विद्यापीठाला दिले आहेत. त्यानुसार विद्यापीठाने परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. देशातील तरुण पिढीला व्यसनाधीन होण्यास प्रतिबंध करणे, जनतेमध्ये नशामुक्त राहण्याबाबत जागरुकता निर्माण करणे, मद्य, धूम्रपान, अमली पदार्थ सेवनास प्रतिबंध करणे करणे गरजेचे आहे. या अनुषंगाने महाविद्यालय स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्ती क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांमार्फत व्यसनापासून दूर राहण्याबाबत महाविद्यालयात कार्यशाळा, संमेलन, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्याबाबत परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे नशामुक्त अभियानातील कार्यक्रम राबवणार कसे, असा प्रश्न विचारला जात आहे.

लोकसत्ता Tue, http:

लोकमत

प्रकाशकांना मिळेना इंटरनॅशनल स्टँडर्ड बुक नंबर : केंद्राने केली पुस्तक नोंदणीसाठी किचकट प्रक्रिया

पुस्तके अडकली 'आयएसबीएन'च्या चक्रात

स्पेशल रिपोर्ट

नम्रता फडणीस
लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोनामुळे ९४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला दिलेली स्थगिती, ग्रंथ प्रदर्शनाद्वारे होणाऱ्या पुस्तक व्यवहाराला बसलेली खीळ, ग्रंथालयांचे थकलेले अनुदान, ग्रंथालयांकडून पुस्तकांची रखडलेली खरेदी, असे प्रकाशन व्यवसायांच्या मागे एकामागून एक शुक्लकाष्ट लागले आहे. त्यात आता पुस्तकांसाठी आवश्यक असणाऱ्या इंटरनॅशनल स्टँडर्ड बुक नंबर (आयएसबीएन)च्या विलंबाची भर पडली आहे. केंद्राच्या राजा राममोहन रॉय नॅशनल एजन्सीच्या संकेतस्थळाचे नूतनीकरण केल्यामुळे ही प्रक्रिया अधिकच किचकट केली आहे. पुस्तक नोंदणीची सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही प्रकाशकांना आयएसबीएन क्रमांकासाठी प्रतीक्षाच करावी लागत आहे. यामुळे नवीन दर्जेदार पुस्तके वाचकांसाठी तयार असूनही, ती या 'आयएसबीएन'च्या प्रक्रियेत अडकली आहेत.

एखादे पुस्तक छापण्यासाठी, ऑनलाइन विक्रीस देण्यासाठी, ग्रंथालयांना पुस्तक खरेदी करण्यासाठी अथवा लेखकाच्या पुस्तकातील कथा किंवा तत्सम मजकूर एखाद्या अभ्यासक्रमाला लावण्याकरिता देण्यासाठी प्रकाशकांकडे पुस्तकासंबंधीचा इंटरनॅशनल स्टँडर्ड बुक नंबर (आयएसबीएन) असणे बंधनकारक आहे. त्याकरिता केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या उच्चशिक्षण विभागांतर्गत राजा राममोहन रॉय नॅशनल एजन्सी नियुक्त केली आहे. या एजन्सीच्या पोर्टलवर प्रकाशकांना पुस्तकांची नोंदणी करणे गरजेचे आहे. मात्र, लॉकडाऊनच्या काळात नूतनीकरणामुळे हे संकेतस्थळ काही महिने बंद होते व आता जरी ते पूर्ववत सुरू केले असले, तरी नोंदणीच्या किचकट प्रक्रियेमुळे प्रकाशकांना आयएसबीएन क्रमांक सहजरीत्या व तातडीने मिळणे अवघड झाले आहे. ही प्रक्रिया पूर्ण करूनही आयएसबीएन क्रमांक मिळत नसल्याचे प्रकाशकांकडून सांगण्यात आले आहे.

कोणतंही पुस्तक हे आयएसबीएन क्रमांकाशिवाय छापले जाऊ शकत नाही. गेल्या सहा महिन्यांपासून आयएसबीएनच्या संकेतस्थळाबाबत अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या साइटवर लॉगिन करून क्रमांकासाठी अप्लाय करावे लागते. त्याकरिता पुस्तकांची संपूर्ण माहिती टाकल्यानंतर लगेचच आयएसबीएन क्रमांक दिला जातो. जगभरात आयएसबीएन क्रमांक हा खूप महत्त्वाचा असून, या क्रमांकावर तुमच्या पुस्तकाची नोंदणी होते. हा क्रमांक न मिळाल्यामुळे देशभरात लाखो पुस्तके रखडली आहेत. आमची शंभर पुस्तके तयार आहेत, पण क्रमांक मिळाल्याशिवाय ही पुस्तके प्रकाशित करू शकत नाही.
- योजना यादव, प्रॉडक्शन हेड, मेहता पब्लिकेशन हाउस

आमच्या प्रकाशनाची जवळपास पन्नास पुस्तके आली आहेत. अनेक नव्या दर्जेदार पुस्तकांची आम्ही दमदारपणे तयारी करून ठेवलीय. अनेक पुस्तकांच्या प्रकाशनाचे नियोजन झालंय, परंतु मागील एक महिन्यापासून पुस्तकांचे आयएसबीएन क्रमांक मिळत नाहीत. पूर्वी एका दिवसात आयएसबीएन क्रमांक मिळायचे. आता या संकेतस्थळाचे नूतनीकरण केले असून, अनेक किचकट बदल केले आहेत. ही सर्व प्रक्रिया ऑनलाइन असल्याने, आम्हा प्रकाशकांकडून जीएसटी लायसन्सची कॉपी, शॉप ॲक्टची कॉपी सर्व मागविली जात आहे. त्याचीही आम्ही पूर्तता केली आहे. त्यानंतर, नवीन लॉगिन देण्यात आले. त्या माध्यमातून सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही आयएसबीएन क्रमांक मिळत नाहीये.
- घनश्याम पाटील, चपराक प्रकाशन

Pune Main
Page No. 2 Mar 16, 2021
Powered by: erelego.com

सरकारकडे विद्यापीठाची थकबाकी

रक्कम तब्बल १४४ कोटी ६२ लाख रुपयांवर; आर्थिक स्थितीबाबत चिंता

पुणे, ता. १६ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या फंडातील निधीला गळती लागल्याने यातील जमा निम्म्याने कमी होऊन ३०० कोटींपर्यंत आलेली आहे. असे असताना राज्य सरकारकडे पुणे विद्यापीठाची १४४ कोटी ६२ लाख ८८ हजार २५० रुपयांची थकबाकी असल्याचे समोर आले आहे.

अधिसभा सदस्य डॉ. कान्हू गिरमकर यांनी यासंदर्भात लेखी प्रश्न विचारला असून, त्यावर विद्यापीठाने उत्तरात ही माहिती दिली आहे. पुणे विद्यापीठाला राज्य सरकारकडून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी निधी दिला जातो. हा निधी वेळेवर मिळत नसल्याने त्याची थकबाकी दीडशे कोटींच्या जवळ जाऊन पोचली आहे. पुणे विद्यापीठाकडून विविध विभागात तात्पुरत्या स्वरूपात सहाय्यक प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त केले जातात, त्यांचे वेतन विद्यापीठ फंडातून दिले जाते. यासह इतर सुविधा फंडातून जात असल्याने हा निधीच्या नावाने असलेल्या ठेवी मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने विद्यापीठाच्या आर्थिक स्थितीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

डॉ. गिरमकर यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी विद्यापीठ फंडातून किती रक्कम खर्च केली जात आहे आणि आतापर्यंत किती खर्च झाला आहे, असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यास विद्यापीठ प्रशासनाने गेल्या दोन वर्षांची आकडेवारी उपलब्ध करून दिली आहे. २०१९-२० या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ फंडातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी अनुक्रमे १७ कोटी ७९ लाख ५० हजार आणि २० कोटी ७४ लाख ४८ हजार इतका खर्च झाला आहे. तर २०२०-२१ मध्ये शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी अनुक्रमे १६ कोटी ७८ लाख ६० हजार आणि २३ कोटी ३५ लाख ३५ हजार रुपये इतकी रक्कम खर्च झाली आहे. गेल्या दोन वर्षांत विद्यापीठ फंडातून फक्त वेतनासाठीच ७८कोटी ६७ लाख ९४ हजार ७२६ रुपये खर्च झाल्याचे यानिमित्ताने समोर आले आहे.

News Paper Clippings During March 2021

Section: Education

खर्चिक योजना, बांधकामांना कात्री!

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ५९३ कोटींचा अर्थसंकल्प सादर

पुणे, ता. २० : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा २०२१-२२ या वर्षाचा ५९३ कोटी ५४ लाख १५ हजारांचा अर्थसंकल्प ऑनलाइन अधिसभेत सादर करण्यात आला. यात तब्बल ५२ कोटी रुपयांची तूट असून, खर्चाला लगाम लावण्याचे व उत्पन्न वाढविण्याचे आव्हान असल्याने नव्या योजनांचा यात समावेश न करता काटकसरीचा संकल्प करण्यात आला आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाइन अधिसभा झाली. त्यामध्ये व्यवस्थापन समिती सदस्य राजेश पांडे यांनी अर्थसंकल्प सादर केला. त्यास सदस्यांनी मान्यता दिली असून, सदस्यांच्या कपात सूचना व त्यावरील चर्चेसाठी कोरोनाचा धोका कमी झाल्यानंतर पुढील महिन्यात प्रत्यक्ष सभेचे आयोजन केले जाणार आहे. कोरोनामुळे सलग दुसऱ्या वर्षी ऑनलाइन अर्थसंकल्प मांडावा लागला आहे.

या अर्थसंकल्पात नव्या खर्चिक योजना व नवे बांधकामे यास ब्रेक लावण्यात आला आहे. तसेच खर्चामध्ये कपात केली आहे. ती कामे व योजना सुरू ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. पुणे विद्यापीठाच्या ठेवी गेल्या चार वर्षात १८० कोटी रुपयांनी कमी झाल्या असून, यंदा ३२५ कोटी रुपये शिल्लक आहेत. या ठेवींमधून विद्यापीठाच्या देखभालीसाठी सुमारे ३० कोटी, विद्यापीठ फंडातून वेतनासाठी ६० कोटी आणि प्रशासकीय कामासाठी सुमारे ३० कोटी असा १२० कोटी रुपये खर्च अपेक्षीत आहे. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी ९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, त्यामध्ये सुमारे ४० हजार विद्यार्थी लाभार्थी असतील.

'कमवा व शिका'साठी सहा कोटी

अर्थसंकल्पात कमवा व शिका योजनेसाठी सहा कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यंदा महाविद्यालयांसाठी तीन कोटींऐवजी चार कोटी रुपये तर, विद्यापीठातील विभागांसाठी तीन ऐवजी दोन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महाविद्यालयांमध्ये लाखो विद्यार्थी शिक्षण घेत असताना त्यांना निधी कमी मिळत असल्याची टीका केली जात होती. त्यामुळे यंदा तरतूद एक कोटीने वाढवली आहे.

ठळक वैशिष्ट्ये

- विद्यापीठ परिसरात फिरणाऱ्यांसाठी एसपीपीयू ऑक्सिपार्क योजना
- मुख्य इमारतीसाठी एसपीपीयू हेरिटेज वॉक योजना
- हत्ती तलाव येथे नक्षत्र उद्यानासाठी ५० लाख
- आदिवासी विद्यार्थ्यांना क्रीडा प्रशिक्षणासाठी ४० लाख
- विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांकडून निधी उभारणार

"विद्यापीठाच्या जमा व खर्चाचा ताळमेळ घालून हा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे, यामध्ये नवे बांधकाम, योजनांवर खर्च केला जाणार नाही. विद्यार्थ्यांसाठीच्या योजनेच्या निधीत कपात करण्यात आलेला नाही. या अर्थसंकल्पावर पुढील महिन्यात सविस्तर चर्चा होईल.

- राजेश पांडे,
सदस्य, व्यवस्थापन परिषद

असे येणार उत्पन्न

१३० कोटी ३४ लाख वेतन : राज्य सरकार अनुदानित	१०४ कोटी ३ लाख प्रशासकीय सर्वसाधारण विभाग
१३६ कोटी ५८ लाख परीक्षा विभाग	४१ कोटी ४७ लाख विद्यापीठातील शैक्षणिक विभाग
१२ कोटी ७१ लाख विद्यार्थ्यांसाठी सेवा	१३ कोटी १० लाख स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम व योजना

असा होणार खर्च

१३० कोटी ३४ लाख वेतन : राज्य सरकार अनुदानित	५५ कोटी ३० लाख वेतन : विनाअनुदानित
२१ कोटी ४६ लाख प्रशासकीय विभाग	११६ कोटी ४५ लाख विद्यार्थीविषयक सेवा व सुविधा
५ कोटी ३५ लाख शैक्षणिक गुणवत्ता सुधार कार्यक्रम	५१ कोटी ५ लाख पायाभूत सेवा विभाग
४५ कोटी २५ लाख इमारत बांधकामे, सुविधा, सुधारणा	८८ कोटी ३१ लाख स्वतंत्र प्रकल्प व योजना

Sakaal 21.3.2021

News Paper Clippings During March 2021

Section: Education

उच्च शिक्षणमंत्र्यांच्या आदेशाला पुणे विद्यापीठाकडून हरताळ

दुर्मीळ चित्रठेवा अद्यापही जतनाच्या प्रतीक्षेत

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दुर्मीळ चित्रठेव्याच्या जतन करण्याबाबत दिलेल्या आदेशाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने हरताळ फासला आहे. सामंत यांनी चित्रांच्या जतनासाठी दिलेली मुदत उलटून गेली असून, चित्रांच्या जतन आणि संवर्धनासाठी तज्ज्ञ समिती नेमण्याव्यतिरिक्त विद्यापीठाने पुढे काहीच पावले उचलली नाहीत. विशेष म्हणजे विद्यापीठाने चित्रांच्या जतनासाठी अर्थसंकल्पात आर्थिक तरतूदही केलेली नसल्याचे समोर आले आहे. 'मराठेशाहीपासूनचा चित्रठेवा धूळ-बुरशीत खितपत' या वृत्ताद्वारे 'लोकसत्ता'ने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील *(पान १२ वर)*

जतन आवश्यक...

विद्यापीठाच्या संग्रहातील काही चित्रांची परिस्थिती बिकट झाली आहे. चित्रांचे कॅनव्हास फाटणे, रंगांचे पोपडे पडणे असे प्रकार झाले आहेत. त्यामुळे या चित्रांसाठी प्रत्येक दिवस महत्त्वाचा असून, तातडीने जतन न झाल्यास हा चित्रठेवा नष्ट होऊ शकतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

"विद्यापीठाने पुरातत्व विभागाच्या प्रस्तावाला अद्यापही प्रतिसाद दिलेला नाही. तसेच चित्रांच्या जतनासाठी अन्य पर्यायही विद्यापीठाने सुचवलेला नाही.

– **डॉ. तेजस गर्गे**, पुरातत्व विभागाचे संचालक, चित्रांच्या जतन समितीचे अध्यक्ष

"चित्रांच्या जतनासाठी स्वतंत्र तरतूद केलेली नाही हे खरे आहे. पण देखभालीसाठीच्या खर्चातून चित्रांच्या जतनाचे काम करता येईल. त्यासाठी निधी कमी पडणार नाही.

– **राजेश पांडे**, व्यवस्थापन परिषद सदस्य

लोकसत्ता Thu, 25 March 2021
https://epaper.loksatta.com/c/59327503

उच्च शिक्षणमंत्र्यांच्या आदेशाला पुणे विद्यापीठाकडून हरताळ

(पान ३ वरून) दुर्मीळ चित्रांची स्थिती समोर आणली होती. त्यानंतर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी तातडीने ऑनलाइन बैठक घेऊन मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत या चित्रांच्या जतनाचे काम पूर्ण करून, त्या चित्रांचे स्वतंत्र दालन करण्याचा आदेश दिला होता. त्यानंतर चित्रांच्या जतनासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी पुरातत्त्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची समिती नियुक्त के ली. पुरातत्त्व विभागातर्फे विद्यापीठातील चित्रांची पाहणी करून जतनासाठीच्या १ कोटी २३ लाख २५ हजारांच्या खर्चाचा प्रस्ताव ३ फे ब्रुवारीला विद्यापीठाला देण्यात आला होता. मात्र विद्यापीठाने या प्रस्तावाला काहीच प्रतिसाद दिलेला नाही.

पुरातत्त्व विभागाने दिलेला प्रस्ताव खर्चीक असल्याने चित्रांच्या जतनासाठी अन्य तज्ज्ञांकडून प्रस्ताव मागवण्याचा विचार सुरू असल्याची माहिती विद्यापीठातील सूत्रांनी दिली. चित्रांच्या जतनासाठीच्या आवश्यक निधीची स्वतंत्र तरतूद अर्थसंकल्पात होणे आवश्यक होते. मात्र करोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठापुढे आर्थिक अडचणी निर्माण झाल्याचे सांगत नवे कोणतेही प्रकल्प अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे चित्रांच्या जतनासाठी अर्थसंकल्पात तरतूदही करण्यात आली नसल्याचे सूत्रांनी नमूद केले. चित्रांच्या जतनासाठी आवश्यक निधी जमा करण्यासाठी अन्य पर्यायांसाठीच्या हालचालीही विद्यापीठाने अद्याप केलेल्या नाहीत. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिलेली मुदत संपूनही विद्यापीठाकडून समिती नियुक्त करण्याव्यतिरिक्त पुढे काहीच कार्यवाही झाली नसल्याने चित्रांचे जतन करण्याची विद्यापीठाची खरोखरच इच्छाशक्ती आहे का, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

लोकसत्ता Thu, 25 March 2021
https://epaper.loksatta.com/c/59326006

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

विद्यापीठाच्या ठेवी संपुष्टात येण्याची भीती

विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्यांना चिंता : चार वर्षांत १८० कोटींचा खर्च

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ठेवीमध्ये निम्म्याने घट झाली असून, विद्यापीठाने आपल्या खर्चावर नियंत्रण आणून उत्पन्नात वाढ केली नाही, तर पुढील चार ते पाच वर्षांत विद्यापीठाच्या ठेवी संपुष्टात येण्याची भीती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य व्यक्त करत आहेत.

कोरोनामुळे बँकांनी व्याजदरात मोठी कपात केली. त्यामुळे विद्यापीठाला ठेवींच्या व्याजातून मिळणाऱ्या उत्पन्नात मोठी घट झाली. तसेच गेल्या काही वर्षापासून केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून विद्यापीठाला मिळणारा निधी पूर्णपणे बंद झाला. त्यामुळे विद्यापीठाची आर्थिक स्थिती चिंताजनक झाली आहे. त्यातच विद्यापीठात सुरू असणाऱ्या विविध बांधकामासाठी विद्यापीठ फंडातील ३० ते ४० कोटींचा निधी खर्च होत आहे.

शासनाने थकवली रक्कम

पाच-सहा वर्षांपूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे सुमारे साडेपाचशे कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. दरम्यानच्या काळात यातील तब्बल यातील अडीचशे कोटी रुपये दरम्यानच्या काळात विविध कारणांसाठी खर्च करण्यात आले आहेत. त्यामुळे ठेवींमध्ये मोठी घसरण झाली आहे. शासनाकडून शंभर कोटी रुपये वेतनापोटी विद्यापीठाला मिळणे अपेक्षित आहे. मात्र ते मिळत नसल्याने ठेवींमधील घसरण रोखणे विद्यापीठास अवघड होत चालले आहे.

शासनाने विद्यापीठातील रिक्त झालेली पदे भरण्यास मान्यता दिली नाही. त्यामुळे विद्यापीठ प्राशासनाला विद्यापीठ फंडातून शिक्षक व शिक्षकेतर पदांवर शेकडो कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या कराव्या लागल्या. त्यांचे वेतन अदा करण्यासाठी दर वर्षी विद्यापीठ फंडातील तब्बल ६० कोटी रुपये खर्च होत आहेत. शासनाने पद भरतीस मान्यता दिल्याशिवाय हा खर्च कमी करता येणार नाही.

गेल्या चार वर्षात विद्यापीठाच्या ठेवी १८० कोटीने कमी झाल्या आहेत. मात्र, विद्यापीठाच्या स्थावर मालमत्तेत २४० कोटीने वाढ झाली आहे. यंदा विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात काही खर्चावर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. परंतु, विद्यापीठाने अद्याप उत्पन्न वाढीच्या साधने निर्माण केली नाही. त्यामुळे हीच परिस्थिती कायम राहिली तर विद्यापीठाच्या ठेवी संपुष्टात येतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

Hello Pune
Page No. 3 Mar 25, 2021
Powered by: erelego.com

पुणे विद्यापीठाच्या दिरंगाईची उच्च शिक्षणमंत्र्यांकडून झाडाझडती

चित्रांच्या जतनासाठी विद्यापीठाकडून पहिल्या टप्प्यातील खर्चाला मान्यता

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील दुर्मीळ चित्रठेव्याच्या जतनाच्या दिरंगाईबाबत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी झाडाझडती घेतली. त्यानंतर विद्यापीठाने पहिल्या टप्प्यात चित्रांच्या जतनासाठी निधीला मान्यता दिली.

विद्यापीठाच्या संग्रहात असलेल्या मराठेशाहीपासूनच्या दुर्मीळ चित्रांच्या जतनाबाबत सामंत यांनी जानेवारीत घेतलेल्या ऑनलाइन बैठकीत मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत काम पूर्ण करण्याचा आदेश विद्यापीठाला दिला होता. मात्र विद्यापीठाकडून चित्रांच्या जतनाच्या कामासाठी तज्ज्ञांची समिती नियुक्त करण्याव्यतिरिक्त काहीच हालचाल करण्यात आली नसल्याचे, तसेच विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात या चित्रांच्या जतनासाठीच्या निधीची स्वतंत्र तरतूदही करण्यात आली

नसल्याचे स्पष्ट झाले होते. या पार्श्वभूमीवर 'उच्च शिक्षणमंत्र्यांच्या आदेशाला पुणे विद्यापीठाकडून हरताळ' हे वृत्त 'लोकसत्ता'ने गुरुवारी प्रसिद्ध केले होते. या वृत्ताची दखल घेऊन सामंत यांनी पुन्हा ऑनलाइन बैठक घेऊन चित्रांच्या जतनासाठी का दिरंगाई झाली याबाबतची झाडाझडती घेतली.

चित्रांच्या जतनाच्या कामाबाबत तज्ज्ञ समितीने अभ्यास करून दुरुस्तीच्या कामाचा तपशील आणि खर्च निश्चित केलेला आहे. सदर कामासाठी सक्षम संस्थांचे, कलाकारांचे पर्याय विद्यापीठाच्या विचाराधीन आहेत. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने पहिल्या टप्प्यातील खर्चाला मान्यता दिली आहे, अशी माहिती विद्यापीठाकडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली.

> विद्यापीठाकडून चित्रांच्या जतनाच्या कामास दिरंगाई झाल्याचे मान्य करण्यात आले. पहिल्या टप्प्यात सहा चित्रांचे काम पूर्ण करण्यात येणार असल्याचे, त्यासाठीच्या निधीच्या खर्चाला मान्यता देण्यात आल्याचे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे. चित्रांच्या जतनाचे काम लवकर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
>
> – उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री

लोकसत्ता Fri, 26 March 2021
https://epaper.loksatta.com/c/59357458

News Paper Clippings During March 2021

Section: Education

विद्यापीठाची आर्थिक घडी विस्कटली

तीन वर्षांपूर्वीच्या ५५० कोटींच्या ठेवी ३२५ कोटींवर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २७ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे तीन वर्षांपूर्वी ५५० कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. या विद्यापीठाच्या ठेवी ३२५ कोटींवर आल्या आहेत. जवळपास आतापर्यंत २२५ कोटी रुपयांच्या ठेवी कमी झाल्याची माहिती समोर आली आहे. करोनामुळे विद्यापीठाची आर्थिक घडी विस्कटली असली तरी या ठेवी कोणत्या कारणावरून खर्च करण्यात आली आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पुणे विद्यापीठाने गेल्या शनिवारी सादर केलेल्या अर्थसंकल्पास अधिसभेने तत्वत: मान्यता दिली आहे. त्यात विद्यापीठाच्या ठेवी खर्ची पडत असून, ही बाब चिंताजनक असल्याचे दिसून आले. करोनामुळे बँकांनी व्याजदरात मोठी कपात केली आहे. परिणामी, विद्यापीठाच्या ठेवींच्या व्याजापतून मिळणाऱ्या उत्पन्नात मोठी घट झाली आहे. त्याचप्रमाणे गेल्या काही वर्षापासून केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून विद्यापीठाला मिळणारा निधी पूर्णपणे बंद झाला आहे. त्यामुळे विद्यापीठाची आर्थिक स्थिती कोलमडली आहे.

तत्कालीन कुलगुरू डॉ. वासदेव गाडे यांच्या कार्यकाळात अनेक बांधकाम सुरू केली होती. ही कामे निधीअभावी रखडली जाता कामा नये, यासाठी विद्यमान कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी त्यांच्या कार्यकाळात नव्याने कोणतेही बांधकाम हाती घेण्यात येणार नसल्याचा निर्णय घेतला. मात्र रखडलेली बांधकाम प्रकल्प पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यासाठी दरवर्षी बांधकामासाठी विद्यापीठ फंडातून सुमारे ४० कोटींचा खर्च होत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

शासनाकडे विद्यापीठाची वेतनापोटी थकित रक्कम...

पुणे विद्यापीठाने २०१४ साली २१० शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केली होती. मात्र शैक्षणिक अर्हतेच्या तांत्रिक कारणावरून या पदांना राज्य शासनाकडून मान्यता देण्यास चालढकल केली जात होती. अखेर विद्यापीठाने सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर वर्षभरापूर्वी १०० कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यास राज्य शासनाने सुरू केली. अन्य कर्मचाऱ्यांचे वेतन विद्यापीठ फंडातून होत आहे. अशा प्रकारे जवळपास ६० कोटी रुपयांचे खर्च वेतनापोटी विद्यापीठाचे दरवर्षी होत आहे. त्याचप्रमाणे या वेतनापोटी १४४ कोटीचे थकित रक्कम राज्य शासनाकडे असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

ठेवींच्या खर्चाचे स्पष्टीकरण आवश्यक...

उत्पन्न घटल्याने विद्यापीठाने महत्त्वपूर्ण असलेल्या संशोधन प्रकल्पांना निधी कपात करीत कात्री लावली आहे. याउलट विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अतिरिक्त भत्ते सुरूच आहेत. त्यातच विद्यापीठाचे ठेवी निम्म्याने कमी होणे ही बाब चिंताजनक आहे. त्यामुळे ठेवीच्या रकमा कोणत्या कारणासाठी वापरले गेले, याचे स्पष्टीकरण विद्यापीठाने द्यावे, अशी मागणी अधिसभा सदस्य संतोष ढोरे यांनी केली आहे.

प्रभात Sun, 28 March 2021
https://epaper.eprabhat.net/c/59403323

News Paper Clippings During March 2021

Section: Education

लोकमत

संशोधन योजनांच्या निधीला कात्री

विद्यापीठाच्या ठेवी गेल्या कुठे ; ॲस्पायर, आविष्कारला फटका

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सुरू केलेल्या विविध योजनांच्या निधीली कात्री लावल्याची माहिती समोर आली आहे. विद्यापीठाच्या उत्पन्नात घट झाल्याने ॲस्पायर, आविष्कारसारख्या योजनांचा निधी कमी केला आहे. सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधनाला प्राधान्य दिले जात असताना पुणे विद्यापीठाने संशोधनासाठी दिल्या जाणाऱ्या निधीत तब्बल २ कोटी २० लाखांची कपात केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या ठेवी गेल्या कुठे? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

अध्यापनाबरोबरच संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळेच पुणे विद्यापीठाने देशातील विद्यापीठांच्या क्रमवारीत चांगले स्थान मिळवले आहे. तसेच विद्यापीठातील विभागांसह संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापकांच्या संशोधनाची दखल राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जाते. त्याचप्रमाणे पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आविष्कार स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवला आहे. आविष्कार स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सादरीकरणाबरोबरच अनेक गोष्टी शिकायला मिळतात.

संशोधनाच्या दृष्टीने ॲस्पायर योजनासुध्दा महत्वाची आहे. मात्र, २०२१-२२ या अर्थसंकल्पात संशोधन योजनांच्या रकमेत गेल्या वर्षाच्या तुलनेत २ कोटी २० लाख रुपयांची कपात केली आहे. यंदा ॲस्पायरसाठी ५ कोटी, आविष्कारसाठी ३० लाख, शैक्षणिक संशोधन समन्वय योजनेसाठी १५ लाख रुपये उपलब्ध करून दिले आले आहेत. त्यामुळे विद्यार्थी व प्राध्यापकांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विद्यापीठाच्या विविध संशोधन योजनांसाठीचा निधी कमी करण्यात आला असला तरी त्याचा परिणाम संशोधनावर होणार नाही, असा दावा विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडून केला जात आहे.

कोट्यवधींच्या ठेवी गेल्या कुठे ?

विद्यापीठाकडे असणाऱ्या कोट्यवधींच्या ठेवी नेमक्या गेल्या कुठे ? याचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. विद्यापीठाने स्थापन केलेल्या कंपन्यांनी विद्यापीठाला निधी उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना विद्यापीठ या कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनावरच विद्यापीठ फंडातील रक्कम खर्च करत आहे, अशी चर्चा विद्यापीठ वर्तुळात केले जात आहे.

संशोधन योजनांसाठीचा निधी

योजना	२०२०-२१	२०२१-२२
ॲस्पायर	७ कोटी	५ कोटी
आविष्कार	४५ लाख	३० लाख
शैक्षणिक संशोधन समन्वय योजना	२० लाख	१५ लाख

- विद्यापीठात पूर्वी मायनर रिसर्च प्रोजेक्ट (एमआरपी) नावाची योजना होती. प्राध्यापकांसह विद्यार्थ्यांमध्येही संशोधनाची आवड निर्माण व्हावी.
- तसेच संशोधन कसे केले जाते हे विद्यार्थ्यांना कळावे, यासाठी प्राध्यापक त्यांना या योजनेअंतर्गत मदत करत होते. परंतु, ही योजना अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षात (आयक्युएसी) वर्ग करून तिला ॲस्पायर नाव दिले. या योजनेअंतर्गत संशोधनासाठी १५ लाखांपर्यंत दिल्या जाणाऱ्या निधीची मर्यादा ५ लाखांपर्यंत कमी करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या आर्थिक उत्पन्नात घट झाल्यामुळे संशोधनात्मक योजनांचा निधी कमी केला आहे,असे कारण सांगितले जात असेल तर विद्यापीठाकडे असणाऱ्या कोट्यवधींच्या ठेवी का मोडण्यात आल्या. तसेच या ठेवींचे काय झाले ? याची सविस्तर खुलासा विद्यापीठाने द्यायला हवा.

- कुलदीप आंबेकर, अध्यक्ष, स्टुडंट हेल्पिंग हॅन्ड

विद्यापीठ नेहमीच तुटीचा अर्थसंकल्प सादर करत असते. त्यामुळे अर्थसंकल्पात भरीव तरतूद करणे गरजेचे आहे. विद्यार्थी व प्राध्यापकांच्या संशोधनाचा निधी कमी करणे योग्य नाही. हा चुकीचा पायंडा आहे.

- प्रा. नंदकुमार निकम, माजी अधिसभा सदस्य

Pune Main
Page No. 2 Mar 28, 2021
Powered by: erelego.com

मॉडर्न चे माजी विद्यार्थी व शिवछत्रपती पारितोषिक विजेते राष्ट्रीय खेळाडू, क्रीडा अधिकारी पुणे महानगरपालिका श्री. सुभाष पुरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.....

Dt: .26.3.2021

आपल्या महाविद्यालयाच्या कार्यालयातील सेवानिवृत्त सहकारी कर्मचारी कार्यालयीन अधिक्षक श्री. आव्हाड सर यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. मॉडर्न महाविद्यालयातील सर्व सहकारी प्रशासकीय कर्मचारी त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे. देव त्यांच्या कुटुंबियांना या दु:खातुन सावरण्याची शक्ती देवो. महाविद्यालयातील सर्व प्रशासकीय कर्मचार्यांच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना

Dt: 28.3.2021

Upcoming Events

April 2021

Sun	Mon	Tue	Wed	Thu	Fri	Sat
				1	2	3
4	5	6	7	8	9	10
11 ***Mahatma Jyotiba Phule Jayanti*** 	12	13	14 ***Dr. Babasaheb Ambedkar Jayanti***	15	16	17
18	19	20	21	22	23	24
25	26	27	28	29	30 ***Rashtrasant Tukdoji Maharaj Jayanti***	



Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.

Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.